# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक १८-०७-१९९१ ते २८-११-१९९१**

**रजिष्टर क्र. १०**

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १७.०७.१९९१ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दिनांक १८ जुलै, १९९१ रोजी मा.सभापती श्री.मो.इस्माईल अ.करीम यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सदस्य उपस्थित होते.**

१. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
२. श्री.भगुरे तुळशीराम छगन
३. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री.विजय गोविंदलाल पालीवाल
५. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
६. श्री.बारवाल गजानन रामकिसन
७. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
८. श्री.सोनवणे केशव काशिनाथ
९. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र.५१ :**

श्री.मतीन काद्री पिता मोईनोद्दीन काद्रीकर निर्धारण अधिकारी यांनी दाखल केलेल्या अपिलावर स्थायी समितीमध्ये चर्चा करणे.

**संवाद :**

**मा.सभापती :** श्री.मतीन काद्री पिता मोईनोद्दीन काद्री करनिर्धारण अधिकारी यांनी दाखल केलेल्या अपिलाबाबत या सभेमध्ये चर्चा करणेसाठी सदरची सभा बोलाविण्यांत आलेली आहे. याबाबत स.सदस्यांनी चर्चा करावी.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** श्री.मतीन काद्री यांनी केलेल्या अपिलाबाबत खुलासा करावा की, मा.आयुक्त यांना संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचा अधिकार आहे काय? जर अधिकार असेल तर कोणत्या नियमाच्या आधारे याची माहिती द्यावी.

**श्री.केशव सोनवणे :** विषयाला सुरुवात होण्यापुर्वी विषयाचा आशय काय आहे ते सर्व स.सदस्यांना समजणे आवश्यक आहे.

**मा.सभापती :** दि.२०.०६.९१ रोजी श्री.मतीन काद्री यांनी स्थायी समितीकडे दाखल केलेले आहे. आणि याच कारणाने मी मा.आयुक्त यांना एक विनंतीपत्र २०.०६.९१ ला दिलेले होते. परंतू संदर्भिय पत्राचे उत्तरही मिळालेले आहे की, ५६/४ प्रमाणे जे पिटीशन आहे. यामध्ये सदरील बाब स्थायी समितीच्या कक्षेत येत नाही. त्यामुळे स्थायी समितीला अधिकार नाही. त्यामुळे स्थायी समितीला अधिकार नाही, केवळ निलंबित करणे किंवा सजा देणे असे नाही आहे.

**श्री.केशव सोनवणे :** नियम ५६/४ मध्ये काय आहे ते सर्वांच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे.

**मा.सभापती :** दि.२७.०६.९१ ला पत्र देवून विचारणा केली आहे की, संबंधित कोर्ट केस बाबत संपूर्ण तपशिलासह माहिती कळविणे आवश्यक आहे. तसेच

दि.०७.०७.९१ ला पत्राने गुन्हा विचारणा केलेली आहे की, माझ्याकडे संबंधित पत्राचे उत्तर लवकरात लवकर कळविणे परंतू कोणत्याही प्रकारचे उत्तर प्राप्त झालेले नाही. यास्तव नाईलाजाने संबंधिता बाबत आजची सभा बोलावण्यात आलेली आहे. व याबाबतचे उत्तर आज मिळालेले आहे. ३.१० वाजता.

**श्री.केशव सोनवणे :** अपिलाची प्रत मा.आयुक्तांना दिलेली होती काय? मग याबाबत उशीर एवढा उशीर होण्याचे कारण संबंधित अधिकाऱ्यांनी स्पष्ट करावे.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करणे आवश्यक आहे.

**श्री.गजानन बारवाल, श्री.प्रभाकर विधाते, श्री.नारायण फत्तेलष्कर, श्री.केशव सोनवणे :** याचा अर्थ असा की, स्थायी समितीला कोणतेही अधिकार नाहीत. असे मा.आयुक्त म्हणत असतील मुंबई प्रांतिक अधिनियम कायदा कशासाठी कोणत्या कारणास्तव बनविलेला आहे. मा.आयुक्तांना निलंबित करण्याचे अधिकार आहेत काय याचा खुलासा व्हावा.

**उपआयुक्त :** सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने हा विषय चर्चेला घेण्यांत येऊ नये. कोणतेही बाब न्यायप्रविष्ट आहे असे समजते तेव्हा त्याबाबत चर्चा मुळीच होता कामा नये. कारण याच प्रकरणावर म्हणजे निलंबित करण्याचा अधिकार आहे किंवा नाही या मुद्यांवर उच्च न्यायालयात प्रकरण निर्णयासाठी पडून असल्याने आपण एखाद्या निर्णय होणे म्हणजे न्यायालयाचचा अवमान करणे होय. तेव्हा निर्णय लागल्यानंतर न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेस येईल. अर्जदार श्री.मतीन काद्री यांनी उच्च न्यायालयात याचिका क्र.१२३४/९१ दाखल करुन स्थायी समिती समोर जे मुद्दे उपस्थित केले आहेत. तसेच न्यायालयामध्ये दाखल केलेल्या याचिकेमध्ये अर्जदाराने मा.आयुक्तांनी दि.२६.०३.९१ रोजी पारित केलेल्या निलंबन आदेशावर स्थगिती देण्याबाबत विनंती केली होती. त्यावर न्यायालयाने सदरील याचिका दाखल करुन घेऊन स्थगिती देण्याचे नाकारले आहे.

**श्री.केशव सोनवणे :** संबंधित अधिकाऱ्यांना कोर्टाचा आदेश आलेला आहे. आणि या महानगरपालिकेमध्ये (content of he court) असल्याने आपण कोर्टाची भाषा वापरणे ठीक नाही. आपण जे सुचविले आहे ते पुर्वीच दिसत होते. यात गैर काय आहे. केवळ आम्हाला कोर्टाची भाषा वापरण्यांत येऊ नये.

**श्री.इकबालसिंग गील :** ज्याप्रमाणे विधी सल्लागार यांचेकडील विधी सहाय्यक म्हणून कार्यरत असलेले कर्मचारी यांना कोर्टाने आदेश दिलेला आहे. त्याप्रमाणे विचारणा करण्यात यावी.

**श्री.केशव सोनवणे :** कोणतीही कोर्ट प्रकरणे स्थायी समितीकडे येणार असे नाही आहे. याबाबत पाहणी करणे आवश्यक आहे. ज्यावेळेस खत्रीनगर येथील वसाहतीची तीस घरे तयार झालेली होती. त्यावेळेस प्रशासन काय करीत होते. याबाबत त्वरीत कार्यवाही का केली नाही. तसेच कर आकारणी करण्याबाबत प्रशासनाला समजले नाही काय?

**उपआयुक्त :** प्रशासनाची याबाबत कार्यवाही चालु आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** ज्यावेळेस खत्रीनगर येथ घरे तयार झालेली होती आणि त्याप्रमाणे संबंधित घरांना कर आकारणी करीत असे पर्यंत आपले प्रशासन काय करीत होते.

**श्री.अलीम बेग :** संबंधितांनी कोर्टाचा आदेश आणलेला असल्याने आता प्रश्नच नाही.

**मा.सभापती :** आयुक्त, स्थायी समिती आणि जी.बी.हे एकच असून सगळ्याचे विरुध्द ते कोर्टात गेलेले आहे. जर त्यांना आपण न्याय दिला तर कोर्टाचा अवमान होणार नाही. या करिता चर्चा करण्यास हरकत नाही. दि.२६.०३.९१ चे जे निलंबिताचे आदेश आयुक्तांनी काढले आहेत ते कोणत्या नियमाधारे काढण्यात आले आहे?

**विधी सल्लागार :** मा.आयुक्त यांनी दि.२६.०३.९१ रोजी संबंधितांवर आदेश काढलेला आहे. यामध्ये कोणत्या प्रकारच्या नियमाखाली सदरचा आदेश निघाला तसे नमूद नाही.

**मा.सभापती :** ठिक आहे. कोणत्या नियमाच्या आधाराने केले व त्यांचा अधिकार काय आहे. ते दिलेले नाही. मग नेमके मुंबई प्रांतिक अधिनियमाचे अधिन राहून सदरील बाब मा.आयुक्तांनी हाताळली असेल की नाही या बाबत आपले मत काय आहे.

**विधी सल्लागार :** मुंबई प्रांतिक अधिनियमाचे कलम ६७ (२) (ब) चा वापर मा.आयुक्तांनी करुन आदेश काढलेला असावा असे दिसून येते. (नियम वाचून दाखविला)

**श्री.गिरजाराम हाळनोर :** मा.सभापती विधी सल्लागारांनी सुचविल्यानुसार ६७ (२) (ब) असे नियमावलीत नसून ६७ (३) (ब) असे आहे. तेव्हा दुरुस्ती व्हावी.

**मा.सभापती :** याबाबत खुलासा व्हावा.

**विधी सल्लागार :** ठिक आहे. मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (३) (ब) असा नियम आहे. यानुसार आयुक्तांना त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचारी यांच्या कामावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार आहे. व त्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही केली आहे.

**श्री.केशव सोनवणे, श्री.अलिम बेग :** सदरच्या नियमात नेमके काय आहे. या बाबतची माहिती स्पष्ट व्हावी आणि यासाठी फॉमॉलिटीज् काय आहेत तेव्ही समजणे आवश्यक आहे. म्हणजे मा.आयुक्तांना एवढ्या कर्मचाऱ्यांना डायरेक्ट निलंबित करता येते काय? याबाबत काही निर्णय घेणे आवश्यक आहे काय?

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** माझ्या मते मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमावली नुसार मा.आयुक्तांना रु.४००/- च्या पगारावरील कर्मचाऱ्यांना निलंबित करता येत नाही. असे आहे.

**विधी सल्लागार :** कलम ५६ मध्ये दिलेले आहे. त्यानुसार स्थायी समितीला माहिती देणे आवश्यक आहे. अशाच प्रकारची केस नागपूर मनपामध्ये झालेली आहे.

**श्री.अलीम बेग :** आम्हाला इतर मनपाशी काही घेणे नाही औरंगाबाद महानगरपालिका नियमाप्रमाणे काय आहे ते स्पष्ट करावे.

**श्री.केशव सोनवणे :** संबंधित अधिकारी यांना दिलेल्या आदेशाचे मा.आयुक्त यांचा स्पष्टपणे खुलासा दिसत नाही.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** आजच्या बैठकीतील विषयानुसार याबाबतची माहिती आजच का दिली गेली. यापुर्वी देता आली नाही काय?

**श्री.गजानन बारवाल :** मा.आयुक्तांना निलंबन करण्याचे अधिकार आहेत काय? जर केलेली असेल तरीही स्थायी समितीला याची माहिती दिली गेली नाही. म्हणजे हा अपमान होय असे समजणे योग्य राहील.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी सुचविल्यप्रमाणे या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यास कोणत्या आधारे निलंबित केले ते प्रशासनाने दाखविणे स्पष्ट आहे. याच बाबतीत मी तीन वेळेस पत्राने सुध्दा विचारणा केलेली आहे.

**विधी सल्लागार :** नियम ६७ (३) (ब) मध्ये माहिती दिलेली आहे. (पुन्हा वाचून दाखविली)

**मा.सभापती :** ठिक आहे. आपण माहिती दाखविलेली आहे.

**श्री.गजानन बारवाल :** याबाबत संबंधितावर नैसर्गिक आपत्ती म्हणून या विषयावर निर्णय घेणे आवश्यक आहे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** आता नवीन मा.आयुक्त आलेले आहेत. त्यांनी खत्री नगर प्रकरणाबाबत कर्मचारी आणि अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन त्यांचेवर कार्यवाही करणे बाबत पत्राने कळवावे. पान क्र.३ मध्ये दर्शविलेले आहे की, उप आयुक्त यांना मंजूरी घ्यावी लागली असे आहे. (सदरील बाब वाचून दाखविले)

**मा.उपआयुक्त :** याच संदर्भात मी मागील सर्वसाधारण सभेमध्ये खुलासा केलेला आहे की, प्रत्येक फाईली कर आकारणी विभागाच्या माझ्याकडे येतात. परंतू त्या फाईलीमध्ये कर आकारणी संदर्भात कोणत्या घराचा कर अधिकृत ते मी पहात नाही. या सर्व बाबतीत संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी करुन मगच माझ्याकडे फाईल ठेवावी असे आहे. दररोज माझ्याकडे हजारो फाईली येतात. मग मी कुणीकडे लक्ष केंद्रीत करु प्रत्येक फाईलीची पान न पान पाहणे मला एकट्याला शक्य नाही. केवळ अधिकाऱ्यांनी त्यांच्या जबाबदारीने सर्व कामाची पाहणी करुनच माझ्याकडे स्वाक्षरीस्तव पाठविणे योग्य असते (याबाबत आरोपास आरोप लावणे असल्यास आपण जरुर लावावे.)

**श्री.गजानन बारवाल :** प्रत्येक फाईली उप आयुक्तांकडे येतात मग त्या वेळेस पाहणी का केली नाही.

**मा.उपआयुक्त :** संबंधित विभागाकडील फाईल केवळ (हेअरींग) आक्षेपाबाबत आलेल्या आहेत काय याचा पाहणी केली जाते व सुनावणी करुन प्रकरण नियमानुसार अंतिम केले जाते. खत्रीनगर प्रकरणामध्ये असे झाले नाही.

**श्री.केशव सोनवणे :** शहरातील ज्या कर आकारणी संदर्भात फाईली येतात. त्या सर्वांची आपण पाहणी करीत नाही काय?

**श्री.अलीम बेगम :** शहरातील कोणतेही घरे Legal की Illegal आणि परवानगी धारक आहेत की विना परवानगी धारक आहेत. ती बाब आपल्या कक्षेत नाही काय?

**मा.उपआयुक्त :** संबंधित फाईलवर त्या विभागाकडून आलेल्या अभिप्रायानुसारच समजू शकते की, शहरातील कोणत्या घरांना अधिकृत व अनधिकृत कर आकारणी केल्या जाते.

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.नारायण फत्तेलष्कर :** संबंधित फाईल नगररचना विभागाकडून आलेली नाही काय, संबंधित आलेल्या अधिकाऱ्यांनी याबाबत अहवाल दिलेला आहे काय? याची माहिती बैठकीत देण्यात यावी. कोणत्याही आरक्षित जागेवर कर आकारणी करणे योग्य आहे काय?

**मा.सभापती :** आरक्षित साईटच्या संदर्भात मागील सर्वसाधारण सभेमध्ये सर्व्हे नं.१७ बाबत चर्चा झालेली होती. त्यावर सदरची जमीन भूसंपादित (Acquire) न करता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत यावा असे झालेले आहे. सदरच्या प्रकरणाबाबत जे आरक्षित साईट आहेत. त्या साईटवरील जागेवरील घरांना

घर आकारणी केलेली आहे. अशा अधिकाऱ्यांवर आपण कार्यवाही केलेली आहे काय? अशा प्रकारची फाईल्स नगर रचना विभागाकडून यावी असे आदेश आहेत काय?

**विधी सल्लागार :** दि.२६.०४.९१ ला याबाबतचा आदेश देण्यांत आलेला आहे. यामध्ये कर आकारणी करीत असतांना कर कोणत्या प्रॉपर्टीवर कसा आकारावा याबाबत आदेशात स्पष्ट नमूद केलेले आहे की, (Legal/illlegal) जागेवर कर आकारणी करावे किंवा नाही मा.आयुक्तांनी सुचना केलेल्या आहेत.

**मा.सभापती :** यापुर्वी कधी अशा प्रकारची (Instruction) सुचना दिलेली होती काय?

**विधी सल्लागार :** नाही तशी माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांना दि.२६.०४.९१ च्या पुर्वी निलंबित केलेले आहे काय? आणि निलंबनाच्या पुर्वी संबंधितांना काही सूचना दिलेल्या होत्या काय?

**विधी सल्लागार :** संबंधित अधिकाऱ्यांना दि.२६.०४.९१ रोजीच निलंबनाचे आदेश काढलेला आहे.

**श्री.गजानन बारवाल :** माझ्या वार्डामध्ये जर पाहणी करावयाचे ठरविल्यास आपल्याला आढळून येईल की, येथे बरेचशे कामे अयोग्यरित्या होतात. आणि याबाबतची कित्येकदा सुचना देवूनही संबंधित अधिकारी / कर्मचारी कोणतीही कार्यवाही करीत नाहीत. बऱ्याचशा ठिकाणी आरक्षित जागा आहेत. त्यावर स्टे आहे. परंतू त्यावरही कामे सतत चालू आहेत. यामध्ये महानगरपालिकेतील संबंधित इमारत निरिक्षक, आणि जबाबदार अधिकारी हे दोषी असून संबंधितांनाही निलंबित करण्यात यावे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** माझ्या वार्डातील काचीवाडा भागात प्रत्यक्षात पाहणी करावी बरेचशे अयोग्य रित्या घरांची कामे घेत आहेत. मी संबंधित अधिकाऱ्यांना विनंती अर्ज दिलेले आहे. त्यावर काहीही होत नाही. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्यांत यावे.

**श्री.इकबालसिंग गील :** संबंधित अधिकाऱ्यांवर जे आरोप करुन निलंबित केलेले आहे. त्या संदर्भात मी श्री.मतीन काद्री यांनी स्थायी समितीकडे दाखल केलेल्या अपिलाच्या काही पत्राद्वारे मी आपले सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो. ते पहावे सदरील अपिल पत्रातील पान क्र.८ मध्ये शासनाचे उप सचिवांचे पत्र क्र.एम.एम.आर./२५७१/५०२५२/एन/नगर विकास विभाग/मंत्रालय मुंबई दि.१६ फेब्रुवारी १९७२ अन्वये शासनाने आदेश काढलेला आहे की, (इंग्रजी अनुवाद वाचून दाखविला) यानंतर पान क्र.९ मध्ये श्री.सतिष त्रिपाठी, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये प्रशासन म्हणून असतांना शासनाचा आदेश क्र.एम.एम.आर /२५७१/५०२५२/एन/दि.१६.०२.१९७२ अधिन राहून संमती असल्याचे दि.१८.०१.१९८३ च्या पत्राद्वारे स्पष्ट दिसते. (इंग्रजी अनुवाद वाचून दाखविला) परंतू मनपा/विधी/४१२/९१, दि.२६.०४.९१ अन्वये आयुक्तांना मालमत्ता कर, घर बांधणी आणि जागेबाबत मनपा कर निर्धारण अधिकारी - १ व २ यांचेसाठी सुचना अध्यादेश काढण्यात आला. (इंग्रजी अनुवाद वाचून दाखविला) त्याचप्रमाणे पान क्र.१३ मध्ये शहरातील एकूण १८ भागातील अनधिकृत जागेवर, आरक्षित जागेवर घरे बांधलेली आहेत. त्या सर्वांना मलमत्ता कर लागू करण्यांत आलेला आहे. म्हणजे सन १९८३ पासून १९९० पर्यंत मालमत्ता कराच्या संबंधी कोणताही बदल वा अध्यादेश निघालेला नाही.

**मा.सभापती :** सर्व्हे नंबर १७,७ आणि ८ गारखेडा येथे बरेचशे अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. आणि तेथील जागा आरक्षित झोनमध्ये येते. परंतू तेथील आरक्षित असलेल्या साईटवर सुध्दा घरांना कर आकारणी करण्यांत आलेली आहे. तेव्हा त्यांच्यावर काही कार्यवाही करण्यांत आली आहे काय, या संदर्भात मा.उपआयुक्तांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, अद्याप कुणावरही कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

**श्री.इकबालसिंग गील :** अपिलातील पान क्र.१७ पहावे यामध्ये गोपनिय पत्र श्री.मतीन काद्री यांना मनपा, आयुक्तांनी दि.२६ मार्च, ९१ रोजी दिलेले आहे. त्या पत्रातील शेवटच्या परिच्छेदामध्ये असे दर्शविलेले आहे की, उपआयुक्तांना संबंधीत कर आकारणी बाबत पुर्ण अधिकार देण्यांत आलेले आहेत. तर पान क्र.३ च्या शेवटच्या परिच्छेदामध्ये व पान क्र.४ चा पाहिला परिच्छेद यामध्ये संबंधितांनी असे कळविले की, उप अभियंता या पदावर आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद हे मला पदोन्नती देत नव्हते म्हणून मी उच्च न्यायालय, औरंगाबाद यांचेकडे याचिका क्र.१८२७/८८ व २४४३/८९ या द्वारे न्याय मागणीसाठी दाखल केली गेली होती व तसेच उच्च न्यायालयाला डावलून इतर कनिष्ठ अभियंतांना दिलेल्या पदोन्नतीवर स्थगिती आणली होती. यावर मा.आयुक्तांनी अंमलबजावणी न केल्याने पुन्हा याचिका संबंधितांनी दाखल केली व नंतर न्यायालयाच्या आदेशान्वये उप अभियंता पदावर पदोन्नती मिळाली. यामध्ये असे निदर्शनास येते की, न्यायालयात मी प्रशासनाविरुध्द भांडल्याने जाणून बुजून सुडबुध्दीने खत्रीनगर प्रकरणी निलंबित केले असे आहे. याबाबत सर्वांनी विचार करावा.

**श्री.केशव सोनवणे :** सर्व स.सदस्यांनी आपआपले मत या विषयी मांडलेले आहेत. तेव्हा मा.सभापतींनी योग्य तो निर्णय देण्यांत यावा.

**मा.सभापती :** १) श्री.मतीन काद्री, कर निर्धारण अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी दि.२०.०६.९१ रोजी एक अपिल दाखल केलेले आहे. यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, मला निलंबित केले आहे ते योग्य नाही. याबाबत मला स्थायी समितीकडून योग्य तो न्याय मिळावयास पाहिजे. जर मला स्थायी समिती सभेकडून न्याय मिळत असल्यास मी कोर्टामध्ये जे अपिल दाखल केलेले आहे. ते परत घेण्यास तयार आहे.

२) तसेच सदरचे अपिल आल्यानंतर मी अध्यक्ष स्थायी समिती महानगरपालिका म्हणून मा.आयुक्त कडे माहिस्तव माहिती मागितली की, आपण जे मनपा/एसी-१/सिआर/२०/९१/१/८९, दि.२६ मार्च ९१ अन्वये श्री.काद्रींना निलंबनाचे आदेश दिलेले आहेत. याविरुध्द श्री.मतीन काद्री यांनी स्थायी समितीकडे न्यायासाठी अपिल केलेले आहे. आणि अपिलाच्या प्रति सर्व स.सदस्यांना वाटप केलेल्या आहेत. याच संदर्भात स्थायी समितीकडे संबंधित बाबतीत सविस्तर माहिती द्यावी असे सभापती स्थायी समिती यांचेकडील पत्र क्र.मनपा/सभापती/६०/९१, दि.२०.०६.९१ अन्वये अशी विचारणा केली.

३) संदर्भातील पत्राचे उत्तर उपआयुक्त, महानगरपालिका यांनी त्यांचे पत्र क्र.मनपा/अस्था/२४३७/९१, दि.३१.०६.९१ अन्वये दिले. यामध्ये त्यांनी असे सांगितले आहे की, संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करणे म्हणजे सजा देणे असे नाही. तर नियम ५६/४ अन्वये संबंधित अधिकाऱ्यांचे प्रकरण

न्यायप्रविष्ट असल्याने याबाबत कोणताही विचार करण्यांत येऊ नये व स्थायी समिती सभेने याबाबत चर्चा करु नये.

४) तेव्हा पुन्हा दि.२७.०६.९१ रोजी सभापती/मनपा/७०/९१ च्या पत्रान्वये विचारणा करण्यात आली की, मी परिच्छेदाप्रमाणे माहिती मागविली. स्थायी समितीच्या अधिकाऱ्यांबाबत विचारणा केलेली नाही. तर श्री.मतीन काद्री यांनी दाखल केलेल्या अपिलाबाबत आपले काय मत आहे. त्याची माहिती द्यावी. याबाबत दि.०७.०७.९१ पर्यंत कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही.

५) आणि पुन्हा सभापती/मनपा/८९/९१ अन्वये मा.आयुक्तांना पत्र लिहिले व त्यामध्ये असे दर्शविले की, दि.२७.०६.९१ चे आम्ही पाठविलेले पत्राचे उत्तर अद्यापही मिळालेले नसून दि.०८.०७.९१ रोजी पुन्हा एक पत्र पाठवून सुचित केले की, संबंधित पत्राचे उत्तर आपणाकडून तीन दिवसाचे आत आले नाही तर स्थायी समिती सभेमध्ये या संदर्भात योग्य तो निर्णय घेण्यांत येईल.

६) त्यानुसार दि.१८.०७.९१ रोजी स्थायी समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे.

७) व ही बैठक सुरु होण्यापुर्वी कोणत्याही प्रकारचे उत्तर मिळालेले नाही. तर आता केवळ सभा सुरु होतांना अंदाजे ३.२५ मिनीटांनी प्रशासनाकडील उत्तर मिळालेले आहे. यामध्ये असे सुचविले आहे की, संबंधित प्रकरण न्यायप्रविष्ट असून उच्च न्यायालयामध्ये हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून उच्च न्यायालयामध्ये हे प्रकरण निर्णयासाठी पडून असतांना आपण निर्णय घेणे म्हणजे न्यायालयाचा अवमान होय याबाबत कोणतीही चर्चा अथवा निर्णय घेण्यांत येऊ नये.

८) त्यानंतर सभेला सुरवात झाली यामध्ये सर्व स.सदस्यांनी आपआपले मत प्रकट केले. त्यांनी सुचविल्यानुसार औरंगाबाद शहरामध्ये हजारो घरे अनधिकृत झालेली आहेत. बांधलेली आहेत. ती घरे कशाप्रकारे झालीत. याबाबतची माहिती कधीही दिलेली नाही. व केली गेली तर तशा अधिकाऱ्यांना निलंबित केलेले नाही.

९) दुसरे असे की, कर आकारणी करण्यापुर्वी कर आकारणी करणे योग्य आहे काय? याबाबत दि.२६.०४.९१ च्या प्रशासनाच्या आदेशापुर्वी असे काहीही सुचित केलेले नाही की, आरक्षित जागेवरील बांधकामे अधिकृत/अनधिकृत असल्यास कर आकारणी करावे असे दिसत नाही.

१०) या मुद्यावर स.सदस्य श्री.गील यांनी सुचविल्याप्रमाणे महाराष्ट्राचे नगर सचिव यांचे पत्र वाचून दाखविले की, अधिकृत/अनधिकृत घराचे करण आकारणी करण्यांत यावी. त्याचप्रमाणे पान क्र.९ मध्ये सुचविल्यानुसार त्यावेळेस सन १९८२ मध्ये मनपा अस्तित्वात आली व दि.०८.१२.८२ रोजी मनपा अस्तित्वात आली व दि.०८.१२.८२ रोजी मनपा प्रशासक म्हणून श्री.त्रिपाठी यांनी सुत्रे स्विकारली दि.१६.०२.७२ च्या शासन धोरणानुसार एक प्रस्ताव संमत करण्यांत आलेला आहे की, औरगाबाद शहरामध्ये पुर्णपणे अधिकृत/अनाधिकृत घरे झालेली आहेत. त्या सर्व जमीन घरांची सुधारणा करुन कर आकारणी करण्यांत यावी. पुढे स.सदस्य श्री.गिल यांचे म्हणणे आहे की, ज्या अनिधकृत आरक्षित झोनमध्ये कर आकारणी करण्यांत आलेली आहे. त्याचप्रमाणे सन १९९०-९१ वर्षी सुध्दा कर आकारणी

करण्याबाबत मा.आयुक्त यांचेकडून कोणत्याही प्रकारची अशीच हालचाल झाल्याचे दिसून येत नाही.

११) सन १९८३ ते २६.०४.९१ पर्यंत कोणतेही नवीन कर लावण्याचे आदेश नाहीत. याचाच अर्थ असा की, श्री.मतीन काद्री यांनी तसे काहीही केलेले नाही.व संबंधितांना केवळ याच कारणाने निलंबित केले आहे. कर आकारणी करण्यापुर्वी ही पॉलिशी आलेली नाही.

१२) श्री.काद्री यांना मा.आयुक्त यांनी निलंबित केले ते कोणत्या नियमाच्या आधारे ते यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले नसून विधी सल्लागार यांनी सांगितले की, ५६/३ स्पष्ट असे नाही. तर रु.२०० ते ४००/- वरील पगार असणाऱ्या कर्मचाऱ्यांना निलंबित करता येत नाही.

१३) त्याप्रमाणे नियम ६७/३ (ब) नुसार विधी सल्लागार यांनी सुचविले की, असे काहीही दिसून येत नाही की, मा.आयुक्त यांना निलंबन करता येते. तर कर्मचारी अधिकारी यांचेवर नियंत्रण ठेवता येऊ शकते. असे आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.मतीन काद्री पिता मोईनोद्दीन काद्री कर निर्धारण अधिकारी, यांनी दाखल केलेल्या स्थायी समिती सभेतील अपिलावर, संबंधित अर्जदारावर करण्यात आलेल्या आरोपांची संपूर्ण चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी नेमण्यात आलेला आहे. या समितीमार्फत तीन महिन्याच्या आत चौकशी करुन सदरील अहवाल स्थायी समितीकडे पाठवावा. तोपर्यंत त्यांचे निलंबन रद्द करुन त्यांचे मुळ विभागात कर निर्धारण अधिकारी या पदावर रुजू करुन घेण्यांत यावे. असे सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याबरोबर आजची सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २२.०७.१९९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**
**सोमवार दिनांक २२ जुलै, १९९१ रोजी मा.सभापती श्री.मो.इस्माईल अ.करीम यांच्या अध्यक्षतेच्या खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

१. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
२. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
३. श्री.जावेद हसन खाँन कसीम हसन खाँन
४. श्री.विजय गोविंदलाल पालीवाल
५. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
६. श्री.भगुरे तुळशीराम छगन
७. श्री.बारवाल गजानन रामकिसन
८. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
९. श्री.सोनवणे केशव काशिनाथ
१०. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र.५२/१ :**
दिनांक ०६.०७.१९९१ च्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>**संवाद :**</u>

**श्री.अलिम बेग :** मागील सभेतील इतिवृत्तातील पान क्र.३० मध्ये वाहन चालकांना जादा वेळेत काम केल्याचा अतिरिक्त भत्ता देण्यांबाबत मा.महापौर, आयुक्त, उपमहापौर आणि सभापती अशा चालकांसाठी दर्शविण्यांत आलेला आहे. सदरच्या वाक्यात तसे नसून याबरोबरच उपआयुक्त, विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा आणि विद्युत आदि वाहने चालकांसाठी अशाच प्रकारचा फायदा देण्यासाठी नोंद करुन दुरुस्ती करण्यांत यावी.

**मा.सभापती :** ठिक आहे, मागील सभेच्या इतिवृत्तांत स.सदस्यांनी सुचविल्यानुसार नोंद झालेली नाही. तेव्हा नागरिकांच्या सेवेसाठी काम करणाऱ्या महानगरपालिकेतील विभागातील वाहन चालकांना उदा. महापौर, उपमहापौर, सभापती, विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, आयुक्त, उपआयुकत, शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता, आणि कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा तसेच विद्युत या अति जलद सेवा करणाऱ्या विभागातील वाहन चालकांना "विशेष बाब" म्हणून रु.२/- ऐवजी रु.४/- प्रति घंटा वाहन भत्ता मंजूर करण्यांत यावा.

**श्री.इकबालसिंग गील :** मागील सभेतील पान क्र.२३ मधील विषय क्र.३७/१९ जो प्रस्ताव मंजूर करण्यांत आलेला आहे. सदरील प्रस्तावातील कामास संबंधित गुत्तेदारांनी काम करण्यांस नकार दिलेला आहे. यापुर्वी सदरील प्रस्ताव रिकॉल झालेला असून दोन्हीही गुत्तेदारांनी काम करण्यास नकार दिलेला आहे. याबाबत पुढील कार्यवाही काय याची माहिती घ्यावी.

**मा.सभापती :** संबंधित प्रस्ताव किती वेळेस रिकॉल करण्यात आला याची माहिती अधिकाऱ्यांनी द्यावी.

**श्री.केशव सोनवणे :** सदरील प्रस्तावाचे काम ए-१ वर करण्यांत यावे. नसता पुन्हा रिकॉल करण्यांत यावे.

**उपअभियंता स्लम :** संबंधित प्रस्ताव तीन वेळेस रिकॉल झालेला असून संबंधित गुत्तेदारांनी निविदातील दर दाखविलेले आहेत. तेव्हा ते त्यांना परवडणारे नाही असे दिसते. करिता काम करण्यास नकार देत आहेत. व सदरील काम बऱ्याच दिवसापासून पडलेले आहे.

**मा.उपआयुक्त :** मुख्य लेखापरिक्षकांनी खुलासा करावा.

**मुख्य लेखापरिक्षक :** स्थायी सभेतील निर्णयानुसार ए-१ वर कार्यवाही करण्याचे सुचविल्यास हरकत नाही.

**मा.सभापती :** संबंधित प्रस्तावातील काम हे बऱ्याच दिवसापासून मंजूर होऊनही पडलेले आहे तेथील कामाची तत्परता लक्षता घेता जे गुत्तेदार महानगरपालिकेचे भत्ते घेऊ शकेल याचा विचार करतील, अशा गुत्तेदाराकडूनच काम करुन घ्यावे व सदरील काम हे शिघ्रगतीने करण्यास (Preority basis) हरकत नसावी.

**श्री.अलीम बेग :** मोंढा येथील ड्रेनेज लाईनच्या कामाबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी अद्यापही काहीही केलेले नाही. तेथील काम अजूनही पडून आहे. याचे कारण काय?

**मा.उपआयुक्त :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी सुचविल्यानुसार मोंढा येथील ड्रेनेज लाईनच्या संदर्भात ३०० मी.मी.व्यासाची लाईन टाकणे बाबत सुचविले होते. परंतू पुढे काही कारणास्तव ती लाईन न टाकता ६०० मी.मी.व्यासाची लाईन टाकणे संबंधी कार्यवाही झाली. आणि ती सुध्दा न टाकता संबंधित गुत्तेदाराकडून आतापर्यंतही काहीही झालेले नाही. याची माहिती द्यावी.

**उप अभियंता, ड्रेनेज :** संबंधित कामाचे बाबत त्वरीत कार्यवाही करण्यांत येईल. परंतू संबंधित कामाचे टेंडर कॉल करावे लागेल.

**मा.सभापती :** १०% कमी दराचे कामास स्थायी समितीने मंजूरी दिल्यानंतरही आपण कामास सुरुवात का केलेली नाही. याचा अर्थ असा स्पष्ट होतो की, स्थायी समितीने दिलेल्या निर्णयावर आपण बंधनकारक नाही. असे यावरुन दिसून येते. कोणत्याही प्रस्तावासंबंधी स्थायी समितीने दिलेला निर्णय हा अंतिम व बंधनकारक समजला जावा व त्याप्रमाणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यात कोणताही बदल होता कामा नये. मोंढा भागातील ड्रेनेज लाईन बाबत ६०० मी.मी.व्यासाची लाईन टाकणे संदर्भात अंदाजपत्रकास आगाऊ मंजूरी दिलेली होती. सदरील काम हे अति महत्वाचे असल्याने कामाची तत्परता लक्षात घेता कामास गति मिळणे आवश्यक आहे.

**श्री.केशव सोनवणे :** कोणत्याही कामाचे बाबतीत मंजूरी मिळाल्यानंतर त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** सभेतील अजंड्यातील विषयातील अति महत्वाच्या प्रस्तावानुसार सर्व स.सदस्यांनी सुचना केल्यानंतरच मंजूरी मिळत असते. आणि त्यानुसार कामास सुरुवात करण्यास हरकत नाही.

**श्री.केशव सोनवणे :** जे काम संबंधित गुत्तेदाराकडून करवून घेण्यास मंजूरी दिलेली असतांना पुन्हा टेंडर कॉल करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यापेक्षा काही अटी

बाबत करार करण्यांत यावा. परंतू त्याच कामाच्या संदर्भात पुन्हा टेंडर कॉल करणे योग्य नाही.

**मा.सभापती :** सदरचे काम अति महत्वाचे असल्याने संबंधित अंदाजपत्रकास आगाऊ मंजूरी दिलेली होती. त्याप्रमाणे कामास सुरुवात करणे आवश्यक आहे.

**श्री.प्रभाकर विधाते :** माझ्या वार्डातील ड्रेनेज लाईनच्या कामाबाबत स्वेच्छा निधीतून काम करण्याबाबत दि.२१.०२.९१ रोजी पत्र दिलेले होते. परंतू याबाबत अद्यापही काहीही कार्यवाही झालेली नाही. याचे कारण काय?

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**ड्रेनेज उपअभियंता :** मला याबाबत कल्पना नसून स.सदस्यांचे पत्र आले त्यावेळेस मी या विभागात कामास नव्हतो. तेव्हा याबाबत संबंधित पत्राची पाहणी करुन कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** आपण संबंधित अधिकारी असून अशा प्रकारचे वक्तव्य सभेमध्ये करणे योग्य नाही. आपण आपल्या विभागातील कनिष्ट अभियंता यांचेकडून विचारणा करुन माहिती घेऊ शकता कोणताही अधिकारी बदली झाल्यानंतर त्यांना पुर्वी काय झाले याचे माहिती विभागात नसते काय? तेव्हा अगोदर पाहणी करुन नंतर कार्यवाही करण्यांत येईल असे सुचवावयास पाहिजे होते. या संदर्भात पुढील बैठकीत अंदाजपत्रकासहीत सूंपर्ण कामाचा तपशिल सादर करुन कामास सुरवात करावी. कोणतेही अति महत्वाचे कामाची तत्परता लक्षात घेता कार्यवाही व्हावी.

**मा.उपआयुक्त :** स.सदस्यांनी सुचविल्यानुसार कोणत्याही वार्डातील स्वेच्छा निधीतून करावयाच्या कामाबाबत (Procedure) प्रोसीजर तयार करुन कामास सुरवात करावी व स्थायी समितीच्या सभेमध्ये सविस्तर माहिती तात्काळ दाखवावी. म्हणजे वारंवार प्रश्न उपस्थित होणार नाहीत.

**श्री.केशव सोनवणे :** स.सदस्यांनी दिलेल्या पत्राला जवळपास पांच महिन्याचा कालावधी लोटला असून अद्यापही प्रोसीजर तयार झालेले दिसत नाही.

**श्री.प्रभाकर विधाते :** अशाच प्रकारचे माझ्या वार्डाच्या संदर्भात कामाबाबत दिनांक २१.११.९० ला पत्र देवून विचारणा केली. संबंधित स्थळी प्रत्यक्षात पाहणी करुन कार्यवाही करावी. परंतू अद्यापही काहीही झालेले नाही.

**उप अभियंता, ड्रेनेज :** संबंधित बाबतीत मला मुळीच कल्पना नाही. कारण त्यावेळेस मी या विभागात कामास नसल्याने पुरेशी माहिती मला नाही.

**मा.सभापती :** आपल्या बोलण्यावरुन असे स्पष्ट होते की, आपल्या विभागातील कामाच्या संदर्भात यापुढे कनिष्ठ अभियंता यांनी सभेमध्ये बोलवावे लागेल. स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाची माहिती पुढील बैठकीत सादर करावी.

**श्री.गजानन बारवाल :** माझ्या वार्डात बरेचशे लाईट बंद अवस्थेत आहे. या संदर्भात वेळोवेळी कळवूनही कोणतीही कार्यवाही झालेली दिसत नाही.

**श्री.प्रभाकर विधाते :** माझ्या वार्डामध्ये "स्वेच्छा निधीतून" लाईट बाबतची व्यवस्था करणे बाबत पत्राने संबंधित विभागास कळविले आणि अद्यापही काम झालेले नसून माझ्या निदर्शनास आले की, पगारीया इंटरप्राईजेस, या एजन्सीने रुपये १२ (बारा) हजाराचे काम करण्यापुर्वीच उचलून घेतलेले आहेत. म्हणजे याचा अर्थ काय समजायचा?

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**विद्युत उपअभियंता :** संबंधित काम चालू असून या कामाबाबत ट्युब्स नसल्याने त्वरीत कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.तुळशीराम भगुरे :** माझ्या वार्डातील बरेचशे विद्युत दिवे बंद अवस्थेत आहेत. याबाबत कोणतेही कार्यवाही दिसत नाही.

**मा.सभापती :** स.सदस्यांने कोणत्याही विभागात त्याचे वार्डातील समस्यांबाबत पत्राने विचारणा केली जाते त्यावेळी त्यांचे पत्राचे उत्तर संबंधित विभागाकडून कार्यवाही झाली किंवा नाही तसे उत्तर देणे आवश्यक आहे. ज्यामुळे स.सदस्यांचे समाधान होते व अशाप्रकारे सभेमध्ये कोणतेही प्रश्न उद्‌भवू शकत नाहीत. शहरातील लाईट प्रश्नाबाबत टेंडर मागविण्यांत आलेले आहेत. त्यानंतर त्वरीत कार्यवाही करण्यांत यावी.

**श्री.केशव सोनवणे :** मला कळाले की, जलनि:सारण मंडळास प्रतिवर्षी रु.३१ लाख ३ एम.एल.डी.पाणी घेण्याच्या संदर्भात करार करण्यांत आला आहे व त्यानुसार तीन (३) महिन्यासाठीचे आगाऊ रक्कम सुध्दा भरण्यांत आलेली आहे. परंतू मागील महिन्यांत ८० एम.एल.डी.पाणी सिडको हडको भागासाठी देण्यांत आले. वाढीव पाणी मिळूनही इतके कमी प्रमाणात पाण्याचा पुरवठा का होतो. क्रांतीचौक आणि दिल्लीगेट येथील टाक्यावरुन पाणी जादा सिडको/हडको भागासाठी पुरविल्या जात नाही. म्हणून पुन्हा नागरिकांच्या तक्रारी वाढतात. याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :** परिसर अभियांत्रिकी कार्यालय, पाणी पुरवठा संदर्भात पंपींगचे काम पाहत असते.

**श्री.केशव सोनवणे :** मागील महिन्यात ८० एम.एल.डी.पाणी मिळत होते. याबाबतची आपल्याकडे काही माहिती उपलब्ध आहे काय?

**मा.सभापती :** संबंधित कार्यालयास याबाबत पत्राने विचारणा करावी.

**उपअभियंता, पाणी पुरवठा :** या संदर्भात कार्यवाही करण्यांत येईल. परंतू क्रांतीचौक येथील पाण्याच्या टाकीवरुन कमी जास्त पाणी घेत असते काय याबाबतची देखरेख सतत होत असते.

**श्री.केशव सोनवणे :** पाणी पुरवठा संदर्भात महानगरपालिकेकडून नेहमी चुका होत असतात याचा अर्थ काय?

**उपअभियंता, पाणी पुरवठा :** दररोज १०.३० पर्यंत पाणी सोडण्याचे काम चालु असते. यामध्ये शहरासाठी तसेच सिडको/हडको भागातील पाणी पुरवठ्याचा समावेश आहे.

**मा.उपआयुक्त :** महानगरपालिका, परिसर अभियांत्रिकी या कार्यालया बरोबर पाणी पुरवठा संदर्भात जो करार झालेला असेल त्या अनुषंगानेच शहरासाठी पाणी पुरवठा दररोजच्या होत राहावा. व यासाठी महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने दक्षता घ्यावी. जर पाणी कमी/जास्त होत असल्यास तसे निदर्शनास आणून द्यावे. परंतू शहरातील पाणी पुरवठ्याबरोबरच सिडको हडको भागातही पाणी पुरवठा व्यवस्थीत होतो किंवा नाही याची सतत पाहणी करावी.

**श्री.केशव सोनवणे :** पाणी पुरवठा कधी कधी व्यवस्थीत होत नाही. याबाबत नेहमी देखरेख ठेवून कार्यवाही करीत राहणे.

**मा.सभापती :** महानगरपालिका कार्यालयाकडे मिटर आहेत काय? ज्यामुळे परिसर अभियांत्रिकी यांच्याकडून होणारा पाणी पुरवठा दररोजचा किती होतो याचा अंदाज घेणे शक्य होईल. आणि त्याप्रमाणे मिटर रिडींग पाहून पैसे मोजता येईल.

**कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :** सध्या महानगरपालिका कार्यालयाकडे मिटरची व्यवस्था नाही. परंतू इलेक्ट्रानिक मिटर बसविण्याची व्यवस्था लवकरच करण्यांत येणार आहे.

**मा.उपआयुक्त :** परिसर अभियांत्रिकी कार्यालयाकडे मिटरच्या संदर्भात पत्राने विचारणा करावी.

**मा.सभापती :** उपआयुक्त यांनी सुचविल्याप्रमाणे विचारणा व्हावी. शहरामध्ये काही ठिकाणी पाणी पुरवठा सुरळीत होतो तर काही ठिकाणी होत नाही. यासाठी सध्या विद्युत मंडळ, परिसर अभियांत्रिकी आणि महानगरपालिका या तिघांच्या माध्यमातून पाणी पुरवठा संदर्भात दररोजची कार्यवाही होत असते. जेस विद्युत मंडळाकडे विजेचे मिटरची व्यवस्था आहे. त्याप्रमाणे महानगरपालिका कडून मिटरची व्यवस्था होणे आवश्यक आहे. नसता विद्युत मंडळ किंवा परिसर अभियांत्रिकी कार्यालयाकडून बसवून घ्यावे.

**श्री.केशव सोनवणे :** या संदर्भात मिटर जर महानगरपालिका, व्यतिरिक्त इतर कार्यालयाने बसविल्यास त्याचे भाडे आकारतील.

**मा.सभापती :** संबंधित कार्यालयाकडे अगोदर पत्राने विचारणा करावी. त्यानंतरच पुढे काय ते लक्षात घेता येईल.

**श्री.इकबालसिंग गील :** गेल्या तीन महिन्यापासून पत्राने कळविले आहे की, महानगरपालिका क्वॉर्टरच्या ठिकाणी शौचालये अपुरे असून बऱ्याच ठिकाणी अनधिकृत शौचालये बांधकाम होत आहे.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता :** कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानी प्रत्येकी शौचालये आहेत. परंतू ज्या ठिकाणी नसतील तेथे शौचालय बांधकाम करण्याबाबत कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी सुचविल्यानुसार महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे निवासस्थानी शौचालये बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत यावे.

**श्री.एकबालसिंग गील :** टाऊन हॉल येथे खांडकी बसविण्याबाबत पत्राने कळविले होते. आणि या संदर्भात अंदाजपत्रकही तयार झालेले होते.

**उपअभियंता स्लम :** सदरील कामास सुरुवात करण्यात येईल.

**श्री.एकबालसिंग गील :** टाऊन हॉल येथील जे काम सुचविलेले होते. त्यानंतर दुसरे टेंडर निघाले परंतू येथील ड्रेनेजच्या बाबतीत अजूनही झालेले नाही.

**उपअभियंता स्लम :** करार करुन २% कमी दराने सदरील काम पुढील आठवड्यापर्यंत करण्यांत येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** पिरबाजार उस्मानपुरा येथील महानगरपालिका शाळेच्या संदर्भात अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असून कामास सुरुवात झालेली नाही. व मागील सभेपासून याच संदर्भात वेळोवेळी विनवण्या करित आहे.

**श्री.गजानन बारवाल :** बन्सीलालनगर येथील महानगरपालिका शाळेच्या संदर्भात याच प्रकारे कार्यवाही व्हावी.

**श्री.अलिम बेग :** शहरातील बऱ्याचशा महानगरपालिका शाळेच्या इमारतीचे याच तक्रारी दिसून येतील.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता स्लम :** मोहल्ला पिरबाजार, उस्मानपुरा महानगरपालिका शाळेच्या संदर्भात रु.३०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** चेलीपुरा येथील महानगरपालिका उर्दू शाळेच्या संदर्भात काय झाले याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** ठिक आहे. याबाबत पुढील बैठकीत चर्चा करण्यात येईल.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** शहरातील मुकूंदवाडी नक्षत्रवाडी आणि सिडको हडको येथील महानगरपालिकांच्या शाळा या भाडेपट्ट्याने इतर संस्थांना एका वर्षाच्या कराराने दिल्या होत्या. आणि त्या कराराची तारिख संपूनही शाळा महानगरपालिकाकडे रिकामी करुन मिळत नाही. गेल्या दोन महिन्यापासून या संदर्भात सतत चर्चा होत असून कोणती कार्यवाही केली याची माहिती सभेमध्ये देण्यांत यावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी सभेमध्ये उपस्थित नसून पुढील बैठकीत याबाबत सविस्तर माहितीसह खुलासा स्पष्ट करण्यांत येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** पिरबाजार, उस्मानपुरा येथील देशी दारुच्या दुकानापासून मंजूरी मिळालेली आहे. सोबत याच ठिकाणी एक मार्केटचे काम सुध्दा होणे बाबत कार्यवाही झालेली नाही.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता :** पिरबाजार, उस्मानपुरा येथे कंपाऊंडवॉल बांध्ंकामास मंजूरी मिळालेली नाही.

**मा.सभापती :** संबंधित बाबतीत लवकरात लवकर कार्यवाही व्हावी.

**श्री.केशव सोनवणे :** पान क्र.१०, दि.६ जुलै, १९९१ च्या इतिवृत्तामध्ये मुंबई प्रा.अ.६७ (३) क्र.नुसार झालेल्या संपूर्ण कामाची माहिती वीस दिवसात देण्यांत येईल असे सुचविले होते. आता केवळ तीनच दिवस शिल्लक असून अद्यापपर्यंत माहिती सभागृहात प्राप्त झालेली नाही.

**मा.सभापती :** अद्याप तीन दिवस शिल्लक असल्याने संपूर्ण माहिती पुढील बैठकीत देण्यांत येईल.

**श्री.तुळशीराम भगुरे :** दिल्लीगेट येथील जलशुध्दीकरण तलावाबाबत काय आहे. याची माहिती द्यावी. कारण संबंधित श्री.हबीबखान यांचे पत्र आलेले असल्याने याची सविस्तर माहिती मिळणे आवश्यक आहे.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबतची सविस्तर माहिती पुढील बैठकीत द्यावी. या बरोबरच विषय क्र.१ यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. त्याचप्रमाणे इतिवृत्तातील पान क्र.२४ विषय क्र.४०/२२ मध्ये मागील सभेत सुचविल्यानुसार संबंधित स्थळी प्रत्यक्षात सं.सदस्यांनी पाहणी केली असून प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :**

महानगरपालिकेतील काही अधिकारी तथा पदाधिकारी यांचे शहरातील नागरिकांच्या तक्रारी व सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी सतत फिरावे लागते. अशा अति महत्वाच्या काम करणाऱ्या विभागातील उदा.महापौर, उपमहापौर, सभापती, विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, तसेच आयुक्त, उपआयुक्त, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, अतिरिक्त शहर अभियंता,

शहर अभियंता आणि विद्युत विभाग आदि ठिकाणी काम करणाऱ्या वाहन चालकांना "विशेष बाब" म्हणून जादा वेतनभत्ता मंजूर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

मागील इतिवृत्तातील पान क्र.२४ विषय क्र.४०/२२ मध्ये सुचविल्यानुसार संबंधित स्थायी स.सदस्यांनी पाहणी करुन सांगितले आहे. त्याप्रमाणे सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो. याच बरोबर इतिवृत्तातील काही दुरुस्त्यांसह विषय क्र.१ दि.०६.०७.१९९१ रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५३/२ :**

कार्यालयातील टंकलेखन यंत्र डुप्लीकेटींग मशीन सन १९९१-९२ सालात दुरुस्ती करण्यासाठी निविदा मागविण्यांत आल्या होत्या. एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१) मे.धनलक्ष्मी इंटरप्राईजेस
२) मे.प्रदिप टी.वडगांवकर्स टाईपरायटर ॲण्ड डुप्लीकेटर्स
३) मे.विजय इंटरप्राईजेस

वरीलप्रमाणे निविदाधारकांच्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार केला असता सर्वात कमी दर मे.प्रदिप टी.वडगांवकर्स टाईपरायटर्स ॲण्ड डुप्लीकेटर्स, यांचे आहेत. करीता खालीलप्रमाणे दर मंजूरीसाठी सादर.

१) मराठी/इंगजी टंकलेखन यंत्र सर्व्हीसिंग-१२ सर्व्हीसिंग रु.१००.०० प्रति मशीन.
२) मराठी/इंगजी टंकलेखन यंत्र ओवर ऑयलिंग रु.३०.०० प्र.मशीन.
३) मराठी/इंग्रजी टंकलेखन यंत्र मेजर रिपेअरींग रु.५०.०० प्र.मशीन.
४) डुप्लीकेटींग मशीन सर्व्हीसिंग व रिपेअरींग रु.२००.०० प्र.मशीन-१२ सर्व्हीसेस.

वरीलप्रमाणे कमी दर मंजूरीसाठी प्रस्ताव प्रारुप सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कार्यालयातील टंकलेखन यंत्रे व डुप्लीकेटींग मशीन सन १९९१-९२ सालात दुरुस्ती करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराच्या मेसर्स प्रदिप टी.वडगांवकर्स टाईपरायटर्स ॲण्ड डुप्लीकेटर्स, यांच्य खालील दर्शविलेल्या दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१) मराठी/इंगजी टंकलेखन यंत्र सर्व्हीसिंग-१२ सर्व्हीसिंग रु.१००.०० प्रति मशीन.
२) मराठी/इंगजी टंकलेखन यंत्र ओवर ऑयलिंग रु.३०.०० प्र.मशीन.
३) मराठी/इंग्रजी टंकलेखन यंत्र मेजर रिपेअरींग रु.५०.०० प्र.मशीन.
४) डुप्लीकेटींग मशीन सर्व्हीसिंग व रिपेअरींग रु.२००.०० प्र.मशीन-१२ सर्व्हीसेस.

**विषय क्र.५४/३ :**

उपअभियंता (विद्युत) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९१-९२ या वर्षासाठी ४० वॅट स्टॉर्टर आणि ४० वॅट चोक खरेदी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खाते (विद्युत) दरसुची अ नुसार र.रु.२,४९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदर खर्च नवीन विद्युत साहित्य खरेदी या शिर्षकामधून करण्यांत येईल. त्यास मान्यता मिळावी.

सदर कामासाठी दैनिक वर्तमानपत्रात (दै.लोकमत टाईम्स, दै.सिटीजन्स) जाहिरात देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता मुदतीच्या आत एकूण चार मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **साहित्यांचे नांव** | **मे.चिंतामणी ट्रे.कं. औंरगाबाद** | **मे.मेहता ट्रेडर्स, मुंबई** | **मे.ओम इले.औरंगाबाद** | **मे.पगारीया इंटरप्राईजेस औरंगाबाद.** |
|---|---|---|---|---|---|
| १. | ४० वॅट स्टार्टर (प्रतिनग) | बजाज मेक ०४.२३ | ०३.९९ | ०४.८० | ०४.६७ |
| २. | ४० वॅट चोक (प्रतिनग) | ७४.४६ | ७४.०० | ७५.०० | ८१.२३ |

याप्रमाणे प्राप्त निविदांची छाननी केली असता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची मे.मेहता ट्रडर्स मुंबई यांची निविदा असून (बजाज मेक) ४० वॅट स्टार्टर प्रतिनग रुपये ०३.९९ आणि ४० वॅट चोक प्र.नग रु.७४.०० याप्रमाणे आहे.

तेव्हा तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची मे.मेहता ट्रेडर्स मुंबई यांची निविदा मान्य करुन नमूद केलेल्या दरामध्ये ४० वॅट स्टार्टर आणि ४० वॅट चोक (अनुक्रमे १२०० नग, ३००० नग) खरेदी करण्यास मान्यता मिळावी.

प्रस्ताव विचारार्थ आणि मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** प्रस्तावातील निविदा भरलेले गुत्तेदार श्री.चिंतामणी यांना संबंधित कंपनीने पत्र दिले आहे की, कमीत कमी दराने म्हणजे रु.७४.०० प्रमाणे देण्यास हरकत नाही. त्याप्रमाणे विचार करण्यांत यावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता :** आता पुन्हा टेंडर कॉल केल्यानंतरच तसे शक्य आहे. तेव्हा कमीत कमी दराची निविदा असल्यास मंजूरी द्यावी.

**मा.सभापती :** ठिक आहे. सदरील प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ या वर्षासाठी ४० वॅट स्टार्टर आणि ४० वॅट चोक खरेदी करण्यासाठी रक्कम रु.२,४९,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे ४० वॅट स्टार्टट प्रति नग रु.३.९९ व ४० वॅट चोक प्रति नग रु.७४.०० या दराच्या मे.मेहता ट्रेडर्स मुंबई यांच्या निविदेस, त्याप्रमाणे वरील दराने एकूण १२००० स्टार्टर व ३००० नग चोक खरेदी करण्यास मंजूरी देण्यांत यावी.

**विषय क्र.५५/४ :**

वार्ड क्र.४४ मो.समतानगर येथे मस्जीद पासून पुष्पक मेडीकल पर्यंत दगडी गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक र.रु.९९,१८०/- चे तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/९४०/९०, दि.१४.०९.९० द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीस निविदा विकण्यांत

आल्या होत्या. त्यापैकी केवळ सहा निविदा प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.सहकारी मजूर संस्था | - | ७% कमी |
| २. | श्री.कैसर खान | - | २८.७८६% कमी |
| ३. | श्री.फारुकी अे.एम. | - | २९.७८६% कमी |
| ४. | श्री.गिरीश सिकची | - | २७.७८६% कमी |
| ५. | श्री.सुखबीरसिंग | - | ३४.०५% कमी |
| ६. | श्री.सैय्यद रफिकोद्दीन | - | ३०% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.५% कमी दराचे श्री. सुखबीरसिंग यांचे दरपत्रक आहे. सदर दरपत्रकास स्थायी समितीचा ठराव क्र.३७९/४९ दि.२१.१२.९० नुसार मंजूरी मिळाली आहे. संबंधित गुत्तेदार श्री. सुखबीरसिंग यांना २% अनामत रक्कम व मुद्रांकन दाखल करणे बाबत पत्र दिले असता संबंधिताने बाजारात भाव वाढल्याने तसेच टेंडर उघडून ३ महिने पुर्ण झाल्याने बंधनकारक नसून काम करण्यास नकार दिलेला आहे.

मा.कार्यकारी अभियंता यांच्या आदेशावरुन दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावरील गुत्तेदारश्री.सय्यद रफिकोद्दीन व श्री.कैसर खान यांना काम देण्याबाबत कार्यालयात बोलावण्यांत आले असता श्री.सय्यद रफिकोद्दीन गुत्तेदार यांनी ५% कमी दराने काम करण्यास तयार असून तसा लेखी खुलासा केलेला आहे. व श्री.कैसर खान यांनी काम करण्यास नकार दिलेला आहे.

श्री. सय्यद रफिकोद्दीन यांचे ५% कमी दराचे दरपत्रक मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

<u>संवाद :</u>

**श्री.तुळशीराम भगुरे :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार गुत्तेदार श्री.सुखबिरसिंग यांनी ३४.०५% कमी दराची निविदा भरलेली आहे. जर सदरील गुत्तेदारास मंजूरी दिल्यास काम होईल काय?

**श्री.केशव सोनवणे :** प्रस्तावातील गुत्तेदार मे.सहकारी मजूर संस्था यांचे ७% कमी दराची निविदा असून ती मंजूर करण्यात यावी.

**उपअभियंता, ड्रेनेज :** ७% कमी दराने भरलेली निविदा ही संबंधित संस्थेनी जुन्या दराने भरलेली निविदा असून ते या दराप्रमाणे काम करण्यास तयार होणार नाहीत.

**श्री.गजानन बारवाल :** माझ्या वार्डातील कामासंदर्भात गेल्या तीन महिन्यापासून सांगूनही कोणतीही कार्यवाही नाही याचे कारण काय?

**मा.सभापती :** कोणतेही काम हे टेंडर कॉल केल्यानंतर त्यास मंजूरी मिळाल्यानंतरच पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

**मा.उपआयुक्त :** कोणत्याही कामाची निविदा संबंधित विभागाकडून मागविली जाते. आणि त्या निविदा मा.आयुक्तांकडे सादर केल्या जातात. त्यानंतरच पुढील कार्यवाही होत असते.

**मा.सभापती :** सदरील प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.४४ मो.समतानगर येथे मस्जिद ते पुष्पक मेडीकल पर्यंत दगडी गटार बांधण्याचे काम गुत्तेदार श्री.रफिकोद्दीन यांनी लेखी खुलासा केल्याप्रमाणे त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षज्ञ ५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५६/५ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, आंबेडकर नगर स्लम भागात अस्तित्वात असलेल्या खांडकी पेव्हींगची दुरुस्ती करणे व दगडी गटाराचे बांधकाम करणेसाठी अंदाजपत्रक र.रु.२९,९५०/- ला मा.आयुक्त महानगरपालिका, यांनी मंजूरी दिल्यानुसार दुसऱ्या वेळेस सदरील कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ (८) निविदा विकण्यांत आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजित तारखेस फक्त दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

१. श्र.अब्दुल खालेक - २६% कमी
२. श्री.राजासिंग - २५.७६% कमी

तुलनात्मकदृष्ट्या श्री.अब्दुल खालिक यांचे टेंडर कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २६% कमी आहे. परंतू सदरील ठेकेदारांनी टेंडर सोबत १% इसाऱ्याची रक्कम न भरल्यामुळे नियमानुसार त्यांचे टेंडर विचारात घेता येत नसल्यामुळे सेकंड लोयेस्ट श्री.राजासिंग यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५.७६% कमी दराचे टेंडर मंजूर करणे योग्य करिता श्री.राजासिंग यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५.७६% कमी दराचे टेंडर मंजूरीसाठी विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.केशव सोनवणे :** दरवर्षी स्लम भागात खांडक्या बसविण्यासाठी २५ ते ३० लाख रुपये खर्च करण्यापेक्षा एकदाचे डांबरीकरण करण्यांत यावे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** उत्तर प्रदेशातील काही भागात खांडकी ऐवजी पक्के दगडी विटाचे रोड तयार करण्यात येतात. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी. किंवा येथील खांडक्या बसविण्याच्या पॉलिसीत बदल करण्यांत यावा.

**श्री.केशव सोनवणे :** प्रतिवर्षी शहरातील काही भागात खांडक्या बसवितात व पुन्हा त्या दुसऱ्या वर्षी रिपेअरींग करण्याबाबत प्रस्ताव मंजूरीस्तव येतो. याचे कारण काय? वसंतभवन येथील खांडक्या बाबत असेच होते.

**मा.सभापती :** कोणत्याही कामाचे संदर्भात संबंधित अधिकीर तथा अभियंत्यांनी कामावरील गुत्तेदाराकडे सामानाची क्वॉलिटी आणि मेंन्टेनन्स बाबत विशेष लक्ष राहिल्यास वेळोवेळी कोणतेही कामे दुरुस्त्यासाठी येऊ शकणार नाहीत. याची दक्षता घ्यावी.

**उपअभियंता स्लम :** संबंधित कामाची निविदा माहे मार्च महिन्यात काढण्यात आलेली असून दुसऱ्या वेळेस सदरील प्रस्ताव रिकॉल करण्यात आलेला आहे. तरीही संबंधित गुत्तेदार काम करण्यास तयार होत नाही. आहेत.

**श्री.केशव सोनवणे :** स्लम भागात खांडकी पेव्हींग बसविण्याबाबत आता पॉलिसी डिसाईड करणे आवश्यक आहे.

**शहर अभियंता :** स्लम भागात ज्या खांडक्या दुरुस्तीसाठी प्रतिवर्षी काम करावे लागते त्याचे मुख्य कारण म्हणजे आपल्याच विभागातील ड्रेनेज आणि पाणी पुरवठा यांचे मुळे होत असते. कारण ड्रेनेज लाईन नवीन टाकणे पाणी पुरवठा लाईन नवीन टाकणे किंवा एखाद्या वेळेस तक्रारीने रोड खोदणे व पुन्हा व्यवस्थीत करुन न ठेवता तसेच ठेवणे इत्यादीमुळे खांडक्या दुरुस्तीसाठी प्रस्ताव पुन्हा पुन्हा येत असते.

**श्री.तुळशीराम भगुरे :** पाणी पुरवठा व ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी वारंवार खोदकामे केली जातात. व पुर्णपणे रोड तसेच्या तसे केली जात नाही. यामुळे संबंधित विभागावर कार्यवाही करण्यांत यावी.

**मा.सभापती :** पाणी पुरवठा किंवा ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामी खोदकामे झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरीत कामाची पाहणी करुन संबंधित गुत्तेदारास रोडचे काम निट करण्याबाबत आदेश देण्याचे करावे. ज्यामुळे पुढे त्रास होणार नाही. तसेच सदरील प्रस्तावाबाबत कोणत्याही गुत्तेदाराकडून संबंधित काम ज्याचे निविदातील दर कमी राहील. अशा गुत्तेदारांकडून करवून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकर नगर स्लम भागात अस्तित्वात असलेल्या खांडकी पेव्हींगची दुरुस्ती करणे व दगडी गटारीचे बांधकाम करणे साठी प्राप्त निविदापैकी श्री.राजासिंग यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.७६% कमी दराची निविदा स्वीकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५७/६ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा स्लम भागात दगडी गटार बांधणे व ३५० मी.मी.व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर.सी.सी.गटार बसविण्याचे कामासाठी अंदाजपत्रक र.रु.१,९५,०००/- ला स्थायी समिती मध्ये मंजूरी दिल्यानुसार सदरील कामासाठी तिसऱ्यां वेळेस कार्यालयाची निविदा सूचना क्र.१ (१९९१-९२) द्वारे निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण (३) तीन निविदा विकण्यात आल्या. व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजित तारखेस (२) दोन निविदा प्राप्त झाल्या. व दि.२२.०४.९१ रोजी उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.पी.सरोदे | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी |
| २. | मे.एस.एच.असोशिएटस | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या श्री.एस.पी.सरोदे यांचे टेंडर कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २% कमी आहे. करिता श्री.एस.पी.सरोदे यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २% कमी दराचे टेंडर मंजूरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा स्लम भागात दगडी गटार बांधणे व ३५० मी.मी.व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर.सी.सी.गटार बसविण्याचे कामासाठी प्राप्त

निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराच्या श्री.एस.पी.सरोदे यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५८/७ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, आंबेडकरनगर स्लम भागात ३५० मी.मी.व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर.सी.सी.गटार बसविण्याचे कामासाठी ठराव क्र.३६, दि.०२.०७.९० द्वारे र.रु.२,२२,०००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत आली असून सदर कामासाठी दुसऱ्या वेळेस प्रगट निविदा मागविल्या असता एकूण फक्त एकच मे.एस.एच.असोशिएट्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त दराची निविदा प्राप्त झाली.

सदरील कामाचे अंदाजपत्रक १९८९-९० चे डी.एस.आर.दराप्रमाणे आहे. व नवीन डी.एस.आर.दराशी तुलना केली असता सदरील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.३९% कमी येतात. करिता मे.एस.एच.असोशिएट्स यांचे अ.प.दरापेक्षा ७% जास्त दराचे टेंडर मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकरनगर स्लम भागात ३५० मी.मी.व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर.सी.सी.गटार बसविण्यांचे कामासाठी मे.एस.एच.असोशिएटस यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५९/८ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, सादत नगर स्लम भागात मुलभूत सुखसोई उपलब्ध करुन देणेसाठी स्थायी समिती ठराव क्र.४५९, दि.१६.०३.९१ द्वारे र.रु.२,९५,०६३/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळाली असून यामध्ये वरील स्लम भागात पाणी पुरवठ्याची लाईन टाकणेसाठीचे अंदाजपत्रक रक्कम रु१,३१,०६३/- चा समावेश आहे. या कामाकरिता कार्यालयीन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सय्यद अथरअली जाफर | - | १% कमी |
| २. | श्री.बी.एम.काथार | - | अंदाजपत्रकीय दराप्रमाणे |
| ३. | श्री.ए.एम.फारुकी | - | २% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री. सय्यद जाफर यांचे टेंडर आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सादत नगर स्लम भागात मुलभूत सुखसोयी उपलब्ध करुन देण्याकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराच्या श्री.सय्यद अथर अली जाफर यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६०/९ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, औद्योगिक वसाहत चिकलठाणा येथे संडासाची दुरुस्ती व दुभाजन भिंत बांधणेसाठी अंदाजपत्रक र.रु.२०,२३०/- ला

मा.आयुक्तांनी दिनांक २४.०३.९१ ला मंजूरी दिल्यानुसार सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.नुरखान | - | १५% कमी |
| २. | श्री.बी.एम.काथार | - | १६% कमी |
| ३. | मे.शैलेश कन्स्ट्रक्शन | - | १५.९% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची श्री.बी.एम.काथार यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** काचीवाडी वार्डामध्ये संबंधित प्रस्तावास अनुसरुन यापुर्वी उप आयुक्त आणि काही अधिकाऱ्यांसमवेत पाहणी केली होती. व त्यानंतर त्वरीत कार्यवाही करण्यांत येईल असे सुचविले होते. परंतू अद्याप काहीही कार्यवाही झालेली नाही. तेव्हा याबाबत निर्णय घेण्यांत यावा.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी सुचविल्यानुसार त्यांचे वार्डात जाऊन प्रत्यक्षात पाहणी करुन संबंधित कामाचे अंदाजपत्रक तयार करावे. या बरोबरच विषय क्र.९ यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औद्योगिक वसाहत चिकलठाणा येथे संडासाची दुरुस्ती व दुभाजन भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराच्या श्री.बी.एम.काथार यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६१/१० :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, नारेगांव स्लम भागात दगडी गटार तसेच ३५० मी.मी.व्यासाची अर्धगोलाकार पुर्वरचित आर.सी.सी.गटार बसविण्याचे कामासाठी झोपडपट्टी सुधारणा, घरबांधणी, समाजकल्याण समिती ठराव क्र.१६, दि.०६.०८.१९९० द्वारे र.रु.२,७७,२३५/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार कार्यालयीन निविदा क्र.१ (१९९१-९२) अन्वये निविदा मागविल्या (दुसऱ्या वेळेस) असता एकूण तीन दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कैसर खान | - | १% कमी |
| २. | मे.एच.एच. असोशिएटस | - | ५% जास्त |
| ३. | श्री.एस.ए.नवाब | - | ४% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री.कैसर खान यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव स्लम भागात दगडी तसेच ३५० मी.मी.व्यासाची अर्धगोलकार पुर्वरचित आर.सी.सी.गटार बसविण्याचे कामाकरिता प्राप्त निविदापैकी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराच्या श्री.कैसर खान यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६२/११ :**

उपअभियंता (विद्युत) महानगरपालिका, यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९१-९२ हया वर्षासाठी ४ फुट x ४० वॅट ट्युब (८००० नग) खरेदी करण्यांसाठी सा.बा.खाते (विद्युत) दरसुचीनुसार र.रु.२,८०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदर खर्च नवीन विद्युत साहित्य खरेदी या शिर्षकामधून करण्यांत येईल. त्यास मान्यता मिळावी.

सदर कामासाठी दैनिक वर्तमानपत्र लोकमत टाईम्स व सिटीजन्स मध्ये जाहिरात देवून निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.ओम इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद (बजाज मेक) | - | रु.३०.७५ प्रति नग |
| २. | मे.चिंतामणी ट्रेडींग कं, औरंगाबाद (बजाज मेक) | - | रु.२९.८८ प्रति नग |
| ३. | मे.मेहता ट्रेडर्स, मुंबई, ( बजाज मेक) | - | रु.३१.४५ प्रति नग |
| ४. | मे.पगारीया इंटरप्राईजेस, औरंगाबाद (कॉम्प्टन मेक) | - | रु.३१.८३ प्रति नग |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व रु.२९.८८ प्रति नग या दराची मे.चिंतामणी ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ हया वर्षाकरिता ४० फुट x ४० वॅट विद्युत ट्युब (एकूण ८००० नग) मे.चिंतामणी ट्रेडींग कं.औरंगाबाद यांच्याकडून रु.२९.८८ प्रति नग या दराने खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६३/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्लेखाना येथे शाळा बांधण्याच्या कामासाठी सन १९९०-९१ चे सां.बा.खात्याचे डी.एस.आर. दराने र.रु.९८,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१६, दि.१८.०३.१९९१ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.आर.के.साबळे | - | ४.५० % जास्त |
| २. | श्री.कैसर खान | - | ६.१६ % जास्त |
| ३. | श्री.अब्दुल सलाम | - | ३.१० % जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१०% जास्त दराची श्री.अब्दुल सलाम यांची निविदा आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे कार्यालयीन पत्र क्र.४८/९१ ए, दि.०५.०४.९१ अन्वये गुत्तेदारास पत्र दिले असता त्यांनी दि.२४.०४.९१ अन्वये लेखी कळविले की, सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१०% जास्त दराऐवजी १%

जास्त दराने करण्यास तयार आहे. सबब अंदाजपत्रक रक्कम रु.९८,५००/- व श्री.अब्दुल सलाम यांच्या १% जास्त दराच्या निविदेस मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** मुकूंदवाडी येथे मनपाच्या शाळेमध्ये एका प्रायव्हेट संस्थेला शाळेची खोली देण्यांत आलेली आहे. ती कोणत्या आधारे दिली याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** ठिक आहे. सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**विषय क्र.६४/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मुकूंदवाडी येथील शाळेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे सां.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,४०,९००/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.७६० दि.२४.०४.९० अन्वये मंजूरी मिळालेली आहे.

सदरचे काम हाती घेण्यासाठी फेर निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

१. श्री.शेख शरीफ - १% जास्त
२. श्री.सय्यद रफिकोद्दीन - ५% जास्त
३. श्री.सय्यद सिराजोद्दीन - ०.०५% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.सय्यद सिराजोद्दीन यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकूंदवाडी येथे प्राथमिक शाळेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या श्री.सय्यद सिराजोद्दीन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६५/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपा झोन नं.१ कार्यालयीन इमारतीचे दुरुस्तीचे कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.६२४ दिनांक ३०.०३.९० अन्वये रक्कम रु.१,३९,३५०/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळालेली आहे.

कार्यालयीन निविदा सूचना क्र.४०८६ दि.१५.०५.९० अन्वये सदर कामासाठी निविदा मागविल्या असता तुलनात्मकदृष्ट्या श्री.शेख इकबाल अहमद यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.५५% कमी दराची निविदा होती. स्थायी समिती बैठक दि.१४.११.९० नुसार सदर कामाची प्रत्यक्ष पाहणीसाठी चर्चा झाली. व पाहणीनंतर निर्णय घेण्यांत येईल असे ठरले. दि.१९.११.९० रोजी सदर ठिकाणी मा.शहर अभियंता व मा.उप अभियंता बांधकाम-२ यांनी पाहणी केली. पाहणी अंती असे निष्पन्न झाले की, सदर कामाचे स्लॅब हा ॲटम रद्द करुन पुन्हा अंदाजपत्रक तयार करणे. सबब सदर कामाचे नवीन अंदाजपत्रक र.रु.५८,७००/- चे तयार करण्यात आले म्हणून सदरच्या कामाची पुर्वी मागविलेली निविदा रद्द करुन कार्यालयीन नि.सु.क्र.२/९१, दि.२१.०४.९१ अन्वये फेरनिविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.इकबाल अहेमद | - | ५% जास्त |
| २. | श्री.ए.एम.फारुकी | - | १५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची श्री.फारुकी ए.एम.यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** सदरील प्रस्तावाबाबत माहिती द्यावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता, बांधकाम :** अगोदर सदरील प्रस्तावाच्या संदर्भात झोन-१ कार्यालयीन इमारतीचे दुरुस्तीचे कामासाठी स्लॅब टाकण्याचे निश्चित झालेले होते. परंतू सदरील इमारतीची बारकाईने पाहणी केली असता तेथील पाया खोलवर नसून मजबूत नाही. त्यामुळे त्या इमारतीवर केवळ पत्रे टाकून इमारतीची दुरुस्ती करण्यास मंजूरी द्यावी.

**मा.सभापती :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका झोन-१ कार्यालयीन इमारतीचे दुरुस्तीचे कामासाठी पुर्वी तयार केलेल्या अंदाजपत्रकातून स्लॅब हा ॲटम वगळून नवीन तयार करण्यांत आलेल्या र.रु.५८,७००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराच्या श्री.फारुकी ए.एम.यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६६/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको एन-१० येथील कैलास शिल्प बहुउद्देशीय हॉलच्या व्हरांड्याचे कामासाठी सां.बा.खात्याचे सन १९९०-९१ चे डी.एस.आर.दराने र.रु.८८,९२२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२, दि.२३.०४.१९९१ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.के.बी.काल्डा | - | १% जास्त |
| २. | श्री.सय्यद रफिकोद्दीन | - | १.२५०% कमी |
| ३. | श्री.इकबाल अहमद | - | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.२५०% कमी दराची श्री.सय्यद रफिकोद्दीन यांची निविदा आहे. अंदाजपत्रक व निविदा मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.केशव सोनवणे, श्री.नारायण फत्तेलष्कर, श्री.तुळशीराम भगुरे :** सदरील प्रस्तावाबाबत सविस्तर माहिती द्यावी की, कैलास शिल्प सिडको एन-१० शी मनपाचा काय संबंध आहे की, व्हरांड्याचे कामासाठी मनपाने खर्चाची तरतूद करावी.

हे कुणाच्या सांगण्यावरुन प्रस्ताव सभेमध्ये मांडण्यांत आला. सदरची इमारत मनपाची आहे काय?

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता :** सिडको एन-१० येथील कैलास शिल्प बहुउद्देशीय हॉल इमारत मनपाच्या ताब्यात नसून या इमारतीशी मनपाचा काहीही संबंध नाही. परंतू सदरील इमारत पोलिस क्वॉर्टरला दिलेली असून त्यांचे विनंतीनुसार त्या बहुउद्देशीय हॉलच्या व्हरांड्यांच्या कामासाठी सदरची तरतूद करण्यांत आलेली आहे.

**श्री.केशव सोनवणे :** सदरची इमारत सार्वजनिक बांधकाम खात्याने बांधलेली असल्याने त्यांनीच याबाबतीत कामाचा खर्च करणे आवश्यक होते. तरतूद केलेली रक्कम कोणत्या हेडखाली केलेली आहे.

**श्री.तुळशीराम भगुरे :** सिडको येथील सदरची इमारत मनपाची नसून हा प्रस्ताव या ठिकाणी आलाच कसा याची माहिती द्यावी आणि कोणत्या हेडखाली या कामासाठीचा खर्च करण्यासाठी तरतूद केलेली आहे.

**मा.सभापती :** जोपर्यंत सिडको बाबतीत नेमकी पॉलीशी डिसाईड होत नाही. तोपर्यंत कोणत्याही प्रकारचा निर्णय घेण्यात येऊ नये. केवळ पाणी पुरवठ्याचा प्रश्न सोडल्यास इतर कोणत्याही बाबतीत, प्रशासनाने निर्णय घेऊ नये. अजून तेथील साफसफाई कर वगैरे वसुल केल्या जात नाहीत. मग त्याप्रमाणे त्या भागात कोणत्याही कामाच्या खर्चास व प्रस्तावास मान्यता देण्यांत येऊ नये. जोपर्यंत पॉलीशी डिसाईड होत नाही. तोपर्यंत सदरील प्रस्ताव रद्द समजण्यांत यावा.

**ठराव :**

सदरचा प्रस्ताव रद्द करण्यांत येतो असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.६७/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, जालना रोडवरील सेव्हन हील सोसायटी अंतर्गत खडी रस्ते तयार करणे बाबतच्या कामासाठी सन १९९०-९१ च्या सा.बां. खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे र.रु.१,६१,७७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोडवरील सेव्हन हिल सोसायटी अंतर्गत खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता र.रु.१,६१,७७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६८/१७ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव दिला आहे की, स्थायी समिती ठराव क्र.४६९ दि.१६.०३.९१ द्वारे मोचीवाडा (पदमपुरा) स्लम भागात मुलभूत सुखसोई पुरविणेसाठी र.रु.३,९९,१४५/- चे अंदाजपत्रकास मंजूरी दिली असून यामध्ये वरील स्लम भागात भुयारी गटारीचे काम करणेसाठी र.रु.१,०८,९७०/- चा समावेश आहे. करिता सदरील कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.आर.एस.बारवाल | - | ०.०१% कमी |
| २. | मे.विपुल कन्स्ट्रक्शन | - | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या श्री.आर.एल.बारवाल यांचे टेंडर कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी आहे. परंतू सदरील ठेकेदाराने दिलेले दर जास्त वाटत असल्यामुळे मा.आयुक्त यांचे दि.२५.०३.९१ चे आदेशाप्रमाणे वरील ठेकेदारास कार्यालयात बोलावून त्यांनी दिलेल्या दराबाबत चर्चा केली असता त्यंनी टेंडरमध्ये दिलेल्या दराऐवजी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३.०१% कमी दराने वरील काम करण्यास तयार असल्याबाबत दि.१५.०४.९१ चे पत्राद्वारे लेखी संमती दिली आहे. करिता श्री.आर.एल.बारवाल यांचे टेंडर त्यांनी लेखी संम्मती दिल्यानुसार अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३.०१% कमी दराने मंजूर करण्याचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोचीवाडा (पदमपुरा) स्लम भागात मुलभूत सुखसोयी पुरविणेच्या कामासाठी श्री.आर.एल.बारवाल (गुत्तेदार) यांनी लेखी संमती दिल्याप्रमाणे सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.०१% कमी दराने करुन घेण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६९/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, दादा कॉलनी वार्ड क्र.३८ अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी सन १९९०-९१ च्या सां.बा.खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे अंदाजपत्रक र.रु.२,०६,२२०/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दादा कॉलनी वार्ड क्र.३८ अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रु.२,०६,२२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७०/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, वार्ड क्र.३७ मोतीवालानगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.१६.०३.९१ ऐनवेळी विषय क्र.५०५/५१ नुसार अंदाजपत्रक र.रु.१,३३,३२५/- ला सर्वानुमते मंजूरी मिळाली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.१/जा.क्र./मनपा/बां.वि.-१/१४७६/९१, दि.१०.०४.९१ रोजी निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा विकल्या गेल्या त्यापैकी दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि.३०.०४.९१ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदाराममक्ष अघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | ३०% जास्त |
| २. | श्री.रे.कन्स्ट्रक्शन | - | ३०% जास्त |

वरीलपैकी ठेकेदाराचे दर सारखेच असल्यामुळे वाटाघाटी करण्याकरिता जा.क्र./मनपा/बां.वि-१/४५/९१, दि.१०.०५.९१ रोजी कळविले असता मे.रे.कन्स्ट्रक्शन यांनी

अर्ज देवून कळविले आहे की, ३०% जास्त ऐवजी २०% जास्त दराने काम करण्यास तयार आहे.

नवीन डी.एस.आर.दराप्रमाणे तुलना केली असता ३.५६% जास्त येते. करिता रे.कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर २०% जास्त दर मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३७ मोतीवाला नगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व मे.रे.कन्स्ट्रक्शन यांनी लेखी दिल्याप्रमाणे त्यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७१/२० :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव दिला की, सन १९९१-९२ सालाकरिता छपाई साहित्य खरेदी करण्याकरिता निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१. मे.श्री.गणेश मुद्रणालय, औरंगाबाद
२. मे.श्रीकृष्ण प्रिटींग प्रेस, औरंगाबाद
३. मे.लिबर्टी लॉ बुक बाइंडर ॲण्ड प्रिंटर्स, औरंगाबाद

वरील निविदा धारकांपैकी श्री.गणेश मुद्रणालय यांनी कागदाचे नमुने चांगल्या प्रकारचे दाखल केलेले असल्यामुळे व छपाई साहित्य चांगल्या प्रकारच्या कागदावर छपाई करण्याकरिता तुलनात्मक तक्त्यातील अनु-१ ते ७७ पर्यंत छपाई चांगल्या कागदावर छपाई करण्यांत येईल. व इतर साहित्य छपाई अनु.७८ ते १०१ हे प्रत्येक निविदा धारकांनी त्यांनी दिलेल्या कमी दरात करुन घेण्यांत येईल. त्यांचे अनुक्रमांक पुढीलप्रमाणे आहेत.

१. मे.श्री.गणेश मुद्रणालय, औरंगाबाद
   अनु.८८-८९-९१-९२-९३-९४-९९-१०१
२. मे.श्रीकृष्णा प्रिटींग प्रेस, औरंगाबाद
   अनु.८३-८४-८६-९०
३. मे.लिबर्टी लॉ बुक बाईन्डर ॲण्ड प्रिंन्टर्स, औरंगाबाद
   अनु.७८-७९-८०-८१-८२-८५-८७-९५-९६-९७-९८-१००

वरीलप्रमाणे निविदा धारकांसमोर दर्शविण्यांत आलेल्या अनुक्रमांकाच्या दरास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**<u>संवाद :</u>**

**सचिव** : या प्रस्तावामध्ये दुरुस्ती करण्यांत यावी.

**सहाय्यक आयुक्त-२ :** सदरच्या प्रस्तावामध्ये कमी दराचे मे.लिबर्टी लॉ बुक बाइंडर ॲण्ड प्रिंटर्स यांचे दर राहुन गेले होते. तरी ७८-७९-८०-८१-८२-८५-८७-९५-९६-९७-९८- व १०० या अनुक्रमांकाचे दर समाविष्ट करण्यांत यावा. अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

**मा.सभापती :** सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ साला करिता छपाई साहित्य खरेदी करण्याकरिता खालील दर्शविल्याप्रमाणे निविदाधारकांच्या नावांसमोर दर्शविलेल्या

अनुक्रमांकाचे छपाई साहित्य खरेदी करणेस व छपाई करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१. मे.श्री.गणेश मुद्रणालय, औरंगाबाद
अनु.१ ते ७७-८८-८९-९१-९२-९३-९४-९९-१०१
२. मे.श्रीकृष्णा प्रिटींग प्रेस, औरंगाबाद
अनु.८३-८४-८६-९०
३. मे.लिबर्टी लॉ बुक बाईन्डर ॲण्ड प्रिंन्टर्स, औरंगाबाद
अनु.७८-७९-८०-८१-८२-८५-८७-९५-९६-९७-९८-१००

**विषय क्र.७२/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रोशनगेटच्या दोन्ही बाजूस सिमेंट कॉँक्रीट रोड तयार करणेबाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु.९९,४००/- ला मा.आयुक्तांची दि.०४.०२.९१ रोजी मंजूरी मिळाली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.जा.क्र./मनपा/बांध-वि-१/१४७६/९१, नुसार निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सय्यद रफिकोद्दीन | - | २.५०% कमी |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | ३% जास्त |
| ३. | श्री.एस.एच.असोशिएटस | - | २% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या श्री.सय्यद रफिकोद्दीन यांचे निविदाचे दर अं.प.दरापेक्षा २.५०% कमी दराचे सर्वात कमी आहेत. काम अत्यंत तातडीचे असल्यामुळे रहदारीस अडथळा होणार नाही या दृष्टीने श्री.सय्यद रफिकोद्दीन यांच्याकडून काम करुन घेण्यांत आले आहे. करिता कार्योत्तर मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोशनगेटच्या दोन्ही बाजूस सिमेंट कॉँक्रीटचा रोड तयार करण्याचे श्री.सय्यद रफिकोद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५०% कमी दराने करुन घेण्यांत आलेल्या कामास कार्योत्तर मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७३/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सुलभ शौचालय कॉम्प्लेक्स (पे अँड मुज टाईप) रेल्वे स्टेशनजवळ बांधण्याच्या कामासाठी सुलभ इंटर नॅशनल ऑर्गनायझेशन यांनी सादर केलेले करंट डी.एस.आर.नुसार अंदाजपत्रक रक्कम रु.६,०८,०००/- चे तयार करण्यांत आलेले आहे.

सदरच्या कामाचा सन १९९०-९१ या वर्षात शासनाच्या कार्यक्रमात समावेश आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक र.रु.६,०८,०००/- व सदर काम करुन घेण्यासाठी एजन्सी "सुलभ इंटर नॅशनल ऑर्गनायझेशन दिल्ली" यास मंजूरीस्तव व प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

**मा.सभापती :** प्रस्तावाची पूर्ण माहिती द्यावी.

**शहर अभियंता :** शहरामध्ये रेल्वेस्टेशन जवळ मुंबईच्या बस थांबा व रेल्वेस्टेशन येथे शौचालय गृहे बांधलेली आहेत. त्याचप्रकारे औरंगाबाद येथे १६ सुलभ शौचालय कॉम्प्लेक्स (पे ॲण्ड मुज टाईपची) बांधण्यात येणार असून दिल्लीचे सुलभ इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन या कंपनीने निविदा दाखल केलेली आहे. व त्यांचेकडून सदरचे काम करवून घ्यावयाचे आहे.

**मा.सभापती :** मला असे वाटते की, दिल्ली वरुन एका एजन्सीला संबंधित कामाचे बांधकामसाठी बोलाविण्यापेक्षा औरंगाबाद शहरामध्ये सदरच्या कामासाठी कारागीर मिळू शकणार नाहीत काय? एवढे खास काम शौचालय बांधणीचे दिल्लीची एजन्सीच करु शकते बाकी इतरही करु शकणार नाही काय? याची माहिती द्यावी. नेमके दिल्लीच्या एजन्सीलाच निविदा मागवून काम देण्याचे धोरण कुणाचे आहे. सरकारने या बाबत काही सुचविले आहे काय?

**श्री.इकबालसिंग गील :** कुणालाही शौचालय बांधकामाचे काम द्यावे परंतू स्विमींग पुल ज्या गुत्तेदारांनी बांधला त्यांना देण्यांत येऊ नये.

**श्री.तुळशीराम भगुरे :** शासनाची संबंधित कामाबाबत काही पत्राद्वारे माहिती आली आहे काय याचा खुलासा व्हावा.

**श्री.अलीम बेग :** संबंधित काम घेणारी एजन्सी बाहेरील असल्याने त्यास काम देण्यांत येऊ नये.

**श्री.इकबालसिंग गील :** त्यास काम देण्यांत येऊ नये.

**मा.सभापती :** स.सदस्यांच्या विचाराअंती सदरील प्रस्तावा संदर्भात ज्या एजन्सीने निविदा दाखल केलेली आहे. ती एजन्सी ही दिल्लीची असून सध्या औरंगाबाद शहराचे स्थानिक कारागीर या कामासाठी मिळणार नाही काय? शासनाचे या प्रस्तावा संदर्भात काही धोरण असल्यास स्पष्ट सांगावे परंतू सध्या प्रस्तावात दर्शविल्यानुसार अंदाजपत्रकीय रकमेस मंजूरी देण्यांत येते. आणि सदरच्या कामासाठी फेरनिविदा मागविण्यांत येऊन संबंधित गुत्तेदार "सुलभ इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन" दिल्ली या एजन्सीला पत्राने तसे कळविण्यांत यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार "सुलभ शौचालय कॉम्प्लेक्स" (पे. ॲण्ड मुज टाईप) रेल्वे स्टेशन जवळ बांधावयाच्या कामासाठी नवीन डी.एस.आर.नुसार अंदाजपत्रक र.रु.६,०८,०००/- ला सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. परंतू सदरच्या कामाचे फेरनिविदा मागविण्यांत याव्या. आणि प्राप्त झालेल्या "सुलभ इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन" दिल्ली या संस्थेला फेरनिविदा संदर्भात पत्राने कळविण्यांत यावे. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.७४/२३ :**

दि.०६.०७.९१ रोजी झालेल्या बैठकीत तृतीय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना गणवेश कापड खरेदी करण्याकरिता प्रस्ताव पाठविण्यांत आला होता. त्या प्रस्तावात फक्त मा.आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे शासनाकडून कपडा खरेदी करण्याबाबतचे दर देण्यांत आले होते. तसेच मा.सभापती यांच्या आदेशानुसार प्राप्त झालेल्या सर्व निविदाधारकांचे दराचा खुलासा देणे बाबत सांगितले असता त्यांच्या दराचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कपड्याचा तपशिल | सुगून | रमेश बिन्नीज टेकस्टाईल्स | विजय जनरल |
|---|---|---|---|---|
| १ | टेरिकॉट खाकी | -- | -- | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | रेमण्डस- ६७/३३ | ९९-८० | १०१-०० | ९८-५० |
| ब) | विमल-६७/३३ | -- | १०१-०० | ९९-५० |
| क) | दिग्जाम-६७/३३ | १०१-०० | ११५-०० | १०९-०० |
| अ) | रेमण्डस-४८/५२ | -- | -- | -- |
| ब) | बिन्नी | -- | -- | -- |
| क) | एस.कुमार | ६६-८० | ६५-५० | ६८-०० |

व तसेच शासनाच्या अंगीकृत उद्योगाचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

१. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, म. - रु.७५.०० प्रति मीटर
२. म.रा.कॉ.ऑप.कंझुमर्स फेड.लि. - रु.११५.०० प्रति मीटर
३. गोदावरी गारमेंटस लि. - रु.६९.०० प्रति मीटर

खालीलपैकी कर्मचाऱ्यांना सन १९९१-९२ सालात गणवेश देणे आहे.

१. झोन कार्यालयातील पुरुष कर्मचारी-
इतर चतुर्थश्रेणी कर्मचारी (अंदाजे) १२०७x५=६०३५ मीटर
२. तृतीय श्रेणी कर्मचारी -
सर्व निरिक्षक, वाहन चालक,
सुरक्षा अधिकारी इतर - १९७x५ =९८५ मीटर

तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी अंदाजे ७००० मीटर कपडा लागेल. तृतीय श्रेणीसाठी कपडा अंदाजे ९८५ मीटर दर रुपये १०९.०० प्रति मीटरसाठी खर्च रु.१,०७,३६५.०० व तृतीय श्रेणी कर्मचारी संख्या १२०७x५=६०३५ मीटर दर रुपये ६५.५० एकूण रुपये ३९५२९२.०० असे एकूण रु.५,०२,६५७.०० अंदाजित खर्च येईल. करिता माहितीस्तव सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**भांडार अधिक्षक :** सदीरल प्रस्तावामध्ये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना गणवेश कपडा खरेदी करण्याकरिता निविदा मागविण्यांत आलेल्या होत्या. पैकी प्राप्त निविदामध्ये तीन शासनाचे अंगीकृत कंपनी व तीन खाजगी दुकानदाराकडून आलेल्या आहेत.

**श्री.अलिम बेग :** ज्या अटी घालून दिलेल्या होत्या त्यापैकी शासन व खाजगी दुकानदारांकडून आलेल्या होत्या काय?

**मा.सभापती :** सदरचा प्रस्ताव विजय जनरल या दुकानदारास टेरीकॉट खाकी मधील दिग्जाम या कंपनीचे कर्मचाऱ्यांना गणवेश कापड खरेदी करण्यांकरिता रु.१०९.०० या दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपातील तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना गणवेश कापड खरेदी करण्याकरिता विजय जनरल या खाजगी दुकानदारास त्यांचेकडील दिग्जाम

या कपंनीच्या कापडाची रु.१०९.०० प्रति मीटर या दराने खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७५/२४ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९१-९२ सालाकरिता तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना चप्पल व बुट देण्याकरिता निविदा मागविण्यांत आल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यांच्या दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ. क्र. | तपशिल | न्यु.जे.के. इंटरप्राइजेस | इन्शा हार्डवेअर | मनोज इंटरप्राइजेस |
|---|---|---|---|---|
| १. | चप्पल पूर्ण लेदर -(स्त्रि कर्मचारी) ५-६-७-८ | ८८.०० प्रति नग | ९९.०० प्रति नग | ७८.०० प्रति नग |
| २. | चप्पल पूर्ण लेदर (पुरुष-कर्मचारी) ६-७-८-९-१० | ८९.५० प्रति नग | १००.०० प्रति नग | ७९.५० प्रति नग |
| ३. | बुट लेदर क्र. ७-८-९-१०--११ | २०५.०० प्रति नग | २४०.०० प्रति नग | २१५.०० प्रति नग |

वरीलप्रमाणे चप्पलचे कमी दर मे.मनोज इंटरप्राइजेस यांचे व बुटाचे कमी दर मे.न्यु.जे.के.इंटरप्राइजेस यांचे आहे. तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ सालात तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना चप्पल व बुट देण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची चप्पल करिता मे.मनोज इंटरप्राइजेस यांची ७८.०० व रु.७९.५० प्रति नग या दराची निविदा तसेच बुटाकरिता मे.न्यु.जे.के.इंटरप्राइजेस यांची रु.२०५.०० प्रति नग या दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७६/२५ :**

सहाय्यक आयुक्त दोन (२) यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९१-९२ सालाकरिता ड्रेनेज बांबू व सुतळी खरेदी करण्याकरिता निविदा मागविण्यांत आल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| अ.क्र. | दरपत्रक धारकांचे नांव | बांबू (र.मी.) | सुतळी प्र.कि. |
|---|---|---|---|
| १. | मे.मनोज इंटरप्राइजेस | ९.२० | ८६.०० |
| २. | मे.इनशा हार्डवेअर | ८.५० | ८२.०० |
| ३. | मे.न्यु.भारत स्टोअर्स | ८.९० | ८५.०० |

तुलनात्मकदृष्ट्या मे.इन्शा हार्डवेअर यांचे बांबु व सुतळीचे दर सर्वात कमी आहेत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ सालाकरिता ड्रेनेज बांबु व सुतळी खरेदी करण्यांकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे बांबु रु.८.५० प्र.र.मी. व सुतळी ८२.०० रु.किलो या मे.इन्शा हार्डवेअर यांच्या दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७७/२६ :**

वार्ड क्र.४५ मो.नुतन कॉलनी येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.पाईप लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.५५,२०५/- ला मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामासाठी बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. पैकी श्री.अन्सारी जी.एम.मुस्तबा यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.९२% कमी दराची निविदा सर्वात कमी होती. संबंधितास पृथ:करण दाखल करणे बाबत पत्रक दिले असता संबंधिताने दर पृथ:करण देवून काम परवडते असा खुलासा केलेला आहे. खुलासा दिल्या नंतर प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीसाठी पाठविला असता स्थायी समिती ठराव क्र.४२६ दि.१६.०३.९१ नुसार फेरनिविदा मागवाव्या असे ठरले.

त्यानुसार निविदा सूचना क्र.१/४६९/९१, दि.०७.०५.९१ द्वारे बी-१ नमुन्यात दुसऱ्यांदा निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

१. श्री.नविद खान - १% कमी
२. श्री.एस.ए.बाहोद्दीन - २% जास्त

तुलनात्कदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री.नविद खान यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४५ मो.नुतन कॉलनी येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.पाईप लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराच्या श्री.नविद खान यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७८/२७ :**

वार्ड क्र.४९ मो.कुशलनगर येथील ड्रेनेज लाईन अपरुटींग करुन २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.५६,२००/- चे बनविण्यांत आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदर कामाकरिता बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता श्री.अे.एन.काल्डा यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची फक्त एकच निविदा प्राप्त झाली प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४९ मो.कुशल नगर येथील ड्रेनेज लाईन अपरुटींग करुन २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता श्री.के.एन.काल्डा यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७९/२८ :**

वार्ड क्र.४९ स्टेट बँक ऑफिसर्स कॉलनी जालना रोड येथे दगडी गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक र.रु.४७,९१०/- चे बनविण्यांत आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र.७ द्वारे बी-१ नमुन्यत निविदा मागविल्या असता सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.७५% कमी दराचे श्री.अनिल चव्हाण यांचे दरपत्रक होते व त्यास स्थायी समिती ठराव क्र.२३९ दि.१४.११.९० नुसार मंजूरी मिळालेली आहे. संबंधितास २% अनामत रक्कम व मुद्रांकन दाखल करणे बाबत पत्रक दिले असता संबंधिताने पुर्तता न केल्याने पुर्तता न केल्याने तसेच (यु.सी.आर.एस.) रेट बाबत मा.आयुक्तांनी खुलासा मागविला असता सा.बा.खात्याच्या

डी.एस.आर.नुसार रेट फारच कमी असून न परवडल्या सारखे असल्याने पुनर्निविदा मागवावे असे आदेश दिले.

आदेशावरुन सदर कामासाठी दि.०४.०३.९१ निविदा सूचना क्र.१८ नुसार फेरनिविदा बी-१ नमुन्यात मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

१. श्री.सय्यद सिराजोद्दीन - १०% कमी
२. श्री.काथार बी.एम. - ४% कमी

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराचे श्री.सय्यद सिराजोद्दीन यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** सदरच्या प्रस्तावाबाबतची संपूर्ण माहिती आहे काय?
**उप अभियंता, ड्रेनेज :** होय. सदरची माहिती उपलब्ध आहे.
**मा.सभापती :** ठिक आहे. सदरील प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४९ मो.स्टेट बँक ऑफिसर्स कॉलनी जालना रोड येथे दगडी गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराच्या श्री.सय्यद सिराजोद्दीन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८०/२९ :**

वार्ड क्र.३७ जुना बायजीपुरा (गादीया पार्क) येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत र.रु.५३,५५०/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मंजूरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी बी-१ नमन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याखालीलप्रमाणे

१. श्री.बी.एम.बेग - १% जास्त
२. श्री.स.सिराजुद्दीन - ६% कमी

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६% कमी दराचे श्री.सय्यद सिराजोद्दीन यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३७ जुनाबायजीपुरा (गादीया पार्क) येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६% कमी दराच्या श्री.सय्यद सिराजोद्दीन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८१/३० :**

वार्ड क्र.४ मो.आनंदनगर येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे कामाकरिता र.रु.५८,७४०/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मंजूरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता श्री.दिपक जैस्वाल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५६% कमी दराची केवळ एकच निविदा प्राप्त झाली. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४ मो.आनंदनगर येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता श्री.दिपक जैस्वाल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५६% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८२/३१ :**

वार्ड क्र.४६ मुक्ती सोपान पासून कार्तिकी हॉटेल पर्यंत (समर्थनगर) नाला ट्रेनिंग करणे बाबत अंदाजपत्रक र.रु.१,५२,२००/- चे तयार करण्यांत आलेले असून सदर नाला पिचींगची लांबी ११० मीटर आहे व मा.आयुक्त साहेब यांनी सदर अंदाजपत्रकास दि.०८.०४.९१ ला मंजूरी दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४६ मुक्ती सोपान पासून कार्तिकी हॉटेल पर्यंत (समर्थनगर) नाला ट्रेनींग करणेच्या कामाकरिता रक्कम रु.१,५२,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८३/३२ :**

अतिरिक्त शहर अभियंता हयांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या विविध वाहनास लागणाऱ्या टायर ट्युबस ब्लॉक खरेदीसाठी वर्तमानपत्रातून जाहिरात देवून (तिसरी वेळ) निविदापत्रके मागविली असता एकूण तीन निविदापत्रके वसुल झाली. त्यापैकी सर्वात कमी दराचे दरपत्रक मे.विजय एजन्सीज, औरंगाबाद हयांचे असून त्यांना निगोशिएशन (वाटाघाटीस) बोलविले असता

| अ. क्र. | साईज | मेल | पुर्वीचे दर | वाटाघाटी नंतर सुधारित दर |
|---|---|---|---|---|
| १. | ५.९०X१५.६ पी आर.टायर ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | रु.१३३०/- | १३०८/- |
| २. | ६.०० X१६.६ आर.आर.जीप टायर-ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | रु.१६४५/- | १६१८/- |
| ३. | ६.००X१६.८ पी.आर.जीप टायर ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | रु.१७३५/- | १७०७/- |
| ४. | ६.००X१६.८ पी आर.टॅक्ट्रर फ्रंट टायर ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | रु.११५०/- | ११३१/- |
| ५. | ७.००X१५.१० पी.आर.टायर ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | रु.२८००/- | २७५५/- |
| ६. | ७.५०X१६ टायर ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | रु.३३८०/- | ३३२५/- |
| ७. | ७.५०X२०.१२ पी.आर.टायर ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | रु.४३५०/- | ४२८०/- |
| ८. | ८.२५X२०.१४ पी.आर.टायर ट्युब क्लॅम्प | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | रु.५१५५/- | ५०७२/- |
| ९. | ९.००X२०.१४ पी.आर.टायर ट्युब क्लॅम्प | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | रु.६५७५/- | ६४६९/- |
| १०. | ९.००X२०.१६ पी.आर.टायर ट्युब क्लॅम्प | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | रु.७२७५/- | ७१५८/- |
| ११. | १२.४X२८ टायर ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | रु.४८२०/- | ४७२०/- |

असे एकूण १९५ टायर्स खरेदी साठी रक्कम रुपये रु.६,५४,५११/- खर्च येईल. मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध वाहनास लागणाऱ्या टायर ट्युब क्लॅम्प, खरेदी करिता मेसर्स विजय एजन्सीस, औरंगाबाद यांचे खालील दर्शविलेल्या दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ. क्र. | साईज | मेल | दर |
|---|---|---|---|
| १. | ५.९०x१५.६ पी आर.टायर ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | १३०८/- |
| २. | ६.०० x१६.६ आर.आर.जीप टायर-ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | १६१८/- |
| ३. | ६.००x१६.८ पी.आर.जीप टायर ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | १७०७/- |
| ४. | ६.००x१६.८ पी आर.टॅक्ट्रर फ्रंट टायर ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | ११३१/- |
| ५. | ७.००x१५.१० पी.आर.टायर ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | २७५५/- |
| ६. | ७.५०x१६ टायर ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | ३३२५/- |
| ७. | ७.५०x२०.१२ पी.आर.टायर ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | ४२८०/- |
| ८. | ८.२५x२०.१४ पी.आर.टायर ट्युब क्लॅम्प | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | ५०७२/- |
| ९. | ९.००x२०.१४ पी.आर.टायर ट्युब क्लॅम्प | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | ६४६९/- |
| १०. | ९.००x२०.१६ पी.आर.टायर ट्युब क्लॅम्प | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | ७१५८/- |
| ११. | १२.४x२८ टायर ट्युब | एम.आर.एफ/मोदी मोदी स्टोअर | ४७४२/- |

एकूण १९५ टायर्स खरेदीस व रक्कम रुपये ६ लाख ५४ हजार ५११ च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८४/३३ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९१ सालात स्टेशनरी साहित्य खरेदी करण्याकरिता निविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यांत आला असता खालील दर्शविण्यांत आल्याप्रमाणे कमी दराच्या संस्थेचा अनुक्रमांक पुरवठा धारकांच्या नावांसमोर दर्शविण्यांत आलेला आहे.

१. मे.न्यु.जे.के.इंटरप्राइजेस :
१-४-७-११-१४-१७-२०-२३-२६-२९-३२-३५-३८-४१-४५-४७-५०-५३-५६-५९-६२-६५-६८-७१-७४-७६-८०-८३-८६-८९-९२-९५-९८-१०४-१०६-१०९-११०-११३-११६-१२५-१२७-१२८-१३१-१३२-१३४-१३७-१३८-१४३-१४६

२. मे.मुरली स्टेशनर्स :
२-५-८-१२-२१-२४-२७-३०-३३-३६-३९-४२-४८-५४-५७-६०-६३-६६-६९-७२-७५-७८-८१-८७-९०-९३-९६-१०८-११२-११४-१२१-१२३-१२४-१२६-१२९-१३५-१४०-१४१-१४२-१४४-१४७

३. मे.विजय जनरल स्टोअर्स :
३-६-९-१०-१३-१६-१८-१९-२२-२५-२८-३१-३४-३७-४०-४३-४६-४९-५१-५२-५५-५८-६१-६४-६७-७०-७३-७६-७९-८२-८५-८८-९१-९४-९७-९९-१००-१०१-१०२-१०३-१०५-१०७-१०८-१११-११२-११५-११७-११८-११९-१२२-१३०-१३३-१३६-१३९-१४५-१४८-१४९-१५०-१५१

वरीलप्रमाणे अनुक्रमांकाचे दर सर्वात कमी आहेत. व क्र.१०८-११२ चे साहित्याचे दर मेमुरली स्टेशनर्स व मे.विजय जनरल स्टोअर्स यांचे सारखे असल्यामुळे दोघांकडून सम प्रमाणात खरेदी करण्यांत येतील.

वरील दर्शविण्यांत आलेल्या कमी दरास मंजूरीसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ सालात स्टेशनरी साहित्य खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी खालील दर्शविल्याप्रमाणे निविदाधारकांचे नावांसमोरील साहित्याचे अनुक्रमांकाचे साहित्य त्या त्या निविदाधारकांकडून खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१. मे.न्यु.जे.के.इंटरप्राइजेस :
१-४-७-११-१४-१७-२०-२३-२६-२९-३२-३५-३८-४१-४४-४५-४७-५०-५३-५६-५९-६२-६५-६८-७१-७४-७६-८०-८३-८६-८९-९२-९५-९८-१०४-१०६-१०९-११०-११३-११६-१२५-१२७-१२८-१३१-१३२-१३४-१३७-१३८-१४३-१४६

२. मे.मुरली स्टेशनर्स :
२-५-८-१२-२१-२४-२७-३०-३३-३६-३९-४२-४८-५४-५७-६०-६३-६६-६९-७२-७५-७८-८१-८४-८७-९०-९३-९६-१०८-११२-११४-१२१-१२३-१२४-१२६-१२९-१३५-१४०-१४१-१४२-१४४-१४७

३. मे.विजय जनरल स्टोअर्स :
३-६-९-१०-१३-१६-१८-१९-२२-२५-२७-३१-३४-३७-४०-४३-४६-४९-५१-५२-५५-५८-६१-६४-६७-७०-७३-७६-७९-८२-८५-८८-९१-९४-९७-९९-१००-१०१-१०२-१०३-१०५-१०७-१०८-१११-११२-११५-११७-११८-११९-१२०-१२२-१३०-१३०-१३६-१३९-१४५-१४८-१४९-१५०-१५१

अनुक्रमांक १०८-११२ चे साहित्याचे दर मे.मुरली स्टेशनर्स व मे.विजय जनरल स्टोअर्स यांचे सारखे असल्यामुळे सदरील ॲटमचे साहित्य दोघांकडून समप्रमाणात खरेदी करण्यांत यावे.

**विषय क्र.८५/३४ :**

सहाय्यक आयुक्त-२ महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९१-९२ सालात महानगरपालिकेस लागणारे साफसफाई साहित्य खरेदी करण्याकरिता निविदा मागविण्यांत आल्या होत्या. एकूण चार निविदा खालील प्रमाणे प्राप्त झाल्या होत्या.

१. मे.मनोज इंटरप्राईजेस, औरंगाबाद.
२. मे.न्यु. भारत स्टोअर्स, औरंगाबाद.
३. मे.इन्शा हार्डवेअर, औरंगाबाद.
४. मे.न्यु.जे.के.इन्टरप्राईजेस, औरंगाबाद.

वरीलपैकी मे.न्यु.जे.के.इंटरप्राईजेस यांनी अनामत रक्कम भरली नसल्यामुळे त्यांच्या निविदाचा विचार करण्यांत आलेला नाही. फक्त अनु.क्र.१-२-३ निविदा धारकांच्याच दाराचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यांत आलेला आहे. व त्यांच्यापैकी कमी दराचे वस्तु खरेदी करणे आहे. व खालीलप्रमाणे त्यांच्या नांवासमोर दर्शविण्यांत आलेले अनुक्रमांकाचे दर कमी असल्यामुळे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

१. मे.मनोज इंटरप्राईजेस, औरंगाबाद.
अनुक्रमांक : १-१७-२१-२२-२३-२४-२५-२६-२७-२८-२९-३०

२. मे.न्यु. भारत स्टोअर्स, औरंगाबाद.
अनुक्रमांक : १-१०-१५-१८-१९-२०-३४-३५-३६

३. मे.इन्शा हार्डवेअर, औरंगाबाद.
अनुक्रमांक : २-३-४-५-७-८-९-११-१२-१३-१४-१६-१९-३१-३२-३३-३७-३८-३९

वरीलप्रमाणे साहित्य अनुक्रमांक १ चे दर मे.मनोज इंटरप्राईजेस व मे.न्यु भारत स्टोअर्स व तसेच अ.क्र.१९ चे दर न्यु भारत स्टोअर्स व मे.इन्शा हार्डवेअर यांचे समप्रमाणात आहेत.

वरीलप्रमाणेच्या संबंधिताच्या नावासमोर दर्शविण्यांत आलेल्या अनुक्रमांकाच्या दरास मान्यतेस्तव प्रस्तावाचे प्रारुप सादर.

सोबत तुलनात्मक तक्त्याची प्रत जोडली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ सालात महानगरपालिकेस लागणारे साफसफाई साहित्य खरेदी करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी मे.न्यु.जे.इंटरप्राईजेस यांनी अनामत रक्कम न भरल्यामुळे त्यांची निविदा रद्द करण्यात येते. तसेच खालील निविदा धारकांचे नावासमोर दर्शविलेल्या अनुक्रमांकाची साहित्य खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१. मे.मनोज इंटरप्राईजेस, औरंगाबाद.
अनुक्रमांक : १-१७-२१-२२-२३-२४-२५-२६-२७-२८-२९-३०

२. मे.न्यु. भारत स्टोअर्स, औरंगाबाद.
अनुक्रमांक : १-१०-१५-१८-१९-२०-३४-३५-३६

३. मे.इन्शा हार्डवेअर, औरंगाबाद.
अनुक्रमांक : २-३-४-५-७-८-९-११-१२-१३-१४-१६-१९-३१-३२-३३-३७-३८-३९

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८६/३५ :**

सन १९९१-९२ सालात कार्यालयातील आवश्यक ते कागदपत्रे व रजिस्टर्स बुक बाईडींग करणे करिता निविदा मागविण्यांत आल्या होत्या एकूण तीन निविदा प्राप्त होत्या.

१. मे.लिबर्टी लॉ बुक बाईंडर ॲण्ड प्रिंटर्स
२. मे.आर.के.शेख
३. मे.सुपर बुक बाईडींग वर्क्स

वरीलप्रमाणे निविदाधारकांचे कमी दर खालीलप्रमाणे आहेत.

१) मे.लिबर्टी लॉ बुक बाईंडर ॲण्ड प्रिंटर्स
अ.क्र.४ पे.बील व्हाऊचर्स
अ) फुलसाईज क्लॉथ बाईडींग - १५.०० प्र.नग
क) जनरल व्हाऊचर्स क्लॉथ बाईडींग - १०.०० प्र.नग

२) श्री.आर.के.शेख
अनु.क्र.१ फुल साईज रजिस्टर बाईडींग
अ) क्लॉथ व मार्बल पेपर - १८.०० प्र.नग
ब) लेदर बाईडींग - २०.०० प्र.नग
अनु.क्र.२-१/२ साईज
अ) क्लॉथ बाईडींग - १२.०० प्र.नग
ब) लेदर बाईडींग - १५.०० प्र.नग
अनु.क्र.३-१-४ साईज

ब) लेदर बाईडींग - १२.०० प्र.नग
अनु.क्र.४-पे बील व्हाऊचर
ब) स्मॉल साईज क्लॉथ बाईडींग - १०.०० प्र.नग
क) जनरल व्हाऊचर क्लॉथ बाईडींग - १०.०० प्र.नग
अनु.क्र.५- पुस्तके बांधणी
अ) १/८ क्लॉथ बाईडींग - ५.०० प्र.नग
ब) १/१२ क्लॉथ बाईडींग - ५.०० प्र.नग
क) १/३२ क्लॉथ बाईडींग - ४.०० प्र.नग

३) मे.सुपर बुक बाईडींग वर्क्स
अनु.क्र.४- पे.बिल व्हाऊचर्स
ब) स्मॉल साईज क्लॉथ बाईडींग - १०.०० प्र.नग
अ.क्र.५- पुस्तके
ब) १/१२ साईज क्लॉथ बाईडींग - ५.०० प्र.नग
क) १-९२ साईज क्लॉथ बाईडींग - ४.०० प्र.नग
अनु.क्र.३-१/४ साईज
अ) १/४ साईज क्लॉथ बाईडींग - १०.०० प्र.नग

वरीलप्रमाणे दर्शविलेले दर सर्वात कमी आहेत व अ.क्र.४ (ब) चे दर श्री.आर.के.शेख व मे.सुपर बुक बाईडींग वर्क्स व अ.क्र.४ क चे दर मे.लिबर्टी लॉ बुक बाईंडर ॲण्ड प्रिंटर्स व श्री.आर.के.शेख यांचे आहेत व तसेच अ.क्र.५ (ब) व (क) चे दर मे.आर.के.शेख व मे.सुपर बुक बाईडींग वर्क्स यांचे आहेत. वरीलप्रमाणे दर्शविण्यांत आलेल्या दरास मंजूरीसाठी प्रस्तावाचे प्रारुप सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ सालात कार्यालयातील आवश्यक ती कागदपत्रे व रजिस्टर बुकबाईडींग करणे बाबतचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी खालील दर्शविलेल्या निविदाधारकांचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१. मे.लिबर्टी लॉ बुक बाईंडर ॲण्ड प्रिंटर्स
२. मे.आर.के.शेख
३. मे.सुपर बुक बाईडींग वर्क्स

वरीलप्रमाणे निविदाधारकांचे कमी दर खालीलप्रमाणे आहेत.

१) मे.लिबर्टी लॉ बुक बाईंडर ॲण्ड प्रिंटर्स
अ.क्र.४ पे.बील व्हाऊचर्स
अ) फुलसाईज क्लॉथ बाईडींग - १५.०० प्र.नग
क) जनरल व्हाऊचर्स क्लॉथ बाईडींग - १०.०० प्र.नग

२) श्री.आर.के.शेख
अनु.क्र.१ फुल साईज रजिस्टर बाईडींग
अ) क्लॉथ व मार्बल पेपर - १८.०० प्र.नग
ब) लेदर बाईडींग - २०.०० प्र.नग
अनु.क्र.२-१/२ साईज
अ) क्लॉथ बाईडींग - १२.०० प्र.नग
ब) लेदर बाईडींग - १५.०० प्र.नग

अनु.क्र.३-१-४ साईज
ब) लेदर बाईडींग - १२.०० प्र.नग
अनु.क्र.४-पे बील व्हाऊचर
ब) स्मॉल साईज क्लॉथ बाईडींग - १०.०० प्र.नग
क) जनरल व्हाऊचर क्लॉथ बाईडींग - १०.०० प्र.नग
अनु.क्र.५- पुस्तके बांधणी
अ) १/८ क्लॉथ बाईडींग - ५.०० प्र.नग
ब) १/१२ क्लॉथ बाईडींग - ५.०० प्र.नग
क) १/३२ क्लॉथ बाईडींग - ४.०० प्र.नग

३) मे.सुपर बुक बाईडींग वर्क्स
अनु.क्र.४- पे.बिल व्हाऊचर्स
ब) स्मॉल साईज क्लॉथ बाईडींग - १०.०० प्र.नग
अ.क्र.५- पुस्तके
ब) १/१२ साईज क्लॉथ बाईडींग - ५.०० प्र.नग
क) १-९२ साईज क्लॉथ बाईडींग - ४.०० प्र.नग
अनु.क्र.३-१/४ साईज
अ) १/४ साईज क्लॉथ बाईडींग - १०.०० प्र.नग
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८७/३९ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिटी क्लब ते रंगीन गेट या १०० फुट डी.पी.रोड मध्ये महानगरपालिका कर्मचारी गृहनिर्माण संस्थेची बाधीत होणारी संरक्षित भिंत पाडून नव्याने बांधणेच्या कामासाठी सन १९९०-९१ चे सार्वजनीक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.८३,५००/- च्या अंदाजपत्रकास दि.१७.०५.९१ ला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदर काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.(३) १९९१-९२ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि.०५.०६.९१ ला एकूण चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१. श्री.राजासिंग - ०.६% कमी दराने
२. श्री.अब्दुल सलाम - ५% जास्त दराने
३. श्री.नरेंद्रसिंग - ८% जास्त दराने
४. श्री.अब्दुल कलीम - ११% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.६% कमी दराने श्री.राजासिंग यांची निविदा असून सदरचा खर्च शासकीय अनुदानातून करण्यांत येईल. निविदा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.इकबालसिंग गील :** सिटी क्लब ते रंगीन गेट या १०० फुटी डी.पी.रोडमध्ये महानगरपालिका कर्मचारी गृहनिर्माण संस्थेची बाधीत होणारी संरक्षित भिंत पाडून नव्याने बांधकामासाठी परवानगी बाबत प्रस्तावात दर्शविलेले आहे. त्याचप्रमाणे जवाहर कॉलनी पोलिस स्टेशनच्या जवळच लागून असलेली

जागासुध्दा एका नागरीकांची बांधीत होत आहे. तेव्हा त्यांनाही महानगरपालिकेतर्फे संरक्षित भिंत बांधून देण्यांबाबत कार्यवाही व्हावी.
**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता :** संबंधित जागेबाबत पुर्णपणे माहिती नसून सिटी सर्व्हे कार्यालयाकडून तसेच नगर रचना विभागाकडून मोजमाप केल्यानंतर प्रत्यक्षात पाहणी नंतर कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे जवाहर कॉलनी येथै प्रत्यक्षात जाऊन पाहणी करावी. आणि नंतरच नगररचना विभागामार्फत संपूर्ण माहिती पुढील बैठकीत ठेवण्यांत यावी. विषय क्र.३६ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिटी क्लब ते रंगीन गेट सह १०० फुट डी.पी.रोडमध्ये महानगरपालिका कर्मचारी गृहनिर्माण संस्थेची बाधीत होणारी संरक्षित भिंत पाडून नव्याने बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.६% कमी दराचे गुत्तेदार श्री.राजासिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८८/३७ :**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, कैलासनगर येथील स्मशान भूमीस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु.१,६३,६४०/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे.

सदर कामाकरिता स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविल्या असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सतरा निविदापत्रके विकल्या गेली. व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात दर निर्दिष्ट पत्रके प्राप्त झाली. प्राप्त झालेली निविदापत्रके ३०.०१.१९९१ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.गिरीश सिकची | - | २५.१% कमी |
| २. | श्री.कैसर खान | - | २१४.००% कमी |
| ३. | श्री.मौला अलियार खान | - | १९.१०% कमी |
| ४. | मे.एस.एच.असोशिएटस | - | १८.४% कमी |
| ५. | श्री.कुलवंतसिंग | - | १९.८७% कमी |
| ६. | मे.पॉल कन्स्ट्रक्शन | - | १३.७८६% कमी |
| ७. | श्री.के.जी.गुनवानी | - | २०.१०% कमी |

श्री.गिरीश सिकची यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.१% कमी आहेत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैलास नगर येथील स्मशान भूमीस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.१% कमी दराचे श्री.गिरीश सिकची यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८९/३८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रोजेबाग स्लम अंतर्गत मोकळ्या जागेत समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी सन १९८९-९० चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे

डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक र.रु.८८,६००/- चे तयार करण्यांत आले असून त्यास मा.अयुक्तांची दि.१०.०४.९१ ला प्रशासकीय मंजूरी मिळालेली आहे.

सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.४, दि.२१.०५.९१ अन्वये निविदा दर मागविले असता शेवटच्या तारखेपर्यंत फक्त एकच निविदा प्राप्त झाली. ती दि.०३.०६.९१ ला गुत्तेदारा समक्ष उघडण्यांत आली सदरची निविदा श्री.शेख शरीफ, गुत्तेदार यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १% कमी (एक टक्का कमी) कमी दराची आहे.

तरी सदर कामाचे अंदाजपत्रकीय र.रु.८८,६००/- व सदर काम एजन्सी श्री.शेख शरीफ यांची निविदा अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १% कमी मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

<u>संवाद :</u>

**श्री.तुळशीराम भगुरे, श्री.नारायण फत्तेलष्कर :** सदरील प्रस्तावात कामासाठी लागणारी अंदाजपत्रकीय रक्कम किती आहे. याचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता, बांधकाम :** सदरच्या कामासाठी लागणारी अंदाजपत्रकीय रक्कम रु.८८,६००/- इतकी आहे.

**मा.सभापती :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोजेबाग स्लम अंतर्गत मोकळ्या जागेत समाज मंदिर बांधणे बाबतचे कामासाठी प्राप्त झालेली एकमेव निविदा गुत्तेदार श्री.शेख शरीफ यांचे १% कमी दराचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.९०/३९ :**

औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार १०० फुट रुंद जिल्हाधिकारी कार्यालय ते चंपा मस्जीद मार्गे दमडी महल या रस्त्यात बाधीत असलेल्या मिळकती खालीलप्रमाणे असून रु.२००/- प्रति चौरस मीटर प्रमाणे होणारी रक्कम त्या नावांसमोर दर्शविलेली आहे.

| अ.क्र. | न.भु.क्र. | बांधित क्षेत्र चौ.मी. | मोबदल्याची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ११३२८-११३२९ | २१३३.०० | सरकारी जमीन |
| २ | ११८७३ | ९२.०० | १८,४००/- |
| ३ | ११८७४ | ६५.०० | १३,०००/- |
| ४ | ११८७१/६ | ७१.५० | १४,३००/- |
| ५ | १०८७१/७ | ७१.५० | १४,३००/- |
| ६ | १०८७२/२ | ६५.०० | १३,०००/- |
| ७ | १०८७१/१ | ७१.५० | १४,३००/- |
| ८ | १०८७१/८ | १३५.०० | २७,०००/- |
| ९ | ११८७१/११ | ३५.०० | ७,०००/- |
| १० | ११२९१ | ३०.०० | ६,०००/- |
| ११ | ११२९२ | ३०.५० | ६,१००/- |
| १२ | ११२९३ | १८.०० | ३,६००/- |
| १३ | ११२९४ | १८.०० | ३,६००/- |
| १४ | १०८७२/१ | ६१.७५ | १२,३५०/- |
| | **एकूण अ.क्र.२ ते १४** | **७६४.७५** | **१,५२,९५०.००** |

एकूण बेरीज अ.क्र.१ ते १४ :-२८९७.७५ वर प्रस्तावित केलेल्या मिळकतीपैकी अ.क्र.१ वरील न.भु.क्र.११३२८ व ११३२९ या सरकारी मिळकतीचे क्षेत्र २१३३ चौ.मी.आहे. उर्वरित १३ मिळकतीमध्ये सुमारे ७६४.७५ चौ.मी.जागा बाधित होते. बांधीव भाग काहीही बाधीत होत नाही व खुल्या जागेसाठी रक्कम रु.२००/- प्रति चौ.मी.प्रमाणे रु.१,५२,९५०/- एवढी मोबदल्याची रक्कम देय होते. तसेच जे मिळकत धारक वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाची सवलत घेतील त्यांना मोबदला देय होणार नाही. करिता संबधितांना मोबदल्याची रक्कम देण्यास दि.१६.०१.९१ रोजी झालेल्या स्थायी समितीचा ठराव क्र.३९९/४ च्या अनुषंगाने सविस्तर माहिती सादर करणेस्तव येऊन सदरचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** मागील वर्षी महाराष्ट्र शासनाकडील अनुदान आलेले होते ते कोणत्या कामासाठी आणि शहरातील कोणकोणत्या रस्त्यांच्या संदर्भात होते. त्याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** सदरील बाबतीत संपूर्ण माहिती पुढील बैठकीत सविस्तर ठेवण्यांत यावी. या बरोबरच सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार १०० फुट रुंद जिल्हाधिकारी कार्यालय ते चंपा मस्जिद मार्गे दमडी महल या रस्त्यात बाधित होत असलेल्या खालील दर्शविल्याप्रमाणे मिळकतांना रु.२००/- प्रति चौरस मिटर या दराने मिळकत धारकांना मोबदल्याची रक्कम देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | न.भु.क्र. | बांधित क्षेत्र चौ.मी. | मोबदल्याची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ११३२८-११३२९ | २१३३.०० | सरकारी जमीन |
| २ | ११८७३ | ९२.०० | १८,४००/- |
| ३ | ११८७४ | ६५.०० | १३,०००/- |
| ४ | ११८७१/६ | ७१.५० | १४,३००/- |
| ५ | १०८७१/७ | ७१.५० | १४,३००/- |
| ६ | १०८७२/२ | ६५.०० | १३,०००/- |
| ७ | १०८७१/१ | ७१.५० | १४,३००/- |
| ८ | १०८७१/८ | १३५.०० | २७,०००/- |
| ९ | ११८७१/११ | ३५.०० | ७,०००/- |
| १० | ११२९१ | ३०.०० | ६,०००/- |
| ११ | ११२९२ | ३०.५० | ६,१००/- |
| १२ | ११२९३ | १८.०० | ३,६००/- |
| १३ | ११२९४ | १८.०० | ३,६००/- |
| १४ | १०८७२/१ | ६१.७५ | १२,३५०/- |
| | **एकूण अ.क्र.२ ते १४** | **७६४.७५** | **१,५२,९५०.००** |

वरीलप्रमाणे एकूण र.रु.१,५२,९५०/- एवढी मोबदल्याची रक्कम मिळकतधारकांना देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐन वेळचे विषय

**विषय क्र.९१/१ :**

सहाय्यक आयुक्त-२, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कार्यालयास झेरॉक्स मशीन खरेदी करण्याकरिता निविदापत्रके मागविण्यांत आले होते.

त्यानुसार एकूण सहा निविदा पत्रके प्राप्त झाली आहेत. दि.०६.०५.९१ अन्वये आलेल्या निविदाधारकांनी झेरॉक्स मशिनच्या किंमतीत वाढ झाल्याचे कळविले आहे. त्यानुसार वाढीव दराची पण मा.आयुक्तांनी दि.१६.०७.९१ अन्वये मान्यता दिली आहे.

तरी वाढीव दरात झेरॉक्स मशिन खरेदी करण्याकरिता प्रस्ताव विचाराधीन सादर निविदा धारकांचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

**१. मे.प्लाझा प्रिंटर्स - कॅनन**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | मॉडेल एनपी-२७० | १५१५०० | - | अधिक इतर साहित्य दर व कर वाढीव देणे वेगळे |
| ब) | मॉडेल-एनपी-२७१ | १५००० | - | अधिक इतर साहित्य दर व कर वेगळे |
| क) | मॉडेल-१०१० | ७८००० | - | अधिक इतर साहित्य व दर व कर वाढीव किंमत वेगळी |

**२. मे.इलेक्ट्रॉनिक सेल्स कॉर्पोरेशन - कारेरा**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | मॉडेल-११०१ | ९०५०० | - | अधिक इतर साहित्य दर व कर व वाढीव देणे वेगळे |
| ब) | मॉडेल-११०१ आर. | ९६५०० | - | अधिक इतर साहित्य दर व कर व वाढीव देणे वेगळे |
| क) | मॉडेल-७७५० | १,१३,५०० | - | अधिक इतर साहित्य दर व कर व वाढीव देणे वेगळे |
| ड) | मॉडेल-७२० | ५८००० | - | अधिक इतर साहित्य दर व कर व वाढीव देणे वेगळे |

**३. मे.चौघुले इंडस्ट्रीज लि. (वाढीव दर)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | मॉडेल-एनपी-२७० | १,६३,००० | - | अधिक इतर साहित्य व कर वेगळे |
| ब) | मॉडेल-एनपी-२७१ | १,३८,००० | - | अधिक इतर साहित्य व कर वेगळे |

**४. मे.श्री.इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | कॅनान | १,६८,०००/- | - | अधिक इतर कर, दर व वाढीव किंमत वेगळी |
| ब) | कोरस | ९५,०००/- | - | अधिक इतर कर, दर व वाढीव किंमत वेगळी |
| क) | मोदी ऑफिस मॉडेल | ८५,०००/- | - | अधिक इतर कर, दर व वाढीव किंमत वेगळी |
| ड) | केनान ऑफिस मॉडेल | ९५,०००/- | - | अधिक इतर कर, दर व वाढीव किंमत वेगळी |

**५. मोदी झेरॉक्स लि.मोदी झेरॉक्स मशीन**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | मॉडेल-५०१२ | ५०,५००/- | - | अधिक इतर साहित्य कर व वाढीव कर वेगळे |
| ब) | मॉडेल-१०२५ (१/१) | ६५,५३०/- | - | अधिक इतर साहित्य कर व वाढीव कर वेगळे |
| क) | मॉडेल-१०२५ रेस्ट | ७३,९३०/- | - | अधिक इतर साहित्य व कर वेगळे |
| ड) | मॉडेल-१०३८ (२०० एम) | १,७०,२६८.६०/- | - | अधिक इतर साहित्य व कर वेगळे |

**६. मे.कोरस इंडिया लि.कोरस**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | मॉडेल-के.एस.-७७५० | ९८,५००/- | - | अधिक इतर साहित्य व कर व वाढीव कर वेगळे |
| ब) | मॉडेल-के.एस.११०१ | ७०,०००/- | - | अधिक इतर साहित्य व कर व वाढीव कर वेगळे |
| क) | मॉडेल-के.एस.११०१ | ७६,०००/- | - | अधिक इतर साहित्य व कर व वाढीव कर वेगळे |

वरीलप्रमाणे पुरवठा धारकांचे दर आहेत. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** मे.मोदी झेरॉक्स लि.मोदी झेरॉक्स मशिन यातील अनुक्रमांक (क) मध्ये दर्शविण्यांत आलेले मॉडेल १०२५ रेस्ट, मुळ किंमत रु.७३,९३०/- असून या मध्ये अधिक इतर सर्व्हीसेस व कर वेगळे असे धरुन रु.८३,०००/- अंदाजे किंमत होते. यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका कार्यालयास झेरॉक्स मशिन खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे मे.मोदी झेरॉक्स लि.यांचे दरपत्रक असून दरपत्रकातील अ.क्र.(क) मॉडेल-१०२५ (रेस्ट) मुळ किंमत र.रु.७३,९३०/- व अधिक इतर साहित्य व कर वेगळे असे धरुन रक्कम रु.८३,०००/- झेरॉक्स मशिन खरेदी बाबतचे खर्चास तसेच सदर मशिन मे.मोदी झेरॉक्स लि.यांचेकडून खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

याबरोबरच आजची सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ०५.०८.१९९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक ०५ ऑगस्ट, १९९१ रोजी मा.सभापती श्री.मो.इस्माईल अ.करीम यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ३.०० वाजता स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

१. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
२. श्री.फैयाज खान अहमद खान
३. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री.जावेद हसन खाँन कसीम हसन खाँन
५. श्री.विजय गोविंदलाल पालीवाल
६. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
७. श्री.भगुरे तुळशीराम छगन
८. श्री.बारवाल गजानन रामकिसन
९. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
१०. श्री.सोनवणे केशव काशिनाथ
११. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र.९२ :**

दि.१८.०७.९१ च्या विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त व दिनांक २२.०७.९१ च्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**मा.सभापती :** दि.२२.०७.९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांचे पान क्र.२४ ते ४५ वर चर्चा केली जाणार नाही. कारण यातील पान क्रमांक व ठराव क्रमांक चुकीचे टाकले गेलेले आहेत. योग्य ती दुरुस्ती करण्याचे संबंधितांना सुचित केलेले आहे. दुरुस्त्या झाल्यानंतर दुरुस्त प्रती सभासदांना पुरविल्यानंतर त्यावर चर्चा करण्यांत येईल.

**श्री.केशव सोनवणे :** २२.०७.९१ च्या इतिवृत्ताचे पान क्र.८ वर माझे वक्तव्य असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम (६७) (३) (क) नुसार झालेल्या संपूर्ण कामाची संपूर्ण माहिती वीस दिवसांत देण्यांत येईल असे सभागृहास सांगण्यांत आले होते. या कलमांतर्गत करण्यांत आलेल्या कामांची यादी स.सभासदांना ६ जुलै ९१ पासून वीस दिवसाचे आंत देण्यांत येणार होती. ही वेळ संपलेली आहे. तरी अद्याप पावेतो अशी यादी स.सभासदांना देण्यांत आलेली नाही. हा विलंब का याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** ६ जुलै रोजी सर्व अभियंत्यांना सांगितले होते की उक्त कलमांतर्गत किती कामे करण्यांत आली याची पुर्ण माहितीसह यादी वीस दिवसांत सर्व स्थायी समिती सभासदांना देण्यांत यावी.

**श्री.केशव सोनवणे :** ६७ (३) (क) कलमांतर्गत करण्यांत आलेल्या कामाची यादी वीस दिवसांत सर्व सभासदांना देण्यांत यावी असे म्हणून एक महिन्याचा

कालावधी लोटला आहे. परंतू आता पावेतो सभागृहास काहीही सांगण्यात आलेले नाही. जर आदेशाचे पालन होणार नसेल तर आदेश देताच कशाला?

**मा.सभापती :** आतापर्यंत अधिकाऱ्यांनी माहिती द्यावयास पाहिजे होती.

**श्री.तुळशीराम भगुरे :** अधिकाऱ्यांनी माहिती आणलेली आहे ते वाचून दाखवतील ती सर्वांनी ऐकावी.

**श्री.केशव सोनवणे :** माहिती देण्यांत यावी असे ठरले होते ती लेखी स्वरुपात का देण्यांत येत नाही. लेखी स्वरुपात माहिती आल्याशिवाय सर्व सभासदांना तिचा अभ्यास करता येणार नाही व कोणास काही शंका असतील तर त्याही त्यांना विचारता येणार नाहीत.

**मा.सभापती :** ६७ (अ) (क) कलमांतर्गत करुन घेण्यांत आलेली कामे आणीबाणीच्या परिस्थितीतच करवून घेण्यांत आली होती का हे लेखी यादी दिल्याशिवाय स.सभासदांना समजणार नाही. सर्व संबंधित इंजिनियर्सनी ही माहिती लेखी स्वरुपात तीन दिवसांत सर्व स्थायी समिती सभासदांना द्यावी. जर त्यावर कोणास काही शंका असतील तर स.सदस्यांनी त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा करावी. ही माहिती सर्वांना निर्धारित वेळेत मिळेल याची मा.उपआयुक्त यांनी खबरदारी घ्यावी.

**मा.उपआयुक्त :** स.सभासदांनी मागणी केलेल्या कामाची यादी पूर्ण माहितीसह तयार करुन सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी सचिवांकडे पाठवावी. स्थायी समिती सभासदांना ती माहिती सचिवांकडून पुरविली जाईल.

**श्री.केशव सोनवणे :** ती माहिती सर्व सभासदांना नक्की केव्हा मिळेल याची आता एकच तारिख देण्यांत यावी.

**मा.सभापती :** १० ऑगस्ट पावेतो ही माहिती सर्व सभासदांना देण्यांत यावी.

**श्री.इकबालसिंग गील :** मी.श्री.समर्थ गृहनिर्माण संस्था गारखेडा च्या भूखंड क्र.१ वरील अतिक्रमणाबाबत माहिती विचारली होती. ती प्रथम देण्यांत यावी.

**मा.सभापती :** नगर रचना विभागाकडून अशी माहिती आलेली आहे. या जागेचे जॉईंट मेजरमेंन्ट करुन घ्यावे. त्यासाठी येणारा खर्च संबंधित पार्टीने करावा. व अहवाल सभागृहास सादर करावा.

**श्री.गजानन बारवाल :** या भुखंडा संबंधाने प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. त्यात मनपा हस्तक्षेप करु शकते का?

**श्री.केशव सोनवणे :** ६ जुलै १९९१ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेत मी एक पत्र दिले होते की, औरंगाबाद शहरात टपऱ्या किती आहेत. याची माहिती द्यावी स.सभापतींनी ही माहिती एक महिन्यांत पुरविण्याचे आदेश दिलेले होते. संबंधित अधिकाऱ्यांनी असे म्हटले आहे की, औरंगाबाद शहरात १३४ टपऱ्या आहेत. हे खरे आहे काय? मनपा टपरी धारकांना जरी जागा ठरवून देते. त्यापेक्षा जास्त जागा बऱ्याचशा टपरी धारकांनी आपल्या ताब्यात घेतलेली आहे. अशा टपऱ्यांचा पंचनामा करण्यांत यावा. अशीही मागणी करण्यांत आलेली होती. ही माहिती देण्यांत यावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती सभागृहात येईपर्यंत पुढील विषयावर चर्चा करण्यांत यावी.

**श्री.केशव सोनवणे :** दि.२२.०७.१९९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्ताचे पान क्र.२२ वरील ठराव क्र.७२/२२ शहर अभियंता यांच्याकडून यावयास पाहिजे होता.

**मा.सभापती :** बांधकामाचा प्रस्ताव असल्यामुळे शहर अभियंता यांनी मांडला असेल. दि.१८.०७.९१ च्या विशेष स्थायी समिती सभेच्या इतिवृत्ताचे ठराव क्र.१ पान क्र.१० वरील पॉईट क्र.१२ मध्ये असे नमूद केले आहे की, विधी सल्लागार यांनी सांगितले की, ५६/३ स्पष्ट असे नाही. यात ५६/३ ऐवजी ५६/१ अशी दुरुस्ती करण्यांत यावी. तसेच दि.२२.०७.९१ च्या इतिवृत्तात प्रस्ताव क्र.७३/२३ पान क्र.२४ वर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी रु.६५.५० पैसे दराने मे.रमेश बिन्नी टेकस्टाईल यांचेकडून एस.कुमार कापड खरेदी करण्यास मंजूरी दिली जाते. अशी दुरुस्ती करावी.

**स.**सभासद श्री.केशव सोनवणे यांनी टपऱ्याबाबत जी माहिती मागविली होती ती उपलब्ध झाली असून शहरात ३५४ टपऱ्यांना परवानगी दिलेली आहे. असे उपलब्ध माहिती वरुन दिसून येते. मनपात लोकनियुक्त प्रतिनिधी येण्यापुर्वी २२२ टपऱ्यांना परवानगी दिलेली आहे.

**श्री.केशव सोनवणे :** मनपा हद्दीत सध्या अस्तित्वात असलेल्या टपऱ्या किती आहेत. त्याचे मनपाने ठरवून दिलेले क्षेत्रफळ किती. किती टपरी मालकांनी ठरवून दिलेल्या क्षेत्रफळापेक्षा जास्त जागा व्यापलेली आहे. याचा प्रथम सर्व्हे करण्यांत यावा, असे ठरले होते. ही माहिती त्या आदेशाप्रमाणे बरोबर आहे का?

**मा.सभापती :** टपऱ्या लावण्यासाठी मनपाने जे क्षेत्रफळ ठरवून दिलेले असेल. त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळावर टपरी मालकांनी टपरी टाकली आहे काय? याचा सर्व्हे करण्यात यावा. तसेच टपऱ्यांसाठी जे रेट ठरविले होते. त्यापेक्षा त्यात वाढ कशी केली. याचीही माहिती सभागृहासमोर ठेवण्यांत यावी.

**मालमत्ता अधिकारी :** विचारणा करण्यांत आलेली माहिती पुर्णपणे देण्यासाठी १०-१५ दिवसाचा अवधी लागेल.

**श्री.केशव सोनवणे :** एवढे दिवस लागण्याचे कारण काय? हे काम विभागीय कार्यालयाकडून का करवून घेण्यांत येत नाही. विभागीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या हाताखालील कर्मचाऱ्यांकडून हे काम तातडीने करुन घ्यावे.

**मा.उपआयुक्त :** हे काम इमारत निरिक्षकांनीच केलेले चांगले राहील हे काम मालमत्ता अधिकारी १५-२० दिवसात करु शकतील.

**मा.सभापती :** मनपाने दिलेल्या टपऱ्या खोके यांचे मुळ क्षेत्रफळ किती. त्यात टपरी मालकांनी स्मवर्जीने काही वाढ केली काय? याचा एक सर्वे करुन मालमत्ता अधिकाऱ्यांनी एक महिन्यात ही पुर्ण माहिती सभागृहास सादर करावी. तसेच टपरी रेट मध्ये जी वाढ करण्यांत आलेली आहे. ती न करता पुर्वीप्रमाणे प्रति फुट २/- दोन रुपये एवढा दर कायम करण्यांत यावा.

**श्री.गजानन बारवाल :** दि.११.०२.९१ रोजी साईट क्र.७२ च्या संदर्भाने मी एक पत्र आपणांकडे दिले होते. या जागेचे भाडे मनपाने किती निश्चित केले आहे. या जागेचा आकार किती. याबाबत माहिती मागितली होती. परंतू याबाबत मला आतापावेतो कोणतीही माहिती मिळालेली नाही.

**मालमत्ता अधिकारी :** संबंधित संचिका ही नगर रचना विभागाकडे पाठविलेली आहे. ती संचिका येताच माहिती दिली जाईल.

**मा.सभापती :** दि.२२.०७.९१ च्या इतिवृत्तातील प्रस्ताव क्र.५९/९ कर श्री.नारायण फत्तेलष्कर यांनी विचारलेल्या प्रश्नावर काचीवाडा भागात प्रत्यक्ष पाहणी करुन संडास बांधकाम हाती घेण्याबाबत सुचविले होते. त्याचे काय झाले.

**उप अभियंता :** या भागाची पाहणी केलेली आहे. नवीन बजेटमधून हे काम हाती घेण्यांत येईल. अद्याप या कामाचे इस्टीमेट बनवणे आहे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** श्री.कलीम अख्तर या विभागाचे उप अभियंता म्हणून काम पाहता असतांना या कामाचे इस्टिमेंट बनवलेले होते.

**श्री.अलीम बेग :** एखाद्या अधिकाऱ्यांची बदली होऊन दुसऱ्या भागात जात असतांना चार्ज लिस्ट बनवली जात नाही का? चार्ज लिस्ट बनवल्या शिवाय कोणती कामे कोणत्या स्टेजवर आहेत हे नवीन येणाऱ्या अधिकाऱ्यांस कसे समजणार.

**अति.शहर अभियंता :** अशा प्रकारची चार्ज लिस्ट आपल्याकडे बनवली जात नाही. संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी आपापल्या विभागातील कामाची स्थिती, पेडींग कामे, बदलून आलेल्या नवीन अधिकाऱ्यांस सांगावयास पाहिजेत.

**उप अभियंता, ड्रेनेज :** पुर्वीचे उपअभियंता ड्रेनेज यांनी असे सांगितले की, या भागात जागा ऑकवॉयर करण्यासाठी ही संचिका नगररचना विभागाकडे पाठविली आहे.

**मा.सभापती :** ही संचिका तातडीने शोधून काढावी अन्यथा दुसरे इस्टिमेट बनवण्यात यावे व पुढील बैठकीत झालेल्या कामाचा अहवाल द्यावा.

**शहर अभियंता :** दि.२२.०७.९१ च्या इतिवृत्तातील प्रस्ताव क्र.५८/८ पान क्र.१५ वर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराच्या श्री.सय्यद जाफर यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली. "ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराच्या श्री.सय्यद अथर अली जाफर यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली. अशी दुरुस्ती करावी."

**मा.सभापती :** या कामासाठी डी.पी.डी.सी.ने रक्कम दिलेली होती. त्यावेळेस ही इमारत मनपाने बनवून त्यांना हस्तांतरीत केली.

**उपअभियंता स्लम :** दि.२२.०७.९१ च्या इतिवृत्तांतील प्रस्ताव क्र.५८/८ पान क्र.१५ वर "अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराच्या श्री.सय्यद जाफर यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली" ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराच्या श्री.सय्यद अथर अली जाफर यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली. अशी दुरुस्ती करावी.

**मा.सभापती :** उक्त दुरुस्तीस मंजूरी दिली जाते.

**मा.सभापती :** गत स्थायी समितीत कॅनान झेरॉक्स मशीन घेण्यास मंजूरी देण्यांत आलेली होती. त्या ठिकाणी नजरचुकीने मोदी झेरॉक्स मशिन घेणेस्तव मंजूरी देण्यांत आली असे लिहिण्यात आले. करिता मोदी मशिन ऐवजी कॅनान मशिन घेणे बाबतची दुरुस्ती करण्यांत यावी.

तसेच दि.२२.०७.९१ च्या इतिवृत्तातील प्रस्ताव क्र.३९/४ पान क्र.३७ वर प्रस्तावित कामास श्री.नारायण फत्तेलष्कर यांच्या मागणीप्रमाणे चेलीपुरा रोडचा या कामात समावेश आहे काय? याचा खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता :** चेलीपुरा रोडचा १९९०-९१ च्या कामात समावेश आहे. यासाठी एकूण ३२ लाखाची तरतूद आहे.

**मा.सभापती :** या कामाअंतर्गत रस्त्याचा सर्व्हे प्रथम करुन पुढील बैठकीत ही माहिती सविस्तरपणे सादर करावी.

**श्री.अलिम बेग :** कलेक्टोरेट ते चंपा मस्जिद रस्त्याचे काम पुर्ण का होत नाही. याचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी करुन पुढील बैठकीत पुर्ण माहिती द्यावी.

**श्री.गजानन बारवाल :** १५ ऑगस्ट निमित्त माझ्या वार्डातील शाळेतील मुलांना गणवेश वाटप करावयाचे आहेत.

**मा.सभापती :** नगरसेवक स्वेच्छा निधीतून सोडीयम व्हेपर विद्युत दिवे बसवण्याबाबत २५-३० नगरसेवकांनी पत्रे दिलेली आहेत. या दिव्यांची देखभाल व त्यावर होणारा खर्च लक्षात घेता गतवर्षी ज्यांना ६-६ सोडीयम व्हेपर विद्युत दिवे देण्यांत आलेले होते. त्यांना यावर्षी ६-६ सोडीयम व्हेपर विद्युत दिव देण्यांत यावेत. उर्वरित नगरसेवकांना यावर्षी व पुढील वर्षी अशा दोन फेजमध्ये ६-६ विद्युत दिवे (सोडीयम व्हेपर) त्यांच्या वार्डात बसवण्यासाठी देण्यांत यावेत. सदस्यांनीही सोडीयम दिव्यांची मागणी छोट्या छोट्या गल्ली बोळासाठी न करता त्यांच्या वार्डातील प्रमुख चौकात ते बसवावेत ज्यामुळे त्यांच्या मेंटेनन्स करणेही मनपास सोपे होईल. मान्य झालेल्या टेंडरमधून हे काम करुन घ्यावे.

**श्री.प्रभाकर विधाते :** रेल्वेस्टेशनच्या बाजुस जी भाजी मंडई आहे. तेथील कामाबाबत खुलासा व्हावा.

**नगररचनाकार :** या लोकांना पर्यायी जागा देण्यासाठी रेल्वे स्टेशन भागात साधना लॉजजवळ मनपा जागा घेत आहे. तेथील अक्वेटेड लोकांची यादी बनवण्याचे काम चालु आहे. ॲक्वॉयर केलेल्या जागेत अक्वेटेड लोकांना जागा देण्यासाठी प्राधान्य दिले जाईल.

**ठराव :**

दि.१८.०७.९१ च्या स्थायी समिती ठराव क्र.१ मुद्दा क्र.१२ मध्ये विधी सल्लागार यांनी सांगितले की, ५६/३ स्पष्ट असे नाही. "ऐवजी विधी सल्लागार यांनी सांगितले की, ५६/१ स्पष्टे असे नाही" अशी दुरुस्ती करावी. दि.२२.०७.९१ च्या इतिवृत्तात प्रस्ताव क्र.७३/२३ पान क्र.२४ वर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी रु.६५.५० दराने मे.रमेश बिन्नसी टेकस्टाईल यांचेकडून एस.कुमार कापड गणवेशसाठी खरेदी करावे. अशी दुरुस्ती करावी.

दि.२२.०७.९१ च्या इतिवृत्तातील प्रस्ताव क्र.५८/८ पान क्र.१५ वर श्री.सय्यद जाफर यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली ऐवजी श्री.सय्यद अथर अली जाफर यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली अशी दुरुस्ती करावी.

दि.२२.०७.९१ च्या प्रस्ताव क्र.९०/१ मध्ये मोदी झेरॉक्स ऐवजी कॅनान झेरॉक्स मशिन खरेदी करण्यास मंजूरी देण्यांत आली.

उक्त दुरुस्त्यांसह दि.१८.०७.९१ व दि.२२.०७.९१ च्या स्थायी समिती इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजूरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९३/२ :**

वार्ड क्र.२९ किराणा चावडी पोलिस चौकी ते अप्पा हलवाई पर्यंत २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.४३,७५०.०० चे तयार करण्यांत आलेले असून सदर कामास मा.आयुक्त साहेब यांची मंजूरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१/४६९/९१, दि.०७.०५.९१ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण नऊ निविदा विकण्यांत आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ तीन निविदा वसुल झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

१. श्री.सय्यद रफिकोद्दीन - ०.२५% कमी
२. श्री.सुनिल जैस्वाल - ३% जास्त
३. श्री.सय्यद सिराजोद्दीन - दर दर्शविलेला नाही.

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी दराचे श्री.सय्यद रफिकोद्दीन यांचे दरपत्रक आहे. तसेच या कामात श्री.स.सिराजोद्दीन आपल्या निविदेत दर दर्शविलेला नाही. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२९ मधील किराणा चावडी पोलिस चौकी ते अप्पा हलवाई यांचे दुकानापर्यंत २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या रक्कम रु.४३,७५०/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते. तसेच या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी श्री.रफिकोद्दीन यांच्या अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.२५% कमी दराच्या निविदास सर्वानुमते मान्यता देण्यांत येते.

**विषय क्र.९४/३ :**

वॉर्ड क्र.४१ दलालवाडी येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.२९,५००/- ला मा.आयुक्त साहेब यांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.२/५९४/९१ला नवा मराठा व डॉन या स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकण्यांत आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ तीन निविदा वसुल झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

१. श्री.भागवत एन.साळवे - १% कमी
२. श्री.झैन बांबुसा - ५.७८६% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री.भागवत एन.साळवे यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४१ दलालवाडी येथे २५० मी.मी.व्यासाची आ.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाच्या रक्कम रु.२९,५००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच या कामाकरिता निविदा मागविल्या असता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १% कमी दराच्या श्री.भागवत एन.साळवे यांच्या निविदास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.९५/४ :**

उप अभियंता जलनिःसारण विशेष कार्यक्रम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, राहुल नगर येथे सेव्हर लाईनचे, पंपहाऊस पर्यंत राहिलेले काम करणे बाबतचे कामसाठी अंदाजपत्रक र.रु.५६,५३६/- ला मा.आयुक्त यांची मंजूरी मिळाली. सदर काम सन १९९१-

९२ च्या शासकीय विशेष अनुदानातून घ्यावयाचे आहे. सदर कामासाठी प्रगट निविदा क्र.४/९१-९२ दि.३०.०५.९१ दै.लोकविजय व दैनिक मफस्सीर मध्ये प्रसिध्द करण्यात आल्यानुसार कोरी निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विकण्यांत आल्या व निविदा स्विकारण्याचे नियोजित तारखेस एकूण दोन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सलीम अहेमद | - | ५.५% जास्त |
| २. | श्री.एम.एम.बेग | - | ०.१०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या श्री.एम.एम.बेग यांचे टेंडर कमी दराचे असून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१०% कमी आहे.

करिता श्री.एम.एम.बेग यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१०% कमी दराचे टेंडर विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राहुल नगर येथे सेव्हर लाईनचे पंपहाऊस पर्यंतचे राहीलेले काम करण्याकरिता र.रु.५६,५३६/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते. तसेच या कामाकरिता निविदा मागविण्यांत आल्या असता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराच्या श्री.एम.एम.बेग यांचे निविदास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.९६/५ :**

वार्ड क्र.५३ मो.जहाँगिरदार कॉलनी येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.७२,०१८.०० चे तयार करण्यांत आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेब यांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.१/५६९/९१, दि.०७.०५.९१ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ दोन निविदा वसुल झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सय्यद रफिकोद्दीन | - | ५.१५% कमी |
| २. | श्री.सय्यद सिराजाद्दीन | - | १५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराचे श्री.सय्यद सिराजोद्दीन यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५३ मो.जहाँगिरदार कॉलनी येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता र.रु.७२,०१८/-च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच सदरच्या कामाकरिता निविदा मागविल्या असता प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १५% कमी दराच्या श्री.सय्यद सिराजोद्दीन यांच्या निविदास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.९७/६ :**

बिबिका मकबरा समोर खडी रस्ता व डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे डी.एस.आर.दराने र.रु.४,४४,०००/- चे अंदाजपत्रकास दि.१२.०३.९१ ला प्रशासकीय मान्यता मिळाली असून काम तातडीने करुन घ्यावयाचे असल्यामुळे मा.आयुक्तांनी त्यांचे दि.१२.०३.९१ चे टिप्पणी द्वारे निविदा मागविल्या म्हणून आदेशित केलेले आहे.

त्यानुसार खडीकरणासाठी निविदा मागविल्या असता सर्वात कमी दराची श्री.राजासिंग यांची निविदा मनपा अधिनियम ६७ (३) (क) अन्वये दि.१७.०५.९१ रोजी मंजूर करण्यांत आलेली असून सदरील काम हे पर्यटकांच्या दृष्टीने चालु करण्यांत आलेले आहे.

करिता खडी रस्त्यासाठीची निविदा र.रु.१,६२,३५३/- साठी श्री.राजासिंग यांची निविदेतील दरास म्हणजे २५.७८६% कमीचे दरपत्रकास कार्योत्तर मंजूरी मिळणेस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.केशव सोनवणे :** आयुक्तांना ४ लाख ४४ हजार रकमेस मंजूरी देण्यांचे अधिकार आहेत काय? या कामात ६७ (३) (क) कलमाचा वापर करण्यासारखी कोणती आणीबाणीची परिस्थिती उद्‌भवली होती.

**मा.सभापती :** रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी हा प्रस्ताव सभागृहासमोर आलेला आहे.

**श्री.केशव सोनवणे :** ही जागा मनपाची आहे काय? अथवा मनपाच्या ताब्यात आहे काय?

**मा.सभापती :** संपूर्ण माहितीसह प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यांत यावा. तोपर्यंत या प्रस्तावास स्थगिती दिली जाते.

**ठराव :**

स.सभासदांनी विचारलेल्या माहितीप्रमाणे संपूर्ण माहितीसह प्रस्ताव पुढील बैठकीत पुन्हा सादर करण्यांत यावा. तोपर्यंत त्यास स्थगिती देण्यांत येते. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.९८/७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.५४ मधील मो.हमालवाडी रेल्वेस्टेशन, रोड - येथे २०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेचे कामाचे र.रु.२७,३५६/- चे अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी दि.०८.०४.९१ अन्वये मंजूरी दिली असून मनपा/पापु/९३६/९१, दि.१८.०४.९१ अन्वये जाहिर निविदा पत्रके मागविण्यांत आली असता एकूण दोन कोरी निविदापत्रके विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या नियोजित दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | आर.जे.पाटील | - | ०१.५०% जास्त |
| २. | एस.के.मिसाळ | - | ४.००% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची श्री.आर.जे.पाटील यांची निविदा असून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०१.५०% जास्त दराची आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५४ मधील मो.हमालवाडी (रेल्वेस्टेशन रोड) येथे २०० मी.मी.व्यासाची एस.जी.जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यांत आल्या असता आलेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या

दरापेक्षा ०१.५०% जास्त दराच्या श्री.आर.जे.पाटील यांचे निविदास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.९९/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, बिबिका मकबरा समोरील मोकळ्या जागेचे खडीकरण करुन डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु.४,४४,८८३/- चे तयार करण्यांत आले असून मा.आयुक्त यांची मंजूरी दि.१३.०३.९१ रोजी मिळाली आहे.

| | | |
|---|---|---|
| पार्ट-अ खडी रस्ता तयार करणे | - | १,७३,८८०/- |
| पार्ट-ब डांबरीकरण करणे | - | २,७०,००३/- |

वरीलपैकी डांबरीकरण कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.१३ जा.क्र./मनपा/बां.वि-२/नुसार निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विक्री झाल्या. त्यापैकी एक निविदा दर भरुन प्राप्त झाली. असून ती दि.०६.०४.१९९१ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारा समक्ष उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१. श्री.मे.रे.कन्स्ट्रक्शन - १८% जास्त

वरीलपैकी अ.क्र.१ श्री.रे.कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या दरापेक्षा १८% जास्त दराची निविदा आहे.

नवीन दराप्रमाणे तुलना केली असता सदरील निविदा ३% कमी दराने येते. त्यामुळे १८% जास्त चे दर मंजूरी करिता सादर.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१००/९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पशुधन विकास अधिकारी महानगरपालिका यांनी जा.क्र./मनपा/पविअ/प्रास/९१६७७, दि.२६.०३.९१ अन्वये पत्र देवून त्यामध्ये त्यांनी सध्या प्राणी संग्रहालय येथे होणारा पाणी पुरवठा अत्यंत कमी होत असल्याने व प्राणी संग्रहालयतील प्राण्यांचे पिंजरे स्वच्छ ठेवणेचे दृष्टीने पाण्याचा तुटवडा होत असलेले प्राणी संग्रहालयातील निल गायीच्या शेड जवळील विहीरीची दुरुस्ती घेऊन त्यावर एक इलेक्ट्रीक मोटार पंप बसविण्यांत यावा असे कळवले आहे.

यास अनुसरुन प्राणी संग्रहालयातील विहिरी दुरुस्त करणे, विहीरीतील गाळ काढणे तसेच सदरील विहीर ते अस्तित्वात असलेली वितरण व्यवस्था पर्यंत १०० मी.मी.व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणे व विहीरीवर ७.५ हॉर्स पॉवर ची इलेक्ट्रीक मोटार पंप बसवणे इत्यादे कामाचे अंदाजपत्रक रु.४९,९८०/- चे तयार करण्यांत आले असून मा.आयुक्तांनी दि.२३.०४.९१ रोजी अंदाजपत्रकास मान्यता दिली.

मनपा/युजीडी/४६९/९१, दि.०७.०५.९१ अन्वये जलनि:सारण विभागातील इतर कामासोबत या कामासाठी जाहिर निविदा बी-१ नमुन्यांत मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दिनांकास एकूण चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या

नियोजित दिनांकास एकूण दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. उपस्थितांसमोर सदरील निविदा उघडण्यांत आल्या असता त्यातील दर पुढीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सलीमखान | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | सय्यद अथर अली | - | ०२.००% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सलीम खान यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दराची आहे. करिता स्विकारणेच्या विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्राणी संग्रहालयतील विहीरीची दुरुस्ती करणे व अस्तित्वात असलेल्या वितरण व्यवस्थेपर्यंत १०० मी.मी.व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणे तसेच विहीरीवर ७.५ हॉर्स पॉवर विद्युत मोटार पंप बसविण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यांत आल्या असता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरातील श्री.सलीम खान यांचे निविदास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०१/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्क मिल कॉलीन येथील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.२,११,४५५/- च्या अंदाजपत्रकास दि.२४.०४.९० च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.७४५/१९ अन्वये मंजूरी मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. (२) १९९१-९२ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजन दि.१६.०५.९१ पर्यंत एकूण एक निविदा विक्री झाली असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दिनांक २०.०५.९१ रोजी एकूण एकच १ निविदा दर भरलेली प्राप्त झाली असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.रे.कन्स्ट्रक्शन | - | २०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% जास्त मे.रे.कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. तसेच सदरील ठेकेदाराने हे दर सन १९८९-९० च्या डी.एस.आर.दराने दिलेले असून त्यांची सन १९९१-९२ च्या नवीन डी.एस.आर.दराने तुलना केली असता फक्त ३.९% जास्त इतके दर येतात. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.केशव सोनवणे :** विषय क्र.१० व ११ मधील प्रस्ताव सारख्याच स्वरुपाचे असतांनाही त्यातील डी.एस.आर.दरात तफावत कमी आहे.

**उप अभियंता बांधकाम-१ :** यातील कामाचे स्वरुप सारखे दिसत असले तरी त्यातील आयटम्स एकच नाहीत. त्यामुळे हा फरक पडतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्क मिल कॉलनी अंतर्गत रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या मे.रे.कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २०% जास्त दराच्या निविदास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०२/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वे स्टेशन येथील महानगरपालिका विश्रामगृहाचे आवरातील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.२९,८६५/- च्या अंदाजपत्रकास दिनांक २४.०४.९० च्य स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.७४६/२० अन्वये मंजूरी मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२ १९९१-९२ चे निवदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि.१६.०५.९१ ला एकूण एकच विक्री झाली असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दि.२०.०५.९१ रोजी एकूण एकच निविदा दर भरलेली प्राप्त झाली. असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.रे.कन्स्ट्रक्शन | - | २०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २०% जास्त दराची मे.रे.कन्स्ट्रक्शन यांची निविदा असून सदरील ठेकेदाराने हे दर सन १९८८-८९ च्या डी.एस.आर.च्या डी.एस.आर.दराने तुलना केली असता फक्त १.९% जास्त इतके दर येतात.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २०% दराने मे.रे.कन्स्ट्रक्शन यांची निविदा असून मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वे स्टेशन येथील महानगरपालिका विश्रामगृहाच्या आवारातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २०% जास्त दराच्या मे.रे.कन्स्ट्रक्शन यांच्या निविदास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०३/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरवाडी येथील गादिया विहार समोरील ५०' फुट डी.पी.रोडचे खडी रस्त्याचे काम करणेसाठी सन १९९०-९१ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.८९,६००/- चे अंदाजपत्रकास दि.३१.०३.९१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.१ सन १९९१-९२ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दिनांक १९.०४.९१ पर्यंत एकूण चौदा निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दि.२६.०४.९१ ला एकूण (५) पाच निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सुखबिरसिंग | - | २९.५% कमी दराने |
| २. | श्री.राजासिंग | - | २६.७८६% कमी दराने |
| ३. | श्री.दिपक के.जैस्वाल | - | २६.५६% कमी दराने |
| ४. | श्री.कुलवंतसिंग | - | १५.७७% कमी दराने |
| ५. | श्री.मे.एस.एच.असोशिएट्स | - | १०% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २९.०५% कमी दराने श्री. सुखबिरसिंग यांची निविदा असून मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी येथील गादिया विहार समोरील ५० फुट डी.पी.रोडचे खडी रस्त्याच्य कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु.८९,६००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते.

तसेच या कामाकरिता आलेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २९.०५% कमी दराच्या श्री.सुखबिरसिंग यांच्या निविदास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०४/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा येथील चेतना सोसायटी अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सन १९८९-९० चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.१९,५२२/- चे अंदाजपत्रकास दिनांक ३०.०७.९० चे स्थापत्य समितीचा ठराव क्र.५२/३६ अन्वये मंजूरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.(९) सन १९९०-९१ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट फेर निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि.०८.०१.९१ पर्यंत एकूण (१) एकच निविदा विक्री झाली असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दि.११.०१.९१ ला एकूण एकच १ निविदा दर भरलेली प्राप्त झाली असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१. मे.रे.कन्स्ट्रक्शन - २२% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २२% जास्त दराने मे.रे.कन्स्ट्रक्शन यांची निविदा असून प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.गिरजाराम हाळनोर :** न्यु स्टेट बँक कॉलनीतील रस्ता तयार करण्यांबाबत कार्यालयात पुन्हा पुन्हा सांगण्यात येत आहे. हा रस्ताही त्वरेने तयार करण्यांत यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील चेतना सोसायटी अंतर्गत रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या मे.रे.कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २२% जास्त दराच्य निविदास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०५/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी गृहनिर्माण संस्था अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९०-९१ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.६०,१३०/- चे अंदाजपत्रकास दि.३०.०७.९० च्य स्थापत्य समितीच्या सभेमध्ये ठराव क्र.४८/३२ नुसार मान्यता मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.(९) १९९०-९१ चे निविदा सूचनेद्वारे प्रगट फेरनिविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि.०८.०१.९१ पर्यंत एकूण (१) एकच निविदा विक्री झाली असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दि.११.०१.९१ ला एकूण एकच निविदा दर भरलेली प्राप्त झाली असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.रे.कन्स्ट्रक्शन | - | २२% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २२% जास्त दराने मे.रे.कन्स्ट्रक्शन यांची निविदा असून प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी गृहनिर्माण संस्था अंतर्गतच्या रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या मे.रे.कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २२% जास्त दराच्या निविदास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०६/१५ :**

वार्ड क्र.४८ मो.पन्नालालनगर येथील १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची पाईप लाईन अप्रुटींग करुन २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.३२,७६०/- चे तयार करण्यांत आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशाप्रमाणे सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.७/६१७/९०, दि.२१.०७.९० द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण एकतीस निविदा विकण्यांत आल्या होत्या. त्यापैकी आठ निविदा प्राप्त झाल्या असून त्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सय्यद सिराजोद्दीन | - | २६% कमी |
| २. | श्री.एम.एम.बेग | - | २०.२१% कमी |
| ३. | श्री.बी.एम.काथार | - | १४% कमी |
| ४. | श्री.मोहंमद मुस्ताक अहेमद | - | ३२% कमी |
| ५. | श्री.प्रशांत खरे पाटील | - | २०% कमी |
| ६. | श्री.शंकर भैरव | - | २९.७०% कमी |
| ७. | श्री.आर.एम.अडने | - | १२% कमी |
| ८. | श्री.अनिल चव्हाण | - | ३१% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१% कमी दराचे दरपत्रक श्री.अनिल चव्हाण यांचे असून सदर निविदेस स्थायी समितीची मंजूरी मिळाली असता संबंधिताने २% अनामत रक्कम व मुद्रांकनची पुर्तता न केल्याने दुसऱ्या क्रमांकावरील गुत्तेदार श्री.शंकर भैरव यांच्या दरपत्रकास स्थायी समितीचा ठराव क्र.४९४/४०, दि.१६.०३.९१ द्वारे मंजूरी मिळालेली आहे. संबंधितास २% अनामत रक्कम व मुद्रांकन दाखल करणे बाबत पत्रक दिले असता संबंधिताने पत्रक देवून निविदा दाखल करुन नव्वद दिवसापेक्षा जास्त दिवस झाल्याने बंधनकारक नसून काम करण्यास नकार दिलेला आहे.

पहिल्या व दुसऱ्या क्रमांकावरील गुत्तेदार काम करण्यास असमर्थ असल्याने निविदा दाखल केलेल्या इच्छुक गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकीय दरात सदर काम करुन घेण्याबाबत शिफारस केली असता मा.आयुक्त साहेबांनी मंजूरी दिलेली आहे.

तिसऱ्या क्रमांकावरील गुत्तेदार श्री.सय्यद सिराजोद्दीन यांना अंदाजपत्रकीय दरात काम करण्यास तयार आहात काय? असे पत्राने कळविले असता संबंधिताने अंदाजपत्रकीय दरात काम करण्यास तयार असल्याचे लेखी खुलासा केलेला आहे.

करिता श्री.सय्यद सिराजोद्दीन यांच्या अंदाजपत्रकीय दरास मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री.केशव सोनवणे :** डी.एस.आर.दर कोणत्या वर्षाचे आहेत. त्याचा उल्लेख प्रस्तावात करण्यांत यावा.

**मा.सभापती :** सर्व अभियंत्यांना सुचित करण्यांत येते की, त्यांनी प्रस्ताव मंजूरीसाठी पाठवतांना कोणत्या वर्षाच्या डी.एस.आर.दरांचा आधार घेतलेला आहे. याचा प्रस्तावात उल्लेख करावा अन्यथा त्यांचा प्रस्ताव विचारार्थ घेतला जाणार नाही.

**उप अभियंता (बांध-१) :** त्या प्रस्तावातील डी.एस.आर.रेट १९८९-९० चे आहेत. त्यास अनुसरुनच हे काम करण्यांत येणार आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पन्नालाल नगर येथील १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची पाईप लाईन अप्रुटींग करुन २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तिसऱ्या क्रमांकाचे गुत्तेदार श्री.सय्यद सिराजोद्दीन यांनी लेखी कबुल केल्याप्रमाणे उपरोक्त काम श्री.सय्यद सिराजोद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकाच्या दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०७/१६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.३६ मधील मोहल्ला किराडपुरा येथील श्रीराम मंदिरासमोर १५० मी.मी.व्यासाची सि.आय.जलवाहिनी टाकणेचे कामाचे र.रु.४८,०३५/- चे अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी दि.१२.०४.९१ अन्वये मान्यता देवून लघु निविदा मागविण्यास परवानगी दिली. त्यानुसार मनपा/पापु/९३६/९१, दि.१८.०४.९१ अन्वये लघु निविदा सूचना क्र.१/९१/९२ अन्वये जाहिर निविदा मागविल्या असता एकूण दोन कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या नियोजित दिनाकांस एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या त्या पुढीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.आर.जे.पाटील | - | ०१.५०% जास्त |
| २. | श्री.एस.के.मिसाळ | - | ०१.००% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या श्री.एस.के.मिसाळ यांची निविदा सर्वात कमी दराची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०१.००% कमी दराची आहे.

मा.आयुक्त (माजी) यांनी दि.०९.०५.९१ अन्वये काम करुन घेण्यास परवानगी देवून स्थायी समितीकडे सदरील प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी ठेवा असा आदेश दिला आहे.

सदरील प्रकरणी करारनाम्याची पुर्तता करुन ठेकेदार श्री.एस.के.मिसाळ यांना कार्यादेश देण्यांत आला असून काम सुरु आहे.

करिता सर्वात कमी दराचे निविदा असलेले ठेकेदार श्री.एस.के.मिसाळ यांची निविदा ०१.००% कमी दराची निविदा स्विकारणेस व काम करुन घेणेस्तव कार्योत्तर मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३६ मध्ये मो.किराडपुरा येथील श्रीराम मंदिरासमोर १५० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणेचे काम तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे निविदाधारक श्री.एस.के.मिसाळ यांचेकडून करुन घेण्यांस सर्वानुमते कार्योत्तर मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०८/१७ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, रमानगर स्लम भागात २५० मी.मी., ३०० मी.मी. व ४५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेचे कामासाठी स्थायी समितीचा ठराव क्र.४७६/२२, दि.१६.०३.९१ द्वारे अंदाजपत्रक र.रु.१,३१,१२०/- ला मंजूरी दिल्यानंतर सदरील कामासाठी कार्यालयाची निविदा सूचना क्र.९१ (१९९१-९२) द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्यांत आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याची दिनांक २०.०४.९१ रोजी फक्त (२) दोन प्राप्त झाल्या व दिनांक २२.०४.९१ ला उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.पी.पी.मेहता | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.९% जास्त |
| २. | मे.एस.एच.असोशिएटस | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या श्री.पी.पी.मेहता यांचे टेंडर कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.९% जास्त आहे. परंतू सदरील ठेकेदारांनी टेंडरवर स्वत: स्वाक्षरी केलेली नसल्यामुळे सदरील टेंडर विचारात घेता येत नसल्यामुळे सेकंद लोवेस्ट ठेकेदार श्री.मे.एस.एच.असोशिएटस यांना पहिल्या कमी दराचे टेंडरचे दरात वरील काम करण्यासाठी विचारले असता त्यांनी दि.१९.०६.९१ चे पत्राद्वारे मे.एस.एच.असोशिएटस यांनी टेंडरमध्ये दिलेल्या दराऐवजी पहिले कमी दराचे टेंडरचे दराप्रमाणे म्हणजे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.९% जास्त दराने करण्यास तयार असल्याची लेखी सम्मती दिली आहे. करिता मे.एस.एच.असोशिएटस यांचे टेंडर त्यांनी लेखी संमती दिल्यानुसार अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.९% जास्त दराने मंजूर करण्यांचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रथम पाहणी करण्यांत यावी व नंतर दुसऱ्या बैठकीत यावर निर्णय घेतला जाईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१०९/१८ :**

वार्ड क्र.२४ मो.नागेश्वरवाडी येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.४९,८३०/- ला मा.आयुक्त साहेब यांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.१/४६९/९१, दि.०७.०५.९१ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकण्यांत

आलेल्या होत्या. त्यापैकी एकूण फक्त एकच २१.०% कमी दराची श्री.दिपक जैस्वाल यांची निविदा वसुल झालेली आहे.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२४ मो.नागेश्वरवाडी येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.१% कमी दराची श्री.दिपक जैस्वाल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.११०/१९ :**

वार्ड क्र.१४ शहाबाजार, चेलीपुरा येथील जुनी अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन काढून त्याठिकाणी ३०० मी.मी.व्यासाची व ४५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.१,२४,७००/- ला मा.आयुक्त साहेब यांनी मंजूरी दिली आहे. तसेच सदर काम प्राप्त शासकीय अनुदानातून करण्यांस मंजूरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२/५४८/९१, दि.२५.०५.९१ ला लोकधर्म व देवगिरी तरुण भारत या स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण सहा निविदा विकण्यांत आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ तीन निविदा वसुल झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.शेख शरीफ | - | १% कमी |
| २. | श्री.आर.एल.बारवाल | - | २% जास्त |
| ३. | श्री.एस.ए.वाहोद्दीन | - | ३% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री.शेख शरीफ यांचे दरपत्रक आहे.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१४ शहाबाजार, चेलीपुरा येथील अस्तित्वात असलेली जुनी ड्रेनेज लाईन काढून त्याऐवजी ३०० मी.मी.व्यासाची व ४५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १% कमी दराच्या श्री.शेख शरीफ यांच्या निविदास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**संवाद :**

**श्री.केशव सोनवणे :** मी दि.०४.०८.९१ ला पत्र दिले आहे. त्या नुसार शालेय साहित्य घेण्यासाठी मंजूरी देण्यांत यावी.

**मा.सभापती :** मा.आयुक्तांनी (Black Board Operation Scheme) योजने अंतर्गत अध्याय आणि अध्यापन शालेय साहित्य घेण्यासाठी मंजूर केलेल्या दरानुसार संबंधिताचे स्वेच्छा निधीतून प्रत्येकी एन-११ व एन-१२ या शाळेकरिता र.रु.२५,०००/- चे शालेय साहित्य घेण्यांस तसेच श्री.शिवाजी कवडे, श्रीमती लता दलाल, स.श्री.विधाते, स.श्री.आनंद गोडसे, स.श्री.सुभाष परदेशी,

स.श्री.गील यांना प्रत्येकी रु.२५,०००/- पर्यंत या योजने अंतर्गत शालेय साहित्य खरेदी करण्यांस मंजूरी देण्यांत येते.

## ऐनवेळचा विषय

**विषय क्र.१११/२० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९०-९१ वर्षाकरिता डी.एस.एम.कंपनीचे ब्लिचींग पावडर खरेदी करण्यासाठी निविदा क्र.मनपा/पापु/भांडार /१२३३/९१, दि.०३.०७.९१ अन्वये निविदा प्रसिध्दीस देण्यांत आली असता शेवटचे तारखेस एकच निविदा मे.महाराष्ट्र केमीकल्स यांना विकण्यांत आली. दि.१७.०७.९१ रोजी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात निविदा उघडण्यांत आली. त्या मे.महाराष्ट्र केमीकल्स, औरंगाबाद यांनी डी.एस.एम.(श्रीराम स्टेबल ब्लिचींग पावडर) कंपनीच्या ब्लिचींग पावडरचा दर रु.६,२००/- प्रति मे.टन दिलेला आहे.

परंतू डी.सी.एम.चे (दर) रेट कॉन्ट्रक्ट नं.ओस्ट-१/आर.सी./२६१२ एस.बी.पी./मीवेदी /९०-९१/एच-१ कोड/४२९ला २९.१२.९० नुसार कंपनीचा दर दिल्ली येथे रु.३,११०/- प्र.मे.टन आहे. त्यास इतर टॅक्स भरले असता.

| | | |
|---|---|---|
| टी.सी.एल.चार दर | - | रु.३,११०.०० प्रति टन |
| एक्साईज १५.७५% | - | रु.४८९.८० प्रति टन |
| सेंट्रल सेल टॅक्स १०% | - | रु.३५९.९० प्रति टन |
| ऑक्ट्राय ३% | - | रु.११८.७७ प्रति टन |
| | - | रु.४०७८/- प्रति टन |

यात कर्टींग, लोडींग, व अन लोडींग, बी ॲण्ड सी.दराप्रमाणे ७५ पैसे प्रति टन किलोमीटर दर आहे. दिल्लीचे अंतर १५०० किती येते. त्यानुसार प्रति टन अंदाज रु.१,१२५.०० खर्च येईल. यासाठी कमीत कमी १० टन माल घ्यावा लागतो. व त्याचा ॲडव्हान्स अगोदरच द्यावा लागतो. व त्याचा ॲडव्हान्स अगोदरच द्यावा लागतो.

तरी निविदेचा दर रु.६,२००/- प्रति टन असून कंपनीकडून घेतल्यास दर रु.५,१२९/- प्र.मे.टन येतो. वाहतुकीचे दर कमी जास्त होऊ शकतो. तरी कंपनीकडून घेतल्यास सर्व करासहीत रु.४,०४४/- दर सध्या येतो. यास्तव कंपनीकडून घेण्यांचे दरास मंजूरीसाठी प्रस्ताव सादर.

**<u>संवाद :</u>**

**मा.सभापती :** आता पावेतो विविध एजन्सीकडून ब्लिचींग पावडर खरेदी केले जात होते. परंतू आता डी.सी.एम.कंपनी कडून ब्लिचींग पावडर खरेदी करण्यांत यावे. अशा आशयाचा प्रस्ताव सभागृहासमोर प्रस्तावित केला आहे. कंपनीकडूनच जर ब्लिचींग पावडर खरेदी केले तर त्यामुळे दरातही १०/- रुपये पर्यंतचा फरक पडू शकतो. डायरेक्ट कंपनीकडून खरेदी असल्यामुळे कोणास दलालीही द्यावी लागणार नाही. कंपनीही शासनानीच आहे. त्यामुळे येणाऱ्या मालाचीही शास्वती देता येईल. आज पैसे पाठविले तर एखाद्या महिन्यांत मालाचा पुरवठा होऊ शकतो. कारण निविदाचे दर रु.६,२००/- प्र.टन असून कंपनीकडून माल घेतल्यास दर रु.५,२०३/- प्र.टन येतो. वाहतुकीचे दर कमी जास्त होवू शकतात. करिता सन १९९१-९२ करिता ७० मे.टन

ब्लिचींग पावडर ची खरेदी करण्याकरिता रु.३,६४,२१०/- च्या खर्चास मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डी.सी.एम.कंपनीचे ब्लिचींग पावडर सन १९९०-९१ करिता दिल्ली येथील कंपनीकडून वाहतुकीचे दरासह र.रु.५,२०३/- प्रति मे.टन या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

सन १९९१-९२ करिता वरील दराने एकूण ७० मे.टन ब्लिचींग पावडर खरेदी करण्यांस व तद्अनुषंगाने येणाऱ्या र.रु.३,६४,२१०/- च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ३१.०८.१९९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शुक्रवार दिनांक ३० ऑगस्ट, १९९१ रोजी मा.सभापती श्री.मो.इस्माईल अ.करीम यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ३.०० वाजता स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

१. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
२. श्री.फैयाज खान अहमद खान
३. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री.जावेद हसन खाँन कसीम हसन खाँन
५. श्री.विजय गोविंदलाल पालीवाल
६. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
७. श्री.भगुरे तुळशीराम छगन
८. श्री.बारवाल गजानन रामकिसन
९. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
१०. श्री.सोनवणे केशव काशिनाथ
११. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र.११२/१ :**

दि.०५.०८.९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>**संवाद :**</u>

**श्री.केशव सोनवणे :** दैनिक लोकधर्म वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्दीस आलेली आहे की, महानगरपालिकेमध्ये सुतळीचा जो काही पुरवठा मागविला जातो त्या संदर्भात चांगल्या प्रकारची सुतळी ही शहरा बाहेरुन मागविली जाते, तर वारंवार लागणारी सुतळी किरकोळ स्वरुपात ती स्थानिक ठिकाणावरुन घेण्यांत येते. याचा अर्थ काय? मनपाला दर वर्षी सुतळीचा पुरवठा किती लागाते यासाठी नियमाप्रमाणे मंजूरी घेतल्या जात नाही काय? याची माहिती द्यावी. अशाप्रकारचे वृत्त प्रकाशित झाल्याने मनपाची बदनामी होते. हे योग्य नाही.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे संबंधित ॲटम फार होते. सदरील बाब अतिशय मायनर असून कुणीही लक्ष दिलेले नाही. त्यामुळेच संबंधित वृत्तपत्राने सदरील बातमी छापलेली आहे. अशा प्रकारची मनपाची बदनामी करणे योग्य नसून संपूर्ण सुतळी ही केवळ आठ हजाराच्या दरम्यान किंमतीत पुरवठा केलेला असेल. यामध्ये कोणीही बेपर्वाही वा खाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तसे काही असल्यास संबंधिताच्या नावासहीत उघडकीस आणावे. त्यानंतर कार्यवाही करता येईल.

**श्री.केशव सोनवणे :** इंदिरानगर, बायजीपुरा येथील कामाच्या संदर्भात ३-४ कामांची यादी दिलेली होती. परंतू अद्यापही संबंधित कामाची कार्यवाही झालेली नाही.

संबंधित गुत्तेदाराच्या कामास मंजूरी मिळूनही गुत्तेदार कामास सुरुवात करीत नाही. याचे कारण काय?

**मा.सभापती :** पुढील बैठकीत संबंधित कामाबाबतची माहिती द्यावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** मागील बैठकीपासून विचारीत असलेल्या प्रश्न संदर्भात उस्मानपुरा पिरबाजार येथील शाळेबाबत पत्राने विचारणा केली होती की, सदरील काम लवकरात लवकर सुरु व्हावे.

**मा.सभापती :** संबंधित कामाला मंजूरी मिळालेली आहे. सदरील कामासाठी टेंडर नोटीस लावण्यांत आलेली आहे. आणि यानंतर संबंधित गुत्तेदाराकडून दोन चार दिवसात काम पूर्ण करण्याबाबत कार्यवाही होईल.

**श्री.केशव सोनवणे :** माझ्या माहितीनुसार मनपा नियमावलीप्रमाणे कोणतेही खुले टेंडर काढीत असतांना स्थायी समितीचे दोन स.सदस्य साक्षीदार म्हणून हजर असावे असे आहे. त्याप्रमाणे यापुढे कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**मा.उपआयुक्त :** माझ्या मते मनपाचे कामासंबंधित किंवा इतर पॉलिसी डिसाईड करण्या संदर्भात करार करण्याकरिता दोन सं.सदस्य उपस्थित रहावे असे असावे मु.प्रा.मनपा अधिनियम १५६ प्रकरण ५ (२) अन्व्ये स.सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे यापुढे अशा प्रकारची कार्यवाही करता येणे शक्य आहे. यामध्ये कार्यकारी अभियंता, शहर अभियंता या विभागांनी यापुढील पध्दत ही अमलात आणावी.

**मा.सभापती :** या पध्दतीमुळे कोणत्या विभागाची फाईल कोठून गेली याबाबत माहिती दिसून येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** मी यापुर्वी सुचविल्याप्रमाणे टेंडर उघडल्या नंतर संबंधित कामास सुरुवात करण्यांत यावी.

**मा.सभापती :** ठिक आहे. संबंधित कामाची निविदा कमीत कमी असणाऱ्या गुत्तेदाराकडून सदरील कामे करवून घेता येईल.

**अति.शहर अभियंता :** परंतू संबंधित कामाचे (वर्क ऑर्डर) सुरु करण्याबाबत आदेश देणे महत्वाचे आहे.

**श्री.केशव सोनवणे :** शहरातील विद्युत बाबतीत सोडीयम व्हेपर दिवे, फिटींग्ज, बाबत अजूनही वर्क ऑर्डर दिलेले नाही. याचे कारण काय? या पुर्वीच संबंधित कामाचे बाबतीत स्थायी समितीने मंजूरी दिलेली होती.

**मा.उपआयुक्त :** दैनिक स्वरगंगा या वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाली होती की, या संदर्भात दै.सकाळच्या वर्तमानपत्रामध्ये संबंधित बाबतीत जाहिरात दिलेली होती. परंतू त्याची दोन बिले न निघाल्याने ती तशीच पडून राहिली व दैनिक सकाळने या बाबतीत जाहिरात दिली नाही. त्यामुळे संबंधित स्वरगंगा वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाली. यामुळे दि.२२.०८.९१ ला मा.आयुक्त यांनी सुचविले की, याबाबत चौकशी करावी. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही होत आहे.

**मा.सभापती :** संबंधित जाहिराती संदर्भात माझ्याकडेही माहिती मिळाली या फाईल्सच्या संदर्भाने या समितीमध्ये फायनल झाल्यानंतर ३६ से किंवा ३७ से पर्यंत किंमती असल्याचे आम्हास वाटते. कमी किंमतीत वस्तु आपल्याला मिळत असल्याने आम्ही ते मान्य करतो.

**श्री.केशव सोनवणे, श्री.नारायण फत्तेलष्कर :** मागील सभेमध्ये सुचविल्याप्रमाणे ६७ (३) "क" कलमांतर्गत करुन घेण्यांत आलेल्या कामाची माहिती मागविण्यांत आली होती. परंतू अद्यापही त्याची वाटप स.सदस्यांना करण्यांत आली नाही.

**श्री.प्रभाकर विधाते, श्री.तुळशीराम भगुरे :** तशी माहिती अपुरी दिलेली आहे. तेव्हा संपूर्ण माहिती देण्यांत यावी नसता ६७ (३) (क) च्या संदर्भात एखादी विशेष स्थायी समिती सभेचे आयोजन करावे.

**मा.सभापती :** आतापर्यंत किती विभागाकडून माहिती प्राप्त झाली याची माहिती द्यावी.

**अति.शहर अभियंता :** माझ्या विभागाशी संबंधित सर्व विभागांची माहिती देण्यांत आलेली आहे.

**श्री.प्रभाकर विधाते :** बेगमपुरा येथील कामाच्या संदर्भात चार लाख रुपयाची माहिती यामध्ये दिलेली आहे.

**उप अभियंता :** बेगमपुरा येथील कामाच्या संदर्भात दिड लाख रुपयाची माहिती देण्यांत आलेली आहे.

**मा.सभापती :** स.सदस्यांच्या सुचना लक्षात घेता बऱ्याच विभागांची माहिती अद्याप ही पुर्णपणे न आल्याने दि.०४.०९.९१ रोजी ६७ (३) (क) कलमान्वये करुन घेण्यांत आलेल्या कामांच्या संदर्भात माहिती मिळविणेसाठी एका "विशेष स्थायी समितीची बैठक" घेण्यांत येईल. यावेळी सर्व अधिकाऱ्यांना सुचविण्यांत येते, की या सभेमध्ये आपआपल्या विभागाचे अंतर्गत सर्व माहिती मिळणे आवश्यक आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** टेंडर कॉलन केल्यानंतर ज्यांची कामे राहिलेली आहेत. त्यांच्या कामास सुरुवात करण्याबाबत मंजूरी द्यावी.

**मा.सभापती :** संबंधित गुत्तेदाराचे दर नवीन डी.एस.आर.प्रमाणे असल्यास मान्य करण्यास हरकत नाही.

**श्री.केशव सोनवणे :** टेंडर उघडण्याची नेमकी तारिख कोणती असणार याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** सध्या एखाद्या कामाची टेंडर फाईल आहे काय.

**अति.शहर अभियंता :** दि.०५.०९.९१ रोजी टेंडर काढण्याबाबतची फाईल आहे.

**श्री.तुळशीराम भगुरे :** ज्या दिवशी टेंडर फाईनल झाल्यानंतर संबंधित कामाबाबत लागणारे साहित्य उदा.सिमेंट लगत असल्यास आपल्याकडे सिमेंट आहे काय? नसल्यास कामास सुरुवात करता येणार नाही.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** आतापर्यंतही बऱ्याचशा कामांना कार्योत्तर मंजूरी दिल्या जातात याचे कारण काय.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे सिमेंट जर मनपाकडे उपलब्ध नसल्यास काय उपाय करणार याबाबत चर्चा होत आहे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** पान क्र.४ वर मागील सभेमध्ये प्रश्न उपस्थित केला त्या संदर्भात काय झाले.

**मा.सभापती :** ड्रेनेज मधील ढापे टाकण्याची कार्यवाही चालू आहे.

**श्री.गजानन बारवाल :** पान क्र.४ वर साईट क्र.७२ च्या माहिती मागविली होती. त्याचे काय झाले. तेथील जागेचा किराया क्षेत्रफळानुसार किती आकारणी केली जाते याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** याबाबत मालमत्ता अधिकाऱ्यांनी खुलासा करावा संबंधित अधिकारी नसतील तर तोपर्यंत पुढील चर्चा चालू ठेवावी.

**श्री.इकबालसिंग गील :** दिल्ली गेट येथील जलशुध्दीकरण करण्याच्या बाबतीत काय झाले याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता, ड्रेनेज :** खुलासा वाचून दाखविला.

**मा.सभापती :** याबाबत पेपरची चर्चा काय आहे. संबंधित पत्र खरे आहे काय? याची माहिती द्यावी.

**उपअभियंता ड्रेनेज :** या पत्रामध्ये सिडको कार्यालयाकडून आता पर्यंत काय काय झाले या संबंधिचा सर्व तपशिल दर्शविलेला आहे.

**मा.उपआयुक्त :** सदरील पत्र मा.आयुक्त यांचे निदर्शनास आणून देणे आवश्यक होते.

**मा.सभापती :** या फाईलचे संदर्भात आपण काय कार्यवाही केली.

**श्री.केशव सोनवणे :** दिल्लीगेट हा भाग सिडकोच्या अंतर्गत येतो. त्यामुळे सिडको आणि मनपा यांच्यामध्ये वाद निर्माण होतो. परंतू संबंधित काम एका गुत्तेदाराने केलेले असल्याने त्या गुत्तेदाराचे पैसे कुणी द्यावयाचे या वादात न पडता सिडकोने संपूर्ण पैसे देणेबाबत कार्यवाही करावी. असे सुचवावे. याबाबत मा.आयुक्त यांनी सिडको प्रशासकांना एका पत्रान्वये कळविले आहे. असे समजते.

**मा.सभापती :** आता पत्राद्वारे वाचून जो खुलासा केलेला आहे. त्यावरुन असे स्पष्ट होते की, संबंधित कामाबाबत मा.आयुक्त सर्वस्वी जबाबदार आहेत कारण त्यांनी पत्र क्र.एममसी/युजीडी/२७ दिनांक ०५.०१.९१ अन्वये स्वतःच्या अधिकार कक्षेत अधिन राहुन सदरील काम करवून घेतलेले आहे. आणि सिडकोकडून र.रु.९८,१००/- ची मागणी सदर पत्राद्वारे केली आहे. असे पत्रावरुन लक्षात येते.

**श्री.केशव सोनवणे :** माझ्या माहितीप्रमाणे मा.आयुक्त हे संबंधित काम करते वेळी काही अधिकाऱ्यांसह पाहणी करुन आलेले होते.

**मा.सभापती :** संबंधित कामाच्या संदर्भात मा.आयुक्त गुत्तेदारांशी संपर्क करु शकत नाही किंवा त्यांचे घरी जाऊन सांगू शकत नाही. केवळ आपला आदेश नियमाप्रमाणे करु शकतात. यामध्ये स.सदस्यांनी दर्शविल्यानुसार काही अधिकाऱ्यांसह संबंधित कामाच्या साईटवर जाऊन प्रत्यक्षात पाहणी केलेली आहे. यामध्ये सिडको आणि मनपा यांच्यामध्ये पत्रव्यवहार घर चालू आहे. त्यात संबंधित गुत्तेदाराच्या कामाचे पैसे देणेसाठी चर्चा झालेली आहे. परंतू उपआयुक्त आणि माझ्यामते चर्चा झालेली नाही.

**मा.उपआयुक्त :** सदरची फाईल मा.आयुक्त यांचेकडे दाखवावी लागणार आहे. आणि गुड ऑफिसेस मध्ये काम करवून घ्यावे लागणार आहे.

**श्री.गजानन बारवाल :** अगोदर गुत्तेदाराचे पैसे द्यावे लागणार आहे. कारण मनपाच्या सुचनेनुसार संबंधित काम झालेले आहे.

**श्री.केशव सोनवणे :** संबंधित कामाचे संदर्भात जर गुत्तेदाराला पैसे द्यावयाचे असेल तर कोणत्या आधारे पैसे देणार.

**मा.सभापती :** नियम ६७ (३) सी प्रमाणे काम करवून घेतल्याने पैसे देता येईल.

**श्री.केशव सोनवणे :** ठिक आहे, तसा आदेश काढून घ्यावा.

**मा.सभापती :** याबाबत काहीही बोलण्यांत अर्थ नाही. मा.आयुक्त असोत किंवा कोणतेही अधिकारी असोत संबंधित कामाचे बाबतीत गुत्तेदारास पैसे देणे बाबत

मा.आयुक्त यांचे पत्रान्वये पत्रव्यवहार करुन सिडको प्रशासकांना सांगू शकतील. कारण सदरचे काम अत्यंत ज्वलंत प्रश्नाचे असल्याने महत्वाचे होते नसता यामुळे नागरिकांची हानी झाली असती असे वाटते. परंतू ज्या अर्थी कामाचे स्वरुप पाहून काम जलदगतीने करण्यांत आले त्या अर्थी गुत्तेदारांना त्यांचा मोबदला मिळणेसाठी कार्यवाही करणे आवश्यक ठरते. यासाठी मनपा ने रक्कम रु.९८,१००/- कामाचा पैसा देवून नंतर सिडको प्रशासनाकडून पैसा वसुल करण्यांत काहीच हरकत नाही.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** माझ्या वार्डामध्ये ड्रेनेज पाण्याच्या संबंधी बरेचशे अधिकारी वर्ग येऊन पाहणी करुन गेलेत. परंतू अद्यापही काही झालेले नाही याचा खुलासा (व्हावा) करावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** या संबंधात चर्चा करण्यांत येईल.

**मा.सभापती :** स.सदस्यांच्या सुचनेनुसार त्या भागातील लोकांचा जिवंत प्रश्न आहे. तो आपण उपआयुक्त, आयुक्त यांच्याशी चर्चा करवून सोडवू शकता. वेळ लावण्यांत काहीच अर्थ नाही.

**मा.उपआयुक्त :** अडचण काय येते.

**उप अभियंता, ड्रेनेज :** सदरच्या कामासाठी लागणारा अंदाजे खर्च ३९ हजार रुपये येणार असून मंजूरीस्तव पाठविली असून सध्या लेखा विभागाकडे फाईल पाठविलेली आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** सदरचे काम लवकरात लवकर करवून घेण्याची कार्यवाही करावी. आणि बऱ्याच ठिकाणी त्या भागामध्ये पाणी वाहून रोडवरती येते. त्यासंबंधी पाणी काढण्यासंबंधी ताबडतोब कार्यवाही करावी. व सदरचे कामाची तत्परता लक्षात घेता तात्काळ कामास सुरुवात करावी.

**श्री.केशव सोनवणे :** मालमत्ता अधिकाऱ्यांनी साईट क्र.७२ बाबत माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे साईट क्र.७२ च्या संदर्भात सदरची जागा १ एकर १० गुंठे इतकी जागा असून या जागेचा किराया गेल्या दहा वर्षापासून शिल्लक असून कमीत कमी १९ हजार रुपये थकीत संबंधितांवर प्रतिवर्षी किराया बाकी आहे. त्यानुसार २ लक्ष ४१ हजार रुपये आतापर्यंतचे शिल्लक उरणार आहेत.

**श्री.गजानन बारवाल :** संबंधितांवर इतकी रक्कम शिल्लक आहे तर पुढील कार्यवाही काय केली.

**मा.सभापती :** अधिकाऱ्यांनी माहिती सांगितल्यानुसार जर एवढी रक्कम मनपाची एका व्यक्तीकडे शिल्लक उरत असेल तर आणि त्यांचेकडून जमा करवून घेता येत नसतील तर मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. याला जबाबदार कोण? सदरची फाईल कोणत्या विभागाकडून गेलेली आहे. आणि संबंधितांकडून ९ (नऊ) वर्षाचा किराया वसुल करता येऊ शकतो काय? याची माहिती द्यावी.

**श्री.गजानन बारवाल :** सदरचे जमिनीचा किराया जर मिळत नसेल तर जमीन मनपाकडे ताब्यात घ्यावी.

**मा.सभापती :** एकूण जमीन किती आहे.

**सहा.संचालक, नगररचना :** सदरची जमीन १ एकर १० गुंठे इतकी आहे. सदरची जमीन शासनाने ३ वर्षासाठी किरायाने द्यावी. अशा प्रकारचा सर्वसाधारण सभेने प्रस्ताव मंजूर केलेला आहे.

**मा.सभापती :** शासनाचा असा काही नियम आहे काय की, जमीन ॲक्वायर करणे बाबत कार्यवाही होत असेल तर सदरची जमीन आरक्षित किंवा खुली आहे तर कोणताही बदल करु शकत नाही. त्या संदर्भात काय बोलणार याबाबत चौकशी करणे आवश्यक आहे.

**श्री.गजानन बारवाल :** याची चौकशी करुन सर्व स.सदस्यांना माहिती द्यावी.

**मा.सभापती :** संबंधित बाबतीत अगोदर भाडे वसुल करावे आणि पुढे काय कार्यवाही करायची त्याची माहिती पुढील बैठकीत द्यावी. २० वर्षाच्या पुढे जर भाडे थकीत असेल तर कोणताही पैस आपल्याला मिळणार नाही. या कामी एकंदर किती पैसा खर्च झाला याची माहिती द्यावी.

**श्री.केशव सोनवणे :** दोन रुपये दराने ठेवावे असे होते.

**मा.सभापती :** सदरचे दर त्यांनी ठरविलेले होते. परंतू माझ्या मते ३ रु.करणे बाबत कोणता आदेश आहे काय? जर तसे नसल्यास नियमाप्रमाणे २ रुपये दर आहे असे नाही.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** पान क्र.१९ मध्ये मा.सभापतीनी ज्या आदेशास मंजूरी दिलेली आहे. त्याबाबत काय आहे.

**मा.सभापती :** आपल्या मागणीशी आणि या विषयाशी काहीही संबंध नाही प्रस्तावामध्ये एकूण (६) सहा स.सदस्यांना त्यांचे स्वेच्छा निधीतून शालेय साहित्य वाटप करण्यांस मंजूरी देण्यांत आली आहे. अजून काही स.सदस्यांचे अर्ज यासंबंधी आलेले आहेत काय?

**शिक्षणाधिकारी :** नाही. अशाप्रकारचे अजून काही अर्ज आलेले नाहीत.

**ठराव :**

पान क्र.१९ मधील इतिवृत्तात ज्या ६ (सहा) सं.सदस्यांचे स्वेच्छा निधीतून प्रत्येकी रु.२५/- हजार पर्यंत (Black Board Operation Scheme) योजने अंतर्गत शालेय साहित्य खरेदी करण्यास मंजूरी देण्यांत यआली. त्यासोबतच पुन्हा रु.२५ हजार प्रत्येकी प्रमाणे शालेय साहित्य वाटप करण्यासाठी स्वेच्छा निधीतून देणे बाबत अर्ज आलेले आहेत. यामध्ये सुरुवातीला रु.२५ हजाराची मागणी केलेले सर्वश्री शिवाजी कवडे व आनंद गोडसे यांना दोन्ही अर्जाचे धरुन रुपये ५० हजार स्वेच्छा निधीतून खर्च करावयाचे आहेत. तर या वर्षाचे स्वेच्छा निधीतून श्री.गिरजामरा माळनारे व श्री.राधाकृष्ण मोटे यांना प्रत्येकी २५ हजार त्यांचे स्वेच्छा निधीत शिल्लक असल्यास संबंधितांना शालेय साहित्य खरेदी करण्यास मंजूरी देण्यांत येते.

१) इतिवृत्तातील पान क्र.१७ विषय क्र.१०८/१७ च्या प्रस्तावामध्ये प्रथम पाहणी करण्यांत येईल. असे ठरलेले होते. त्याप्रमाणे पाहणी करण्यांत आलेली आहे. सदरील कामास सुरुवात करण्यांत यावी.

२) पान क्र.९ मध्ये विषय क्र.९७/६ चे काम तातडीने करुन घ्यावयाचे असल्याने यासाठी मा.विभागीय आयुक्त व आयुक्त यांचेसह काही अधिकाऱ्यांनी पाहणी केलेली आहे. सदरील रोड हा बाहेरील पर्यटकांच्या दृष्टीने चांगला करणे अति महत्वाचे आहे. कारण ऐतिहासिक शहर म्हणून गणल्या जाणाऱ्या शहरातील रोड वाईट दिसू नये

यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सुध्दा वरीष्ठ पातळीवरुन विचारणा करण्यांत आली होती. त्यानुसार मा.आयुक्तांना त्यांनी प्रत्यक्षात सूचना केल्या होत्या. आणि सदरील रोडचे काम जलद गतीने व्हावे असे सुचविले. त्यानुसार सदरील कामाची सुरवात डब्ल्यु.बी.एम.प्रमाणे चालु ठेवण्यांस मंजूरी देण्यांत येते.

३) त्याचप्रमाणे इतिवृत्तातील पान क्र.१० विषय क्र.९९/८ यास वरीलप्रमाणे मंजूरी देण्यांत येते. याचबरोबर दिनांक ०५.०८.९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत पास करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.११३/२ :**

प्रकल्प अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, वाल्मी हया संस्थेतील मोठ्या आकाराचे रंगीत पारदर्शीकांच्या धर्तीवर मनपाच्या विविध (उदा. रस्ता रुंदीकरण, वाहतुकबेट, सौंदर्यीकरण, सिध्दार्थ उद्यान, प्राणी संग्रहालय, वृक्षारोपण) अशा योजना वरील सात रंगीत छायाचित्रे मोठ्या आकारात तयार करुन डिसप्ले बोर्ड करण्यास मंजूरी मा.आयुक्तांनी दि.०४.०५.९१ रोजी दिली आहे. त्यांच्या शिफारशीनंतर दैनिक लोकविजय दि.०९.०५.९१ दै.मुफस्सीर दि.०९.०५.९१ या वृत्तापत्रामधून निविदा प्रकाशित करण्यांत आल्या तीन निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दर रक्कम रुपये | शेरा (डिस्प्ले बोर्ड) |
|---|---|---|---|
| १ | शेटकर डी.एम. | १३,४५०/- (तेरा हजार चारशे पन्नास फक्त) | प्रत्येकी |
| २ | पारिक फोटो स्टुडिओ | १५,०००/- (पंधरा हजार रुपये फक्त) | प्रत्येकी |
| ३ | हरकल बी.एस. | १३,०००/- (तेरा हजार रुपये फक्त) | प्रत्येकी |

एकूण सात डिस्प्ले बोडर्सवर रु.९१,०००/- खर्च अपेक्षित आहे. वरील निविदापैकी हरकल बी.एस.या एजन्सीचे दर सर्वात कमी आहेत. प्रति बोर्ड रु.१३,०००/- दर मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

सदरचा प्रस्ताव रद्द करण्यांत यावा याचे प्रमुख कारण म्हणजे शहरातील बऱ्याचशा भागातील कामे अद्यापही अपुरी असल्याने लोकांची सारखी ओरड असते आणि शहर विकासाच्या दृष्टीने कामे सुरळीत होणे आवश्यक आहे. काही भागातील अंतर्गत कामे अजूनही पडलेली आहेत. मग एवढा पैसा याठिकाणी गुंतवण्यापेक्षा शहरातील इतर कामांमध्ये जे विकासात्मक असेल अशासाठी पैसा उपयोगात आणणे ठीक राहील. करिता सदरचा प्रस्ताव रद्द समजण्यांत यावा.

**ठराव :**

सदरचा प्रस्ताव रद्द करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.११४/३ :**

वार्ड क्र.३५ कैसर कॉलनी, खास गेट, आणि सिध्देश्वर कॉलनी येथे जुनी अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन काढून त्या ठिकाणी २५० मी.मी.व्यासाची ३०० मी.मी.व्यासाची आ.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.१,१८,५,००/- ला मा.आयुक्तांनी दिलेली आहे. सदर काम प्राप्त शासकीय अनुदानातून करण्यास मंजूरी

मिळाली आहे. अंदाजपत्रक सन १९९१-९२ च्या डी.एस.आर.दराने तयार करण्यांत आलेले आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२/५४८/९१, दि.२९.०५.९१ द्वारे दै.लोकधर्म व देवगिरी तरुण भारत या स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.फारुकी ए.एम. | - | ४% जास्त |
| २. | श्री.स.सिराजुद्दीन | - | २% जास्त |
| ३. | श्री.एम.एम.बेग | - | २% जास्त |
| ४. | श्री.सलीम अहेमद | - | १% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री.सलीम अहेमद याचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.केशव सोनवणे :** अंदाजपत्रकास मा.आयुक्तांना मंजूरी देता येते काय? याची माहिती द्यावी. यामध्ये स्पेसिफीक मान्यता आहे काय?

**श्री.प्रभाकर विधाते :** सदरील विषास स्थायी समितीची मान्यता कधी घेतली.

**मा.सभापती :** सदरची योजना शासनाची आहे.

**श्री.केशव सोनवणे :** मी यापुर्वी सूचना केलेली होती की, शासनाच्या अशा प्रकारच्या योजने अंतर्गत वार्ड वाईज एकूण किती कामे हाती घेतलेली आहेत. याची एक यादी सदस्यांना देण्यांत यावी म्हणजे याबाबत कल्पना येते.

**उपअभियंता (स्लम) :** शासनाच्या मंजूरीनुसार शहरातील विकास कामांची उदा.रस्ते, ड्रेनेज आदिबाबत वार्डवाईज माहिती उपलब्ध करुन देण्यांत येईल.

**मा.सभापती :** सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३५ कैसर कॉलनी, खासगेट, सिध्देश्वर कॉलनी येथे जुनी अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन काढून त्या ठिकाणी २५० मी.मी.व्यासाची व ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री.सलीम अहेमद यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.११५/४ :**

वार्ड क्र.१२ किराडपुरा येथे जुनी अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची व ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.२,५०,६००/- ला मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. तसेच सदर काम प्राप्त शासकीय अनुदानातून करण्यास मंजूरी मिळालेली आहे. तसेच अंदाजपत्रक सन १९९१-९२ च्या डी.एस.आर.दराने तयार करण्यांत आलेले आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना बी-१ नमुन्यात दै.लोकधर्म व देवगिरी तरुण भारत या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.आर.एल.बारवाल | - | १०% जास्त |
| २. | श्री.एम.एम.बेग | - | २ जास्त |
| ३. | श्री.कैसर खान | - | ०.०१% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराचे श्री.कैसर खान यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१२ किराडपुरा येथे जुनी अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी. व ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या श्री.कैसर खान यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.११६/५ :**

झोन क्र.१ मधील विविध ठिकाणी असलेल्या सार्वजनिक संडासाची दुरुस्ती करणे बाबत अंदाजपत्रक र.रु.३,२१,६५४/- ला मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. तसेच सदर काम प्राप्त शासकीय अनुदानातून करण्यांस मंजूरी मिळालेली आहे. अंदाजपत्रक सन १९९१-९२ च्या डी.एस.आर.दराने तयार करण्यांत आलेले आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२/५४८/९१ अन्वये दै.लोकधर्म व देवगिरी तरुण भारत मध्ये जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.ए.बाहोद्दीन | - | १% कमी |
| २. | श्री.एस.ए.नवाब | - | ४% जास्त |
| ३. | श्री.आर.एल.बारवाल | - | ८% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री.एस.ए.बाहोद्दीन यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.तुळशीराम भगुरे :** संबंधित कामाची पाहणी करावी.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** या कामाच्या संदर्भात जनतेने सहकार्य करावे आणि यासाठी कधी आणि कोणत्या वेळेस पाहणी करावयास जाणार याची सदस्यांना कल्पना द्यावी.

**मा.सभापती :** उद्या दि.३१.०८.९१ रोजी ठीक ११.०० वाजता संबंधित कामाची प्रत्यक्षात पाहणी करण्यांत येईल.

**ठराव :**

सदर कामाची पाहणी केल्यानंतर याबाबत विचार करण्यांत येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.११७/६ :**

उप अभियंता विद्युत मनपा, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक जवाहर कॉलनी पर्यंत १५० वॅट एच.पी.एस.व्ही.फिटींगचा पुरवठा करणे आणि बसविणेसाठी सा.बां.खाते (विद्युत) अनुसार रक्कम रु.४,१९,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदर खर्च हा विशेष शासकीय अनुदानातून खर्च करण्यांत येईल त्यास मान्यता मिळावी.

सदर कामासाठी फेरनिविदा (दुसरी वेळ) मागविण्यात आल्या असता एकूण फक्त एकच मे.मुजाहेद इलेक्ट्रीक वर्क्स औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.११% कमी दराची निविदा प्राप्त झाली. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** यामध्ये ७.११% कमी दर असल्याने प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

**श्री.प्रभाकर विधाते :** संबंधित प्रस्तावानुसार यापुर्वी एक प्रस्ताव मंजूर झालेला आहे. बलवंत वाचनालय ते मिल कॉर्नर पर्यंतच्या विद्युत पुरवठा करणे आणि बसविणे बाबत अद्यापही कामास सुरुवात नाही. याचे कारण काय?

**मा.सभापती :** याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उपअभियंता, विद्युत :** सदरचा प्रस्ताव पुढील बैठकीत येणार आहे.

**मा.सभापती :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक जवाहर कॉलनी पर्यंत १५० वॅट एच.पी.एस.व्ही.फिटींगचा पुरवठा करणे आणि बसवणे साठीच्या कामाकरिता र.रु.४,१९,२००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामाकरिता प्राप्त झालेल्या मे.मुजाहेद इलेक्ट्रीक वर्क्स, औरंगाबाद यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.११% कमी दराच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.११८/७ :**

शहर यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रेल्वे स्टेशन येथील गेस्ट हाऊस जवळील अस्तित्वात असलेल्या महानगरपालिका कर्मचारी निवासस्थानाचा विस्तार करणेच्या कामासाठी स्थायी समिती सभा दि.३०.०३.९१ ठराव क्र.५६५ अन्वये र.रु.२,९८,०००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी प्राप्त झाली आहे. सदरचे काम हाती घेणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.४/९१ दि.२१.०५.९१ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.ए.नवाब | - | ६% जास्त |
| २. | श्री.एस.एच.असोशिएटस | - | ५% जास्त |
| ३. | श्री.अब्दुल सलाम | - | ०.१५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१५% कमी दराची श्री.अब्दुल सलाम गुत्तेदार यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.केशव सोनवणे :** या संबंधी माहिती द्यावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता :** रेल्वे स्टेशन येथील मनपाचे जुने क्वॉटर्स आहेत. तेथील काम करवून घ्यावयाचे आहे. यामध्ये काही विस्तार करण्यांचे काम आहे. तर काही ठिकाणी दुरुस्तीची कामे आहेत.

**श्री.केशव सोनवणे :** या क्वॉर्टरजवळ काही ड्रायव्हर कर्मचारी असतात त्यांचे बाबतीत आहे काय?

**मा.सभापती :** संबंधित क्वॉर्टरचे केवळ जागे अभावी विस्तार करण्याचे काम होणार आहे.

**अति.शहर अभियंता :** ड्रायव्हर कर्मचाऱ्यांचे घरांना विस्तारित करण्यात येणार नाही. केवळ त्या ठिकाणी प्रकल्प अधिकारी, विधी सल्लागार यांचे क्वॉर्टरच्या संदर्भात जे की ५x३.१५ व १५x१० च्या आकाराचे विस्तारीत खोल्या काढून व मागील भागात शौचालय गृहाची व्यवस्था आणि काही दुरुस्तीसह कामे करावी लागणार आहेत.

**मा.सभापती :** सदरील प्रस्तावाबाबत प्रथमतः पाहणी करुन नंतरच प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

**श्री.एकबालसिंग गील :** माझी कित्येक दिवसांची मागणी होती की, ज्युब्लीपार्क येथील कर्मचाऱ्यांना शौचालय बांधून देण्या बाबतची कार्यवाही व्हावी. परंतू अद्याप होत नाही. याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता :** पुढील बैठकीत सदरचा विषय ठेवण्यांत येईल.

**ठराव :**

पाहणी नंतर सदरच्या प्रस्तावाबाबत विचार करण्यांत येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.११९/८ :**

वार्ड क्र.१९ बुढ्ढीलेन येथे मुन्ना गॅरेज येथे ३०० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.६४,६६०/- ला मा.आयुक्तांनी मंजूरी दिल्यानंतर सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२, दि.१४.०९.९० अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सात निविदा वसूल झाल्या होत्या. पैकी सर्वात कमी म्हणजे ३०.८६% कमी दराची निविदा जी.एम.अन्सारी यांची होती व सदर निविदेस स्थायी समिती ठराव क्र.५३४ दिनांक २६.०६.९१ अन्वये मंजूरी मिळालेली आहे व संबंधित गुत्तेदार यांना २% अनामत व दहा रुपयाचा मुद्रांक दाखल करणेस्तव पत्रक सुध्दा देण्यांत आले होते. परंतू संबंधिताने सदर अनामत रक्कम कार्यालयात दाखल न केल्याने व सदर निविदा संबंधीताने भरुन ९० दिवसांपेक्षा जास्त कालावधी झाल्याने गुत्तेदार बंधनकारक नव्हता व सदर कामाचे हे दर १९८९-९० चे डी.एस.आर.प्रमाणे आहेत. त्यामुळे मा.आयुक्त साहेब यांनी दि.२६.०५.९१ ला सदरची फेरनिविदा मागवावी असा आदेश दिला.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.३/५९४/९१, दि.२०.०६.९१ दुसऱ्यांदा दै.नवा मराठा, डॉन, या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा विकण्यांत आल्या होत्या. पैकी केवळ दोन निविदा वसुल झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.स.रफिकउद्दीन | - | ५.७% कमी |
| २. | श्री.बांबुसा झैन | - | ३.७८६% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.७% कमी दराची श्री.सय्यद रफिकउद्दीन यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

वॉर्ड क्र.१९ बुढ्ढीलेन येथे मुन्ना गॅरेज येथे ३०० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.७% कमी दराचे श्री.सय्यद रफिकउद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२०/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, वार्ड क्र.१ मिटमिटा जवळील नाक्या समोरील रस्त्यावर डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु.१,००,०००/- ला मा.आयुक्तांनी मंजूरी दि.१४.०१.९१ ला मिळाली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.९ जा.क्र./मनपा/बांध.वि-१/६८४/९१, दि.१६.०२.९१ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विकल्या गेल्या त्यापैकी एक निविदा दर भरुन प्राप्त झाली असून ती दि.१८.०३.९१ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आली तिचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१. श्री.रे.कन्स्ट्रक्शन - १९.५०% जास्त

वरीलपैकी श्री.रे.कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १९.५०% जास्त दराचे आहे.

सन १९८९-९० च्या दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. आता काम सन १९९०-९१ या वर्षात हाती घ्यावयाचे आहे. त्यामुळे निविदाचे दर सुचीप्रमाणे तुलना केली असता ०.११% कमी आहेत. करिता निविदा १९.५०% जास्त दराची निविदा मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

**मा.सभापती :** सदरील रोड २०० फुट स्केअर फुटाचा असल्याने या रोडमुळे रहदारीसाठी दुटप्पी वाहतुक करणे साईस्कर होईल त्यादृष्टीने डांबरीकरण आवश्यक आहे.

**श्री.प्रभाकर विधाते :** बेगमपुरा येथील बिबीका मकबरा बाबत रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे.

**अति.शहर अभियंता :** ठिक आहे. सदरील रस्ता तयार करण्यात येत आहे.

**मा.सभापती :** सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१ मिटमिटा जवळील नाक्या समोरील रस्त्यावर डांबरीकरण करणेच्या कामासाठी श्री.रे.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.५०% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२१/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, एकनाथनगर, मिलींदनगर, येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सा.बा.खात्याचे

डी.एस.आर.दराने र.रु.४,०४,२३०/- च्या अंदाजपत्रकास दिनांक २४.०४.९० च्या स्थायी समिती सभा ठराव क्र.७४७ नुसार मान्यता मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२ अन्वये प्रगट फेरनिविदा मागविल्या असता मे.रेकन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.५०% जास्त दराची फक्त एकच निविदा प्राप्त झाली. सन १९९०-९१ चे डी.एस.आर.दराशी तुलना केल्यास सदरील दर ०.७०% जास्त असा येतो. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकनाथनगर, मिलींदनगर, येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी मे.रे.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.५०% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२२/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन या १०० फुट डी.पी.रोडचे खडीकरण, रुंदीकरण, फुटपाथ, करबीग, मेडियन व डांबरीकरणाचे काम करणेसाठी सन १९८९-९० चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.४२,१७,३६२/- च्या अंदाजपत्रकास दि.१५.०९.९० च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.६३ अन्वये मंजूरी मिळाली आहे.

सदरील कामापैकी डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रु.२७,२७,१९३/- साठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२ (१९९१-९२) चे निविदा सूचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.डी.एस.जग्गी | - | ०.१०% कमी |
| २. | मे.रे.कन्स्ट्रक्शन | - | ३% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री.डी.एस.जग्गी यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन या १०० फुट डी.पी.रोडचे खडीकरण, रुंदीकरण, फुटपाथ, करबींग व मेडीयन व डांबरीकरणाचे कामापैकी डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री.डी.एस.जग्गी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२३/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.१५ कैसर कॉलनी, कुंभारवाडा भागात नवीन खांडकी बसविणे व जुनी खांडकीची दुरुस्ती करणेच्या कामासाठी र.रु.६६,५७०/- च्या अंदाजपत्रकास दि.०९.०४.९१ ला मा.आयुक्तांची मंजूरी मिळाली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.२, दि.१०.०५.१९९१ नुसार निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.अब्दुल कदीर | - | ०.१% कमी |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री.ए.एम.फरुकी | - | ५% जास्त |
| ३. | श्री.एम.एम.बेग | - | २% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वा कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री.अब्दुल कदीर यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३५ कैसर कॉलनी कुंभारवाडा भागात नवीन खांडकी बसविणे व जुनी खांडकीची दुरुस्ती करणेच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री.अब्दुल कदीर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२४/१३ :**

मा.उपआयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका वाचनालयासाठी पुस्तके खरेदी करीता दरपत्रके जाहिरात देवून मागविण्यांत आली एकूण सहा दरपत्रके प्राप्त झाली. सदरील दरपत्रकानुसार सर्वाधिक सुट देणारे दर निश्चित करावयाचे आहेत. सन १९९१-९२ च्या आर्थिक तरतुदीच्या आधिन राहुन पुस्तके खरेदी करण्यांत येतील.

तुलनात्मक तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सर्वाधिक सुट देणाऱ्या दरावर पुस्तके खरेदीचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** वाचनालयासाठी पुस्तके खरेदी करण्याकरिता दरपत्रके जाहिरात देवून मागवण्यिांत आलेली आहेत. यामध्ये बऱ्याचशा बुक स्टेशनरीचे दर प्राप्त झालेले आहेत. आणि प्रस्तावात दर्शविल्यानुसार सर्वाधिक सुट देणाऱ्या दरावर पुस्तके खरेदी करता येऊ शकेल. आणि यामुळे मनपाला आर्थिक उत्पन्न मिळू शकेल.

**श्री.प्रभाकर विधाते :** अशी एकूण किती पुस्तके मागविली आहेत.

**उपआयुक्त :** भरपूर पुस्तके मागविण्यांत येणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने लहान मुलांसाठी गप्पागोष्टीची पुस्तके, मासिके, वर्तमानपत्र आणि इतर विषयांवरील काही पुस्तकांचा समावेश राहील.

**मा.सभापती :** सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका वाचनालयासाठी पुस्तके खरेदी करिता प्राप्त झालेल्या दरपत्रकापैकी सर्वाधिक सुट देणारे दर निश्चित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच १९९१-९२ च्या आर्थिक तरतूदीच्या अधिन राहुन पुस्तके खरेदी करण्यात यावीत. तुलनात्मक दर तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सर्वाधिक सुट देणाऱ्या दरावर पुस्तके खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२५/१४ :**

वार्ड क्र.२४ नेहरु प्लेस, भुईवाड्यापासून ते नाल्या पर्यंत ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.५०,५५०/- ला मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.३, दि.२०.०६.९१ अन्वये दै.नवा मराठा, व डॉन, या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे -

१. श्री.स.रफिकउद्दीन - ४.१०% कमी
२. श्री.विशाल कन्स्ट्रक्शन - १८% कमी
३. श्री.एस.के.मिसाळ - १५% कमी
४. श्री.कैसर खान - १२.७८६% कमी
५. श्री.एस.ए.वाहोद्दीन - २१.०१% कमी
६. श्री.स.सिराजुद्दीन - १६% कमी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.०१% कमी दराची श्री.एस.ए.वाहोद्दीन यांची निविदा आहे. सदरील दर सन १९९०-९१ च्या डी.एस.आर.प्रमाणे आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२४ नेहरु प्लेस, भोईवाड्यापासून ते नाल्यापर्यंत ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.०१% कमी दराच्या श्री.एस.ए.वाहोद्दीन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२६/१५ :**

वार्ड क्र.३४ रेंगटीपुरा निजामगंज येथे जुनी अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन काढून त्या ठिकाणी २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.५२,३००/- चे सन १९९०-९१ च्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. सदर काम प्राप्त शासकीय अनुदानातून करणेस मंजूरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.२, दि.२९.०५.९१ ला दै.लोकधर्म व देवगिरी तरुण भारत या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

१. श्री.एम.जी.महेबुब अली - १% कमी
२. श्री.सय्यद सिराजुद्दीन - ५.०५% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री.एस.जी.महेबुब अली यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

**मा.सभापती :** याप्रस्तावामध्ये दर प्राप्त झाल्यानुसार १% कमी व ५.०५% जास्त अशी दुरुस्ती व्हावी व सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३४ रेंगटीपुरा निजामगंज येथे जुनी अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन काढून त्या ठिकाणी नवीन २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन

टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री.एम.जी.महेबुब अली यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२७/१६ :**

झोन क्र.२ मधील विविध ठिकाणी असलेल्या सार्वजनिक संडासाची दुरुस्ती करणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.७५,२१५/- चे तयार करण्यांत आलेले असून सदरचा दर सन १९९०-९१ या डी.एस.आर.दराप्रमाणे असून सदर कामास मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामास मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. तसेच सदर काम प्राप्त शासकीय अनुदानातून करण्यांत मंजूरी मिळालेली आहे.

आदेशनुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र.२/५४८/९१/ दिनांक २९.५.९१ ला देवगिरी तरूण भारत व लाकधर्म या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून बरीच नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सहा निविदा विकण्यात आल्या पैकी एकूण तीन निविदा वसुल झाल्या त्याचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.ए.बाहोद्यीन | - | १२% कमी |
| २. | श्री.सुनिल जैस्वाल | - | ११.५% कमी |
| ३. | श्री.अशोक शिंदे | - | २३.७९% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.७९% कमी दराचे श्री.अशोक शिंदे यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सदर कामाची पाहणी केल्यानंतर या बाबत विचार करण्यांत येईल. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१२८/१७ :**

वार्ड क्र.३८ दत्तनगर दादा कॉलनी येथे ड्रेनेज लाईन (अस्तित्वात असलेली) काढून तेथे २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.१,४४,२५०/- चे सन १९९०-९१ च्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यांत आलेले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेब यांनी मंजूरी दिलेली आहे. तसेच सदर काम प्राप्त शासकीय अनुदानातून करण्यांस मंजूरी मिळालेली आहे.

आदेशाप्रमाणे सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२/५४८/९१, दि.२९.०५.९१ ला दैनिक लोकधर्म व देवगिरी तरुण भारत या स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकण्यांत आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ एकच निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.९% कमी दराची श्री.अे.के.अरोरा यांची निविदा वसुल झालेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३८ दत्तनगर दादा कॉलनी येथे ड्रेनेज लाईन (अस्तित्वात असलेली) काढून तेथे २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत तयार करण्यांत आलेली रक्कम रु.१,४४,२५०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी प्राप्त झालेल्या एकमेव निविदाधारक श्री.अे.के.अरोरा यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.९% कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२९/१८ :**

झोन क्र.६ मधील विविध ठिकाणी असलेल्या सार्वजनिक संडासाचे दुरुस्ती करणे बाबत अंदाजपत्रक र.रु.१,२१,७८६/- चे सन १९९०-९१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून प्राप्त सरकारी अनुदानातून सदर काम करणे बाबत मा.आयुक्त साहेबांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२/५४/९१, दि.२९.०५.९१ द्वारे दैनिक लोकधर्म व देवगिरी तरुण भारत दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सात निविदा विकण्यांत आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ तीन निविदा वसुल झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता दर खालीलप्रमाणे आहे.

१. श्री.फारुकी अे.एम. - १% कमी
२. श्री.एम.एम.बेग - २% जास्त
३. श्री.आर.एल.बारवाल - ४% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री.फारुकी ए.एम.यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.प्रभाकर विधाते :** विषय क्र.११ मध्ये जशी मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार मागील सभेमध्ये असे ठरलेले होते. की, उस्मानपुरा येथील टेलिफोन बुथ जोपर्यंत हलविला जात नाही. तोपर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करता येऊ शकत नाही.

**मा.सभापती :** या संबंधी मा.आयुक्त कार्यवाही करतील.

**श्री.केशव सोनवणे :** या संदर्भात मा.आयुक्तांनी आश्वासन दिलेले आहे की, सहा महिन्याच्या मुदतीची संबंधितांना आदेश दिलेला आहे. त्यानंतर त्यांचेवर कार्यवाही करण्यांत येईल. मग त्यांची मदत अद्यापही संपलेली नाही काय?

**मा.सभापती :** ठिक आहे. या संदर्भात मा.आयुक्त कार्यवाही करतील.

**श्री.केशव सोनवणे :** संबंधित बुथ मालकास परवानगी कधी पर्यंत दिलेली आहे. याची माहिती द्यावी.

**मा.उपआयुक्त :** पुढील बैठकीत याबाबत सविस्तर माहिती देण्यांत येईल.

**मा.सभापती :** या विषयाशी संबंधित चर्चेशी काहीही संबंध येत नाही. तेव्हा सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यांत आलेला आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र.६ मधील विविध ठिकाणी असलेल्या सार्वजनिक संडासाचे दुरुस्ती करणे बाबतचे कामाची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर विचार करण्यांत येईल. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१३०/१९ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९१-९२ सालात किटक नाशक औषधी, नोव्हान, गॅमेझीन पावडर व फिनेल खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्यांत आल्या होत्या. खालीलप्रमाणे निविदा दरपत्रके प्राप्त झाली.

१. मे.अभिनव केमीकल
२. मे.व्हि.जी.प्रॉडक्टस

३. मे.न्यु.जे.के.इंटरप्राईजेस
४. मे.इन्शा हार्डवेअर
५. मे.मनोज इंटरप्राईजसे
६. मे.न्यु भारत स्टोअर्स

वरीलप्रमाणे फिनेलचे नमुने फक्त मे.अभिनव केमिकल्स व व्ही.जी.प्रॉडक्टस, यांनी दिले असता सदरील पुरवठाधारकाचे नमुने तपासणी करिता शासकीय लॅबला पाठविण्यांत आले असता त्यांचेकडे (                ) नसल्यामुळे तपासणी न करता परत पाठविले म्हणून सदरील नमुने वैद्यकीय अधिकारी यांचेकडे तपासणी करीता पाठविले आहे. अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही. करिता नोव्हान, व सेन्टेड फिनेल गॅमेझीन पावडर खरेदी करण्या करिता प्रस्ताव सादर करीत आहे.

नोव्हान, गॅमेझीन पावडर व सेन्टेड फिनेलचे दर व तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पुरवठाधारकांचे नांव | नोव्हान सिबाका | सेन्टेड फिनेल प्र.लि. | बी.एस.ई-१०% प्रती बॅग ५० कि. |
|---|---|---|---|---|
| १ | अभिनव केमीकल्स | -- | २४.०० | १५०.०० प्र.बॅग |
| २ | व्हि.जी.प्रॉडक्टस | -- | ३५.०० | -- |
| ३ | न्यु.जे.के.इन्टरप्राईजेस | -- | २०.०० | १०५.०० प्र.बॅग |
| ४ | इन्शा हार्डवेअर | २३०.०० प्र.लि. | ४८.०० | ११६.०० प्र.बॅग |
| ५ | मनोज इंटरप्राईजेस | २०१.०० | १६.८० | १०२.०० प्र.बॅग |
| ६ | न्यु भारत स्टोअर्स | २९८.०० | ५५.९० | १९२.०० प्र.बॅग |

वरीलप्रमाणे कमी दर नोव्हान, सेन्टेड फिनेल व गॅमेझीन पावडरचे दर मे.मनोज इंटरप्राईजेस यांचे आहे. करिता कमी दरास

<u>संवाद :</u>

**मा.सभापती :** फिनेल का घेण्यांत आले नाही.

**भांडार अधिक्षक :** तपासणी रिपोर्ट न आल्यामुळे फिनेल घेण्याबाबत नमूद केलेले नाही.

**मा.सभापती :** गेल्या वर्षी २०% डिपॉझीट ठेवून ज्यांचे कमी दर आहे. त्यांना फिनेलची ऑर्डर दिली होती.

**श्री.गजानन बारवाल :** फिनेल किती (क्वॉन्टीटी) मागविण्यांत येते.

**भांडार अधिक्षक :** ३० ते ४० बॅरल मागविण्यांत येते.

**श्री.गजानन बारवाल :** बऱ्याचशा झोन कार्यालयामध्ये साफसफाई झाल्यानंतर ड्रेनेज लाईन नाला आणि संडासाचे ठिकाणी पावडरचा मारा करण्यांसाठी वाटप करण्यांत येतो काय?

**मा.सभापती :** ज्याअर्थी गतवर्षी २०% डिपॉझीट ठेवून कमी दराचे निविदा धारकांस फिनेल पुरविण्याचे आदेश दिले होते त्याचप्रमाणे यावर्षीही २५% रक्कम बिलातून कपात करुन घ्यावी. कमी दराचे निविदाधारकास फिनेल पुरविण्याचे आदेश देण्यांत यावे. सॅम्पल समाधानकारक आल्यानंतर कपात केलेली रक्म अदा करावी. सप्लायर्सने फिनेल सप्लाय केल्यानंतर प्रत्येक बॅरल मधून सॅम्पल घेऊन ते सप्लायर्सने स्वखर्चाने तपासणी करुन अहवाल देणे आणि कार्यालयाने देखील प्रत्येक बॅरल मधून सॅम्पल घेऊन सिल करुन ठेवणे.

**मा.उपआयुक्त :** झोन कार्यालयातील स्वच्छता निरिक्षक यांचे मार्फत पुरवठा केला जातो.

**मा.सभापती :** स्थायी समितीला माहिती देण्यांत यावी की, झोन कार्यालयातील संबंधित स्वच्छता निरिक्षक यांचे निरिक्षणा खाली साफसफाई केलेल्या नाल्या, मुताऱ्या आणि संडासामध्ये व्यवस्थीत पावडर व फिनेलचा उपयोग करतात काय? याबाबत पत्राने झोनला कळविण्यांत यावे. याबरोबरच सदरील प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो. मान्यता देणे बाबत प्रस्ताव सादर. ब्लॅक फिनेलचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रस्ताव सादर करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ सालात किटक नाशक, औषधी, नोव्हान गॅमेझीन पावडर व फिनेल खरेदी करणेसाठी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदा धारकाने दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच ज्याप्रमाणे गतवर्षी २०% डिपॉझीट ठेवून कमी दराचे निविदा धारकास फिनेल पुरविण्याचे आदेश दिले होते. त्याचप्रमाणे या वर्षीही २५% रक्कम बिलातून कपात करुन घ्यावी. कमी दराचे निविदा धारकास फिनेल पुरविण्याचे आदेश देण्यांत यावे. सॅम्प्ल समाधानकारक आल्यानंतर कपात केलेली रक्कम अदा करावी. सप्लायर्सने फिनेल सप्लाय केल्यानंतर प्रत्येक बॅरल मधून सॅम्पल घेऊन ते सप्लायर्सने स्वखर्चाने तपासणी करुन अहवाल देणे. आणि कार्यालयाने देखील प्रत्येक बॅरल मधून सॅम्पल घेऊन ठेवणे या अटीवर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३१/२० :**

गणेश कॉलनी, मजनु हील, येथील नगर भुमापन क्र.११४३२ व ११४३६ पैकी ७१५६.५० चौ.मी.जमीन संपादनाचा प्रस्ताव स्थायी समितीचा ठराव क्र.५८९ दि.२६.०४.१९९१ नुसार मंजूरी मिळाली आहे. सदर प्रस्तावानुसार संपादित जमिनीची एकूण द्यावयाची रक्कम रु.१२,२२,२४०/- असून सदरची रजिस्ट्री करुन देणेसाठी रजिस्ट्री खर्च रु.१,२७,२५०/- इतका येतो.

रजिस्ट्री शिवाय सदर जमीन महानगरपालिकेचे हक्कात नोंदणीसाठी अडचण येते. शिवाय आतापर्यंत अशा जमिनी घेतल्या त्यासाठी जमिन मालक व महानगरपालिका यांनी प्रतयेकी ५०% खर्च केला आहे.

सदर प्रकरणी जागा ताब्यात घेण्यांसबंधीच्या करार अभावी स्टॅम्प पेपर ॲक्ट सेक्शन ३० (ब) नुसार स्टॅम्प साठी लागणारा एकूण खर्च हा महानगरपालिकेस करावा लागेल असा विधी सल्लागार यांनी अभिप्राय दिला आहे.

करिता सदर जमीन रजिस्ट्री करुन घेणेसाठी रक्कम रु.१,२७,२५०/- चे खर्चास मान्यता मिळणेस सदरचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.गजानन बारवाल :** सदरील प्रस्तावाबाबत किती खर्च केलेला आहे. याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार जमीन संपादानाची (प्रॉपर्टी मालमत्ता) जास्त मोठी असल्याने जादा खर्च अपेक्षित आहे, असे दिसून येते.

**सहा.संचालक, नगररचना :** यासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालयातील रजिस्टेशन विभागामध्ये रजिस्ट्री करणे आवश्यक असून त्या नुसार पुढील कार्यवाही करता येणे शक्य आहे. कारण या ठिकाणची जमीन संपादनासाठी जादा खर्च येणार असल्याने सदरची कार्यवाही आवश्यक आहे.

**मा.सभापती :** जमीन संपादनासाठी रक्कम देणे बाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करता येणे शक्य आहे काय? याची माहिती द्यावी. परंतू शहरामध्ये आता अशा कामासाठी रजिस्ट्री करणे आवश्यक असल्याची चर्चा आहे. करिता सदरील प्रस्ताव मंजूरीस्तव मांडण्यांत आलेला आहे.

**श्री.गजानन बारवाल :** शहरातील बऱ्याच भागामध्ये अशा प्रकारे जमीनीच्या प्रॉपर्टीसाठी खर्च करण्यांत आलेला आहे. मग त्यांचे साठी काय करणार?

**श्री.केशव सोनवणे :** सदरील प्रस्ताव जो मांडलेला आहे. याबाबत आपण संबंधित पैसा देवू शकतो काय याची माहिती द्यावी.

**सहा.संचालक, नगररचना :** सदरील प्रस्तावात विधी सल्लागार यांनी खुलासा केलेला आहे की, सदर प्रकरणी जागा ताब्यात घेण्या संबंधीच्या करारा अभावी स्टॅम्प पेपर ॲक्ट सेक्शन ३० (ब) नुसार स्टॅम्पसाठी लागणारा एकूण खर्च महानगरपालिकेस करावा लागेल. असा अभिप्राय आहे. त्यानुसार रजिस्ट्री करुन घेणेसाठी रु.१,२७,२५०/- चा खर्च येणार आहे.

**श्री.गजानन बारवाल :** सदरील खर्चाची माहिती देण्यांत यावी.

**मा.सभापती :** सदर प्रस्तावानुसार संपादित जमिनीस एकूण द्यावयाची रक्कम रु.१२,२२,२४०/- असून सदरची रजिस्ट्री करुन देणेसाठी रजिस्ट्री खर्च रु.१,२७,२५०/- इतका होतो. यामध्ये ८% स्टॅम्प पेपर खरेदीवर करावा लागतो. व ३% फी व इतर खर्च असा एकूण ११% खर्च येतो. हा खर्च महानगरपालिकेने करावा या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गणेश कॉलनी मजनूहील येथील नगरभूमापन क्र.११४३२ व ११४३६ पैकी ५१५६.५१ चौ.मी.जमीन संपादनाचा ठरावाच्या मंजूरीनुसार एकूण द्यावयाची रक्कम रु.१२,२२,२४०/- असून सदरच्या जमीनीची रजिस्ट्री करुन घेणेसाठी रजिस्ट्री खर्च रु.१,२७,२५०/- इतका येतो.

सदरील प्रस्तावानुसार जमीन रजिस्ट्री करण्यास लागणारा सर्व खर्च महानगरपालिकेने करावा असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र.१३२/२१ :**

वार्ड क्र.५१ रेल्वे स्टेशन ते (प्रिंट्राव्हल) महावीर चौक पर्यंत २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.२,८८,२००/- चे तयार करण्यांत आले असून सदर खर्च परिसर अभियांत्रिकी, बांधकाम, विभाग क्र.२, औरंगाबाद यांचेकडून वसुल केला जाणार असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेब यांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.३/५९४/९१, दि.३०.०६.९१ द्वारे दै.नवा मराठा व डॉन दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविले असता एकूण सात निविदा विकण्यांत आल्या होत्या. त्यापैकी केवळ तीनच निविदा प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मझरुल हक्क | - | ०.०३% कमी |
| २. | श्री.कैसर खान | - | ५% जास्त |
| ३. | श्री.एम.एम.बेग | - | ८% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३% कमी दराचे श्री.मझरुल हक्क यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५१ मो.रेल्वे स्टेशन ते (प्रिंट्राव्हल) महावीर चौक पर्यंत २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.लाईन टाकणे बाबत तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३% कमी दराचे गुत्तेदार श्री.मझरुल हक्क यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३३/२२ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९०-९१ वर्षा करिता सी.आय.स्लुस व्हॉल्ह खरेदी करण्याकरिता रु.६,१४,९६५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. परंतू त्यापैकी र.रु.१,००,०००/- चे स्लुस व्हॉल्व्ह खरेदी करण्याकरिता मा.आयुक्तांनी दि.०६.०६.९१ रोजी मंजूरी दिली आहे. त्यानुसार निविदा पत्रक क्र./मनपा/पापु/भांडार-११६४/९१, दि.२१.०६.९१ अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता एक निविदा विकली गेली व आखरी तारखेस म्हणजे दि.०५.०७.९१ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत एक निविदा प्राप्त झाली. निविदा श्री.बालाजी इंडस्ट्रीज यांची आहे. त्यांनी निविदेत दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | स्लुस व्हॉल्व्हचा आकार | एकूण नग | दिलेले दर | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | १०० मी.मी.व्यासाचे स्लुस व्हॉल्व्ह | ३५ नग | १९८० प्र.नग | ६९३००.०० |
| २ | १५० मी.मी.व्यासाचे स्लुस व्हॉल्व्ह | १० नग | ३१२५ प्र.नग | ११२५०.०० |
| ३ | २०० मी.मी.व्यासाचे स्लुस व्हॉल्व्ह | २ नग | ५४५० प्र.नग | १०९००.०० |
| ४ | २५० मी.मी.व्यासाचे स्लुस व्हॉल्व्ह | २ नग | ७७०० प्र.नग | १९४००.०० |
| | | | | **१,२६,८५०.००** |

अंदाजपत्रक हे सन १९८९-९० वर्षाच्या डी.एस.आर.प्रमाणे तयार करण्यांत आलेले आहे. वरील दर निविदेच्या दराप्रमाणे तुलना केली असता २७.८३% जास्त आहेत. परंतू १९९०-९१ वर्षाच्या दरसुची प्रमाणे तुलना केली असता सदरील कंपनीचे दर ०.०७% टक्के कमी दराचे येतात.

करिता रु.६,१४,९३५/- च्या अंदाजपत्रकास व श्री.बालाजी इंडस्ट्रीज यांच्या २७.८३% जास्त दराच्या निविदेस मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९०-९१ वर्षाकरिता सी.आय.स्लुस व्हॉल्व्ह खरेदी करणचे कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रुपये ६,१४,९३५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच स्लुस व्हॉल्व्ह खरेदी बाबत निविदा मागविल्या असता श्री.बालाजी इंडस्ट्रीज यांच एकमेव निविदा आखरी तारखेपर्यंत प्राप्त झालेली असून त्यांचे अंदाजपत्रकीय दर हे सन १९८९-९० चे वर्षाचे डी.एस.आर.प्रमाणे असून ते २७.८३% जास्त आहेत. परंतू सन १९९०-९१ वर्षाचे दरसुची प्रमाणे सदर कंपनीचे दर हे ०.०७% कमी असल्यामुळे श्री.बालाजी इंडस्ट्रीज यांचे २७.८२% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

याबरोबरच आजची सभा संपली असे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ०४.०९.१९९१ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समितीचा इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक ०४ सप्टेंबर, १९९१ रोजी मा.सभापती श्री.मो.इस्माईल अ.करीम यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ३.३५ वाजता स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

१. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
२. श्री.फैयाज खान अहमद खान
३. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री.जावेद हसन खॉंन कसीम हसन खॉंन
५. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
६. श्री.भगुरे तुळशीराम छगन
७. श्री.बारवाल गजानन रामकिसन
८. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
९. श्री.सोनवणे केशव काशिनाथ
१०. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र.१३४/१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये मा.आयुक्त यांना प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारात केलेल्या कामावर चर्चा करणे बाबत.

**संवाद :**

**श्री.केशव सोनवणे :** आजची सभा होणार किंवा नाही कारण आज महत्वाच्या विषयावर चर्चा होणार आहे. माजी आयुक्तांनी वापरलेल्या नियमाबद्दल चर्चा होणार आहे. त्यामुळे आजची बैठक ही फार महत्वाची आहे. आणि त्यामुळे मा.आयुक्तांनी आजच्या बैठकीस हजर राहावयास पाहिजे होते. परंतू या सभेस मा.आयुक्त, उपआयुक्त व अधिकारी वर्ग हजर नाहीत. मा.आयुक्तांना कलम ६७ (३) (सी) च्या आधारे काय अधिकार आहेत. तसेच शंका-कुशंकाचे निरसन करण्यासाठी मा.आयुक्तांनी हजर राहावयास पाहिजे होते.

**मा.सभापती :** अधिकारी सभेस उपस्थित नसले म्हणून काय झाले. जिम्मेदार व्यक्ती म्हणून सचिव हे उपस्थित आहेत. आणि आपण जे विचार मांडले ते योग्य आहेत.

**श्री.केशव सोनवणे :** कलम ६७ (३) (सी) आधारे मा.आयुक्त यांनी सिमेंटची जी खरेदी केली ती संचिका सभेस दाखविण्यांत यावी.

**श्री.एकबालसिंग गील :** होलीक्रॉस हायस्कुलचे जे गेट बांधण्यांत आले त्याबद्दल माजी आयुक्तांनी या कामाकरिता एवढी रक्कम खर्च करण्याचा अधिकार होता काय? याचा खुलासा व्हावा.

**श्री.प्रभाकर विधाते :** सेल टॅक्स कार्यालयाची भिंत बांधण्यांत आली ती ६७ (३) (सी) आधारे बांधण्यांत आली काय?

**अति.शहर अभियंता :** सेल टॅक्स कार्यालयाची भिंत बांधण्या बाबतचे रेग्युलर टेंडर आहे.

**श्री.केशव सोनवणे :** ६७ (अ) (सी) आधारे आयुक्तांनी जे सिमेंट मागविले त्याबाबतची संचिका दाखविण्यांत यावी.

**मा.सभापती :** विभागाच्या कामाच्या यादीप्रमाणे चर्चेस घेवू.

**श्री.एकबालसिंग गील :** होली क्रॉस शाळेचे जे गेट बांधण्यांत आले त्याबाबत या स्टेटमेंट मध्ये देण्यांत आले आहे काय?

**श्री.अलिम बेग :** जे काम केले त्यांचे टेंडर मागविण्यांत आले होते काय?

**श्री.केशव सोनवणे :** त्यांचे टेंडर दाखवू शकता काय?

**मा.सभापती :** आजच्या सभेत सर्व स.नगरसेवक हजर आहेत पण अधिकारी वर्गांना या सभेबद्दल पत्र देवूनही ते हजर नाहीत याचे कारण दाखवावे. संबंधित अधिकाऱ्यांस या सभेचे काहीच महत्व नाही असे वाटते.

**मा.सचिव :** इटखेडा येथील पुलाची दुरुस्ती बाबतचा (ठराव वाचून दाखवला)

**श्री.केशव सोनवणे :** काम करुन किती कालावधी झाला?

**अति.शहर अभियंता :** गेल्या वर्षीच काम केले आहे. त्यानंतर मायनर रिपेअरिंगचे काम एका महिन्यापुर्वी करण्यांत आले आहे.

**मा.सभापती :** पण सदर काम पुर्वीच पुर्ण का करण्यांत आले नाही. या कामाचा पेमेंट करण्यांत आला काय?

**अति.शहर अभियंता :** पेमेंट करण्यांत आला आहे. आणि आता जे काम करण्यांत आले ते मायनर स्वरुपाचे असून त्या कामाचा खर्च रु.३,०००/- पर्यंत आहे.

**मा.सभापती :** मी स्वतः त्या ठिकाणी जाऊन आलो आजही काय चालु आहे.

**अति.शहर अभियंता :** हे इटखेड्याचे काम नाही. आपण जे म्हणता ते दुसरे काम आहे.

**श्री.प्रभाकर विधाते :** दिड वर्षापुर्वीच काम झाले आहे. मग इतक्या लवकर रिपेअरींगचे कामाची गरज कशी काय पडली.

**मा.सभापती :** रिपेअरींगची गरज का पडली?

**अति.शहर अभियंता :** सात-आठ वर्षाचा पुल आहे. त्या ठिकाणी रिपेअरींग तर कारावीच लागणार.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** आमची अशी मागणी आहे की, यादीत जेवढे काम दाखविण्यांत आले आहेत. त्या कामाबद्दल सर्व स.सभादांनी व संबंधित अधिकाऱ्यांनी कामाची पाहणी केली पाहिजे. या यादीमध्ये लाईट विभागाच्या कामाची यादी नाही. लाईट यादीपण दिली पाहिजे.

**मा.सभापती :** जी कामे रु.२५,०००/- चे वरची आहेत. व ज्या कामांची परवानगी किंवा माहिती स्थायी समितीला दिलेली नाही. अशी प्रकरणे स.सदस्यांनी सभेच्या निदर्शनास आणावी.

**अति.शहर अभियंता :** रुपये २५,०००/- पर्यंतच्या कामांना मंजूरी देण्यांचे मा.आयुक्तांना अधिकार आहेत.

**श्री.केशव सोनवणे :** जरी अधिकार असले तरी सदर कामे सभागृहापुढे यावयास पाहिजे.

**मा.सभापती :** आयुक्तांना रु.२५,०००/- चे पॉवर असले तरी त्यांनी अशी कामे सभागृहापुढे का पाठविली नाही.

**मा.सचिव :** रेल्वेस्टेशन हॉलीडे कॅम्प ....१०० फुटी डी.पी.रोड ...... प्रस्ताव वाचून दाखवला.

**मा.सभापती :** संचिका आहे काय? हे प्रकरण कमेटीमध्ये केव्हा आले होते. याबद्दल खुलासा करावा.

**निवासी उपअभियंता :** दि.१४.०२.९१ ला हे प्रकरण समितीपुढे ठेवण्यांत आले होते.

**मा.सभापती :** कमीशनरने या कामास मंजूरी दिली काय?

**श्री.केशव सोनवणे :** स्थायी समितीने या कामास स्थगिती दिल्यानंतर तुम्ही हे काम मंजूर करवून घेतले. स्थायी समिती विषय रिजेक्ट करित जाईल आणि आयुक्तांच्या अधिकारात मंजूर करुन घेत जा.

**मा.सभापती :** दिनांक १६.०३.९१ च्या स्थायी समिती मध्ये हा विषय स्थगित ठेवला होता. त्यानंतर २-३ मिटींग झाल्या. त्यावेळेस हा विषय स्थगित ठेवला होता. हा मुद्दा कुणी ठेवला होता की, काम करणे आवश्यक होते. तेव्हा एप्रिलमध्ये ३ मिटींग झाल्या. त्यावेळेस हा विषय स्थगित असल्याबाबत सभेपुढे मुद्दा उठवला काय? हे आपणास जरुरी वाटले नाही काय? आणि असे जर असेल तर ६७ (३) (सी) चा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**श्री.केशव सोनवणे :** ही बाब सदस्यांच्या नजरेस आणून द्यावयास पाहिजे. असे काही ठरले आहे काय? स्थायी समितीने स्थगित विषय स्थायी समितीपुढे न ठेवता ६७ (३) (सी) नुसार मंजूर करुन घेण्यांत यावे. मग स्थायी समिती कशासाठी ठेवली आहे.?

**मा.सभापती :** प्रशासनाकडे कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्याची तरतूद आहे काय?

**सहा.आयुक्त :** ज्यांच्याविरुध्द तक्रारी झालेल्या आहेत. त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यांत आलेल्या आहेत.

**श्री.प्रभाकर विधाते :** रुपये २,६८,६८०/- चे काम त्यांनी केले नाही. त्याला पेमेंन्ट दिला गेला काय?

**श्री.केशव सोनवणे :** स्थायी समितीला विषय स्थगित ठेवता येत नाही. असा नियम दाखवावा.

**मा.सभापती :** स्थायी समितीस तसा नियम आहे काय असल्यास तो दाखविण्यांत यावा.

**श्री.केशव सोनवणे :** स्थायी समितीला तसेच अधिकार आहे किंवा नाही याचा खुलासा अगोदर करण्यांत यावा.

**अति.शहर अभियंता :** स्थायी समितीला विषयास स्थगिती देता येते. स्थायी समितीला स्थगितीचा अधिकार नाही असे सांगितले शब्द मी मागे घेतो.

**श्री.केशव सोनवणे :** स्थगिती देता येते का नाही याचा खुलासा मागवा.

**मा.सभापती :** स्थायी समितीला स्थगिता देण्याचा अधिकार आहे किंवा नाही याबाबत लिगल ॲडवायझर यांच्याकडून खुलासा मागविण्यांत यावा. अंदाजपत्रक समितीसमोर कधी आले?

**मा.सचिव :** दिनांक १६.०३.९१ च्या स्थायी समितीसमोर सदर अंदाजपत्रक आले होते.

**मा.सभापती :** हे काम सात महिन्यानंतर दिले तेव्हा ते टाईम बार (Time barred) होण्याची शक्यता असते.

**श्री.केशव सोनवणे :** स.स.चे म्हणणे आहे की, स्थगित ठेवता येते किंवा नाही.

**श्री.अलिम बेग :** स्थायी समितीचा अर्थ काय होतो.

**श्री.केशव सोनवणे :** खुलासा येईपर्यंत आजची बैठक तहकुब करा.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** स्थगितीचे पॉवर कुणाचे आहे. याचा खुलासा करा.

**श्री.अलिम बेग :** कामाची पाहणी करणे म्हणजेच स्थगिती होते आणि पाहणी केल्यानंतर त्यास मंजूरी देण्यांत येते.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** स्थायी समितीस चर्चेचे अधिकार नाहीत. स्थगितीचे अधिकार नाहीत. मग काय अधिकार आहेत याचा कायदेशीर खुलासा करण्यांत यावा.

**अति.शहर अभियंता :** बी.एम.सी.ॲक्ट (६५) (९) प्रमाणे प्रस्ताव स्थगित ठेवू शकतो. त्यामुळे मी माझे शब्द परत घेतो.

**श्री.इकबालसिंग गील :** तीन महिने झाल्यानंतर त्या गुत्तेदाराने काम करण्यांस इन्कार केला असे लिहिले आहे.

**श्री.अलिम बेग :** गुत्तेदाराने काम केले नाही तर त्यास काही शिक्षा करण्याचे अधिकार आहेत काय?

**मा.सभापती :** आयुक्तांना शिक्षा करण्याचे अधिकार आहेत काय? त्यावर काय कार्यवाही करणार ते अगोदर ठरवा कुठले काम आवश्यक आहे. कुठले काम आवश्यक नाही याचा काहीही विचार न करता कामास ६७ (३) (सी) च्या आधारे मंजूर करणे हे बरोबर दिसत नाही.

**श्री.अलिम बेग :** आम्ही माहिती सांगितल्यानंतर हे प्रकरण सभेत सादर करण्यांत आले आहे.

**मा.सभापती :** रेल्वे स्टेशन येथील रस्त्याचे काम करण्यांत आले ते काम तातडीचे नव्हते सदर कामाची माहिती स्थायी समितीला न देताच काम ६७ (३) (सी) आधारे मंजूर करुन घेतले. सदरील प्रकरणी तेथील रहिवाशांना बोलावून सल्ला मसलत (Negotiation) करण्यांत आले किंवा नाही. जे काम तातडीचे स्वरुपाचे असते उदा.पाणी पुरवठा, ड्रेनेज व औषधी किंवा नागरिकांच्या जिवनाकरिता हानीकारक असते त्याप्रकरणातच संरक्षणाच्या दृष्टीने कलम ६७ (३) (सी) आधारे ती कामे मंजूर करुन घ्यावीत. सर्वसाधारण स्वरुपाच्या कामात या कलमाचा उपयोग करता येत नाही. आणि जी कामे २५,०००/- च्या कमी रकमेची आहेत. ती या कलमा आधारे मंजूर करु शकत नाही. दि.१६.०९.९१ ला हे काम पास केले तोड फोड झाल्यानंतर तेथील लोकांची यादी तयार केली होती का?

**श्री.अलीम बेग :** जी कामे ६७ (३) (सी) मध्ये बसत नाही अशा कामाची माहिती गव्हर्नमेंन्टला पाठवावी.

**मा.सभापती :** २५,०००/- ची जी कामे आहेत. त्याची माहिती पाठविण्याची गरज नाही.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** स्थायी समितीला माहिती न देता मा.आयुक्त यांनी २५ हजारांच्या वरील अनेक कामे केली त्याची यादी शासनाला पाठवावी अशी आमची मागणी आहे.

**मा.सभापती :** विषय १ व २ याची माहिती पाठविण्यांत येऊ नये विषय क्र.३ पाठविणे मकबरा येथील कामास मंजूरी दिलेली आहे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** पैठण गेट येथे किती संडास अस्तित्वात आहेत.

**अति.शहर अभियंता :** सध्या दोन संडास आहेत.

**श्री.केशव सोनवणे :** रुपये ३४,६४,२००/- चे सिमेंट खरेदी करण्यांत आले. त्यामध्ये असे निदर्शनास येते की, ही करण्यांत आलेली खरेदी एका-एका महिन्याच्या कालावधीने करण्यांत आली. त्यावेळेस स्थायी समिती नव्हती. या काही हेतूपुरस्सर स्थायी नसतांना हे काम केले. यामागचा उद्देश काय? निविदापत्रक मागविण्यांत आले होते काय?

**अति.शहर अभियंता :** टेंडर मागविण्यांत आले होते.

**श्री.केशव सोनवणे :** टेंडरला लाखाच्या वर मान्यता देण्यांत येते काय?

**मा.सभापती :** टेंडर कितीचे मागविण्यांत आले होते. आठ (८) लाखांची मंजूरी देण्यांचे अधिकार सर्वसाधारण सभेला आहे.

**श्री.केशव सोनवणे :** टेंडरची ऑर्डर कुणी दिली याचा खुलासा व्हावा.

**अति.शहर अभियंता :** टेंडर मागविण्याचा अधिकार आयुक्तांना आहे.

**श्री.केशव सोनवणे :** तीन (३) लाखांचे सिमेंट आणतांना तेवढा खर्चास स्थायी समितीची मंजूरी (मान्यता) दिल्यानंतरच टेंडर मागवावयास पाहिजे होते.

**मा.सभापती :** एवढा मोठ्या क्वॉलिटीचे टेंडर कमिटी समोर ठेवले नाही. आयुक्तांना ६७ (३) (सी) आधारे रेट फायनल करण्याचे पॉवर आहे काय? रेटची मान्यता क्वॉन्टीटीची मान्यता घेण्यांची गरज नाही काय?

**श्री.अलिम बेग :** टेंडर स्थायी समितीसमोर आले होते काय?

**मा.सभापती :** फायनल ॲथॉरिटी ही स्थायी समितीच आहे. क्वॉन्टीटी (Rate) भाव यास मान्यता घेणार की नाही दराबाबत अंतिम निर्णयाकरिता स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे.

**मा.सभापती :** कंपनीवाल्यांशी निगोशिएशन केले होते काय? सरकारी कंपनी देखील निगोशिएशन करते. सिमेंट खरेदी करतांना कंपनी कडून दराचा चार्ट मागविण्यांत आला किंवा नाही. प्रत्येक कंपनीमध्ये शासनाला सिमेंट विकणे बाबत दराचा चार्ट असतो. सिमेंट खरेदी करण्यापुर्वी चार्ट मागविण्यांत आला का नाही.

**श्री.केशव सोनवणे :** दिनांक २८.०८.९१ रोजी सिमेंटची जी खरेदी केली त्याबाबत कंपनीच्या दराप्रमाणे पेमेंट मंजूर करण्यांत यावा. व बाकीच्या रकमेची जबाबदारी संबंधित आयुक्तांवर टाकण्यांत यावी.

**मा.सभापती :** सिमेंट खरेदी करतांना कंपनीच्या शासनाला पुरविण्याच्या सिमेंटच्या दराप्रमाणे फार फरक पडतो. त्यांनी दर कमी केले नाही तर आपण दुसऱ्या कंपनी कडून सिमेंट घेवू शकतो.

**श्री.प्रभाकर विधाते :** एक-एक महिन्याचे कालावधीने सिमेंट मागण्यांत आले आहे.

**श्री.अलीम बेग :** हे प्रकरण स्थायी समिती समोर आणावयास पाहिजे होते. त्यांनी हे स्थायी समिती समोर आणले नाही. ते हे मानावयास तयार आहे.

**मा.सभापती :** नियमाआधारे हे बरोबर नाही. रेट व क्वॉन्टीटीसाठी सदर प्रकरणी स्थायी समितीसमोर आणावयास पाहिजे होते. मा.आयुक्तानी मर्यादेबाहेर जाणून आपल्या अधिकारांचा वापर केलेला आहे.

**श्री.अलीम बेग :** याचा काही ऑडीट आहे काय?

**मा.सभापती :** गव्हर्नमेंट ऑडीट आहे. पण त्याच्या आधी स्थायी समिती समोर हे प्रकरण आणू नये असे आहे काय? यास मंजूरी देणे आवश्यक आहे.

**श्री.केशव सोनवणे :** हे प्रकरण मोठे असल्याकारणाने ते सर्वसाधारण सभेला पाठविण्यांत यावे.

**मा.सभापती :** सिमेंट प्रकरण दुसऱ्या विषयासह पुढील सर्वसाधारण सभेला पाठविण्यांत यावे.

**मा.सभापती :** मुजीब कॉलनी येथे रुपये १६,५६८.०० चे काम विषय नागश्वरवाडी येथे रु.१५,६७०.०० चे काम विषय उमाजी कॉलनी येथे २७,३०८.०० चे काम करण्यांत आले.

**श्री.केशव सोनवणे :** उमाजी कॉलनी येथील विहीर बंद करण्याचे मागील सभेत स्थगिती देण्यांत आली होती.

**मा.सभापती :** विहीर बुजविण्यांच्या कामासाठी एवढा खर्च कसा आला?

**उप अभियंता, पाणी पुरवठा :** त्यामध्ये मुरुम टाकण्यांत आल्या कारणाने त्याचे एवढे अंदाजपत्रक झाले.

**मा.सभापती :** हे काम एवढे महत्वाचे होते काय? लोकांच्या एवढ्या तक्रारी आहेत ते काम करण्यांत येत नाही. एवढा खर्च करण्यापेक्षा विहीरीच्या बाजूने ५ फुटाचे मुंडेर बांधायचे होते.

**श्री.केशव सोनवणे :** माझ्या माहितीप्रमाणे प्रकरण स्थायी समितीसमोर आले होते. परंतू स्थगितीचा प्रकार आहे असे वाटते.

**उप अभियंता, पाणी पुरवठा :** या बाबतची तेथील लोकांचा तक्रार अर्ज आहे. जमीन सपाटी बरोबर ही विहरी असल्याकारणाने ती धोकादायक होती.

**मा.सभापती :** इतर ठिकाणीही विहीर आहे. मो.घाटी झोपडपट्टी, पंचकुवा कब्रस्तान येथील विहीरी उमाजी कॉलनीच्या विहीरीपेक्षाही जास्त धोकादायक असूनही सदर ठिकाणी अद्याप आपण काहीच कार्यवाही केलेली नाही. परंतू उमाजी कॉलनी येथील प्रकरणी स्थगित असूनही त्या ठिकाणी काम करुन घेतले. मोहल्ला निजामगंज येथील काम इतके महत्वाचे आहे. ते काम ६७ (३) (सी) आधारे करुन घेता येत नाही. आणि इतर कामे मात्र करुन घेता तेथील लोकांच्या घरासमोर घाण पाणी वाहते. २४ घंटे त्या लोकांना त्याचा त्रास होतो. त्या ठिकाणी कुणीही थांबू शकत नाही.

**श्री.प्रभाकर विधाते :** माझ्या वार्डातील विहीर बुजविण्याबाबत अद्याप कार्यवाही केलेली नाही.

**मा.सभापती :** विहीर बुजविण्याबाबत माझा विरोध नाही. पण त्यावर जास्त खर्च करण्यात आलेला आहे. सदरील विहीर मुरुम ऐवजी कचरा टाकून का भरण्यांत आली नाही.

**श्री.केशव सोनवणे :** चिकलठाणा येथील बावडी बुचवितांना मा.आयुक्तांनी कचरा गाड्या टाकून ती बुजविण्यास सांगण्यात आले होते. त्यांचवेळेस हे का सांगण्यात आले नाही.

**मा.सभापती :** समर्थनगर पोलिस क्वॉर्टरमध्ये रु.६२,५८९/- ची नाली बांधण्याचे काम करण्यांत आले.

**श्री.अलीम बेग :** नाली बांधण्याचे काम काय एवढे महत्वाचे होते.

**उप अभियंता :** त्या ठिकाणी पाणी वाहात होतो आणि त्याबाबत पेपरमध्येही सारखी दोन-तीन दिवस बातमी आली होती.

**मा.सभापती :** स्थायी समितीतील जेव्हा ९ सं.सदस्य जनतेच्या अडीअडचणी लक्षात घेऊन महत्वाची कामे अधिकाऱ्यास करावयास सांगतात ती कामे होत नाहीत. पण जी कामे महत्वाच्या स्वरुपाची नाहीत. त्यांना अधिकाराचा दुरुपयोग करुन कलम ६७ (३) (सी) आधारे करण्यांत येते.

**श्री.अलीम बेग :** या विषयास स्थायी समिती मंजूरी देत नव्हती काय?

**मा.सभापती :** आपणास हवी ती ६७ (३) (सी) अंतर्गत काम करुन घेता. आम्ही कामे सांगितली म्हणजे आम्हाला आयुक्तांची अडचण दाखवता. पुर्ण समिती एका बाजुला राहते. व आपण ६७ (३) (सी) आधारे हवी ती कामे करुन घेता. आम्हालाही वाटते की काही कामे नागरिकांच्या फायद्याची असतात ती कामे

लवकर व्हावी. परंतू तसे होत नाही. लोकांनी तक्रारी केल्यानंतरही लोकांची कामे होत नाहीत.

**श्री.फय्याजखान :** हरी मस्जिद जवळील काम अर्जंट करणे बाबत संबंधितास सांगण्यात यावे.

**श्री.अलीम बेग :** निजामगंज येथील ड्रेनजचे पाणी सारखे वाहात आहे. ते काम तातडीने करावयास सांगणे.

**मा.सभापती :** सदरील प्रकरणे आपण विषय पत्रिकेमध्ये घेतले आहे किंवा नाही. याबद्दल मला लेखी उत्तर देण्यांत यावे.

**श्री.प्रभाकर विधाते :** पहाडसिंगपुरा येथे ६/७ वर्षापासून ड्रेनेज लाईन नाही किंवा सेप्टीक टँक नाही. याबाबतीत मी १०-१२ वेळापत्र दिले परंतू अद्याप काहीच कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

**मा.सभापती :** मोंढा रोड येथे पाणी वाहाने सारखे चालुच आहे. पाणी थांबणे हे महत्वाचे आहे. त्या ठिकाणी ६७ (३) (सी) आधारे तातडीने काम करुन घेणे आवश्यक होते. परंतू अद्यापपर्यंत ते काम झाले नाही.

**श्री.नारायण फत्तलेष्कर :** एस.बी.कॉलनीमध्ये काम झाले काय याची माहिती द्यावी.

**श्री.केशव सोनवणे :** ज्याची माहिती दिलेली आहे ते चर्चा करण्यांस आले नाही.

**मा.सभापती :** हे काम कमेटीसमोर ठेवले होते काय. ठेवले तर ते कोणत्या कमेटीसमोर ठेवले.

**मा.सभापती :** २५,०००/- आत असलेली जी कामे मा.आयुक्तांनी (माजी) आपल्या अधिकारात करुन घेतली त्याबाबत आमचे काही दुमत नाही ते आम्हास मान्य आहे. पण २५ हजाराच्या वरील कामास त्यांनी स्थायी समितीची मंजूरी घेतली नाही. या बद्दल आम्हासी तक्रार आहे. त्यांनी अशा कामाची माहिती स्थायी समितीला देणे आवश्यक होते.

**श्री.गजानन बारवाल :** यावर जी चर्चा झालेली आहे. त्यास आम्ही बंधनकारक आहे का नाही.

**मा.सभापती :** मा.आयुक्तांना टेंडर मागविण्याचा अधिकार आहे. पण टेंडर फायनल करुन काम करुन घेता येत नाही. आम्ही ६७ (३) (सी) अधिकाराबाबतची स्पेशल मिटींग बोलावली होती. पाहणी केल्यानंतर असे समोरल आले. १. रेल्वेस्टेशन हॉलीडेकॅम्प १०० फुट डी.पी.रोड जे २,६८,६३५/- चे काम आहे. रेल्वे स्टेशन भाजी मार्केटचे काम ही कामे जी अर्धवट स्थगित आहेत ती कामे पूर्ण करुन घेण्यात यावीत.

**ठराव :**

आम्ही ६७ (३) (क) अधिकाराबाबतची विशेष सभा बोलाविली होती. त्या बैठकीमध्ये एकूण २२ विषयांची यादी देण्यांत आली होती. त्यावर चर्चा करण्यात आली होती. त्यावर चर्चा करण्यांत आली. चर्चे अंती असे स्पष्ट झाले की, १) रेल्वे स्टेशन हॉलीडेकॅम्प १०० फुट डी.पी.रोड जे काम रु.२,६८,६३५/- चे आहे. २) रेल्वे स्टेशन भाजी मार्केटचे काम व ३) सिमेंट खरेदी रक्कम रु.३४,६४,२००/- हे तीन कामे तातडीने करावयाचे नव्हते. आणि एवढ्या मोठ्या रकमेस स्थायी समिती अथवा सर्वसाधारण सभेची मंजूरी न घेता ही कामे ६७ (३) (क) कलमाच्या आधारे मा.आयुक्तांनी करवून घेतली ते आपल्या अधिकाराच्या विरुध्द आहे. याची माहिती शासनाला पाठविण्यांत यावी.

याबरोबरच आजची सभा संपली असे मा.सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १०.०९.१९९१ रोजी संपन्न झालेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्त.**

**मंगळवार दिनांक १० सप्टेंबर, १९९१ रोजी मा.सभापती श्री.मो.इस्माईल अ.करीम यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ३.०० वाजता स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

१. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
२. श्री.फैयाज खान अहमद खान
३. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री.जावेद हसन खाँन कसीम हसन खाँन
५. श्री.पालीवाल विजय गोविंदलाल
६. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
७. श्री.भगुरे तुळशीराम छगन
८. श्री.बारवाल गजानन रामकिसन
९. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
१०. श्री.सोनवणे केशव काशिनाथ
११. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र.१३५/१ :**

दिनांक ३०.०८.९१ च्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.अलीम बेग :** आजच्या सभेस विषयपत्रिकेसोबत विशेष स्थायी समितीचे इतिवृत्त मिळाले नाही. निजामगंज येथील ड्रेनेज लाईन चोकअप झाली असून घाण पाणी रस्त्यावर वाहात आहे. या भागातील कामाचे अंदाजपत्रकास मंजूरीही मिळाली आहे. पण काम सुरु करण्यांस मात्र विलंब होत आहे.

**मा.कार्यकारी अभियंता :** कामाची तातडी लक्षात घेता निजामगंज येथील ड्रेनेज कामासाठी लघुनिविदा मागविण्यांत येतील.

**श्री.केशव सोनवणे :** वॉर्ड क्र.३४ येथील ड्रेनेज कामासाठी रक्कम रु.६६,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळाली असून या कामासाठी आतापर्यंत चारवेळा निविदापत्रके मागविण्यांत आली आहेत. तरीही या कामाचे टेंडर अद्याप समितीसमोर मंजूरीस आलेले नाही. यासाठी वारंवार संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेण्यांत आली ओह. तेव्हा वार्ड क्र.३४ च्या ड्रेनेज कामासाठी आणखी किती किती वेळा टेंडर रिकॉल करणार. याचा खुलासा व्हावा.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** बायजीपुरा येथे मनपाने बांधलेल्या कर्मचारी निवासातील बरेच गाळे रिकामे आहेत. त्या बाबत खुलासा व्हावा. तसेच नगरसेवकांनी स्वेच्छा निधीतून काम करण्याबाबत दाखल झालेल्या प्रकरणात वरीष्ठ अधिकारी शेरा मारल्या मुळे नगरसेवकांचे वार्डातील कामास विलंब होत आहेत. याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** बायजीपुरा येथील मनपा निवासस्थानाबाबत मालमत्ता अधिकारी यांनी पुढील सभेत खुलासा करावा.

**मा.उपआयुक्त :** नगरसेवकांच्या स्वेच्छा निधी प्रमाणेच आमदार महोदयांनाही त्यांचे मतदार संघात आवश्यक कामे हाती घेण्यासाठी आमदार निधी असतो. आमदार निधीतील रक्कम खर्च करण्यासाठी गाईड लाईन ठरवून देण्यांत आल्या आहेत. त्याचप्रमाणे नगरसेवक स्वेच्छा निधीचे खर्चाबाबतही गाईड लाईन निश्चित असणे आवश्यक वाटते. नगरसेवक स्वेच्छा निधीतून वार्डाची कामे हाती घेण्यांबाबत अनेक प्रकरणे प्रशासनाकडे दाखल झाली आहेत. त्यापैकी काही प्रकरणात नगरसेवकांचे स्वेच्छा निधीतून खाजगी संस्थेच्या कामासाठी खर्च करण्याच्या सूचना आल्या आहेत. ही बाब लक्षात घेता नगरसेवक स्वेच्छा निधीचे खर्चाबाबत गाईडलाईन ठरविणे आवश्यक वाटते.

**श्री.अलीम बेग :** वरील बाब ही पॉलीशी मॅटरची वाटते. तेव्हा सर्वसाधारण सभेत विषय ठेवून त्यावर निर्णय घेणे योग्य होईल.

**श्री.गजानन बारवाल :** स्वेच्छा निधी/नगरसेवक निधी यात फरक काय?

**मा.उपआयुक्त :** स्वेच्छा निधी/नगरसेवक निधी ही एकच बाब आहे. स्वेच्छा निधीतून हाती घेण्यांत येणाऱ्या कामास स्थायी समितीच्या मंजूरीची आवश्यकता नाही. या निधीतून नगरसेवकांनी सुचविलेली कामे हाती घेण्यांत येतात.

**श्री.केशव सोनवणे :** मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम (६६) अन्वये नगरसेवक स्वेच्छा निधीची रक्कम खर्च करणे योग्य होईल. ऑगस्ट १९९० मध्ये नगरसेवक स्वेच्छा निधीतून २०४ शालेय विद्यार्थ्यांचे गणवेशासाठी खर्च करण्यांची परवानगी मागितली असता गोदावरी गारमेंटस यांचेकडून कपडा खरेदी करण्याबाबत मा.आयुक्तांनी मंजूरी दिली. त्याप्रमाणे संबंधितांना आदेश दिला पण कापड मिळाले नाही.

**मा.सभापती :** १) गोदावरी गारमेंन्टस यांना कापड पुरविणे बाबतचा आदेश देऊनही संबधितांनी अद्याप कापड पुरवठा केला नाही. तेव्हा संबंधितांचा आदेश रद्द करावा आणि कापड पुरविणे बाबत कोटेशन घेण्यांत यावे. व त्वरीत शालेय विद्यार्थ्यांना गणवेश कापड देण्यांत यावे. २) वार्ड क्र. ( ) येथील ड्रेनेज कामाच्या संचिकेची माहिती देण्यांत आली. या कामासाठी आलेले दरपत्रक हे कोणत्या वर्षाचे डी.एस.आर.दराचे आहे. हा प्रश्न गुत्तेदाराचा आहे. दरपत्रकाचे दराप्रमाणे अंदाजपत्रकीय बाबीचे काम करुन घेणे हे मनपा अधिकाऱ्यांचे काम आहे. तेव्हा नियमाप्रमाणे १५ दिवसाचे आंत संबंधित गुत्तेदारास कामाचा आदेश देण्यांत यावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** मनपाच्या प्रकल्प विभागातील प्रोजेक्टर मशिनने गणेश उत्सवात चित्रपट दाखविण्यांत येतात. ते सध्या गणेश उत्सवात प्रोजेक्टर उपयोगी आहे काय?

**प्रकल्प अधिकारी :** प्रकल्प विभागाकडे असलेला प्रोजेक्टर मशिन हा युनिसेफकडून मनपाला मिळालेला आहे. ती मशिन गेल्या एक महिन्यापासून बंद स्थितीत आहे. पुर्वी या मशिनद्वारे गणेश उत्सवात चित्रपट दाखवले जात होते. त्याच पध्दतीने पुन्हा चित्रपट दाखवणे सुरु केले तर योग्य होणार नाही. यापुर्वीचा प्रोजेक्टर मशिन सध्या बंद स्थितीत आहे. युनिसेफ तर्फे मिळालेली मशिन ही येथे दुरुस्त होत नाही.

**श्री.केशव सोनवणे, श्री.प्रभाकर विधाते :** प्रोजेक्टर मशिनचे संदर्भात सभागृहाची दिशाभुल केली जात आहे. प्रोजेक्टर मशिन एक महिन्यापेक्षा जास्त काळापासून बंद आहे. तेव्हा प्रोजेक्टर मशिनबाबतचे रेकॉर्ड सभासगृहासमोर ठेवण्यांत यावे.

**श्री.अलिम बेग, श्री.गजानन बारवाल, श्री.तुळशीराम भगुरे :** गणेश उत्सव/इद मिलाद असे दोन धार्मिक सणांना सुरुवात झाली आहे. तरी पण त्यादृष्टीने वार्डात लावण्यासाठी सोडीयम दिले जात नाहीत. याबाबत सतत मागणी करत आलो आहोत.

**मा.सभापती :** सोडियम दिवे पुरवठा करण्याबाबत संबंधितांना ताबडतोब आदेश देण्यांत यावा.

**श्री.गजानन बारवाल :** मागील वर्षापासून सोडियम दिव्यांच्या पुरवठा करण्यांत यावा अशी मागणी करण्यांत येत आहे. यादीत २५ नगरसेवकांची नांवे आहेत.

**मा.उपआयुक्त :** मागील वर्षी सोडियम दिव्यांचा पुरवठा करणे संदर्भात दैनिक सकाळमध्ये तक्रार प्रसिध्द झाली. त्याप्रमाणे चौकशी केली असता सोडियम दिव्यांचे दरामध्ये रक्कम रु.१,०००/- चा परुक दिसून आला. यानंतर या संदर्भात स्थानिक वृत्तपत्रात पुन्हा तक्रार प्रसिध्द झाली. त्याबाबत पुन्हा चौकशीचे आदेश मिळाले आहेत. तेव्हा याबाबत १२/१३ सप्टेंबरला निर्णय घेण्यांत येईल.

**मा.सभापती :** सोडीयम व्हेपर दिवे पुरविणे बाबत तीन कोटेशन घेतले असता कोटेशन मध्ये रु.३,९००/- चा दर आला. आणि टेंडरमध्ये याबाबत रु.३,०००/- चा दर प्राप्त झाला आहे. याबाबीचा विचार केला असता प्रत्येक नगरसेवकाचे मागे मनपाचा प्रत्येकी रु.४,०००/- चा फायदा होईल. असे अतिरिक्त शहर अभियंता यांचेशी झालेल्या चर्चेच्या वेळी लक्षात आले. सोडीयम दिवे पुरविण्याबाबत तयार करण्यांत आलेल्या २५ नगरसेवकांचे यादी बाबत मागील सभेतच निर्णय घेण्यांत आला आहे. वृत्तपत्रात काहीही प्रसिध्द झाले तर त्याकडे लक्ष देणे योग्य होणार नाही. तेव्हा गणेश उत्सव आणि इद मिलाद या सणांचे महत्व लक्षता घेता रु.३,१००/- प्रमाणे सोडियम दिवे खरेदी करण्यांस हरकत नाही. याबाबत मा.उपआयुक्त यांनी मा.आयुक्त यांचेकडे सविस्तर खुलासा करावा. आणि नगरसेवकांना सोडीयम दिवे पुरविणे बाबतची व्यवस्था करावी.

**श्री.केशव सोनवणे :** प्रोजेक्टर मशिन बाबतचे रेकॉर्ड दाखल करण्याची सुचना करुन बराच वेळ झाला, तरी अद्याप रेकॉर्ड सभागृहासमोर ठेवण्यांत आले नाही. यावरुन प्रोजेक्टर मशिन ही एक महिन्यापेक्षा जास्त काळ पासून बंद असावी हे सिध्द होते.

**श्री.गजानन बारवाल :** दिनांक ३०.०८.९१ च्या सभेत खुलासा केल्याप्रमाणे साईट क्र.७२ च्या एक एकर दहा गुंठे जमिनीचा भाड्याबाबत आणि पुढील कार्यवाही बाबत खुलासा व्हावा.

**मा.उपआयुक्त :** साईट क्र.७२ ची जागा भाड्याने देणे बाबतच्या संचिकेची तपासणी केली असता सदर संचिका क्र.७८/१९८४ पासून मालमत्ता विभागाकडे आली आहे. संचिकेची मुळ सुरुवात नगर रचना विभागाकडून झालेली आहे. याबाबत खुलासा घेण्यांत यावा असा संबंधित संचिकेवर अहवाल देण्यांत आला आहे.

**श्री.केशव सोनवणे :** एखाद्या बाबी बाबत झालेला करार पाळणे हे उभय पक्षांवर बंधनकारक असते. त्याप्रमाणे साईट क्र.७२ साठी झालेल्या करारानुसार दोन्ही बाजूकडून कार्यवाही होणे आवश्यक होते. हीच बाब शालेय इमारतीचे बाबतीत आहे. अशीच परिस्थिती त्या ठिकाणी दिसून येते. इमारत ६ महिन्याचे लिजवर देण्याबाबत करार झाला. मात्र प्रत्यक्ष अजूनही सदर इमारत रिकामी करुन मिळाली नाही. तेव्हा अशा प्रकरणाबाबत पॉलिशी ठरविण्यांत यावी. साईट क्र.७२ बाबत ३ वर्षाचा करार झाल्यानंतर शासनाकडून पत्र आले असता खुलासा झाला तेव्हा ते पत्र काय आहे. याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** नगर परिषद काळात लोकप्रतिनिधीच्या वेळी (श्री.अलफखाँ यांचे काळात) ही जागा लिजवर देण्यांत आली आहे. तेव्हा प्रकरणाची चौकशी करण्यासाठी खालील स.सभासदांचा समावेश असलेली उपसमिती कायम करण्यांत यावी.

१) सर्व श्री.गजानन बारवाल ,
२) श्री.एकबालसिंग गील,
३) श्री.नारायण फत्तेलष्कर,
४) श्री.मो.इस्माईल अ.करीम
५) श्री.अलफ खाँ हुसेन खाँ

**श्री.एकबालसिंग गिल :** मागील सभेत ठराव क्र.११६-१२७-१२९ च्या कामांची पाहणी करण्याबाबत निर्णय घेण्यांत आला होता. तेव्हा त्याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** ठराव क्र.११६-११८-१२७-१२९ च्या पाहणी बाबत ठरल्याप्रमाणे सकाळी ११.०० वाजता पाहणीसाठी गेलो होतो. सार्वजनिक संडासाची परिस्थिती फार कठीण आहे. त्या ठिकाणी किडे तयार झाले आहेत. त्यामुळे सार्वजनिक संडासाचा नागरिकांना उपभोग घेता येत नाही. अर्थात सावे. संडासाचे सफाईसाठी स्वीपर नेमलेले आहेत. तरीही वरीलप्रमाणे परिस्थिती का निर्माण झाली हे कळत नाही. विभागीय अधिकारी यांनी स्विपर मार्फत सार्वजनिक संडासाची स्वच्छता करुन घ्यावी. तसेच ज्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था नाही. अशा ठिकाणी त्वरीत पाणी पुरवठा करणे बाबत कार्यकारी अभियंता यांनी व्यवस्था करावी यांना मंजूरी देण्यांत येते. विषय क्र.११८ रेल्वेस्टेशन येथील क्वॉर्टरची वाढीव काम करण्याची गरज नाही. करिता या विषयास नामंजूर करण्यात येते. फक्त क्लास २ चे जे एक अधिकारी तेथे राहतात त्यांना खुली जागेवर एक रुम अर्जंट बांधून देण्यांत यावी.

**ठराव :**

ठराव क्र.११६ व ११८ बाबत वरील दुरुस्तीसह दिनांक ३०.०८.९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३६/२ :**

विषय क्र.१३ आलमगीर कॉलनी येथे अस्तित्वात असलेली लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.१,३१,३००/- चे सन १९९०-९१ च्या दरसूचीनुसार तयार करण्यांत आलेले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. तसेच सदर काम प्राप्त शासकीय अनुदानातून करण्यास मंजूरी मिळाली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२/५४८/९१, दि.२९.०५.९१ ला दै.लोकधर्म व देवगिरी तरुण भारत या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरता देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एम.एम.बेग | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री.आर.एल.बारवाल | - | ६% जास्त |
| ३. | श्री.स.सिराजुद्दीन | - | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.एम.एम.बेग यांचे दराचे श्री.एम.एम.बेग यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१३ आलमगीर कॉलनी येथे अस्तित्वात असलेली लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता र.रु.१,३१,३००/- च्या अंदाजपत्रकास व सदर कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.एम.एम.बेग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३७/३ :**

वार्ड क्र.३९ रोकडीया हनुमान कॉलनी येथे अस्तित्वात असलेली लाईन काढून त्या ठिकाणी २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता र.रु.६९,५२०/- चे अंदाजपत्रक सन १९९०-९१ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यांत आले असून मा.आयुक्तांची मंजूरी मिळाली आहे. सदर काम प्राप्त शासकीय अनुदानातून करण्यांस मंजूरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२ अन्वये दैनिक लोकधर्म व देवगिरी तरुण भारत या स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.स.रफिकउद्दीन | - | ०.१५% कमी |
| २. | श्री.मो.इजाज | - | २% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१५% कमी दराचे श्री.स.रफिकउद्दीन यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३९ रोकडीया हनुमान कॉलनी येथे अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन काढून त्या ठिकाणी २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१५% कमी दराच्या श्री.स.रफिकउद्दीन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३८/४ :**

वार्ड क्र.५४ हमालवाडी येथील १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता

र.रु.४८,३००/- चे अंदाजपत्रक सन १९९०-९१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून प्राप्त सरकारी अनुदानातून सदर काम करणे बाबत मा.आयुक्तांनी मंजूर दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामाकरिता निविदा सूचना क्र.२ अन्वये दैनिक लोकधर्म व देवगिरी तरुण भारत या स्थानिक दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण फक्त एकच श्री.सय्यद सिराजोद्दीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची निविदा प्राप्त झाली.

मा.कार्यकारी अभियंता यांच्या आदेशावरुन संबंधितास दर कमी करण्याच्या अनुषंगाने वाटाघाटीसाठी बोलावले असता वाटाघाटी अंती २% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करणेस सम्मती दिलेली असून तसा त्यांनी लेखी खुलासा केलेला आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५४ मो.हमालवाडी येथील १५० मी.मी.व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेचे काम श्री.सय्यद सिराजोद्दीन यांनी लेखी दिल्याप्रमाणे त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३९/५ :**

वार्ड क्र.४९ मो.लिमयेवाडी येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.लाईन टाकणे बाबत रक्कम रुपये ५५,९१०/- चे सन १९९०-९१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून सदर काम भांडवली तरतूदीच्या १०% जास्त तरतूदीतून करणे बाबत मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामाकरिता दैनिक लोकधर्म व देवगिरी तरुण भारत या दैनिकास जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सुरेश बी.सदवानी | - | ५% जास्त |
| २. | श्री.एस.बी.शेळके | - | १% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री.एस.बी.शेळके यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४९ मो.लिमयेवाडी येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराच्या श्री.एस.बी.शेळके यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४०/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा येथील नदीवर पुलाचे बांधकाम करणेच्या कामासाठी सन १९८८-८९ च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने

रक्कम रु.१,१७,८००/- च्या अंदाजपत्रकास दि.२४.०४.९० च्या स्थायी समिती ठराव क्र.७३९ अन्वये मंजूरी मिळाल्यानंतर प्रगट निविदा मागविल्या असता एकूण सहा निविदा प्राप्त झाल्या होत्या. पैकी सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.७९% कमी दराचे श्री.पी.जे.तमखाने यांचे निविदेस दि.२३.०७.९० च्या स्थायी समिती ठराव क्र.९३ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुळ अंदाजपत्रक | - | १,१७,८००.०० |
| २. | रबर फिलींग करणेसाठी अतिरिक्त बाब रुपये | - | १०,३१८.०० |
| ३. | साईड विंग वॉल व रिटेअनिंग वॉलचे बांधकामा साठी रक्कम रुपये | - | ६२,७९९.०० |
| | एकूण रुपये | - | १,९०,९१७.०० |

दिनांक ७, ८ व ९ रोजी फार जोराचा पाऊस झाला. नदीस मोठा पूर आल्यामुळे पुलाच्या दोन्ही बाजूकडील माती वाहून गेली व तेथे मोठे भगदाड पडले. पुलास पकड येणेसाठी नदीच्या थडीपर्यंत साईट विंग वॉल व रिटेअनिंग वॉलचे बांधकाम करणे जरुरी असून नदीस पावसाचा जोर जास्त असल्यामुळे वरील बाबी करणे अत्यंत जरुरी आहे. तरी बी-१ निविदेतील क्लॉज क्र.३८ प्रमाणे वाढीव बाबी हया अंदाजपत्रकाचे दराप्रमाणे पुर्वीचेच ठेकेदार श्री.पी.जे.तमखाने यांचेकडून करुन घेणेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सदर प्रकरणी पाहणी करण्यांत यावी, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१४१/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नारेगांव ते ट्रेचिंग ग्राऊंड या रस्त्यावरील पुलाची दुरुस्ती करणेच्या कामासाठी सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.८०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास दि.०६.०८.९१ ला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम हे प्रथम प्राधान्य म्हणून मे.एस.एच.असोशिएट्स कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून करुन घेण्यांत येत आहे. कारण अतिवृष्टीमुळे पुलाचा बराचसा भाग खचून गेलेला आहे. त्यामुळे रहदारीस फार अडथळा होत असून रस्ता मोठा प्रमाणात खराब झालेला असल्यामुळे तेथे भरती करुन पुलाचे बांधकाम करणे अत्यंत जरुरीचे आहे. पुल ना दुरुस्त असल्याकारणाने वाहतुक बंद होण्याच्या मार्गावर होती म्हणून पुलाची दुरुस्ती करणे जरुरीचे आहे.

करिता र.रु.८०,०००/- चे अंदाजपत्रकास व काम अत्यंत तातडीने करुन घ्यावयाचे असल्यामुळे मे.एस.एच.असोशिएटस कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेणेस्तव कार्योत्तर मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव ते ट्रेचिंग ग्राऊंड या रस्त्यावरील पुलाची दुरुस्ती करण्याचे कामासाठी र.रु.८०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. व

कामाची तातडी लक्षात घेता सदर काम मे.एस.एच.असोशिएट्स कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेणेस्तव कार्योत्तर सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४२/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, वार्ड क्र.१५ काचीवाडा, माळीवाडा, भागात खांडकी पेव्हींग करणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.११.०७.९० ठराव क्र.४९ नुसार अंदाजपत्रक र.रु.१,३६,७००/- ला सर्वानुमते मंजूरी मिळाली आहे.

सदर कामासाठी दि.१०.०५.९१ रोजी निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सय्यद सिराजुद्दीन | - | ०.०५% कमी |
| २. | श्री.सय्यद अथर अली | - | ५% जास्त |
| ३. | श्री.एम.एम.बेग | - | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.स.सिराजुद्दीन यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१५ काचीवाडा, माळीवाडा, भागात खांडकी पेव्हींग करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.सय्यद सिराजुद्दीन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. अतिरिक्त शहर अभियंता यांनी कामावर खास देखरेख करुन नियमाप्रमाणे काम करुन घ्यावे.

**विषय क्र.१४३/९ :**

उप अभियंता शासकीय विशेष कार्यक्रम जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला की, कांचनवाडी येथील ऑक्सीडेशन पॉलमध्ये जमा केलेले पाईप उचलणे सुलभ घेणेसाठी रॅम बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.३०,६१८/- चे तयार केले असून त्यास मा.आयुक्तांनी दिनांक २१.०१.९१ रोजी मंजूरी दिली आहे.

सदर कामासाठी अ-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.नंदकुमार परदेशी | - | ०.०१% कमी |
| २. | श्री.शैलेश कन्स्ट्रक्शन | - | ७.७७% जास्त |
| ३. | श्री.ए.एम.फारुकी | - | १०.०१% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री.नंदकुमार परदेशी यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कांचनवाडी येथील ऑक्सीडेशन पॉण्डमध्ये जमा केलेले पाईप उचलणे सुलभ होणेसाठी रॅम बांधण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री.नंदकुमार परदेशी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४४/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, वार्ड क्र.२० व वार्ड क्र.२४ उदय कॉलनी, कोतवालपूरा, पारधीपुरा भागातील रस्त्यावर २० मी.मी.जाडीचे मिक्स सिलि सरफेसिंग करणेच्या कामासाठी र.रु.२,२६,७४०/- च्या अंदाजपत्रकास दि.१२.०४.९० रोजी स्थायी समिती ठराव क्र.७३ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदर कामासाठी तिसऱ्यांदा कार्यालयीन निविदा क्र.३ अन्वये निविदा मागविल्या असता मे.रे.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरपेक्षा १८% जास्त दराची केवळ एकच निविदा प्राप्त झाली.

परंतू सन १९९०-९१ च्या सा.बां.खात्याच्या नवीन दराने तुलना केली असता सदरील दर ०.१४३% कमी येतो. करिता १८% जास्त दराची निविदा मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२० व वार्ड क्र.२४ उदय कॉलनी, कोतवालपुरा, पारधीपुरा भागातील रस्त्यावर २० मी.मी.जाडीचे मिक्स सिल सरफेसिंग करणेच्या कामासाठी प्राप्त झालेली मे.रे.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४५/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र.२६ वसंतभुवन विभागीय कार्यालय (झोन क्र.२) इमारतीची खास दुरुस्ती करणेच्या कामासाठी स्थापत्य समिती सभा दि.३०.०८.९० ठराव क्र.६३ अन्वये र.रु.९३,२१०/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळालेली आहे.

सदरील काम हाती घेण्यासाठी फेरनिविदा दि.०३.०७.९१ अन्वये मागविण्यांत आल्या असता एकूण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सय्यद सिराजुद्दीन | - | १५% जास्त |
| २. | श्री.अताऊल्लाह खान | - | ६% कमी |
| ३. | श्री.राहीदास बारवाल | - | ४.९९% कमी |
| ४. | श्री.जावेद अहेमद खान | - | १९% जास्त |
| ५. | श्री.विशाल कन्स्ट्रक्शन | - | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६% कमी दराची श्री.अताऊल्लाह खान यांची निविदा मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२६ वसंतभुवन विभागीय कार्यालय (झोन क्र.२) इमारतीचा खास दुरुस्ती करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६% कमी दराची श्री. अताउल्लाखान यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४६/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, खुल्या बाजारातून सिमेंट खरेदी बाबत सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (भारत सरकारचा उपक्रम) यांच्याकडून दि.२२.०८.९१ रोजी

दरपत्रक मागविले असता संबंधित कंपनीचे विक्री अधिकारी यांनी दि.२३.०८.९१ रोजी दरपत्रक देऊन सर्व करांसह जकात कर वगळता प्रति मे.टन रु.१८००/- दर दिला असून सदरील सिमेंटचा दर हा सी.सी.आय. किंवा रेल्वे गुडस गोडाऊन्स पर्यंतचा आहे. तसेच अटी खालीलप्रमाणे आहेत.

१. सदरील सिमेंटचा दर प्रती मे.टन रु.१८००/- दिला असून सी.सी.आय.किंवा रेल्वे गोडावून पर्यंतचा आहे.
२. सदरील सिमेंट हे महापालिकेने रेल्वेस्टेशन गोडावून किंवा सी.सी.आय.गोडावून पासून महानगरपालिकेच्या पर्यंत वाहतूक करावी.
३. सिमेंटची रक्कम प्रति मे.टन रु.१८००/- प्रमाणे सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांच्या नावाने १०० टक्के आगाऊ रक्कम द्यावी लागेल.
४. शासनातर्फे उत्पन्नाच्या दरात किंवा इतर करांमध्ये वाढ झाल्यास त्या रकमेचा फरक महानगरपालिकेस सोसावा लागेल.
५. सिमेंट पुरवठा ३० दिवसाच्या आत करण्यांत येईल. जर नैसर्गिक आपत्ती किंवा रेल्वे वॅगन उपलब्ध न झाल्यास पुरवठा करण्यास विलंब होईल.
६. वरील दर हा दि.३०.०९.९१ पर्यंत बंधनकारक राहील.

सध्या भांडार विभागात सिमेंट उपलब्ध नसल्यामुळे तसेच विभागाची मागणी पाहता दुसऱ्या तिमाहीतील सप्टेंबर १९९१ पर्यंत १००० मे.टन सिमेंट घेणे आवश्यक आहे.

वरील दराप्रमाणे म्हणजे प्र.टन रु.१८००/- प्रमाणे १०० मे.टनाचे एकूण रक्कम रु.१८,००,०००/- इतकी होते आणि ती रक्कम सदरील कंपनीस अग्रीम द्यावी लागेल.

संबंधित कंपनी ही भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत येत असल्याने यापुढेही आवश्यकतेनुसार व विभागाची मागणीप्रमाणे सन १९९१-९२ या वर्षासाठी सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांच्याकडून प्रत्येक तिमाहीसाठी दरपत्रक देवून संबंधित कंपनीकडूनच सिमेंट खरेदी बाबत व उपलब्ध ठेकेदारांकडून सिमेंट वाहतुक फि सह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तावात दर्शविल्यादराने म्हणजे प्रति टन रक्कम रु.१८००/- या दराने २०० मे.टन सिमेंट "सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया" या कंपनीकडून खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**<u>संवाद :</u>**

**मा.सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.शांताराम काळे यांच्या नगरसेवक स्वेच्छा निधीतून क्रिडा विभागाकरिता रक्कम रु.२५,०००/- चे क्रिडा साहित्य खरेदी करण्यांत यावे.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २५.०९.१९९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत.**

**बुधवार दिनांक २५ सप्टेंबर, १९९१ रोजी मा.सभापती श्री.मो.इस्माईल अ.करीम यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस ठिक ३.३० वाजता सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

१. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
२. श्री.फैयाज खान अहमद खान
३. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री.जावेद हसन खाँन कसीम हसन खाँन
५. श्री.पालीवाल विजय गोविंदलाल
६. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
७. श्री.भगुरे तुळशीराम छगन
८. श्री.बारवाल गजानन रामकिसन
९. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
१०. श्री.सोनवणे केशव काशिनाथ
११. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र.१४७/१ :**

दिनांक ०४.०९.९१ च्या विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त व दिनांक १०.०९.९१ च्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.केशव सोनवणे :** आजच्या सभेत सिडको पाणी पुरवठा बाबत चर्चा होणे आवश्यक आहे. सध्या सिडकोचा पाणी प्रश्न बिकट झालेला असून १ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर पर्यंत सिडको भागातील सहा सेक्टरला आतापर्यंत १९ गॅप देण्यांत आले आहे. म्हणजेच प्रत्येक सेक्टरला या २५ दिवसात प्रत्येकी तीन गॅप दिलेले आहेत. यावरुन सिडको भागामध्ये गॅप देण्याबाबत हेतूपुरस्परपणे कट रचलेला दिसून येतो. नियमित होणाऱ्या गॅप बाबत शहर भागातून सिडको भागाला होणाऱ्या पाणी पुरवठा पैकी कोटला कॉलनी येथील जलकुंभाजवळील व्हॉल्व्ह खराब आहे. तशी सबब सांगितली जाते. परंतू हा व्हॉल्व्ह खराब असल्यामुळे औरंगाबाद हॉटेल, पी.एन.बी.विभाग इ.भागाकडे आवश्यकतेपेक्षा जादा पाणी पुरवठा होऊन सिडको भागाला दररोज कमीत कमी ३ एम.एल.डी.कमी पाणी मिळते.

**जलगृह अभियंता :** कोटला कॉलनी येथील पाण्याची टाकी ओव्हर फ्लो होत नाही. एखाद्या वेळेस झाली असल्यास तो प्रश्न वेगळा. कोटला कॉलनी येथील वॉल्व्ह ची दुरुस्ती बाबतची सुचना मिळाली आहे. तरीपण सुचनेप्रमाणे वॉल्व्हचा स्पॅडल दुरुस्त करणे बाबत सूचना दिल्या आहेत. स.सभासदांच्या सूचनेप्रमाणे कोणत्याही भागात जरुरीपेक्षा जास्त पाणी दिले जात नाही.

**श्री.केशव सोनवणे :** २३ ऑगस्ट ९१ ला कोटला कॉलनी येथील वॉल्व्ह नादुरुस्त असल्याबाबतची सूचना दिली आहे. तोपण आजपर्यंत यामध्ये सुधारणा झालेली नाही. अधिकाऱ्यांनी सभागृहात दिलेली माहिती चुकीची आहे.

**मा.सभापती :** पाणी पुरवठा ही दैनंदिन गरजेची बाब लक्षात घेता संबंधित अधिकाऱ्यांने वॉल्व्हची दुरुस्ती तातडीने करणे आवश्यक होते. तेव्हा येत्या पाच-सहा दिवसांत कोटला कॉलनी येथील वॉल्व्हची दुरुस्ती करण्याचे काम तातडीने पूर्ण करुन घ्यावे तसेच आवश्यकता असल्यास ऑड साईज वॉल्व्ह बदलून नवीन वॉल्व्ह त्या ठिकाणी टाकण्याची व्यवस्था करावी.

**जलगृह अभियंता :** सिडको भागासाठी किमान दररोज दहा एम.एल.डी.पाणी मिळण्यास हवे परंतू गेल्या महिन्यांत दररोज ७/८ एम.एल.डी.पाणी सिडको भागासाठी मिळाले आहे. त्यामुळे सप्टेंबर महिन्यात सिडको भागाचे पाणी पुरवठ्यास १८ गॅप पडले ही बाब खरी आहे.

**मा.कार्यकारी अभियंता :** जायकवाडीकडून शहरास होणाऱ्या पाणी पुरवठ्यास दरमहा किमान चार गॅप मिळतात. याबाबत संबंधित विभागात चौकशी केली असता असे समजले की, या ठिकाणी पाण्याचा एकच पंप असल्यामुळे या ठिकाणाहून संप भरल्यानंतर शहरास पाणी पुरवठा कमी केला जातो. ही बाब लक्षात घेता समांतर जलवाहिनीची नवीन पाईप लाईन सुरु होईपर्यंत वरील अडचण राहणार आहे.

**श्री.प्रभाकर विधाते :** वार्ड क्र.३ मधील लाईट बंद आहेत. मकबऱ्यासमोरील पोलवर असलेला जादा बंद मरक्युरी लाईट काढून दुसऱ्या ठिकाणी लावण्याची व्यवस्था करण्याबाबत गेल्या एक महिन्यापासून विद्युत भागास वारंवार सूचना करण्यांत आलेल्या आहेत. परंतू अद्याप पर्यंत काम झालेले नाही. नगरसेवकांनी सूचना करुनही कामात अशा प्रकार दिरंगाई होत असेल तर सामान्य नागरिकांचे काय हाल असतील याचा विचार न करणेच योग्य होईल.

**श्री.जावेद हसन, श्री.गिरजाराम हाळनोर :** न्यायमुर्ती श्री.चपळगांवकर यांचे निवास्थानासमोरील सार्वजनिक लाईट पुर्ववत सुरु करण्याबाबत लेखी सूचना दिल्यानंतर तो एकच लाईट दुरुस्त करण्यात आला परंतू याच भागात असलेले अन्य लाईट अद्याप दुरुस्त झालेले नाहीत. त्यामुळे सामान्य नागरिकांचा सार्वजनिक दिव्यांचा प्रश्न सुटलेला नाही. तेव्हा एकाच वेळी एका भागातील सर्व लाईट दुरुस्त केले जातील, याची खबरदारी घ्यावी.

**मा.सभापती :** गणपती उत्सव असल्यामुळे शहरातील बंद दिव्याचे कामात विलंब झाला असला तरी उप अभियंतांनी सार्वजनिक दिव्यांचे दुरुस्ती कामाबाबत विशेष लक्ष देऊन शहरातील दिवे दुरुस्त करण्याच्या कामाबाबत गती द्यावी.

**श्री.प्रभाकर विधाते :** वार्ड क्र.३ मधील डांबरी रस्ते, खडी रस्तेखांडकी पेव्हींगची कामे इ.बाबत वारंवार मागणी करुनही काम झालेले नाही तसेच वार्डाचे काही रस्त्यावर मुरुम टाकण्याची सुचना देण्यात आली असतांनाही पावसाळा संपत आला तरी मुरुम टाकण्याचे काम झालेले नाही. तसेच पहाडसिंगपुरा स्लम भागात ड्रेनेज लाईन टाकण्याबाबत मागणी केली असता, बजेट शिल्लक नाही असा खुलासा करण्यांत आलेला आहे.

**उप अभियंता, बांधकाम-१ :** वार्ड क्र.३ मधील डांबरी करणाच्या कामाचे अंदाजपत्रक तयार झालेले आहे. तसेच सध्या कार्यालयाकडे सिमेंट उपलब्ध नसल्यामुळे खांडकीचे काम बंद होते. सिमेंट उपलब्ध होताच खांडकीचे काम सुरु केले जाईल.

**मा.सभापती :** स्लम विभागाचे बजेट संपलेले असले तरी प्रत्येक कामाच्या बचती मधून शिल्लक राहीलेल्या रकमेत स्लम विभागाची कामे हाती घेता येतील. काय याबाबत संबंधित विभागांनी कार्यवाही करावी.

**श्री.अलीम बेग, श्री.फय्याज खान :** झोन मधील कचरा उचलणे बाबत कचरा वाहणारे ट्रक नियमितपणे येत नाही. त्याबाबत माहिती घेतली असता उप अभियंता यांत्रिकी म्हणून श्री.अत्रे काम करीत असल्याचे समजले. नवीन वाहन खरेदी बाबत चौकशी करण्याचा प्रयत्न केला असता श्री.अत्रे ही कार्यालयात हजर नसल्याचे कळाले.

**अतिरिक्त शहर अभियंता :** यांत्रिकी विभागाचे श्री.अत्रे हे रजेवर आहे. नवीन वाहन खरेदी बाबतची संचिका तयार करुन पुढील कार्यवाही साठी पाठविली आहे.

**मा.उपआयुक्त :** नवीन वाहन खरेदी बाबतच्या संचिकेवर वाहन खरेदी बाबत शासनाचे काय नियम आहेत. या बाबतचा खुलासा मागविला आहे.

**मा.सभापती :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी पुढील सभेत सविस्तर माहिती द्यावी.

**श्री.अलिम बेग :** कमलनयन बजाज हॉस्पीटल करिता आयात होणाऱ्या मशिनरीवर जकात माफी देण्यांत आली आहे. हे खरे आहे काय?

**मा.सभापती :** स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत पुढील सभेत माहिती देण्यांत यावी.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** दैनिक लोकमतमध्ये नेहरु रोजगार योजने अंतर्गत नारेगांव भागात गैर व्यवहार झाला असून त्याची चौकशी व्हावी असे वृत्त प्रसिध्द झाले आहे. त्याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** नेहरु रोजगार योनजे अंतर्गत नमुना फॉर्म वाटण्याची आजची शेवटची तारिख असल्यामुळे प्रकल्प अधिकारी सभेस उपस्थित नाहीत. तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांनी पुढील सभेत नेहरु रोजगार घर दुरुस्ती बाबत नावासह सविस्तर माहिती देण्यांची व्यवस्था करावी.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** काही मनपा कर्मचाऱ्यांनी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून औषधोपचाराची देयके सहा-सहा महिने मिळत नाहीत. मात्र काही खास कर्मचाऱ्यांना ही देयके ताबडतोब दिली जातात. याशिवाय आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी एका पत्राद्वारे अशा देयकांना पुर्वपरवानगीची अट घातल्याची माहिती मिळाली आहे. नगर परिषद कर्मचारी शहरातील विविध भागात राहात असल्यामुळे रात्री अपरात्री आजार उद्‌भवल्यास अशा कर्मचाऱ्यांस आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची पुर्वपरवानगी घेणे शक्य होईल काय? याचा कार्यालयाने विचार करावयास हवा होता. याबाबत माहिती असता बऱ्याच कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके वरील कारणासाठी नामंजूर करण्यांत आल्याची माहिती मिळाली आहे. तेव्हा या विषयावर खास सभा घेण्यांत यावी. या सभेत चालू वर्षात किती कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय देयकांची रक्कम मिळणेबाबत मागणी केली त्यापैकी किती कर्मचाऱ्यांना वैद्यकीय देयके मंजूर करण्यांत आली. आणि किती कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके नामंजूर करण्यांत आली. त्याची कारणे काय. या बाबतची सविस्तर माहिती देण्यांत यावी.

तसेच चालु वर्षात वैद्यकीय उपचारासाठी किती कर्मचाऱ्यांना अगाऊ रक्कम देण्यांत आली. अगाऊ रक्कम देण्याची तरतूद आहे काय? असल्यास ती कोणकोणत्या उपचारासाठी देण्यांत आली. याबाबतची सविस्तर माहिती देण्यांत यावी. आरोग्य वैद्यकीय केंद्र हर्सुल येथील डॉ.हे पार्ट टाईम पगारावर काम करतात. अशी माहिती मिळाली. वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे निर्माण करतांना या पदावर स्त्री वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची मंजूरी सर्वसाधारण सभेत घेण्यांत आली आहे. तेव्हा या पदावर डॉ.पार्ट टाईम पगारावर कसे काम करतात याचा खुलासा व्हावा.

**श्री.जावेद खॉन :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे मनपा कर्मचाऱ्यांनी मनपा आरोग्य केंद्रांतच उपचार घ्यावा. असे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सुचविले आहे. तेव्हा मनपाच्या आरोग्य वैद्यकीय केंद्रात औषधी उपलब्ध आहेत काय याचा खुलासा व्हावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** महापालिकेने तयार केलेल्या उपविधी नुसार हृदय विकार, किडणी, अपेंडिक्स, टी.बी.इत्यादी खास आजारांच्या उपचाराची खर्च झ ालेल्या रकमेची परतावा करण्याची तरतूद आहे. मनपा कर्मचाऱ्यांकडून या आजारा व्यतिरिक्त किरकोळ उपचारासाठी खर्च झालेल्या रकमेचा परतावा मिळणेबाबत मागणी येत आहे. अशी मागणी करत असतांना कर्मचारी उपचारासाठी खर्च केलेल्या रकमेबाबत औषधीची देयके दाखल न करता विसंगत देयके दाखल करतात. तसेच अचानकपणे उद्‌भवलेल्या रोगावर उपचार घेतल्यानंतरही नजिकच्या काळात त्या बाबतची पुर्वसूचना कार्यालयास न देता खर्च झालेल्या रकमेची मागणी केली जाते. या शिवाय आजार उद्‌भवलेला रोगी तपासणीसाठी हजर केला जात नाही. वरील बाबी लक्षात घेता तपासणीचे वेळी आवश्यक पणे दाखल केलेली देयके नामंजूर केली जातात.

**मा.सभापती :** दिल्ली गेट तलाव येथे गुत्तेदारांने केलेल्या कामाबाबत पुन्हा असा निर्णय घेण्यांत येतो की मनपाच्या आदेशावरुन गुत्तेदाराने दिल्ली गेट येथील काम केलेले असल्यामुळे संबंधित गुत्तेदार यांना त्या कामाचे बिल अदा करण्यांत यावे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** दिनांक १०.०९.९१ च्या सभेत बायजीपुरा येथील मनपा निवास्थानाबाबत संबंधित अधिकाऱ्यांने पुढील सभेत खुलासा घ्यावा. असा निर्णय झालेला आहे. त्यावर काय कार्यवाही झाली.

**मा.उपआयुक्त :** बायजीपुरा येथे मनपाने खालीलप्रमाणे निवासस्थानाची व्यवस्था केली असून त्या बाबत सविस्तर माहिती देणारा तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ.क्र | निवास स्थानाचा प्रकार | संख्या | अधिकृत वापर | अनधिकृत वापर | प्रदान केलेल्या व्यतिरिक्त वापर | रिकामे |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वर्ग-२ | ०४ | ०१ | ०३ | - | -- |
| २. | वर्ग-३ | २४ | १२ | १० | ०२ | -- |
| ३. | वर्ग-४ | १६ | ०६ | ०९ | -- | ०१ |
| | **एकूण** | **४४** | **१९** | **२२** | **०२** | **०१** |

निवासस्थान वाटपाबाबत प्रशासकीय समिती असून सदर प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी समिती समोर ठेवण्यांत येणार आहे. त्यानंतर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.अलिम बेग :** किराडपुरा भागात बांधण्यांत येत असलेल्या समाज मंदिराचा वापर लग्न कार्यासाठी केला जात असल्याचे दिसते हे खरे आहे काय?

**अतिरिक्त शहर अभियंता :** किराडपुरा येथे बांधण्यांत येणारे समाजमंदिराचे काम अद्याप पुर्ण झालेले नाही. त्यामुळे बांधकाम करणाऱ्या गुत्तेदाराकडून सदर इमारत मनपाच्या ताब्यात घेतलेली नाही. तरी पण सं.सभासदांच्या सुचनेप्रमाणे प्रत्यक्ष मोक्यावर शहानिशा केली जाईल. तसेच स.सदस्यांच्या सुचनेप्रमाणे या ठिकाणी लग्नकार्य घेत असल्याचे आढळून आल्यास सदर इमारत त्वरीत मालमत्ता अधिकारी यांचेकडे हस्तांतरीत करण्यांत येईल.

**श्री.केशव सोनवणे :** दि.१०.०९.९१ च्या सभेत वार्ड क्र.३४ येथील प्रलंबित ड्रेनेज कामाबाबत १५ दिवसाच्या आत गुत्तेदारास कामाचा आदेश द्यावा असा निर्णय झालेला आहे. त्याबाबत खुलासा व्हावा.

**श्री.गजानन बारवाल :** वार्ड क्र.३४ च्या ड्रेनेज कामाबाबत आतापर्यंत झालेली चर्चा आणि प्रशासनाकडून मिळालेली माहिती व सं.सभासदांची मागणी लक्षात घेता हे काम ए-१ वर करुन घेण्यांत यावे.

**उप अभियंता स्लम :** वार्ड क्र.३४ येथील ड्रेनेज कामाची संचिका आवश्यक कार्यवाहीसाठी वरीष्ठांकडे सादर केली असता गुत्तेदाराने दिलेल्या दराबाबत दर पृथ:करण मागविण्यांत यावे असे ठरले त्यानुसार संबंधित गुत्तेदार यांना पत्र देण्यांत आले आहे.

**मा.सभापती :** वार्ड क्र.३४ मधील कामाबाबत बरीच चर्चा झाली. यापुर्वी गुत्तेदारास वर्क ऑर्डर देण्यांस मंजूरी दिली तेव्हा दर पृथ:करण वगैरे बाबी विचारात न घेता कामाचा आदेश देण्यास मंजूरी देण्यांत येते.

**श्री.गजानन बारवाल :** दि.१०.०९.९१ च्या सभेत

१) नगर सेवकांच्या स्वेच्छा निधीतून सोडीयम लाईट लावण्याच्या प्रकरणी दिनांक १२ व १३ सप्टेंबर रोजी निर्णय घेण्यांत येईल असे सुचविण्यांत आले होते.

२) नगर परिषद लोकप्रतिनिधी काळात लिजवर देण्यांत आलेल्या जागांचे चौकशी प्रकरणी कायम करण्यांत आलेल्या उपसमितीमध्ये स.सभासद श्री.केशव सोनवणे यांचे नावाचा समावेश करण्याच्या सुचनेचा उल्लेख नाही.

३) ठराव क्र.१४६ बाबत पत्र क्र.अश/भांडार/३९१/९१, दि.२१.०९.९१ अन्वये सिमेंट खरेदी बाबत दुरुस्त प्रस्तावावर विचार करण्यांची सूचना प्राप्त झाली आहे.

**श्री.केशव सोनवणे :** स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे नवरात्र उत्सवास लवकरच सुरवात हो असल्यामुळे स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे सोडीयम लाईट बाबत आजच्या सभेत निर्णय घेणे आवश्यक वाटते.

**मा.उपआयुक्त :** सोडीयम लाईट बाबत गत सभेत झालेल्या चर्चेनुसार याप्रकरणी प्राथमिक चौकशी केली होती. सदर प्रकरणाच्या संचिकेवर मा.आयुक्त यांनी दिलेल्या सूचना आज विद्युत विभागाकडे पाठविण्यांत आल्या आहेत. संबंधित विभाग मा.आयुक्त यांच्या सुचनेप्रमाणे सदर प्रकरणी कार्यवाही करीलच त्यामुळे

नवरात्र उत्सवास नगरसेवकांना त्यांचे वार्डामध्ये सोडीयम दिवे लावणे बाबत अडचण येणार नाही असे मला वाटते. तथापि गत सभेत ठरल्याप्रमाणे या प्रकरणाची चौकशी करणे हा भाग मला स्वतंत्र असल्यामुळे त्याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही होईल.

**मा.सभापती :** नगर परिषद लोकप्रतिनिधी काळात लिजवर देण्यांत आलेल्या जागांचे चौकशी प्रकरणी कायम करण्यांत आलेल्या उप समितीमध्ये स.नगरसेवक श्री.केशव सोनवणे यांचे नावाचा समावेश करण्यास मंजूरी देण्यांत येते.

दिनांक १६.०९.९१ रोजी सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. कंपनीचे विक्रीकर अधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेनुसार प्रति टन रुपये १७२०.०० या दराने पुर्वीचे अटीसह ठराव क्र.१४६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दोनशे टनाऐवजी १००० मे.टन सिमेंट, सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.यांचेकडून दिनांक ३०.०९.९१ पर्यंत बिलाची रक्कम संबंधित कंपनीस अदा होईल अशी व्यवस्था करण्यासह खरेदी करण्यांस मंजूरी देण्यांत येते.

२५० वॅट सोडीयम व्हेपर दिवे मागविण्यांत आले आहे. ज्यास वर्क ऑर्डर मिळावयाचे आहे. परंतू सध्या गणपती उत्सव, इद असल्यामुळे वर्क ऑर्डरची वाट न पाहता त्वरीत २५० वॅट फिटींग मंजूर दरावर मंजूर एजन्सी मार्फत मागवून विविध वार्डात स.सदस्यांच्या मागणीप्रमाणे २५ नगरसेवकांच्या (१९९०-९१) च्या पत्रकाप्रमाणे विविध वॉर्डात बसविण्यांचे आदेश दिले होते. हे काम आजपर्यंत पुर्ण झाले नाही. तरी लवकरात लवकर पूर्ण करुन घ्यावे.

ठराव क्र.१४० मध्ये ठरल्याप्रमाणे प्रत्यक्ष मोक्यावर पाहणी केली असता चिकलठाणा नदीवरील पुलापासून जवळच गावातील दुकाने आहेत. या व अन्य कारणांसाठी या पुलाचे काम करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रकातील रबर फिलिंग व साईड विंग वॉल आणि रिटेनिंग वॉल या वाढीव बाबीचे काम अंदाजपत्रकाचे दराप्रमाणे गुत्तेदार श्री.पी.जे.तमखाने यांच्याकडून करुन घेण्यांस मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि.०४.०९.९१ च्या विशेष स्थायी समितीचे इतिवृत्त आणि ठराव क्र.१३५,१४०,१४६ मधील आवश्यक त्या दुरुस्त्यासह दिनांक १०.०९.९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४८/२ :**

वार्ड क्र.५७ मो.फुलेनगर येथे १५० मी.मी.व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.२,०७,८७०/- चे सन १९८९-९० च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून सदर काम प्राप्त सरकारी अनुदानातून करणेस्तव मा.आयुक्त साहेबांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदर कामासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यात श्री.आर.एल.बारवाल, ५.५% कमी व श्री.जे.जे.भारुका २१% कमी परंतू श्री.जेजे.भारुकर गुत्तेदार यांनी दिनांक ०८.०२.९१ ला पत्र देवून त्यांचे २१% कमी दर नसून २१% जास्त दर असल्याचे कळविले आहे. तसेच

मा.कार्यकारी अभियंता यांच्या दालनात संबंधित गुत्तेदाराशी प्रत्यक्ष चर्चा होवून मा.कार्य.अभियंता यांनी २१% जास्त दर असल्याचे अभिप्राय दिलेला आहे.

मा.आयुक्तांच्या आदेशानुसार दुसऱ्यांदा निविदा मागविल्या असता एकही निविदा प्राप्त झाली नाही.

कार्यालयीन निविदा सूचना क्र.३, दि.२०.०६.९१ नुसार तिसऱ्यांदा निविदा मागविल्या असता श्री.सय्यद सिराजोद्दीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराची केवळ एकच निविदा प्राप्त झाली. सध्याच्या सन १९९०-९१ च्या दराप्रमाणे तुलना केली असता हे दर ६.८१% कमी येतात. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५७ मो.फुलेनगर येथे १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता र.रु.२,०७,८७०/- च्या अंदाजपत्रकास व सदर कामासाठी श्री.सय्यद सिराजोद्दीन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४९/३ :**

शहर अभियंता यानी प्रस्ताव सादर केला की, वैद्यकीय आरोग्य अधिकारी महानगरपालिका यांचे अस्तित्वात असलेल्या कोटला कॉलनी येथील क्वॉर्टरमध्ये आणखी एका रुमची वाढ करणेच्या कामासाठी सा.बा.खात्याचे सन १९९०-९१ चे डी.एस.दराने र.रु.९४,३८१/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मंजूरी मिळाली आहे.

सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा क्र.४५३, दि.०३.०७.९१ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सय्यद सिराजोद्दीन | - | १०% कमी |
| २. | श्री.जफर खान | - | २.९९९% कमी |
| ३. | श्री.अतावुल्लाखान | - | ५.१% कमी |
| ४. | श्री.रोहिदास बारवाल | - | ४.४४% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराच्या श्री.सय्यद सिराजोद्दीन यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर. सदरचा खर्च भांडवली इमारती या शिर्षकाखाली करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय आरोग्य अधिकारी महानगरपालिका, औरंगाबाद यांचे अस्तित्वात असलेल्या कोटला कॉलनी येथील क्वॉर्टर मध्ये आणखी एका रुमची वाढ करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५०/४ :**

वार्ड क्र.११ जिवेश्वर हौसिंग सोसायटी येथे १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता र.रु.१,३२,५००/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.५९४ दि.२६.०६.९१ द्वारे मंजूरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१, दि.०७.०५.९१ अन्वये दैनिक अजिंठा व आलमगीर टाईम्स या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण फक्त एक श्री.एम.एम.बेग यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा प्राप्त झाली.

आदेशानुसार संबंधित गुत्तेदार यांना दर कमी करणेस्तव दि.११.०७.९१ व दि.१८.०७.९१ ला पत्र देण्यांत आलेले होते. संबंधिताने दि.१८.०७.९१ ला पत्र देवून कळविले की, सदर कामातील पाईपचे दर कमी आहेत. माझ्या निविदेतील दरापेक्षा मी दर कमी करु शकत नाही.

करिता श्री.एम.एम.बेग यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.११ जिव्हेश्वर हौसिंग सोसायटी येथे १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता श्री.एम.एम.बेग यांच्या अंदाजपत्रकीय दराच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५१/५ :**

वार्ड क्र.५० मो.भिमपुरा येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता सन १९९०-९१ च्या दरसुचीनुसार र.रु.३३,४००/- चे अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२, दि.२९.०५.९१ द्वारे दै.लोकधर्म व देवगिरी तरुण भारत ला जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.नरेंद्रसिंग तारासिंग | - | १% कमी |
| २. | श्री.मे.विपुल कन्स्ट्रक्शन | - | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री.नरेंद्रसिंग तारासिंग यांचेदरपत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५० मो.भिमपुरा येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री.नरेंद्रसिंग तारासिंग यांचे दर पत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५२/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नाथ मार्केट (सुपर मार्केट) औरंगपुरा इमारतीमध्ये लिफ्ट बसविण्याचे कामासाठी स्थायी समिती दि.१२.१०.८८ ठराव क्र.४१७ अन्वये रुपये ७ लक्ष ऐवजी सहा लक्ष मंजूर करण्यांत आलेले आहेत. इमारतीचे बांधकाम आता पुर्ण झालेले असून वरचा शेवटचा (तिसरा) मजला फॅमिली कोर्ट कार्यालयास भाड्याने देण्याचे निश्चित झाल्याचे मालमत्ता अधिकारी यांनी सुचविले असून दुसऱ्या मजल्यावर अन्न व औषधी कार्यालय कार्यान्वित आहे.

या कामाचे दर दरसुचीमध्ये नाहीत. (डी.एस.आर.) म्हणून ओ.टी.इलेव्हेटर यांना कार्यालयाचे पत्र क्र.बांध-१/३३/९०, दि.१२.०४.९०, दि.१२.०४.९० अन्वये विचारणा केल्या

नुसार त्यांनी त्यांचे पत्र क्र.५२/७२५२/अे.आर.टी.एस.आर.जे., दि.२३.०४.९० अन्वये एका लिफ्ट करिता रु.८,७३,२१८/- दर कळविले आहे. अंदाजपत्रकाचे तरतूदीचे दृष्टीने व निविदा मागविण्याच्या दृष्टीने रक्कम रु.८,७३,२१८/-गृहीत धरुन या कामाची फेरनिविदा दि.०६.०५.९१ (वर्तमानपत्राद्वारे मागविण्यांत आली होती. परंतू एकही निविदा प्राप्त झाली नाही. तसेच औरंगाबादला सदर कामाची एकही अेजन्सी उपलब्ध नसल्यामुळे व मा.आयुक्तांचे मंजूरीनुसार ओटीस इलेव्हेटर कंपनी यांचे पत्राद्वारे दर्शविलेली किंमत रु.८,७३,२९८/- (दोन लिप्ट करीता) मान्य करण्याच्या मंजूरीस्तव व सध्या किंमतीमध्ये जे काही फरक होईल. ती वाढीव रक्कम मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

**मा.सभापती :** नाथ सुपर मार्केट औरंगपुरा येथील दुकानदार दुकानासमोर असलेल्या मोकळ्या जागेचा विना परवानगी वापर करीत आहेत. त्याबाबत मालमत्ता अधिकारी यांनी विशेष खबरदारी घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्या बाबींची तुर्त आवश्यकता नाही. असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.१५३/७ :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मील कॉर्नर ते बलवंत वाचनालया पर्यंत १५० वॅट एच.पी.एस.व्ही.फिटींगचा पुरवठा करणे व बसवणे साठी सा.बा.खात्याचे सन १९८९-९० चे दरसुचीनुसार र.रु.५,२२,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदर खर्च शासकीय अनुदान हया शिर्षकामधून करण्यांत येईल. त्यास मान्यता मिळावी.

सदर कामासाठी दै.मराठवाडा आणि मुकद्दस मध्ये निविदा सूचना प्रसिध्द करुन मोहरबंद निविदा मागविण्यांत आल्या असता एकूण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.शांती इलेक्ट्रीकल्स, लातूर | - | १.५% जास्त |
| २. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | - | ०.१% कमी |
| ३. | मे.सत्यम वायर्स, औरंगाबाद | - | ०.५% जास्त |
| ४. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | - | ०.५% जास्त |
| ५. | मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | - | १% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची निविदा सर्वात कमी दराची असून (बजाज, फिलीप्स, क्रॉम्पटन, फक्त) वरील काम अंदाजपत्रकीय दरोपक्षा ०.१% कमी दरात मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचेकडून करुन घेण्यांस मान्यता मिळावी. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिल कॉर्नर ते बळवंत वाचनालयपर्यंत १५० वॅट एच.पी.एस.व्ही.फिटींगचा पुरवठा करणे आणि बसविणेच्या कामासाठी रक्कम रु.५,२२,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदरील काम प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराने मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचेकडून करुन घेण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५४/८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.२१ मधील ज्युब्लीपार्क पंप हाऊस भोवती संरक्षित भिंत होती. परंतू सदरील भिंत आजूबाजूच्या लोकांनी पाडल्यामुळे व अतिक्रमण झाल्यामुळे सदर संरक्षित भागास धोका होण्याचा संभव आहे.

ज्युब्लीपार्क पंप हाऊस व्ही.आय.पी.मुख्य रस्त्यावर असून रहदारी जास्त असल्यामुळे पादचारी सदर संरक्षित भागातून रहदारी करतात परिणामी सदर संरक्षित भाग निकामी होईल. करिता सदरील पंप हाऊस भोवती संरक्षित चैन लिंक करणे आवश्यक असून परिसर अभियांत्रिकी दरसुची सन १९९०-९१ प्रमाणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.१,१३,९००/- चे तयार करण्यात आले असून मंजूरीस्तव सादर. सदरचा खर्च भांडवली पाणी पुरवठा कामे सदरातून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२१ मधील ज्युब्लीपार्क पंप हाऊस भोवती संरक्षित चैनलिंक करणेच्या कामाकरिता रक्कम रु.१,१३,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर कामासाठी लघुनिविदा तातडीने मागविण्यांत याव्यात.

**विषय क्र.१५५/९ :**

उप अभियंता शासकीय विशेष जलनिःसारण कार्यक्रम यांनी प्रस्ताव सादर केला की, भावसिंगपुरा येथे भुमिगत ड्रेनेज लाईन टाकण्याबाबतचे अंदाजपत्रक र.रु.२७,०५,२४५/- एवढ्याचे असून त्यास शासन ठराव क्र.१०९०, विकास/प्र.क्र.३७ (अ)/योजना-८, दि.१९.०१.९१ अन्वये मंजूरी मिळाली आहे. सदरचे कामासाठी प्रगट निविदा क्र.३/९१-९२, दि.३०.०५.९१ अन्वये दै.लोकमत व दै.औरंगाबाद मध्ये टाईम्स मध्ये प्रसिध्द करण्यांत आली. त्यानुसार एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.उदय इंजिनीअरींग कंपनी | - | ३७% जास्त |
| २. | श्री.एल.एम.पडघन | - | ४०% जास्त |
| ३. | श्री.आर.एल.बारवाल | - | ४२.१०% जास्त |
| ४. | श्री.ए.सी.कोठारी | - | १% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री.ए.सी.कोठारी यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा येथे भुमिगत ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री.ए.सी.कोठारी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५६/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका वाचनालय, खडकेश्वर या इमारतीची वाढ व दुरुस्तीचे कामासाठी सर्वसाधारण सभा दि.२२.११.९० ठराव क्र.८४ अन्वये र.रु.८,१३,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा (दुसऱ्यांदा) सुचना क्र.मनपा/उद्यान/४५३/९१,

दि.०३.०७.९१ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.रोहिदास बारवाल | - | ९.९९% जास्त |
| २. | श्री.एस.एच.असोशिएटस | - | १०% जास्त |
| ३. | श्री.विकास कन्स्ट्रक्शन | - | २५.२५% जास्त |
| ४. | श्री.एस.ए.नवाब | - | १५.२०% जास्त |
| ५. | श्री.एल.एम.चंचलानी | - | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९% जास्त दराची श्री.रोहिदास बारवाल यांची निविदा आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने गुत्तेदारास दर कमी करण्यासाठी कार्यालयीन प.क्र.१९६, दि.२४.०७.९१ अन्वये पत्र दिले असता सदर गुत्तेदाराने दि.०१.०८.१९९१ चे त्यांचे लेखी पत्रान्वये कळविले की, सदरचे काम ते पुर्वीचे म्हणजेच ९.९९% जास्त दराऐवजी ८.९९% जास्त दराने करण्यांस तयार आहे.

सबब सदरच्या कामासाठी श्री.रोहिदास बारवाल यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.९९% जास्त दराची निविदा मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** सदर प्रकरणाचा स्थळ दर्शक नकाशा अपूर्ण वाटतो. तेव्हा संबंधित विभागाने सुधारित नकाशे तयार करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका वाचनालय खडकेश्वर या इमारतीची वाढ व दुरुस्ती करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.९९% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५७/११ :**

झोन क्र.३ मधील विविध ठिकाणी असलेल्या सार्वजनिक संडासाची दुरुस्ती करणेच्या कामासाठी र.रु.३,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. सदर काम प्राप्त शासकीय अनुदानातून करण्यांस मंजूरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२/५४८/९१, दि.२९.०५.९१ ला दैनिक लोकधर्म व देवगिरी तरुण भारत या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एम.एम.बेग | - | अंदाजपत्रकीय दराने, |
| २. | श्री.एस.ए.नवाब | - | ८% जास्त |
| ३. | श्री.मे.विपुल कन्स्ट्रक्शन | - | १०% जास्त |
| ४. | श्री.आर.एल.बारवाल | - | १५.१५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.एम.एम.बेग यांचे दरपत्रक असून सदरील अंदाजपत्रक हे सन १९९०-९१ या दर सुचीप्रमाणे तयार करण्यांत आलेले आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र.३ मधील विविध ठिकाणी असलेल्या सार्वजनिक संडासाची दुरुस्त करणेच्या कामाकरिता रक्कम रु.३,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.एम.एम.बेग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.१५८/१२ :**

उप अभियंता (जलनि:सारण) यांनी प्रस्ताव सादर केला की, सध्या ड्रेनेज विभागात पारंपारिक पध्दतीने म्हणजेच बांबूच्या कमट्यांच्या साह्ययाने ड्रेनेज चोकअप काढण्यांत येते.

या पध्दतीमध्ये बऱ्याच वेळा असे घडते की, ज्या बाबूंच्या कमट्या सुतळीच्या सहाय्याने एकमेकास बांधून जलनि:सारण वाहिनीमध्ये घुसविल्या असता आतमध्ये घर्षण होवून सुतळी तुटते व बांबूच्या कमट्या आत अडकून पडतात.

तसेच ड्रेनेज लाईन जर जास्त गच्च मातीने भरलेली असेल तर अपरुंटींग करण्याशिवाय पर्याय नसतो. या अडचणीवर उपाय म्हणून साऊदर्न पॉवरटेक इक्विपमेंट प्रा.लिमिटेड मद्रास (भारत) यांनी एक छोटे संयत्र विकसीत केले आहे.

सदरील संयंत्राचे महाराष्ट्रातील वितरक कॅप असोशिएटस पुणे हे असून त्यांची अंदाजे किंमत रुपये २६,५७५/- एवढी आहे.

तरी कॅप असोशिएटस यांच्यातर्फे तुर्त एक संयत्र खरेदी करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ड्रेनेज चोकअप काढण्याकरिता साऊदर्न पावरटेक इक्वीपमेंट प्रा.लि.मद्रास (भारत) यांनी विकसीत केलेले सयंत्र त्यांचे महाराष्ट्रातील वितरक कॅप असोशिएटस पुणे यांच्याकडून तुर्त एक संयत्र खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**संवाद :**

**मा.सभापती :** ठराव क्र.११८ मध्ये नामंजूर केलेल्या ठरावात चुकीची दुरुस्ती करण्यांत येते. क्लास टू चे जे अधिकारी तिथे राहतात. त्यांना मोकळ्या जागेत एक रुम बांधून देण्यांत यावी. जुन्या घरांना काहीही दुरुस्ती नाही. तसेच ठराव क्र.१२७ व १२९ च्या कामांची पाहणी झाली. सदरील ठरावास मंजूरी देण्यांत येते.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापतींनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ११.१०.१९९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत.**

**शुक्रवार दिनांक ११ नोव्हेंबर, १९९१ रोजी मा.सभापती श्री.मो.इस्माईल अ.करीम यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
२. श्री.फैयाज खान अहमद खान
३. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री.पालीवाल विजय गोविंदलाल
५. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
६. श्री.भगुरे तुळशीराम छगन
७. श्री.बारवाल गजानन रामकिसन
८. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
९. श्री.सोनवणे केशव काशिनाथ
१०. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र.१५९/१ :**

दिनांक २५.०९.९१ च्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

**श्री.प्रभाकर विधाते :** महापालिका निवडणूक काळात उत्कृष्ट काम केलेल्या कर्मचाऱ्यांना दोन आगाउ वेतनवाढ देणे बाबत संबंधित विभागाकडे पत्र दिले आहे. त्यावर अद्याप काहीही उत्तर मिळाले नाही. तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**श्री.अलिम बेग :** दिनांक २५.०९.९१ सभेत कमलनयन बजाज हॉस्पीटल करिता आयात झालेल्या यंत्रसामुग्रीला जकात माफी देण्याबाबत या सभेत खुलासा करण्यांत येईल. असा निर्णय झाला आहे. त्याबाबत विचार व्हावा.

**जकात अधिक्षक :** जकात अधिनियमाचे कलम ५/६ अन्वये कमलनयन बजाज हॉस्पीटल करिता आयात होणारी यंत्रसामुग्री नागरीकांच्या उपयोगी करिता आयात होणारी असल्यामुळे मा.आयुक्त यांचे मंजूरीनुसार जकात माफी देण्यांत आली होती. यानंतर दिनांक ०१.०८.९१ ला नजरचुकीने देण्यांत आलेला आदेश मा.आयुक्तांनीच रद्द केला आहे.

**श्री.अलिम बेग, श्री.केशव सोनवणे :** जकात अधिक्षक यांनी खुलासा केल्याप्रमाणे कमलनयन बजाज हॉस्पीटल करिता आयात यंत्रसामुग्रीवर मा.आयुक्तांनी नजरचुकीने देण्यांत आलेली जकात कर माफीचा आदेश रद्द करण्यांत आला तर आयात झालेल्या मशिनवरीवर जकात कर वसुल करण्यांत आला काय? याबाबत खुलासा व्हावा. आणि जकात नियम ५/६ व संस्थेने जकात माफी साठी केलेला अर्ज सभागृहास वाचून दाखविण्यांत यावा.

**जकात अधिक्षक :** कमलनयन बजाज हॉस्पीटल करिता आयात झालेल्या यंत्रसामगुग्रीवर देण्यांत आलेला जकात माफीचा आदेश रद्द झाला असला तरी अद्याप यावर

जकात वसुल झाली नाही. सभागृहाने मंजूरी दिल्यास आयात मालावर जकात कर वसूल केला जाईल.

**मा.सभापती :** आर्थिक बाबीचे निर्णय घेण्याचा अधिकार स्थायी समितीस असतांना कमलनयन बजाज हॉस्पीटल साठी आयात होणाऱ्या यंत्रसामुग्रीवर जकात माफीचा आदेश देतांना मा.आयुक्त यांनी सभागृहाची मंजूरी घेतली नाही. तेव्हा जकात कर वसुलीसाठी मंजूरी देण्यांचा प्रश्नच येत नाही.

**श्री.केशव सोनवणे, श्री.गजानन बारवाल, श्री.तुळशीराम भगुरे :** कमलनयन बजाज हॉस्पीटलसाठी आयात झालेल्या यंत्रसामुग्रींची किंमत किती असेल याचा खुलासा व्हावा आणि संबंधिताकडून नियमाप्रमाणे जकात वसूल करावी.

**मा.उपआयुक्त :** कमलनयन बजाज हॉस्पीटलसाठी आयात करण्यांत आलेल्या यंत्रसामुग्रीची किंमत आदींबाबत माहिती देऊन एक महिन्याच्या आत सभागृहास खुलासा करण्यांत येईल.

**श्री.केशव सोनवणे :** शहरात बऱ्याच ठिकाणी एस.टी.डी./पी.सी.ओ.ची व्यवस्था मोठ्या प्रमाणात उपलब्ध झालेली आहे. या केंद्रावर जकात विभागातर्फे जकात कराबाबत नोटीसा बजावल्या जात असल्याचे कळाले. वरील बाबीवरुन या यंत्रसामुग्रीवर जकात वसुल झाली नाही असे दिसते. तेव्हा या मशिनरी विनाजकात शहरात कशा आल्या या बाबत खुलासा व्हावा. व त्याबाबत नियमाप्रमाणे वसुली करावी.

**जकात अधिक्षक :** मा.उपआयुक्त यांचे परवानगीने मी स्वतः शहरातील एस.टी.डी./पी.सी.ओ. केंद्रावर जकात वसुली बाबतची कार्यवाही सुरु केली आहे.

**मा.सभापती :** कमलनयन बजाज हॉस्पीटल आणि एस.टी.डी./पी.सी.ओ. या बाबत शहरात आयात झालेल्या यंत्रसामुग्रीबाबतची जकात विषयक सर्व माहिती या सभेनंतर होणाऱ्या दुसऱ्या सभेच्या वेळी सभागृहास देण्यांत यावी.

**श्री.एकबालसिंग गील, श्री.तुळशीराम भगुरे :** दिल्लीगेट तलाव येथे झालेल्या कामाचे बील संबंधित गुत्तेदार यांना अदा करण्याबाबत सभागृहाने मंजूरी दिली आहे. तेव्हा संबंधितास या कामाचे बिल अद्याप का देण्यांत आले नाही. याचा खुलासा व्हावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.केशव सोनवणे :** एकनाथ नगर येथील ड्रेनेज चेंबरमध्ये पडून एका बालकाचा मृत्यू झाला आहे. याबाबत महापालिका काय कार्यवाही करणार आहे.

**कार्यकारी अभियंता :** एकनाथनगर भागात म्हाडातर्फे सेप्टीक टँक तयार झालेला असून सदर मुलगा यामध्ये पडून मृत्यू पावला आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** म्हाडाने येथील कामाबाबत मनपाकडे रक्कम जमा केली आहे. त्यास किती कालावधी झाला आहे. रक्कम जमा होऊनही हे काम का झाले नाही. या ठिकाणचे काम सुरु होऊन एक वर्षाचा कालावधी झालेला आहे. सध्या ते काम बंद आहे. परंतू संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत पाहणी सुध्दा केली नाही. काम बंद असलेल्या कालावधी करिता संबंधित गुत्तेदारावर काय कार्यवाही केली जाईल. या सर्वाचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** स.सभासदांच्या सुचनेप्रमाणे एकनाथनगर भागातील या कामाबाबतची चौकशी करण्यासाठी स.सभासद श्री.अलीम बेग फैय्याजखान व हाळनोर यांचा समावेश असलेली उपसमिती कायम करण्यात येते.

**श्री.अलिम बेग :** दिल्लीगेट येथील तलावाचे कामाप्रमाणेच सिडकोचा भाग असलेल्या एका ठिकाणी मुरुम टाकण्याचे काम यापुर्वी झालेले आहे. त्या मुरुम टाकण्याचे कामाचे बील संबंधित गुत्तेदारास अदा करण्यांत आले आहे. तेव्हा त्याप्रमाणेच दिल्लीगेट तलावाचे काम करणाऱ्या गुत्तेदारालाही कामाचे बील देण्यांत यावे.

**उप अभियंता, बांधकाम-२ :** सिडकोचा भाग असलेल्या ठिकाणी मुरुम टाकण्याच्या कामास समितीची मंजूरी घेण्यांत आली होती.

**श्री.प्रभाकर विधाते :** मनपा निवडणूक काळात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देणे बाबत च्या सुचनेवर खुलासा व्हावा.

**सहाय्यक आयुक्त :** मनपा निवडणूक काळात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्याबाबतची संचिका पुढील कार्यवाही साठी पाठविण्यांत आली आहे.

**मा.सभापती :** सहाय्यक आयुक्त-१ यांनी स.सभासदांच्या सुचनेबाबत पुढील सभेत माहिती द्यावी.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** शहागंज मार्केट येथील मच्छी बाजारचा विस्तार करण्याच्या कामास मंजूरी मिळाली आहे. त्याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी स.सभासदांचे सुचनेबाबत संपूर्ण माहिती पुढील सभेत द्यावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** पिरबाजार येथील शाळेच्या कामासाठी टेंडर मागविण्यांत आले आहे. अनेक वेळा मागणी करुनही काम हाती घेतले जात नाही. याबाबत खुलासा व्हावा.

**उप अभियंता (इमारती) :** पिरबाजार शाळेच्या कामासाठी वसुल झालेले दरपत्रक अंदाजपत्रकीय दराचे असून संचिका मान्यतेसाठी वरीष्ठांकडे दाखल करण्यांत आली आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.केशव सोनवणे :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे काम चालणार असेल तर दर आठ दिवसाला सभा घेणे योग्य होणार नाही. या कामाचे दरपत्रक उघडून एक महिन्याचा कालावधी झालेला आहे. अद्याप काम हाती घेण्यांत आले नाही.

**मा.सभापती :** पिरबाजार शाळेच्या कामाचा प्रस्ताव उपअभियंता (इमारती) यांनी पुढील सभेत मांडावा.

**श्री.तुळशीराम भगुरे :** हरसुल येथील खडी रस्ते, खांडकी बसविणे ही कामे अे-१ वर करुन घेण्यांत यावीत असा मागील सभेत निर्णय झाला असतांना लेखाधिकारी यांनी त्यास मंजूरी देवून सदर संचिका मा.आयुक्तांकडे न पाठवता संबंधित उपअभियंता यांचेकडे परत पाठवून या संचिका उप अभियंतांनी मा.आयुक्तांकडे पाठवाव्यात असा अभिप्राय दिला आहे. त्यामुळे या कामाला विनाकारण विलंब होत आहे.

**लेखाधिकारी :** सभागृहात चुकीची माहिती दिली जात आहे. हरसुल येथील खडी रस्ते व खांडकी बसविण्याच्या कामाच्या संचिकेवर मा.आयुक्त यांची मंजूरी घेवून समितीची मंजूरी देण्यांत यावी असा अभिप्राय दिला आहे.

**श्री.तुळशीराम भगुरे :** हरसुल येथे पाण्याची टाकी बांधकामाच्या कामासाठी ८८ मध्ये अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर संचिकेवर स्थायी समितीच्या मंजूरीची आवश्यकता असल्याचा अभिप्राय लेखाधिकारी यांनी दिला आहे. पडेगांव व इतर ठिकाणी पाण्याची टाकी बांधण्याच्या कामासाठी सर्वसाधारण

सभेने मंजूरी दिली असतांना या कामासाठीच स्थायी समितीच्या मंजूरीची आवश्यकता का भासते. कामाचे अंदाजपत्रक ८८ चे असल्यामुळे गुत्तेदाराने टेंडर घेतले नाही किंवा जादा दराचे टेंडर भरले तर त्यांना हा जादा पैसा कोण देणार याचा खुलासा व्हावा.

**जलगृह अभियंता :** सदर प्रकरणी लेखाधिकारी यांचेशी चर्चा केली. नजरचुकीने अभिप्राय दिला गेला असा खुलासा त्यांनी केला आहे. पाण्याचे टाकीबाबतची कार्यवाही पुढे चालू आहे.

**मा.उपआयुक्त :** सदर प्रकरणी आठ दिवसांत चौकशी करुन अहवाल देण्यांत येईल.

**श्री.गजानन बारवाल, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.प्रभाकर विधाते, श्री.केशव सोनवणे :** सोडीयम दिवे व हॉलोजन लाईट प्रकरणी मागील सभेत निर्णय घेण्यांत आला आहे. त्यानुसार वार्डात नवरात्र महोत्सवानिमित्त विद्युत व्यवस्था करण्याबाबत लेखी पत्र दिले. शिवाय संबंधितांची प्रत्यक्ष भेटही घेतली आहे. याही नंतर विद्युत व्यवस्था करण्यांत यावी. त्यासाठी जो खर्च येईल. तो स्वतः भरण्यात तयारआहे. असे सांगितले तरीपण नवरात्र महोत्सवाच्या ठिकाणी विद्युत व्यवस्था झाली नाही. नवरात्र महोत्सव सुरु होऊन ४ दिवस झाले तरी ही परिस्थिती आहे. मंत्रिमंडळ बैठकी निमित्त मात्र ताबडतोब विद्युत व्यवस्था केली जाते. तेव्हा संबंधित अधिकारी काम करत नसतील तर ५६ अ प्रमाणे कार्यवाही करावी. आज सभा असतांना संबंधित अधिकारी रजेवर आहेत. तेव्हा नवरात्र महोत्सवासाठी विद्युत व्यवस्था करण्याबाबत जो अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यांत यावी. अनेक वेळा मागणी करुनही नवरात्र महोत्सवा सारख्या प्रसंगी विद्युत व्यवस्था झाली नाही. म्हणून आम्ही ५.०० मिनीटाकरिता सभात्याग करत आहोत. स.सभासदांनी ४.१० वाजता सभात्याग केला.

**मा.उपआयुक्त :** सभेचे आयोजन झालेले असतांना शाखा प्रमुखांनी विभाग प्रमुखांना सुटी देवू नये.

**श्री.नाराण फत्तेलष्कर, श्री.प्रभाकर विधाते :** बेगमपुरा शाळा येथील पाण्याच्या टाकीचे कामाबाबत खुलासा करण्यांत यावा.

**उप अभियंता, इमारती :** या ठिकाणी पाण्याच्या टाकीची तरतूद नाही.

**अतिरिक्त शहर अभियंता :** बेगमपुरा शाळा येथे पाण्याच्या टाकीचे कामाचा समावेश आहे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** संबंधित अधिकारी सभागृहाला चुकीची माहिती देत आहे. येत्या सोमवारी मा.उपआयुक्त, सभापती व आणखी दोन स.सभासद यांचे समवेत या कामाची पाहणी करावी. या ठिकाणी पाण्याची टाकी असेल तर त्या कामाचे बिल संबंधित अधिकाऱ्यांच्या पगारातून देण्यांत यावे. अधिकाऱ्यांनी अशी चुकीची माहिती सभागृहास देऊ नये. येत्या चार दिवसात पाण्याच्या टाकीसाठी नळ कनेक्शन तसेच मुलांसाठी संडास/मुतारीची व्यवस्था करण्यांत यावी.

**मा.सभापती :** पुढील सभेत सदर प्रकरणी तसेच हॅलोजन व सोडीयम लाईट बाबत सविस्तर माहिती देण्यांत यावी. स.सभासद सर्वश्री.गजानन बारवाल, प्रभाकर विधाते, गिरजाराम हाळनोर, केशव सोनवणे यांनी ४.१५ वाजता सभागृहात प्रवेश केला.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** उप अभियंता इमारती यांनी पिरबाजार शाळेच्या कामाची संचिका अतिरिक्त शहर अभियंता यांचेकडे पडून असल्याचा खुलासा केला आहे.

मात्र अतिरिक्त शहर अभियंता यांचेकडे दोन दिवसापेक्षा जास्त काळ संचिका प्रलंबित नसते. असा खुलासा संबंधित करतात. तेव्हा या बाबत खुलासा व्हावा.

**अति.शहर अभियंता :** दोन दिवसापेक्षा जास्त काळ कोणतीही संचिका प्रलंबित राहात नाही. ही बाब खरी आहे. पिरबाजार शाळेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.२५,०००/- पेक्षा जास्त रकमेचे असतांना या कामासाठी अे-१ वर दरपत्रके कशी मागविण्यांत आली. याबाबत मा.आयुक्त यांचेकडून कारणे दाखवा नोटीस मिळाली आहे. त्याबाबतचे उत्तर अद्याप आले नाही.

**मा.सभापती :** यापुर्वी २५,०००/- आणि त्यापेक्षा जास्त रकमेची कामासाठी अे-१ वर दरपत्रके मागविण्यांत आली आहेत. तरीपण दरपत्रके मागविण्याबाबत काय नियम आहेत. याचा विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** दरपत्रके नियमाबाबत अभ्यास करुन पुढील सभेत याबाबत खुलासा करण्यांत येईल.

**मा.सभापती :** सभागृहाने घेतलेल्या निर्णयावर त्वरीत कार्यवाही करण्याऐवजी यांना त्या कारणामुळे काम करण्यांस विलंब केला जातो. तसेच सभागृह काही प्रकरणी खुलासा मागितला असता प्रत्येक खुलासा बाबत पुढील सभेत माहिती देण्यांत येईल असे अधिकारी सांगतात तेव्हा आजची सभा पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यांत येते.

आजची सभा तहकुब झाल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १६.१०.१९९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**दिनांक ११.१०.१९९१ रोजी तहकुब झालेली स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १६.१०.१९९१ रोजी मा.सभापती श्री.मो.इस्माईल अ.करीम यांचे अध्यक्षतेखाली दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात सुरु झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

१. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
२. श्री.फैयाज खान अहमद खान
३. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री.जावेद हसन खान कसीम हसन खान
५. श्री.पालीवाल विजय गोविंदलाल
६. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
७. श्री.भगुरे तुळशीराम छगन
८. श्री.बारवाल गजानन रामकिसन
९. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
१०. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र.१५९/१ :**

दिनांक २५.०९.९१ च्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

**श्री.तुळशीराम भगुरे, श्री.नारायण फत्तेलष्कर :** दिनांक २५.०९.९१ च्या सभेत "कर्मचाऱ्यांना देय असलेल्या वैद्यकीय भत्याबाबतची माहिती सहाय्यक आयुक्त-१ व सहाय्यक आयुक्त-२ यांचेकडून सभागृहात पुढील सभेत पुरविण्यांत येईल. असा खुलासा आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी केला आहे. परंतू इतिवृत्तांमध्ये याबाबतची नोंद घेण्यांत आलेली नाही. तेव्हा आवश्यक ती दुरुस्ती करुन वैद्यकीय भत्याबाबत सभागृहास माहिती देण्यांत यावी."

**मा.सभापती :** स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे ठराव क्र.१४७ मध्ये वैद्यकीय भत्यावरील चर्चेमध्ये कर्मचाऱ्यांना देय असलेल्या वैद्यकीय भत्याबाबतची माहिती सहायक आयुक्त-१ व सहाय्यक आयुक्त-२ सभागृहास पुढील सभेत पुरविण्यांत येईल अशी वाढ करण्यास मंजूरी देण्यांत येते. याबाबतची माहिती देतांना सहाय्यक आयुक्त-१ व २ यांनी कर्मचाऱ्यांचे नांव, रोगाचा प्रकार, मागणी केलेली एकूण रक्कम, देय असलेली रक्कम मंजूर केलेली रक्कम, देय असलेली रक्कम मंजूर केलेली रक्कम, शेरा इ.माहिती सभागृहाला पुढील सभेत देण्याची व्यवस्था करावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** एखाद्या प्रकरणी सभासदांनी लेखी माहिती मागितली असल्यास संबंधित विभागाचे अधिकारी असे सांगतात की, सर्व साधारण सभेत माहिती दिली जाते. तेव्हा सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची माहिती देण्यांची गरज नाही. या उलट यापुर्वी सभासदाने विचारलेल्या लेखी प्रश्नाचे उत्तर त्या-त्या

विभागाकडून मिळत होते. मग वरील पध्दत आताच का अंमलात आणली याचा खुलासा व्हावा.

**मा.उपआयुक्त :** प्रशासनाकडून हवी असलेली माहिती विचारतांना बहुतेक सभासद त्या प्रकरणाची दहा वर्षापुर्वीची माहिती उपलब्ध करुन देण्याची मागणी करतात. अशा प्रकरणी सभासदांनी विचारलेली माहिती उपलब्ध करुन देण्यास सहाजिकच वेळ लागतो. या शिवाय मुं.प्रा.मनपा अधिनियमात स.सभासदांनी विचारलेल्या लेखी प्रश्नाची माहिती देण्यांत यावी असे नमूद केल्याचे आढळून येत नाही. तरी पण याबाबत मनपा विधी सल्लागार यांचा सल्ला घेण्यांत येईल.

**मा.सभापती :** मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ अन्वये सभासदांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत लेखी माहिती देण्याची तरतूद आहे काय? या बाबतचा खुलासा पुढील सभेत देण्यांत यावा.

**श्री.केशव सोनवणे :** शहरातील स्लम व इतर भागात वास्तव्य करणाऱ्या नागरिकांना नळ कनेक्शन घेणे आणि मालमत्ता कराची आकारणी करुन घेणे या प्रकरणी बऱ्याचा अडचणी येतात. नागरिकांनी नळ कनेक्शन साठी दाखल केलेल्या संचिकावर सहाय्यक संचालक नगर रचना यांचा अहवाल घेतला जातो. आणि अशा परिस्थितीत नागरिकांना नळ कनेक्शन न मिळाल्यामुळे विना परवाना नळ कनेक्शन जोडून घेण्याची प्रवृत्ती वाढत आहे. आणि पर्यायाने तेव्हा या बाबींवर विचार व्हावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** विष्णु नगर/उत्तमनगर भागातील एका नळ कनेक्शनच्या संचिकेवर मा.नगररचना संचालक यांनी सदर भाग शैक्षणिक झोनमध्ये असल्याने विकासखर्च घेता येत नाही. असा अभिप्राय दिला आहे. सदर भागात असलेले आरक्षण वगळण्याबाबत सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर झालेला आहे. या शिवाय याठिकाणी नागरी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या आहेत. तेव्हा ही विसंगती कशी याबबत खुलासा होऊन नागरिकांना शक्य तितक्या लवकर नळ कनेक्शन कसे मंजूर करता येईल. याबाबत विचार व्हावा.

**मा.सभापती :** स.सभासदांनी मांडलेल्या सुचनावर विचार करण्याच्या दृष्टीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी शहर व सिडको भागात पाणी पुरवठा करण्यासाठी एका वर्षात किती खर्च येतो. त्यापैकी एका वर्षात किती उत्पन्न होते. एकूण नळ कनेक्शन किती आहेत. याबाबतची माहिती पुढील सभेत सादर करावी. तसेच या माहिती सोबत नळ कनेक्शन संबंधाने प्रशासनाने तयार केलेला ठराव पुढील सभेत मांडण्यांत यावा.

**श्री.प्रभाकर विधाते :** दि.२५.०९.९१ च्या सभेत वार्ड क्र.३ मधील विद्युत व्यवस्थेबाबत झालेल्या चर्चेनुसार मकबऱ्यासमोरील पोलवर असलेला जादा बंद मरक्युरी लाईट काढून घेतला आहे. तो कुंभारगल्ली येथे लावण्यास सांगितलेला होता. पण प्रत्यक्षात त्या ठिकाणी लावण्यांत आलेला नाही. याशिवाय वार्ड क्र.३ मध्ये ३५ पोल वरील लाईट अद्याप बंद आहे. तेव्हा बंद असलेल्या लाईट बाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा. तसेच काढून घेण्यांत आलेला मरक्युरी लाईट कोठे आहे. याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** उप अभियंता विद्युत यांनी पुढील सभेपर्यंत वार्ड क्र.३ मधील बंद असलेले सर्व दिव्यांबाबत च्या तक्रारी पुढील सभेपर्यंत दुर करण्याची व्यवस्था करावी. अन्यथा सभागृह नियमाप्रमाणे कार्यवाही करील. याची नोंद घेण्यांत यावी.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** महापालिकेतील एका विभागात कनिष्ठ अभियंता यांना उठवून त्या जागेवर एका लिपीकाला बसविण्यांत आले आहे. ही बाब खरी आहे काय? असल्यास त्याबाबतची चौकशी करण्यांत यावी.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत अतिरिक्त शहर अभियंता व उपअभियंता विद्युत यांचेशी झालेल्या चर्चेप्रमाणे आपसातील समझोत्याने असा बदल करण्यांत आलेला आहे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** महापालिकेतील एका विभागात कनिष्ठ अभियंता यांना उठवून त्या जागेवर एका लिपिकाला बसविण्यांत आले आहे. ही बाब खरी आहे काय? असल्यास त्याबाबतची चौकशी करण्यांत यावी.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत अतिरिक्त शहर अभियंता व उपअभियंता विद्युत यांचेशी झालेल्या चर्चेप्रमाणे आपसातील समझोत्याने असा बदल करण्यांत आलेला आहे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** दि.२५.०९.९१ च्या सभेतील चर्चेनुसार बायजीपुरा येथील निवासस्थानाबाबत सभागृहात देण्यांत आलेल्या माहितीनुसार काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा.उपआयुक्त :** बायजीपुरा येथे अस्तित्वात असलेल्या महापालिका निवासस्थानाबाबत दि.२५.०९.९१ च्या सभेत सविस्तर माहिती दिली आहे. या निवासस्थानामध्ये वास्तव्य करण्यास वर्ग-२ चे अधिकारी इच्छुक नाहीत. ही बाब लक्षात घेता उरलेल्या वर्ग-३ व ४ च्या बायजीपुरा निवासस्थानाबाबत या ठिकाणी राहात असलेल्या कर्मचाऱ्यांना नियमित करावे काय? याबाबत प्रशासकीय समितीत निर्णय घेऊन कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.जावेद हसन खाँन :** रॉक्सी सिनेमा शेजारी असलेली दर्पण भवन ही इमारत कोणाच्या मालकीच्या जमीनीवर आहे. व त्यास परवानगी कशी देण्यांत आली. तसेच बांधकाम परवानगी किती क्षेत्रासाठी देण्यांत आली याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** स.सभासदांनी विचारलेल्या सुचनेबाबत मा.सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी पुढील सभेत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**श्री.केशव सोनवणे :** सभागृहाने रेल्वेस्टेशन येथील मनपा निवासामध्ये फक्त वर्ग-२ चे अधिकाऱ्यांच्या निवासस्थानामध्ये वाढ करण्यांस मंजूरी दिली आहे. त्याऐवजी या ठिकाणी राहत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना सुविधा उपलब्ध होईल असे काम हाती घेण्यांत यावे.

**मा.सभापती :** सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नियमानुसार वर्ग-२, वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांला किती क्षेत्रफळाचे निवास्थान असावे याबाबतची माहिती अतिरिक्त शहर अभियंता यांनी पुढील सभेत सादर करावी.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** दि.२५.०९.९१ च्या सभेत नेहरु रोजगार योजने अंतर्गत दैनिक लोकमतमध्ये प्रसिध्द झालेल्या वृत्तांबाबत पुढील सभेत माहिती देण्यांत येईल असा निर्णय घेण्यांत आलेला आहे. तेव्हा नियमानुसार सभागृहात खुलासा करण्यांत यावा.

**मा.सभापती :** स.सभासदांनी विचारलेल्या सुचनेवर पुढील सभेत संबंधित अधिकाऱ्यांनी सदर विषयी माहिती द्यावी असा निर्णय घेतला जातो. तेव्हा यानंतर सभासदांच्या कोणत्याही सुचनेवर संबंधित अधिकाऱ्यांनी पुढील सभेत माहिती द्यावी असा निर्णय झाल्यानंतर त्यासंबंधीची माहिती प्राप्त न झाल्यास

संबंधित अधिकाऱ्यांवर समिती कार्यवाही करीत आणि या बाबतची जबाबदारी त्या अधिकाऱ्यांवर व्यक्तिगत रित्या राहील.

प्रशासनातर्फे विविध विभागात काम करणाऱ्या अंदाजे ८/१० गुत्तेदारांचा काळ्या यादीत समावेश करण्यांत आल्याची माहिती सभागृहास प्राप्त झालेली आहे. या प्रकरणी चौकशी करण्यासाठी मा.सभापती, स.सभासद श्री.गजानन बारवाल, श्री.तुळशीराम भगुरे यांचा समावेश असलेली एक उप समिती कायम करण्यांत येते.

दि.११.१०.९१ च्या सभेत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्यातर्फे ऐनवेळेवर प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आवश्यक असलेले औषधी खरेदी बाबतचा प्रस्तावावर सभा तहकुब झाल्यामुळे निर्णय होवू शकलि नाही. ही बाब लक्षात घेता मनपा प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक असलेली औषधी खरेदी करण्याकरिता तुर्तास रक्कम रु.४० ते ४५ हजार खर्चाची औषधी खरेदी करण्यांस मान्यता देण्यांत येते. याशिवाय १९९१-९२ वर्षाकरिता खरेदी करण्यांत येणाऱ्या औषधींची यादी समितीच्या सर्व सभासदांना देण्यांची व्यवस्था करण्यांत यावी.

स.सभासद श्री.शांताराम काळे यांच्या स्वेच्छा निधीतून रक्कम रु.२५ हजाराचे क्रिडा साहित्य खरेदी करण्यांस मंजूरी मिळाली आहे. त्याऐवजी स.सभासद श्री.शांताराम काळे यांच्या स्वेच्छा निधीतून वार्ड क्र.४८ अंतर्गत असलेल्या महापालिका शाळेतील इयत्ता १ ली व २ री च्या विद्यार्थ्यांना ब्लॅक बोर्ड योजने अंतर्गत मराठी मुळाक्षरे फिक्सींग, पिक्चर, फन, ॲन-लर्न व प्राणी संग्रह संच इत्यादी शालेय साहित्य खरेदी करण्यास रक्कम रु.२५ हजाराच्या खर्चास मंजूरी देण्यांत येते. अशी दुरुस्ती करण्यांत येते.

ठराव क्र.१५८ अन्वये ड्रेनेज लाईनचे चोकअप काढण्यासाठी साऊदर्न इक्विपमेंट प्रा.लि.मद्रास यांनी विकसीत केलेले-एक नग संयंत्र खरेदीस र.रु.२६,५७५/- च्या खर्चास मंजूरी मिळाली आहे. परंतू यात वरील रकमेच्या ५.२५% आबकारी कर जादा द्यावा लागेल. या कंपनीने नमूद केलेल्या अटीचा समावेश करण्याचे नजर चुकीने राहून गेले आहे. तेव्हा वरीलप्रमाणे दुरुस्ती करुन ड्रेनेज लाईन चोकअप काढण्यासाठी साऊदर्न पॉवर टेक इक्वीपमेंट प्रा.लि.मद्रास यांनी विकसीत केले संयंत्र (एक नग) खरेदी करण्यास रक्कम रु.२६,५७५/- अधिक मुळ रकमेवर ५.२५% जादा आबकारी कर असे एकूण रक्कम रुपये २७,९७०.१८ पैसे (रु.२६,५७५+१३९५=१८) च्या खर्चास मंजूरी देण्यांत येते अशी दुरुस्ती करण्यांत येते.

**ठराव :**

वरील दुरुस्त्यांसह २५.०९.९१ च्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६० :**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अग्निशमन अधिकारी हे एक पद रुपये ३३५-६८० या वेतनश्रेणीत कार्यरत आहे. परंतू अग्नीशमन अधिकारी यांचे कार्यक्षेत्र, कामाचा व्याप, कार्यालयीन जबाबदाऱ्या तसेच शैक्षणिक पात्रता याचा विचार केल्यास रु.३३५-६८० ही वेतनश्रेणी खुपच कमी आहे.

करिता अग्नीशमन अधिकारी या पदाची वेतनश्रेणी रु.३३५-६८० या वेतनश्रेणी ऐवजी रु.५०० ते ९०० सुधारित वेतनश्रेणी रुपये १६४०-६०-२६००-७५-२९०० या प्रमाणे वेतनश्रेणीत सदरील ठराव मंजूरीच्या दिनाकांपासून वाढ करण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन अधिकारी या पदाचे कार्यक्षेत्र, कामाचा व्याप, कार्यालयीन जबाबदाऱ्या तसेच शैक्षणिक पात्रता याचा विचार करता सदरील पदाची वेतनश्रेणी रुपये ३३५-६८० या वेतनश्रेणी ऐवजी रु.५००-९०० म्हणजे सुधारित वेतनश्रेणी रु.१६४०-६०-२६००-७५-२९०० याप्रमाणे वेतनश्रेणीत ठराव मंजूरीच्या दिनांकापासून वाढ करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६१ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जलनिःसारण विशेष कार्यक्रमांतर्गत मोहल्ला हर्सुल येथे आर.सी.सी.एन-२ क्लासचे ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.१७,०७,२४७.६० यास शासनाची प्रशासकीय मान्यता (विशेष अनुदान) विकास/१०९०/प्र.क्र./३७(अ) योजना-८, दि.१९.०१.१९९१ द्वारे मिळालेली आहे. सदरच्या कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.३ जी की दैनिक लोकमत व औरंगाबाद टाईम्स मध्ये जा.क्र./मनपा/विका/५९/९१, दि.३०.०५.९१ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.आर.एल.बारवाल | - | ६५.१% जास्त |
| २. | श्री.मे.उदय इंजिनिअरींग | - | ३४% जास्त |
| ३. | मे.एम.एल.पडघन | - | २६% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या श्री.एल.एम.पडघन यांचे दर सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६% जास्त होते. मात्र एल.एम.पडघन यांचे दर जास्त असल्यामुळे त्यांनी दिलेल्या दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी दि.२६.०७.९१ रोजी पत्र देवून कार्यकारी अभियंता यांचे दालनात चर्चेसाठी बोलाविण्यांत आले होते. त्यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६% जास्त ऐवजी १९% जास्त दराने काम करण्यांस तयार असल्याचे लेखी दिले आहे. मात्र उपरोक्त दरसुध्दा जास्त असल्याने दुसऱ्या तसेच तिसऱ्या कमी दराच्या ठेकेदारांकडून सुध्दा सिलबंद लिफाफ्यात ऑफर देण्यासाठी श्री.आर.एल.बारवाल व मे.उदय इंजिनिअरींग कं. यांना दि.२०.०८.९१ रोजी पत्र देवून कळविले असता संबंधित ठेकेदारांनी त्यांची पुनर ऑफर सादर केली असून त्यांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.उदय इंजिनिअरींग कंपनी | - | १४.२५% जास्त |
| २. | श्री.आर.एल.बारवाल | - | ४.१८% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.१८% जास्त दराची श्री.आर.एल.बारवाल यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलनि:सारण विशेष कार्यक्रमांतर्गत मोहल्ला हर्सुल येथे आर.सी.सी.,एन.पी.-२ क्लासचे ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.१८% कमी

**विषय क्र.१६२/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, वार्ड क्र.२६ येथील जोहरीवाडा, नगारखाना गल्ली व केळीबाजार येथील खांडकी दुरुस्ती करणे तसेच नविन खांडकी बसविणे बाबतच्या कामासाठी सन १९८९-९० च्या सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.४०,०००/- च्या अंदाजपत्रकास दि.१२.११.९० ला मा.आयुक्तांची मंजूरी मिळाली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.८ दि.१५.०१.९१ रोजी प्रगट निविदा मागविल्या असता एकूण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मौला अलियार खान | - | १०.०१% कमी |
| २. | श्री.देवराव वाहुळ | - | २२.५१% कमी |
| ३. | श्री.गिरीश सिकची | - | २५% कमी |
| ४. | श्री.अब्दुल कलीम | - | २०% कमी |
| ५. | श्री.खेडकर बी.आर. | - | ७% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराची निविदा श्री.गिरीश सिकची याची आहे. परंतू गिरीश सिकची ठेकेदार यांना स्थायी समिती ठराव क्र.१० प्रमाणे दि.२४.०६.९१ ला मंजूरी मिळाली असता त्यांनी आजपर्यंत २% अनामत रक्कम कार्यालयात जमा केली नाही.

त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचे ठेकेदार श्री.देवराव वाहुळ यांचे निविदाचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.५१% कमी दराची आहे. करिता श्री.गिरीश सिकची यांची १% इसाऱ्याची रक्कम जप्त करुन दुसऱ्या क्रमांकाचे गुत्तेदार श्री.देवराव वाहुळ यांची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२६ मधील जोहरीवाडा, नगारखाना गल्ली व केळीबाजार येथील खांडकी दुरुस्त करणे तसेच नवीन खांडकी बसविणेच्या कामाकरिता दुसऱ्या क्रमांकाचे कमी दराचे ठेकेदार श्री.देवराव वाहुळ यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.५१% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच पाहिले कमी दराचे ठेकेदार श्री.गिरीश सिकची यांनी २% अनामत रक्कम न भरल्यामुळे त्यांनी कार्यालयात जमा केलेली १% इसाऱ्यांची रक्कम जप्त करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६३/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जय विश्व भारती कॉलनी येथील स.न.६२ येथील मनपाच्या खुल्या जागेवर तार फेन्सींग करणे बाबतचे कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.३३,९७१/- ला मा.आयुक्तांनी मंजूरी दिल्यानुसार सदर कामाचे बी-१ नमुन्यात सूचना दि.०३.०७.९१ रोजी दैनिक मराठवाडा व मुकद्दस मध्ये प्रसिध्द करण्यांत आले. त्यानुसार एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.आर.ए.शेख | - | १६.५% कमी |
| २. | श्री.विशाल कन्स्ट्रक्शन | - | ८% कमी |

३. श्री.आर.एल.बारवाल - ४.४४% कमी
४. श्री.कुलवंतसिंग - ५% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.५% कमी दराची श्री.आर.ए.शेख यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जय विश्वभारती कॉलनी येथील स.नं.६२ येथील मनपाच्या खुल्या जागेवर तार फेन्सींग करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.५% कमी दराच्या श्री.आर.ए.शेख यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६४/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहरातील विविध रोडवर लेन मार्कींग करणे व ट्राफिक बॅरिअर्सचा पुरवठा करणेच्या कामासाठी र.रु.६,१०,८२०/- चे अंदाजत्रक तयार करण्यांत आले असून "ट्रफिक" या सदराखाली "गृहविभाग" (वाहतुक) यांचेकडून रु.१४ लाख शासन निर्णय क्र.विकास-१०९०/प.क्र.३७ (अ)/योजना-८, मंत्रालय, मुंबई दि.१९ जानेवारी १९९१ च्या विशेष विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हा पोलिस अधिक्षक औरंगाबाद यांनी काम करणेसाठी शिफारस केलेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.४ (१९९१-९२) दि.१६.०७.९१ च्या निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदापैकी श्री.एम.एम.बेग यांची ९% जास्त दराने व मे.फयाज असोशिएटस यांची १२% जास्त दराची निविदा आहे. परंतू दर जास्त असल्यामुळे मा.आयुक्त यांचे दि.०७.०९.९१ चे आदेशानुसार दोन्ही ठेकेदारास दर वाटाघाटीसाठी बोलावले असता सदरच्या दोन्ही ठेकेदारांनी बंद पाकीटामध्ये लेखी सम्मतीद्वारे खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

१. श्री.एम.एम.बेग - ३.९२% जास्त
२. श्री.मे.फराज असोशिएटस - ७.५०% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा (वाटाघाटीद्वारे) ३.९२% जास्त दराची श्री.एम.एम.बेग यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विविध रोडवर लेन मार्कीग करणे व ट्रफिक बॅरिअर्सचा पुरवठा करणेच्या कामाकरिता प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३.९२% जास्त दराची श्री.एम.एम.बेग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६५/७ :**

उप अभियंता शासकीय जलनि:सारण विशेष कार्यक्रम यांनी प्रस्ताव सादर केला की, विशेष कार्यक्रम यांनी प्रस्ताव सादर केला की, मसनतपूर येथे आर.सी.सी.एन.पी.२ क्लासची ड्रेनेजची वितरण व्यवस्था करणे बाबतच्या कामास अंदाजित र.रु.३,८५,०००/- ला

शासनाने प्रशासकीय मान्यता (विशेष अनुदान) विकास १०९० प्र.क्र.-३७ (अ) योजना ८ दिनांक १९.०१.१९९१ नुसार प्राप्त झाली.

या कामासाठी निविदा सूचना क्र.२ जी की, दैनिक अजिंठा व आलमगीर टाईम्समध्ये जा.क्र./मनपा/विका/५८/९१, दि.३०.०५.९१ नुसार प्रसिध्द करण्यांत आली. प्रगट निविदा मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेस एकूण नऊ निविदा विक्री झाल्या पैकी एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एम.एम.बेग | - | १०.५०% जास्त |
| २. | श्री.आर.एल.बारवाल | - | १५.३% जास्त |
| ३. | श्री.एस.ए.नवाब | - | १३.२५% जास्त |
| ४. | श्री.कैसर खान | - | ०.०१% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री.कैसर खान यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मसनतपूर येथे आर.सी.सी.एन.पी-२ क्लासची ड्रेनेजची वितरण व्यवस्था करणेच्या कामाकरिता र.रु.३,८५,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या श्री.कैसर खान यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६६/८ :**

कार्यकारी अभियंता महानगरपालिका, यांनी प्रस्ताव सादर केला की, जलनि:सारण विशेष कार्यक्रम योजना विभागामार्फत तयार केलेल्या मो.नारेगांव येथे आ.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाच्या अंदाजपत्रक र.रु.११,३४,१५०.७० ला शासनाने प्रशासकीय मान्यता (विशेष अनुदान) विकास/१०९०/प्र.क्र.३७/(अ)/योजना-८, दि.१९.०१.९१ नुसार दिलेली आहे.

त्यानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२/९१-९२ जी की, दैनिक अजिंठा व दै.आलमगीर टाईम्स मध्ये मनपा/विका/५८/९१, दि.३०.०५.९१ नुसार प्रकट निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विशाल कन्स्ट्रक्शन | - | ८% जास्त |
| २. | एस.ए.नवाब | - | ४.९७% जास्त |
| ३. | आर.एल.बारवाल | - | १५% जास्त |
| ४. | एम.एम.बेग | - | १५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९७% अधिक दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा आहे. उपरोक्त कामाच्या निविदेत सिमेंटचा दर प्रति गोणी ७१.४० ऐवजी १०१.३० दर्शविला आहे. त्यानुसार श्री.एस.ए.नवाब यांचे दर १.४३% कमी येतात. करिता प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलनिःसारण विशेष कार्यक्रम योजना विभागामार्फत तयार केलेल्या मो.नारेगांव येथे आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९७% कमी दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६७/९ :**

वार्ड क्र.३३ मो.बुक्कलगुडा येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या र.रु.४१,२०७/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली असून सदरचे अंदाजपत्रक सन १९९०-९१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी दै.अजिंठा व आलमगीर टाईम्स या या वर्तमानपत्र पत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कैसर खान | - | १०% जास्त |
| २. | श्री.सलीम अहेमद | - | ४% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराचे श्री.सलिम अहेमद यांचे दरपत्रक आहे. मा.कार्यकारी अभियंता यांचे आदेशानुसार संबंधितास वाटाघाटी करिता दि.२०.०८.९१ ला पत्र देण्यांत आले होते. संबंधित गुत्तेदार यांनी सदर कामा ४% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्यास संमती दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३३ बुक्कलगुडा, शहाबाजार येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेचे काम गुत्तेदार श्री.सलीम अहेमद यांनी लेखी सम्मती दिल्यानुसार त्यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६८/१० :**

वार्ड क्र.४६ मो.समर्थनगर येथे १००० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.पाईप लाईन टाकणेच्या र.रु.४९,७००/- चे सन १९९०-९१४ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदर काम सन १९९१-९२ च्या दुरुस्ती व देखभाल या तरतूदीतून काम करणेस मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदर कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.५/९७०/९१, दि.२१.०८.९१ नुसार दै.लोकविजय व मुफस्सीर या दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सुनिल जैस्वाल | - | १५.०५% जास्त |
| २. | श्री.एस.के.मिसाळ | - | ०.१% कमी |
| ३. | श्री.सय्यद सिराजोद्दीन | - | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराचे श्री.एस.के.मिसाळ यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४६ मो.समर्थनगर येथे १००० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.पाईप लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री.एस.के.मिसाळ यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६९/११ :**

जलनिःसारण अभियंता-१ यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र.१ मधील विविध ठिकाणी असलेल्या ड्रेनेज लाईनची देखभाल व दुरुस्ती करणे बाबत अंदाजपत्रक र.रु.२,६८,५८४.०० चे तयार करण्यांत आले ते असून मा.आयुक्तांनी सदर अंदाजपत्रकास दि.१६.०९.९१ ला मंजूरी दिलेली आहे. तसेच सदरील अंदाजपत्रक सन १९८९-९० च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यांत आले आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

**मा.सभापती :** झोन क्र.१ प्रमाणे इतर झोन करिताही अशी मंजूरी देणे आवश्यक वाटते. त्यामुळे टेंडर वर्क पध्दतीमुळे कामावर योग्य नियंत्रण राहील. तसेच महापालिकेचा आर्थिक फायदाही होईल. ही बाब लक्षात घेता सर्व झोन करिता टेंडर पध्दतीनेच वरील कामे हाती घेण्यांत यावीत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र.१ मधील विविध ठिकाणी असलेल्या ड्रेनेज लाईन ची देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामाकरिता र.रु.२,६८,५८४.०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१७०/१२ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.४६ मधील महावीर चौकाजवळील म्हाडातर्फे बांधण्यांत आलेल्या गाळ्यांना पाणी पुरवठा व्यवस्था करणेसाठी १०० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकण्याचे र.रु.२,२८,९१०/- चे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकीचे सन १९८९-९० चे दरसुचीनुसार तयार करण्यांत आले होते. सदरील काम करणेसाठी म्हाडातर्फे महानगरपालिकेमध्ये चेक क्र.०१५३००, दि.०४.०३.९१ अन्वये मनपा पावती क्र.०९११८, दि.०५.०३.९१ प्रमाणे रक्कम रु.२,२८,९१०/- जमा करण्यांत आले आहेत.

माजी आयुक्तांनी दि.१४.०२.९१ अन्वये निविदा मागविण्यास परवानगी दिली त्यानुसार लघुनिविदा सूचना क्र.८ (१९९०-९१) जा.क्र./८६०/९१, दि.२१.०३.९१ अन्वयचे मागविण्यांत आल्या असता फक्त अे.अे.अबेदी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त एकच निविदा प्राप्त झाली. श्री.अबेदी यांनी भरलेले दर जास्त असल्याकारणाने जा.क्र.९५३/९१, दि.२५.०४.९१ अन्वये पत्र देवून श्री.अबेदी यांनी दर कमी करण्याकरिता वाटाघाटी करिता कळविले असता संबंधिताने पाईप वाहतुकीकरिता खर्च जास्त येत असल्याने १५% जास्त दरापेक्षा दर कमी करणेस तयार नसल्याचे कळविले. करिता मा.आयुक्तांचे दि.१४.०५.९१ चे आदेशास अनुसरुन मनपा/पापु/१४१/९१, दि.१६.०५.९१ अन्वये दुसऱ्यांदा निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संजीव खर्डीकर | - | ४५% जास्त |
| २. | परदेशी वासुदेव इंटरप्राईजेस | - | १२.३७% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या परदेशी वाहुदेव इंटरप्राईजेस यांची निविदा सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.३७% जास्त दराची आहे.

परंतू परदेशी वासुदेव इंटरप्राईजेस यांनी दि.०४.०६.९१ रोजी पत्र देवून विनंती केली की, त्यांनी निविदेत दिलेले १२.३७% जास्त दर त्यांना परवडणारे नसून त्यांची निविदा ४३.७% जास्त दराने मंजूर करावी.

यानंतर जा.क्र./१३७६/९१, दि.०८.०७.९१ अन्वये दुसरे क्रमांकाचे गुत्तेदार संजीव खर्डीकर यांना परदेशी वासुदेव यांचे १२.३७% जास्त दराने काम करणेस तयार आहात काय. अशी विचारणा केली असता श्री.खर्डीकर यांनी ४०% जास्त दराने काम करणेस तयार असल्याचे कळवले. तसेच श्री.खर्डीकर यांनी पत्रामध्ये असेही लिहिले की, जर मनपा पाईपचा पुरवठा करणेस तयार असेल तर परदेशी वासुदेव यांच्या दरात म्हणजेच १२.३७% जास्त दराने काम करण्यांस तयार आहेत.

सी.आय.पाईपसह निविदा मागविण्यांत आल्यामुळे व सी.आय.पाईपचा दर जास्त असल्यामुळे तसेच काम लवकर करणे जरुरी असल्यामुळे सी.आय.पाईपचे ऐवजी अे.सी.पाईप टाकून काम करण्याचे ठरले असून मजूरीची रक्कम रु.३७,७९०/- इतकी आहे.

परदेशी वासुदेव इंटरप्राईजेस यांना पत्र देवून विचारणा केली असता त्यांनी मनपा अे.सी.पाईपचा पुरवठा करणेस तयार असेल तर १२% जास्त दराने काम करणेस तयार असल्याचे लिहिले.

यानंतर कार्यकारी अभियंता यांचे समक्ष परदेशी वासुदेव इंटरप्राईजेस यांनी चर्चेअंती सदरील काम ४.२७% जास्त दराने काम करणेस तयार आहे. असे लेखी दि.१३.०८.९१ रोजी लिहून दिले (मात्र अे.सी.पाईप कार्यालयाने पुरवावे लागेल.)

करिता सदरील प्रकरणी कामाची निकड व म्हाडा कार्यालयाचा पाठपुरावा लक्षात घेता हे काम लवकर करणे आवश्यक आहे. करिता र.रु.२,२८,९१०/- चे खर्चास मान्यता मिळणेस्तव व परदेशी वासुदेव इंटरप्राईजेस यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.२७% जास्त दराची निविदा (फक्त मजूरीचे दराकरिता) मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४६ मधील महावीर चौकाजवळील म्हाडातर्फे बांधण्यांत आलेल्या गाळ्यांना पाणीपुरवठा व्यवस्था करणेसाठी १००० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे कामाकरिता र.रु.२,२८,९१०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम परदेशी वासुदेव इंटरप्राईजेस यांचेकडून अंदाजपत्रकीय दरोपक्षा ४.२७% जास्त दराने (फक्त मंजूरीचे दराकरिता) करुन घेण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१७१/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, हॉटेल पंचवटी येथील चौकात वाहतुक स्वयंचलित सांकेताक बसवणेच्या कामाकरिता (दरसुची वाहतुक संकेतक) सन १९८८-८९ नुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.०२% कमी दराची मे.फरानी इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रानिक लेण औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल पंचवटी येथील चौकात वाहतुक स्वयंचलित संकेतक बसवणेच्या कामाकरिता रक्कम रु.१,८१,५४१/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.०८% कमी दराचे मे.फरानी इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रीक, औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१७२/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, लेबर कॉलनी ते मजनूहिल पर्यंत रस्ता दुभाजकांमध्ये भुमिगत केबल वर्क्स करुन स्टील ट्युबलर पोल रोवून त्यावर प्रत्येकी दोन नग १५० वॅट एच.पी.एस.व्ही.फिटींग (एकूण ४० नग) पोल ४८० नगर फिटींग पुरवठा करणे आणि बसविणेसाठी सा.बा.खाते (विद्युत) सन १९८९-९० च्या दरसुचीनुसार र.रु.६,८३,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदर खर्च विशेष शासकीय अनुदान या शिर्षकाखाली करण्यांत येईल. त्यास मान्यता मिळावी.

तसेच सदर कामासाठी दैनिक वर्तमानपत्र मराठवाडा व मुकदस हया दैनिकात निविदा सूचना प्रसिध्द करुन फेरनिविदा दुसरीवेळ मागविण्यांत आल्या असता मुदतीच्या आत एकूण पाच कोऱ्या निविदा विकल्या गेल्या असून शेवटच्या क्षणापर्यंत पांचही मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.शांती इलेक्ट्रीकल्स, लातूर | - | १.५% जास्त |
| २. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | - | ०.१% कमी |
| ३. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | - | ०.५% जास्त |
| ४. | मे.सत्यम वायर्स, औरंगाबाद | - | ०.५% जास्त |
| ५. | मे.इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | - | १% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची मे.लुना इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लेबर कॉलनी ते मजनूहील पर्यंत रस्ता दुभाजकामध्ये भुमिगत केबल वर्क्स करुन स्टील ट्युबलर पोल रोवून त्यावर प्रत्येकी दोन नग १५० वॅट एच.पी.एस.व्ही.फिटींग (एकूण ४० नग पोल + ८० नग फिटींग) पुरवठा करणे आणि बसविणेच्या कामाकरिता र.रु.६,८३,७००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१७३/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, समतानगर ते सिल्लेखाना हया रस्त्याचे खडीकरण करुन ह्युम पाईप कल्व्हेटचे बांधकाम करणेसाठी सन १९९०-९१ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर. दराने र.रु.२,९५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून शासनाचे सन १९९०-९१ च्या (७ कोटी) योजनेत त्यास मान्यता मिळालेली आहे. सदर कामाकरिता प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कुलवंतसिंग | - | ०.५०% कमी |
| २. | श्री.बी.आर.आनंद | - | ३% जास्त |

३. श्री.कैसर खान - ४% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराची श्री.कुलवंतसिंग यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समतानगर ते सिल्लेखाना या रस्त्याचे खडीकरण करुन ह्युम पाईप कल्व्हर्टचे बांधकाम करणेसाठी र.रु.२,९५,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराच्या श्री.कुलवंतसिंग यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ०२.११.१९९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**दिनांक ०२.११.१९९१ रोजी मा.सभापती श्री.मो.इस्माईल अ.करीम यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ३.०० वाजता स्थायी समिती सभेस सुरवात झाली. या सभेत कार्यालयीन अधिकाऱ्यांसह निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
२. श्री.फैयाज खान अहमद खान
३. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री.जावेद हसन खान कसीम हसन खान
५. श्री.पालीवाल विजय गोविंदलाल
६. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
७. श्री.भगुरे तुळशीराम छगन
८. श्री.बारवाल गजानन रामकिसन
९. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
१०. श्री.सोनवणे केशव काशिनाथ
११. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र.१७४/१ :**

दि.११.१०.९१ च्या तहकुब सभेचे व दिनांक १६.१०.९१ च्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.केशव सोनवणे :** महापालिका शिक्षक संघटनेने कार्यालयासमोर त्यांच्या मागणीसाठी उपोषणास सुरवात केली आहे. संघटनेच्या मागण्या विचारात घेता प्रशासन त्या मागण्या मान्य करु शकतील. त्याचप्रमाणे चटोपाध्याय आयोगाची अंमलबजावणी करण्याबाबतची मागणीही मंजूर करण्यासारखी आहे. तेव्हा प्रशासनाने शिक्षकांच्या मागणीबाबत लवकर कार्यवाही करुन मागण्या मान्य करण्याबाबत विचार करावा.

**शिक्षणाधिकारी :** उपोषणार्थी शिक्षकांच्या मागण्यांचे निवेदन नुकतेच मिळाले आहे. यात नमूद केल्याप्रमाणे महापालिका शिक्षकांना चटोपाध्याय आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याची कार्यवाही प्रशासनातर्फे कार्यरत आहे. या कामासाठी २/३ शिक्षकही कार्यालयात कामासाठी पाचारण केले आहेत. चटोपाध्याय आयोगाची वेतनश्रेणी लागू करण्यास आणखी एक महिना कालावधी लागेल. या बाबत आवश्यक ती जादा माहिती घेण्यांची कार्यवाही चालू आहे.

**मा.सभापती :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे प्रशासनातर्फे शिक्षकांना चटोपाध्याय आयोग लागू करण्याची कार्यवाही पुर्वीपासूनच कार्यरत आहे. तेव्हा याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यास वेळ लागेल यांची संघटनेस कल्पना आहे. तरीपण संघटनेने उपोषणाचा मार्ग अवलंबलेला आहे.

**श्री.केशव सोनवणे :** चटोपाध्याय आयोगाप्रमाणेच शिक्षकांच्या पगारातून दरमहा कपात होणाऱ्या भविष्य निर्वाह निधीबाबतच्या स्लिप मिळण्याबाबत ची शिक्षकांची मागणीही फार जूनी आहे. याबाबत शिक्षकांकडून अनेक वेळा मागणी करुनही त्याची पुर्तता करण्यांत आली नाही.

**शिक्षणाधिकारी :** सन १९८३ पासून शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधी बाबतचे काम पेडींग होते. शिक्षक विभागाचा कार्यभार सांभाळल्यापासून यात बरीच प्रगती झाली असून भविष्य निर्वाह निधी बाबत शिक्षकांना स्लिप देण्याबाबतचे काम आता जवळ जवळ पुर्ण करण्यांत आले आहे. आता त्याबाबतचे जमा खर्चाचे आकडे तयार असले तरी प्रत्यक्षात शिक्षकांना भविष्य निर्वाह निधी बाबतची स्लिप देण्याबाबत ३ महिन्याचा कालावधी लागेल.

**मा.उपआयुक्त :** चटोपाध्याय आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव मा.आयुक्त यांच्याकडे दिला आहे. याप्रकरणी दिनांक ११.११.९१ ही तारिख मा.आयुक्तांनी दिली आहे. तेव्हा यात ११.११.९१ नंतर निर्णय घेतला जाईल. जिल्हा परिषदकडून वर्ग झालेले शिक्षक आणि महापालिकेत काम करणारे शिक्षक या प्रमाणे दोन प्रकारचे शिक्षक काम करीत असल्यामुळे शिक्षकाच्या जेष्टता यादित बराच वाद होता. परंतू या सर्वांची छाननी करुन शिक्षकांची जेष्टता यादी तयार करण्यांत आली आहे.

**विधी सल्लागार :** प्रशासनातर्फे जिल्हापरिषदेकडून वर्ग झालेले आणि महापालिकेत पुर्वीपासून कार्यरत असलेले अशा दोन्ही शिक्षकांची एकत्र जेष्टता सुची तयार करण्यात आली असली तरी यापैकी एका शिक्षकाने या जेष्टता यादी बाबत न्यायालयात दाद मागितली आहे.

**श्री.मिर्झा अलीम बेग :** मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती मिळालेले शिक्षक वर्गावर नियमाप्रमाणे शिकवत नाही. तेव्हा प्रशासनातर्फे ज्या शिक्षकांना मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती देण्यांत येईल. ते शिक्षक त्या शाळेत वर्गावर शिकविण्याचे काम करतील काय?

**श्री.प्रभाकर विधाते :** वार्ड क्र.३ मधील रस्त्याचे डांबरीकरणाबाबत वेळोवेळी सभागृहात मागणी करुनही त्याबाबतचा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवला जात नाही. संबंधित विभागाकडे चौकशी केली असता या कामाचे अंदाजपत्रक दोन वेळा सुधारित करण्यांत आल्याचे समजते. तेव्हा या कामाचे अंदाजपत्रक आणखी किती वेळा सुधारित करणार याचा खुलासा करावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** ज्योतीनगर भागात ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी आवश्यक असलेले खोदकाम २/३ महिन्यापुर्वी झालेले आहे. परंतू अद्याप त्या ठिकाणी पाईप लाईन टाकण्याचे काम सुरु झालेले नाही. याचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता, ड्रेनेज :** ज्योती नगर येथील ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामामध्ये काही ठिकाणी कठीण खडक लागल्यामुळे तेथील काम मशिनद्वारे हाती घेण्यांत आलेले आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** नगर रचना विभागातील झोन क्र.४ करिता बांधकाम परवानगी प्रकरणाची कार्यवाही करण्यासाठी संबंधित कनिष्ठ अभियंता यांचे सहाय्यक असलेले दुय्यम आवेक्षक त्या ठिकाणाहून काढून अन्यत्र त्यांची बदली करण्यांत आलेली आहे. वस्तुतः झोन क्र.४ परिसरात जादा बांधकाम चालू असून अनेक प्रकरणासाठी कार्यरत असलेले दुय्यम आवेक्षक अन्यत्र बदली का करण्यांत आली याचा खुलासा व्हावा.

**सहाय्यक आयुक्त -१ :** झोन क्र.४ मधील बांधकाम प्रकरणे हाताळण्यासाठी लवकरच दुय्यम आवेक्षक देण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

**श्री.तुळशीराम भगुरे :** आरोग्य विभागाचे सन १९९०-९१ वर्षाचे लेखा परिक्षण झाले आहे काय? असे लेखी विचारणा केली असता सदर विभागाचे लेखा परिक्षणास एक महिनाचा कालावधी लागेल असा खुलासा प्राप्त झाला आहे. तेव्हा आरोग्य विभागातील संबंधित अभिलेख मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांचे ताब्यात ठेवावे.

**मा.सभापती :** स.सभासदांच्या सुचनेप्रमाणे मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी येत्या दोन दिवसांत आरोग्य विभागाचे सन १९९०-९१ चे सर्व अभिलेख हस्तगत करण्याची व्यवस्था करावी.

**मा.मुख्य लेखापरिक्षक :** पुढील सप्ताहात दिवाळी निमित्त रजेवर असल्यामुळे रजेवरुन आल्यानंतर आरोग्य विभागाचे अभिलेख ताब्यात घेतले जातील.

**मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** लेखा परिक्षणासाठी आवश्यक असलेले अभिलेख "रेकॉर्ड" विविध आरोग्य केंद्रावर असते. त्यामुळे संबंधित अभिलेख उपलब्ध करुन देण्यास किमान दोन महिन्याचा कालावधी लागेल.

**श्री.तुळशीराम भगुरे, श्री.नारायण फत्तेलष्कर, श्री.जावेद हसन खॉंन :** लेखा परिक्षणासाठी आवश्यक असलेले अभिलेख "रेकॉर्ड" उपलब्ध करुन देण्यासाठी लागणारा वेळ मागण्याची संबंधित अधिकाऱ्यांची पध्दत योग्य नाही. म्हणून या बाबीचा आम्ही निषेध नोंदवून सभात्याग करतो. स.सभासद श्री.तुळशीराम भगुरे, नारायण फत्तेलष्कर, श्री.जावेद हसन खॉं, श्री.हाळनोर, श्री.एकबालसिंग गील, श्री.फैय्याज खॉंन, श्री.अहमद खान, श्री.अलीम बेग मिर्झा कलीम बे, श्री.विजय पालीवाल, श्री.गजानन बारवाल, श्री.प्रभाकर विधाते, श्री.केशव सोनवणे यांनी ४.०० वाजता सभात्याग केला आणि ४.०५ मिनीटांनी सभागृहात प्रवेश केला.

**श्री.केशव सोनवणे, श्री.तुळशीराम भगुरे, श्री.नारायण फत्तेलष्कर :** लेखा परिक्षणासाठी अभिलेख "रेकॉर्ड" दाखल करण्यांकरिता कालावधी वाढवून मागण्याची संबंधित अधिकाऱ्यांची पध्दत योग्य नाही. म्हणून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) ड-अन्वये संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यांत यावी आणि आजपासूनच आरोग्य विभागाचे अभिलेख (रेकॉर्ड) जमा करण्याची कार्यवाही करण्यांत यावी.

**श्री.गजानन बारवाल, श्री.केशव सोनवणे :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी भावनेच्या भरात सभागृहात विवरण केले आहे ही बाब लक्षात घेता संबंधितास समज देण्यांत येऊन यापुढे दक्षता घेण्याची सुचना देण्यांत यावी.

**मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** आरोग्य विभागाचे सन १९८९-९० या वर्षाचे लेखा परिक्षण पुर्ण झालेले आहे. सन १९९०-९१ यावर्षाचे अभिलेख (रेकॉर्ड) लेखा परिक्षणासाठी दाखल करण्यांस वाढीव कालावधी मागण्यामध्ये सभागृहाच्या भावना दुखवण्याचा कोणताही उद्देश नाही. तरी पण सभागृहाचा अवमान झ ाला आहे. असे वाटत असल्यास सभागृहाची माफी मागण्यात येते आणि सभागृहास पुन्हा विनंती करण्यांत येते की, लेखा परिक्षणासाठी आवश्यक असलेले अभिलेख (रेकॉर्ड) दाखल करण्यासाठी दिवाळीनंतर एक महिन्याची मुदत देण्यांत यावी.

**मा.सभापती :** आरोग्य विभागाचे सन १९९०-९१ वर्षाचे लेखापरिक्षणासाठी आवश्यक असलेले अभिलेख (रेकॉर्ड) दि.२५.११.९१ पर्यंत संबंधित विभागाकडे जमा करण्याची व्यवस्था करण्यात यावी.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** दि.११.१०.९१ च्या सभेतील चर्चेनुसार गणेश उत्सव व नवरात्र उत्सव यासाठी हॅलोजन व सोडीयम दिव्यांची सन १९९०-९१ आणि १९९१-९२ या वर्षाकरिता किती खरेदी करण्यात आली. याबाबत खुलासा करण्यांत यावा. तसेच त्यापैकी किती दिवे शिल्लक आहेत याची माहिती देण्यांत यावी.

**मा.सभापती :** स.सभासदांनी विचारलेल्या बाबींची माहिती संबंधित विभागाने पुढील सभेत देण्याची व्यवस्था करावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** स.सभासदांनी उपस्थित केलेल्या चर्चेनुसार नवरात्र उत्सवाच्या ठिकाणी हॅलोजन व सोडीयम दिवे लावण्याचा निर्णय होऊनही प्रशासनातर्फे नवरात्र उत्सव सुरु झाल्यानंतर ४/५ दिवसांनी विद्युत दिवे लावण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. तेव्हा ज्या नगरसेवकांनी त्याचे प्रभागातील नवरात्र उत्सवाचे ठिकाणी उत्सवाचे सुरवातीपासून सोडीयम किंवा हॅलोजन दिव्यांची व्यवस्था केली आहे. अशा दिव्यांचे देयक कोण देणार याबाबत खुलासा व्हावा.

**श्री.केशव सोनवणे :** दि.१०.०९.९१ च्या चर्चेनुसार निवडणूक काळात उत्कृष्ट काम केलेल्या कर्मचाऱ्यांना दोन आगाऊ वेतनवाढ देण्याबाबतची संचिका पुढील सभेत दाखल करण्याचा निर्णय झालेला आहे. तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**मा.उपआयुक्त :** महापालिका प्रशासनाने कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत एका उप समितीचे गठण केले आहे. या उपसमितीने गतवर्षी २९ कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्यास मंजूरी दिली आहे. आगावू वेतनवाढ देतांना जेष्ठता सुची, कर्मचाऱ्यांचे गोपनिय अहवाल आणि नियम व बाबींचा विचार करुन आगाऊ वेतनवाढ देण्यात येते. तेव्हा सन १९९१-९२ वर्षाकरिता कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या आगाऊ वेतनवाढ प्रकरणी निवडणूक काळात उत्कृष्ट काम केलेले कर्मचारी वरील नियमास पात्र असतील तर अशा कर्मचाऱ्यांना समितीद्वारे नियमाप्रमाणे आगाऊ वेतनवाढ देण्याचा विचार केला जाईल.

निवडणूक काळात उत्कृष्ट काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्याबाबतचा प्रश्न बऱ्याच काळापासून चर्चेला येत असून या प्रकरणी यापुर्वीच्या स्थायी समितीने निवडणूक काळात उत्कृष्ट काम केलेल्या कर्मचाऱ्यांना दोन आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत मंजूरी दिलेली आहे. असा खुलासा माजी महापौर तथा माजी स्थायी समिती सदस्य श्री.प्रदिपकुमार जैस्वाल यांनी मा.सभापती यांच्या पुर्व परवानगीने सभागृहात केला.

**मा.सभापती :** माजी महापौर तथा स्थायी समिती सदस्य यांनी सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे निवडणूक काळात उत्कृष्ट काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगाऊ दोन वेतनवाढ देण्याबाबत यापुर्वीच्या स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयाचा वृत्तांत पुढील सभेत दाखल करण्याची व्यवस्था सभागृह विभागाने करावी.

**श्री.प्रभाकर विधाते :** दि.११.१०.९१ च्या सभेत "ए" वर देण्यात येणाऱ्या कामाबाबत नियमानुसार विधी सल्लागार पुढील सभेत खुलासा करतील अशी नोंद आहे. त्याबाबत खुलासा व्हावा.

**विधी सल्लागार :** महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम मॅन्युअलचे कलम २०२ अन्वये रु.२५,०००/- चे अंदाजपत्रक असलेल्या कामासाठी वृत्तपत्रात जाहीरात देवून निविदा मागविण्यात याव्यात आणि रु.२५,०००/- पेक्षा कमी अंदाजपत्रक असलेल्या कामासाठी ठळक दर्शनी भागातील नोटीस बोर्डावर नोटीस प्रसिध्द करुन पत्रके मागण्यात यावी. असा नियम आहे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** दि.११.१०.९१ च्या सभेत शहागंज येथील मच्छीबाजाराच्या विस्ताराबाबत पुढील सभेत सविस्तर माहिति देण्यांत यावी. असा खुलासा करण्यांत आला होता. त्याबाबत माहिती व्हावी.

**मा.सभापती :** स.सभासदांच्या सुचनेप्रमाणे शहागंज मच्छीबाजार विस्ताराचे अंदाजपत्रक संबंधित अधिकाऱ्यांने पुढील सभेत दाखल करावे.

**श्री.जावेद हसन खाँन :** दि.१६.१०.९१ च्या सभेत रॉक्सी सिनेमा शेजारी असलेल्या दर्पण भवन या इमारतीबाबत पुढील सभेत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय झालेला आहे. त्याबाबत खुलासा व्हावा.

**सहाय्यक संचालक, नगररचना :** रॉक्सी सिनेमा जवळील दर्पण भवन ही इमारत खाजगी मालकीच्या सी.टी.एस.नंबर १७६३४ या जमीनीवर विनापरवाना बांधण्यांत आलेली आहे. कलम २६० अन्वये संबंधितास नियमाप्रमाणे नोटीस देण्यांत आलेली आहे.

**श्री.जावेद हसन खॉन :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे दर्पण भवन बाबत अपूर्ण माहिती दिली गेली आहे. तेव्हा या इमारतीस विद्युत कनेक्शन बाबत ना हरकत प्रमाणपत्र नळ कनेक्शन बाबत ना हरकत प्रमाणपत्र नळ कनेक्शन जागेचे मालक इत्यादी बाबतची सविस्तर माहिती देणे आवश्यक आहे. त्या प्रमाणे माहिती देण्यांत यावी.

**जलगृह अभियंता :** दर्पण भवन येथे असलेल्या नळ कनेक्शन बाबत संबंधितांना दिनांक ३०.१०.९१ रोजी ३ दिवसाचे आत सविस्तर खुलासा करावा, याबाबतची नोटीस देण्यांत आली आहे. नोटीसीची मदत संपलेली नसल्यामुळे अद्याप संबंधितांकडून खुलासा प्राप्त झाला नाही.

**मा.सभापती :** स.सभासदांनी विचारल्याप्रमाणे रॉक्सी सिनेमा जवळील दर्पण भवन या इमारतीचे मालक कोण? त्यात भाडेकरु आहे काय? असल्यास कोण? या इमारतीचे विद्युत कनेक्शनसाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे काय? इमारतीचे बांधकामासाठी विकास खर्च भरुन घेण्यांत आला आहे काय? तसेच नळ कनेक्शन दिले आहे काय? असल्यास केव्हा व कसे याबाबतची सविस्तर माहिती संबंधित विभागाने पुढील सभेत देण्याची व्यवस्था करावी.

**श्री.केशव सोनवणे, श्री.गजानन बारवाल :** दि.१६.१०.९१ च्या सभेत नळ कनेक्शन संचिका मंजूरीबाबत प्रशासनाने तयार केलेला प्रस्ताव पुढील सभेत मांडइयांत यावा. असा निर्णय झालेला आहे. त्यावर विचार व्हावा.

**मा.सभापती :** नळ कनेक्शन मंजूरीबाबत प्रशासनातर्फे तयार केलेल्या प्रस्तावावर सर्वकश विचार करण्यासाठी दिवाळीनंतर (स्पेशल मिटींग) घेण्यांत येईल.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** नेहरु रोजगार योजने बाबत दैनिक लोकमत प्रसिध्द झालेल्या वृत्ताबाबतचा खुलासा करण्यांत यावा अशी मागणी गेल्या दोन सभेपासून करण्यांत येत आहे. परंतू त्याबाबत अद्याप माहिती माहिती उपलब्ध होत नाही. तेव्हा या वृत्ताबाबत खुलासा व्हावा.

**प्रकल्प अधिकारी :** नेहरु रोजगार योजने अंतर्गत शहरातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील १०० व्यक्तींना घर दुरुस्ती व बांधणी यासाठी रक्कम रु.४०००/- हजाराच्या प्रत्येकी याप्रमाणे खर्च करण्याचा या योजनेत समावेश आहे. त्यानुसार अर्ज मागवून कार्यवाही करण्यांत आली आहे. दैनिक लोकमत प्रसिध्द झाल्यानुसार नारेगांव भागातील नागरिकांचा सर्वसाधारण अर्ज कार्यालयात प्राप्त झाला आहे. त्यात काही तथ्थ नाही. अर्जातील खुलाशावरुन नारेगांव भागातील नागरिकांमध्ये आपसातील मतभेद दिसतात याबाबतचा सविस्तर खुलासा करण्यात आलेला आहे.

**ठराव :**

दिनांक ११.१०.९१ (तहकुब) व दि.१६.१०.९१ च्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१७५/२ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, गांधीनगर स्लम भागात १५० मी.मी.व्यासाची एस.डब्ल्यु.जी.ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी सा.बा.खात्याचे सन १९९०-९१ चे दरसुची नुसार अंदाजपत्रक र.रु.६,४,४२५/- चे तयार केले. त्यास मा.आयुक्तांची मंजूरी मिळाल्यानंतर प्रगट निविदा मागवून प्राप्त झालेल्या निविदापैकी श्री.अे.के.अरोरा यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.९०% कमी दराचे निवदेस स्थायी समिती ठराव क्र.४०४ दि.१६.०१.९१ द्वारे मंजूरी दिल्यानुसार ठेकेदारास अनामत रक्कम जमा करणेसाठी कळविले असता ठेकेदारांनी अनामत रक्कम न भरता निविदेस ९० दिवसापेक्षा जास्त कालावधी झाल्यामुळे काम करण्यास नकार दिल्यानंतर मा.आयुक्तांनी दि.११.०७.९१ ला पुन्हा निविदा मागविण्याचे आदेश दिल्यानुसार कार्यालयीन निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.के.मिसाळ | - | १६.५% कमी |
| २. | श्री.सलीम अहेमद | - | ३०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.५% कमी दराची श्री.एस.के.मिसाळ यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गांधीनगर स्लम भागात १५० मी.मी.व्यासाची एस.डब्ल्यु.जी.ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.५% कमी दराच्या श्री.एस.के.मिसाळ यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१७६/३ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, शहाबाजार स्लम भागात आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामाकरिता सा.बा.खात्याचे १९९०-९१ चे दरसुची नुसार र.रक्कम १,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मान्यता मिळाल्यानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.७ द्वारे स्थानिक दैनिकात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

१. श्री.मीर हिदायत अली - १% जास्त
२. श्री.अे.अे.अबेदी - ३% जास्त
३. श्री.शेख शरीफ - ०.१% कमी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री.शेख शरीफ यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहाबाजार स्लम भागात आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराच्या श्री.शेख शरीफ यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१७७/४ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, इंदिरानगर (बायजीपुरा) स.न.३२ येथील विहीरीजवळ दगडी गटारीचे बांधकाम करणेसाठी सा.बा.खात्याचे १९८९-९० चे दरसुची नुसार र.रु.३०,५५०/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मंजूरी दिल्यानुसार स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता सात दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराची निविदा स्थायी समिती ठराव क्र.२९, दि.०६.०७.९१ द्वारे श्री.अब्दुल खालेक यांचे टेंडर मंजूर करण्यांत आले.

त्यानुसार श्री.खालेक यांना २% अनामत रक्कम जमा करणेसाठी दि.२४.०७.९१ चे पत्राद्वारे कळविले तसेच दि.०५.०८.९१ ला स्मरणपत्र दिले. तरीपण त्यांनी अनामत रक्कम जमा न केल्यामुळे मा.आयुक्तांचे आदेशाप्रमाणे सेकंड लोयेस्ट ठेकेदार श्री.स.सिराजुद्दीन ज्यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.१% कमी आहेत. त्यांनी दि.०२.०९.९१ ला पत्र देवून विचारणा केली असता त्यांनी दि.०५.०९.९१ चे पत्राद्वारे त्यांचे टेंडरमध्ये दिलेले दर (१८.१% कमी) ऐवजी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ११% कमी दराने काम करण्यास तयार असल्याबाबत लेखी सम्मती दिलेली आहे. करिता श्री.सय्यद सिराजुद्दीन यांचे ११% कमी दराचे टेंडर मंजूर करण्याचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर, (बायजीपुरा) स.न.३२ येथील विहीरीजवळ दगडी गटाराचे बांधकाम करणेसाठी दुसरे कमी दराचे गुत्तेदार श्री.सय्यद सिराजुद्दीन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% कमी दराची निविदा (त्यांनी लेखी सम्मती दिल्यानुसार) स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१७८/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नाथ मार्केट मागील मोकळ्या जागेवर कंपाऊंड वॉल बांधणे बाबतचे कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.८५,८५३/- ला मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली असून सदर कामाचे बी-१ निविदा सूचना दैनिक मराठवाडा व दैनिक मुकदस्स मध्ये दि.०३.०७.९१ ला प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकुण नऊ दरनिर्दिष्ट निविदा मागविल्या असता एकूण नऊ दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

१. श्री.स.रफियोद्दीन - १४.५% कमी

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री.आर.अे.शेख | - | १२% कमी |
| ३. | श्री.सेन बेमूसा | - | १२.७८६% कमी |
| ४. | श्री.सय्यद सिराजोद्दीन | - | १२.२०% कमी |
| ५. | श्री.अब्दुल खालेद | - | ११% कमी |
| ६. | श्री.विशाल कन्स्ट्रक्शन | - | ८% जास्त |
| ७. | श्री.कुलवंतसिंग | - | अंदाजपत्रकीय दराने |
| ८. | श्री.एस.एच.असोशिएटस | - | १०% जास्त |
| ९. | श्री.आर.एल.बारवाल | - | १५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.५०% कमी दराचे श्री.सय्यद रफियोद्दीन गुत्तेदार यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नाथ मार्केट मागील मोकळ्या जागेवर कंपाऊंड वॉल बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.५०% कमी दराच्या श्री.सय्यद रफियोद्दीन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१७९/६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, व्यंकटेश नगर येथे २५० मी.मी.व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकावयाची आहे. त्याकरिता सन १९९०-९१ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,९२,४३६/- चे अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. सदर खर्च १९८९-९० च्या शासकीय विशेष अनुदानातून करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व्यंकटेशनगर येथे २५० मी.मी.व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामाकरिता र.रु.१,९२,४३६.०० च्या अंदाजपत्रकीय सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१८०/७ :**

वार्ड क्र.५८ मो.उत्तमनगर येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.२,७८,३६३/- चे सन १९९०-९१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून प्राप्त सरकारी अनुदानातून सदर काम करणेस्तव मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे.

सदरील काम हाती घेणेसाठी बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.आर.एल.बारवाल | - | १.११% कमी |
| २. | श्री.विपुल कन्स्ट्रक्शन | - | २% कमी |
| ३. | श्री.एम.एम.बेग | - | १०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराचे श्री.एम.एम.बेग यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सदर प्रकरणी पाहणी करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१८१/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा येथील नंदीग्राम कॉलनी स.न.८ येथील मनपाच्या खुल्या जागेवर तार फेन्सींग करणे बाबतचे कामासाठी अंदाजपत्रक र.रु.३६,०००/- ला मा.आयुक्तांनी मंजूरी दिल्यानुसार सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.आर.अे.शेख | - | १६% कमी |
| २. | श्री.आर.एल.बारवाल | - | ४.९९% कमी |
| ३. | श्री.कुलवंतसिंग | - | ५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराचे श्री.आर.अे.शेख यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील नंदीग्राम कॉलनी स.न.८ येथील मनपाच्या खुल्या जागेवर तार फेन्सींग करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराच्या श्री.आर.अे.शेख यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१८२/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरवाडी ज्योतीनगर स.न.१ व ५ येथील मनपाच्या खुल्या जागेवर तार फेन्सींग करणे बाबतचे कामासाठी र.रु.८८,०००/- ला मा.आयुक्तांनी मंजूरी दिल्यानंतर सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.आर.अे.शेख | - | १७.५% कमी |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | ८% कमी |
| ३. | श्री.विशाल कन्स्ट्रक्शन | - | ६.८५% कमी |
| ४. | श्री.आर.एल.बारवाल | - | ५% कमी |
| ५. | श्री.सय्यद समियोद्दीन | - | ४% जास्त |
| ६. | श्री.एस.एच.असोशिएटस | - | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.५% कमी दराचे श्री.आर.ए.शेख यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी ज्योतीनगर स.न.१ व ५ येथील मनपाच्या खुल्या जागेवर तार फेन्सींग करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.५% कमी दराच्या श्री.आर.अे.शेख यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१८३/१० :**

जलनिःसारण अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हरी मस्जिद ते नालापर्यंत ६०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी रक्कम

रु.२,०५,४५८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. काम करुन घेणेस्तव तातडीने निविदा मागविल्या असता खालीलप्रमाणे चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.फारुकी अे.एम. | - | ९% कमी |
| २. | श्री.बशीरखान | - | ५% कमी |
| ३. | श्री.सय्यद सिराजुद्दीन | - | १% कमी |
| ४. | श्री.कैसर खॉन | - | १% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% कमी दराची निविदा श्री.फारुकी ए.एम.यांची आहे. सदरील अंदाजपत्रकीय रकमेत पुर्वीचे स्थायी समितीने ठरविलेले कंत्राटदार श्री.शमशुद्दीन यांचे कामांतर्गत अर्धवटपणे केलेल्या कामाच्या खर्च रु.११,३१८.९४ चाही अंतर्भाव आहे. संबंधितांनी त्यांना याच कामांतर्गत मिळालेल्या आदेशानुसार ३०० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम केले आहे. पुढे हा प्रस्ताव रद्द झाला व ६०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याचे ठरले संबंधितांना वरील देयक आता देण्यांत येत आहे.

तरी उपरोक्त कामासाठी र.रु.२,०५,४५८/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेसह श्री.फारुकी ए.एम.यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% कमी दराची निविदा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हरी मस्जिद ते नालापर्यंत ६०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता र.रु.२,०५,४५८/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१८४/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्लेखाना येथे शाळेची इमारत बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.२२.०७.९१ ठराव क्र.६२ अन्वये गुत्तेदार श्री.अब्दुल कलीम यांचे नावाऐवजी श्री.अब्दुल सलम यांचे नांव अनवधानाने प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अब्दुल सलाम यांचे नांवास मान्यता प्राप्त झाली आहे. सबब श्री.अब्दुल सलम या नांवाऐवजी अब्दुल कलीम या नांवाची ठरावात दुरुस्तीसाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्लेखाना येथे शाळेची इमारत बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.६२, दि.२२.०७.९१ अन्वये अब्दुल कलीम यांचे नांवाऐवजी अनवधानाने श्री.अब्दुल सलाम यांचे नांवास मान्यता मिळाली आहे. तरी श्री.अब्दुल सलाम या नांवाऐवजी श्री.अब्दुल कलीम या नांवाची ठरावात दुरुस्ती करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८५/१२ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, आरोग्य विभागात सन १९९१-९२ या वर्षासाठी औषधी व साहित्य खरेदी करण्यांसाठी दि.१६.०७.९१ रोजी वृत्तपत्रातून जाहिर प्रगटन देवून निविदा मागविण्यांत आल्या होत्या. त्याप्रमाणे खालील चार औषध विक्रत्यांकडून निविदा प्राप्त झाल्या आहेत.

१. संर्जिको मेडीकल इंटरप्राईजेस, मुंबई
२. केंकरे ब्रदर्स, मुंबई
३. बालाजी इंटरप्राईजेस
४. चेबर फार्मो

तुलनात्मक तक्त्यानुसार कमी दराचे औषधी व साहित्य विक्रेत्याच्या नांवासमोर प्रसिध्द केलेल्या यादीतील अनुक्रमांकानुसार दर्शविण्यांत आलेले आहेत.

१) सर्जिको मेडीकल मुंबई यांनी नियमानुसार अनामत रक्कम न भरल्यामुळे त्यांच्या निविदेचा विचार करण्यांत येत नाही.

२) केंकरे ब्रदर्स, मुंबई अ.क्र.१ ते ५,७ ते ११,१३ ते ३०, ३३ ते ३८,४०,४१,४४,४५,४६, ४८,४९,५१,५२,५३,५५,५६,५८ ते ६३,६५ ते ७२,७५,७७,७९,८१,८२,८३,८५,८६,८७,९४,९८, १०१ ते ११०,११२ ते १४२,१४४ ते १४६,१४८ ते १५१,१५३ ते १५७,१५९ ते १७३,१७५ ते १७७,१७९,१८३ ते १८८,१९२ ते १९५,१९७,१९९,२००,२०५,२०६,२११,२१२ ते २१७,२१९ ते २२८,२३० ते २३१,२३३ ते २४३,१४४ ए.बी.सी.२४५ ते २६९,२७१ ते २७३,२७४,२७९,२८२, २८८,२९२,२९४,२९५,३०६ ते ३०८,३१० ते ३१८,३२०,३२१,३२२ ते ३२६,३२८,३२९,३३१,३३२, ३३४,३३५,३७८ ते ३८७,३९०,३९१,३९२ ते ४०० (एकूण तीनेश आठ -३०८)

३) बालाजी इंटरप्राईजेस - अ.क्र.४३,५०,५४,५७,६४,८४,९२,९३,१११,१४३,१५२,१५८, १७८,१८०,१९१,२१८,२२९,२३२ ए.बी.-२४४,बी.ई.-२७६ ते २७८, २८३ ते २८७,२८९ ते २९१, २९३,२९६ ते ३०५,३३३,३४८,३४९,३५२,३५३,३५४,३६६,३६७,३७७,३८८,३८९,३९१ ए.बी.सी. डी. (एकूण त्रेपन्न-५३)

४) चेरब फार्मा : अ.क्र.१०० बी.सी.डी.सी.ई. (एकूण चार-४)

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार कमी दराची दरपत्रके मंजूर करण्यांत यावी. व त्याचे बरोबर सन १९९१-९२ साठी औषधी व साहित्य खरेदी करणेसाठी करार करण्यास व अंदाजपत्रकातील साहित्य व औषधी खरेदीसाठी अंदाजित केलेल्या रक्कमपर्यंतच्या खर्चास मंजूरी द्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरोग्य विभागासाठी सन १९९१-९२ करिता आवश्यक असलेली रक्कम रु.७ लाखापर्यंतची औषधी या कामासाठी प्राप्त झालेल्या दरपत्रकाधारकांकडून तुलनात्मक तक्त्यातील तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराने वेळोवेळी खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

तसेच सन १९९१-९२ करिता आरोग्य विभागासाठी आवश्यक असलेले साहित्य खरेदीच्या तुलनात्मक तक्त्यातील अनुक्रमांक २१२ ते ४०० पर्यंतचे साहित्य खरेदी करिता नंतर विचार केला जाईल. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८६/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, झोन क्र.३ (क) मधील जुन्या संडासाचे रुपांतर जलौधित संडासात करणेसाठी स्थायी समितीचा ठराव क्र.२० दि.०२.०७.९० द्वारे श्री.बी.आर.आनंद यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची निविदा मंजूर करण्यांत आली होती. परंतू कामाची निकड लक्षात घेता श्री.बी.आर.आनंद यांनी काम न केल्यामुळे झोन क्र.३ मधील काम ब व क साठी हे काम श्री.बी.आर.आनंद

यांच्याकडून काढून दुसऱ्या उपलब्ध ठेकेदाराकडून करुन घेण्यास मा.आयुक्त यांनी दि.२८.०२.९१ रोजी मंजूरी दिली.

स्थायी समितीच्या दि.३०.०३.९१ च्या बैठकीमध्ये दि.१६.०३.९१ च्या सभेचे इतिवृत्त कायम करण्याच्या ठराव अनुषंगाने झालेल्या चर्चेनुसार व ठराव क्र.५१५ नुसार श्री.बी.आर.आनंद यांनी काम बंद केल्यामुळे त्यांनी ब व क या दोन्ही कामासाठी भरलेली अनामत रक्कम परत करण्यात यावी असे ठरलेले आहे.

श्री.बी.आर.आनंद यांनी अनामत रक्कम परत करण्यासाठी नोटींग सादर केली असता मा.आयुक्त यांनी दिनांक ०७.०९.९१ रोजी संबंधित ठेकेदारांची अनामत रक्कम जप्त करण्यांत येऊन त्यांना मपा मध्ये कुठल्याही प्रकारची काम देण्यांत येवू नये. असा अभिप्राय दिला आहे. त्या नुसार श्री.बी.आर.आनंद यांची वरील कामाची अनामत रक्कम जप्त करण्याच्या व तसेच मनपामध्ये त्यांना कुठल्याही प्रकारचे काम न देण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

दिनांक १६.१०.१९९१ च्या सभेत यासारख्या प्रकरणावर विचार करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या उपसमितीचा अहवाल प्राप्त होईपर्यंत सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१८७/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोतीवालानगर येथील उद्यानामधील सुधारणाकरणे बाबतचे कामासाठी अंदाजपत्रक र.रु.९७,५००/- ला मा.आयुक्तांच्या मंजूरीनुसार सदर कामासाठी बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जावेद खान अहेमद खान | - | २९.३१% कमी |
| २. | गिरीश सिकची | - | २४.५% कमी |
| ३. | एस.जे.बाहोद्दीन | - | २२.५% कमी |
| ४. | अशोक के.साबळे | - | २१.५% कमी |
| ५. | एस.एच.असोशिएटस | - | १६.६३% कमी |
| ६. | पी.अंजय्या | - | १५% कमी |
| ७. | सय्यद गयासोद्दीन | - | १३.१३% कमी |
| ८. | आर.ए.शेख | - | ११% कमी |
| ९. | कैसर खॉन बदरोद्दीन | - | १०% कमी |
| १०. | सय्यद सिराजोद्दीन | - | १०% कमी |

सदरील दरपत्रकात तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.३१% कमी दराचे श्री.जावेद खान अहेमद खाँन यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोतीवालानगर येथील उद्यानामधील सुधारणा करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.३१% कमी दराच्या श्री.जावेद खाँन अहेमद खाँन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१८८/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, साईट क्र.२ आमखास मैदान येथे कंपाऊंड वॉल बांधणे बाबतचे कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.४,१७,२६१/- ला मा.आयुक्तांची मंजूरी मिळाली असून सदर कामाचे बी-१ निविदा सूचना दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण सात दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.ए.नवाब | - | १८% कमी |
| २. | श्री.आर.ए.शेख | - | १६% कमी |
| ३. | श्री.एल.एम.चंचलानी | - | १५% कमी |
| ४. | श्री.कैसर खान बदरोद्दीन खॉन | - | १५% कमी |
| ५. | श्री.एस.एच.असोशिएट्स | - | १०.६३% कमी |
| ६. | श्री.फरसा असोशिएन | - | ६.९९% कमी |
| ७. | श्री.आर.एल.बारवाल | - | ४.१९% कमी |

सदरील प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साईट क्र.२ आमखास मैदान येथे कंपाऊंड वॉल बांधणे बाबतचे कामाकरिता र.रु.४,१७,२६१/- ला सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच सदर कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराच्या व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी दराच्या श्री.एस.ए.नवाब यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१८९/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मजनुहिल येथे कंपाऊंड वॉल बांधणे बाबतचे कामासाठी रक्कम रु.४,३१,६६७/- चे अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मंजूरी मिळाल्यानुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सात दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. सदरील खर्च शासकीय अनुदानातून करण्यांत येणार आहे. दराचे तपशिल खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.आर.ए.शेख | - | १९.८६% कमी |
| २. | श्री.एस.ए.नवाब | - | १८% कमी |
| ३. | श्री.कैसर खान बदरोद्दीन | - | १६% कमी |
| ४. | श्री.एल.एम.चंचालानी | - | १५% कमी |
| ५. | श्री.एस.एच.असोशिएटस | - | ९.९% कमी |
| ६. | श्री.आर.एल.बारवाल | - | २.२३% कमी |
| ७. | श्री.के.के.पठाण | - | २.१०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.८६% कमी दराची श्री.आर.ए.शेख यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मजनूहील येथे कंपाऊंड वॉल बांधणेच्या कामासाठी रक्कम रु.४,३१,६६७/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.८६ % कमी दराच्या श्री.आर.ए.शेख यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१९०/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्क मिल कॉलनी येथील जमीनी लॅब जवळील नाल्यावर पुलाचे बांधकाम करणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.९९,९४९/- चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदर काम हाती घेणेकरिता प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.अब्दुल कलीम | - | ०.१५% कमी |
| २. | श्री.राजासिंग | - | ७% जास्त |
| ३. | श्री.नरेंद्रसिंग | - | ४.५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१५% कमी दराची श्री.अब्दुल कलीम यांची निविदा असून मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्क मिल कॉलनी येथील जमीनी लॅब जवळील नाल्यावर पुलाचे बांधकाम करणेच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरोपक्षा ०.१५% कमी दराची श्री.अब्दुल कलीम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१९१/१८ :**

कार्यकारी अभियंता मनपा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कबीरनगर येथे उर्वरित भागात १५० मी.मी.व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकीच्या सन १९९०-९१ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,९२,११३/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मंजूरी दिली आहे. सदर काम सन १९९०-९१ च्या शासकीय विशेष अनुदानातून रु.२५ लाखाची लमसम प्रोव्हीजन असलेल्या निधीतुन करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कबीर नगर येथे उर्वरित भागात १५० मी.मी.व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामाकरिता र.रु.१,९२,११३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१९२/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बेगमपुरा येथे समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.५० दिनांक ०६.०७.९१ अन्वये सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु.२,८८,५००/- ला सर्वानुमते मंजूरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.७, दि.२०.०८.९१ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.ए.नवाब | - | ०.०३% कमी |
| २. | श्री.एस.एच.असोशिएटस | - | ०.०५% जास्त |
| ३. | श्री.विशाल कन्स्ट्रक्शन | - | ७.५०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३% कमी दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सदर प्रकरणी पाहणी करण्यांत येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१९३/२० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.ब्रिजवाडी येथे आर.सी.सी. एन.पी.-२ क्लासची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु.५,५३,६९२/- यास शासनाची प्रशासकीय मान्यता (विशेष अनुदान) विकास/१०९०/पत्र क्र.३७अ/योजना-८, दि.१९.०१.९१ द्वारे मिळालेली आहे. सदरच्या कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.६ (दुसरी वेळ) द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

१. श्री.पी.अंजय्या - ८% जास्त
२. श्री.उदय इंजिनिअरींग कंपनी - ५% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या उदय इंजिनीअरींग कंपनी यांचे दर सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त होते. मात्र उपरोक्त दर जास्त असल्यामुळे दोन्ही ठेकेदारांना मा.आयुक्तांचे आदेशाप्रमाणे दराबाबत वाटाघाटा करण्यासाठी दि.२५.०९.९१ रोजी उपस्थित राहणे करिता पत्र देवून कळविण्यांत आले होते. त्यानुसार दोन्ही ठेकेदारांनी बंद पाकीटात ऑफर दिली असून त्यांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

१. मे.उदय इंजिनीअरींग कंपनी - ४.७५% जास्त
२. श्री.पी.अंजय्या - ५.६०% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या मे.उदय इंजिनिअरींग कंपनी यांचे दर सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकापेक्षा ४.७५% जास्त आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सदर प्रकरणी पाहणी करण्यांत येईल, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१९४/२१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्री.बी.के.जैस्वाल, दुय्यम आवेक्षक यांना त्यांनी बेटरमेंट चार्जेस आकारणी मध्ये खाडाखोड करुन मनपास रु.१०,०००/- आर्थिक हेतू होता. करिता त्यांना निलंबित करुन प्रकरणात विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यांत आली होती. चौकशी अहवालानुसार मा.आयुक्त यांनी त्यांना सेवेतून बडतर्फे केले. परंतू स्थायी समिती ची मंजूरी न घेतल्यामुळे या तांत्रिक दोषामुळे मा.उच्च न्यायालयाने त्यांना रुजू होण्याची परवानगी दिली असता प्रकरणाची पुर्णत: पडताळणी करुन चौकशी अहवाल पाहता आणि त्या अनुषंगाने इतर बाबी लक्षात घेता त्यांनी केलेल्या गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्याबाबत त्यांना मनपा सेवेतून बडतर्फे करण्यांत यावे म्हणून मी या निर्णयावर आलो आहे. तरी श्री.बी.के.जैस्वाल यांना सेवेतून बडतर्फे करण्यासाठी स्थायी समितीची मंजूरीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (७) क्लॉज (सी) अन्वये प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

सदर प्रकरणी विशेष सभेमध्ये चर्चा करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१९५/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.३४ रेंगटीपुरा भागात खांडकी पेव्हींग करणे व जुन्या खांडकीची दुरुस्ती करणे बाबतच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सा.बा.खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे अंदाजपत्रक र.रु.१,१८,२६०/- चे तयार केले आहे. सदरील खर्च सरकारी अनुदानातून सन १९९१-९२ या सदराखाली करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३४ रेंगटीपुरा भागात खांडकी पेव्हींग करणे व जुन्या खांडकीची दुरुस्ती करणेच्या कामाकरिता रक्कम रु.१,१८,२६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१९६/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंना यांनी प्रस्ताव दिला की, जुना मोंढा अंतर्गत रस्त्यास ५० मी.मी. व २० मी.मी.जाडीचे मॅकडेस व मिक्स सिल सरफेसिंग करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सा.बा.खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे अंदाजपत्रक र.रु.४,२१,८३०/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च सरकारी अनुदानातून सन १९९१-९२ या सदराखाली करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जुना मोंढा अंतर्गत रस्त्यास ५० मी.मी. व २० मी.मी.जाडीचे मॅकडेम व मिक्स सिल सरफेसिंग करणेच्या कामाकरिता र.रु.४,२१,८३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१९७/२४ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की. सन १९९१-९२ सालात तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना गणवेश व गणवेशासोबतचे साहित्य खरेदी करण्याकरिता निविदा मागविण्यांत आल्या असता ड्रेस शिलाईसाठी एकूण सहा निविदा प्राप्त झाल्या होत्या. पैकी मे.रेणूका टेलर्स व आर.एस.जैस्वाल टेलर्सनी ड्रेस नमुना दाखल केला असल्यामुळे व निविदा अटी पुर्ण केल्या नसल्यामुळे त्यांच्या दराचा विचार केला गेला नाही. फक्त खालीलप्रमाणेच निविदाधारकांनी निविदाप्रमाणे पुर्ण अटींची पुर्तता केली आहे.

१. मे.सोहेल टेलरिंग ॲण्ड टेलरिंग मटेरियल स्टोअर्स -
२. मे.डिलक्स टेलर्स -
३. मे.सुरेश टेलर्स -
४. मे.ड्रेस मास्टर टेलर्स -

वरीलप्रमाणे सर्वात कमी दर मे.सोहेल टेलरिंग ॲण्ड टेलरिंग मटेरिअल स्टोअर्स यांचे रु.४०/- प्रति ड्रेस प्रमाणे व बाकीचे रु.९९/- प्रति ड्रेस प्रमाणे आहेत. करिता कमी दर श्री.मे.सोहेल टेलरिंग ॲण्ड टेलरिंग मेटरिअल स्टोअर्स, यांचे असल्यामुळे प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

तसेच गणवेश साहित्यासाठी फक्त दोनच निविदा पत्रे प्राप्त झाली होती. त्यांचे कमी दराचे साहित्याचे अनुक्रमांक पुढील प्रमाणे आहेत -

१. मे.पारा इंटरप्राईजेस - २-८-१०-११-१३
२. मे.विजय जनरल स्टोअर्स - १-३-४-५-६-७-९-१२-१३ व १४ असे आहेत.

अ.क्र.१३ चे दर दोघांचे सम प्रमाणात असल्यामुळे दोघांकडून घेतांना सम प्रमाणात घेण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ करिता तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना गणवेश शिलाईसाठी प्रति ड्रेस रु.४०/- या दराप्रमाणे मे.सोहेल टेलरिंग ॲण्ड टेलरिंग मटेरिअल स्टोअर्स यांचे सर्वात कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

मे.सोहेल टेलरिंग ॲण्ड टेलरिंग मटेरिअल स्टोअर यांच्याकडून शिलाई करुन घेण्यांत आलेले ड्रेस कार्यालयात जमा करुन घेण्यांत यावे. अशाप्रकारे संबंधित फर्मकडून शिवून आलेल्या ड्रेसची संख्या १०० किंवा त्यापेक्षा जास्त झाल्यानंतर स्थायी समितीचे सदस्यांसमक्ष सदर ड्रेसचे वाटप संबंधित कर्मचाऱ्यांना करण्यांत यावे.

तसेच सन १९९१-९२ वर्षात गणवेश सोबत मनपा कर्मचाऱ्यांना देण्यांत येणाऱ्या गणवेश साहित्यासाठी दरपत्रकासोबत प्राप्त झालेले नमूना साहित्य तपासणीसाठी सभागृहात दाखल करण्यांत यावे. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९८/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, एम.पी.लॉ कॉलेज ते नागेश्वरवाडी (खडकेश्वर) रस्त्याच्या दोन्ही बाजूस नाली तयार करणेच्या कामासाठी र.रु.२,२३,०००/- चे अंदाजपत्रक सरकारी अनुदानातून मिळणाऱ्या सात कोटी रुपयातून १९९१-९२ वर्षामध्ये करावयाचे आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.३ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.एस.एच.असोशिएटस | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे.कुलवतंसिंग | - | २% जास्त |
| ३. | मे.एस.ए.नवाब | - | ३% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे मे.एस.एच.असोशिएटस यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एम.पी.लॉ कॉलेज ते नागेश्वरवाडी (खडकेश्वर) रस्त्याच्या दोन्ही बाजूस नाली तयार करणेच्या कामाकरिता र.रु.२,२३,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच मे.एस.एच.असोशिएट्स यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१९९/२६ :**

वार्ड क्र.५८ मो.बुध्दनगर येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.२,२३,०००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. तसेच स्थायी समिताचा ठराव क्र.४५, दि.०६.०७.९१ द्वारे मंजूरी मिळालेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.५/९७०/९१, दि.२१.०८.९१ नुसार दै.लोकविजय व मुफस्सीर दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा विकण्यांत आल्या होत्या. पैकी चार निविदा वसूल झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कैसर खान | - | ६% जास्त |
| २. | श्री.मौला अली यारखान | - | १०% जास्त |
| ३. | श्री.मोहंमद सलीम | - | ०.३०% कमी |
| ४. | श्री.एस.ए.नवाब | - | ४.५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३०% कमी दराचे श्री.मोहंमद सलीम यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५८ मो.बुध्दनगर येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३०% कमी दराची श्री.मोहंमद सलीम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२००/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, उस्मानपुरा येथील बुरुड समाज स्मशान भुमीस संरक्षित भिंत व वाचमन क्वॉर्टर बांधणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.४३,६००/- चे अंदाजपत्रकास दि.०७.०१.१९९१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.३ (१९९१-९२) चे निविदा सूचनेद्वारे प्रगट निविदा स्विकारणेस नियोजित वेळेपर्यंत एकूण सात दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.गिरीश सिकची | - | १७.१०% कमी |
| २. | श्री.अब्दुल कलीम | - | १६.९५% कमी |
| ३. | श्री.सुखबीरसिंग | - | १६.००% कमी |
| ४. | श्री.कुलवंतसिंग | - | १५.००% कमी |
| ५. | श्री.जलाल खॉंन | - | १४.७८६% कमी |
| ६. | श्री.मे.एस.एच.असोशिएटस | - | १३% कमी |
| ७. | श्री.एस.ए.नवाब | - | ११% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७.१०% कमी दराने श्री.गिरीश सिकची यांचे निविदेस दिनांक ०६.०७.९१ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.२७ नुसार मान्यता मिळालेली आहे. परंतू श्री.गिरीश सिकची यांना महानगरपालिका कार्यालयीन पत्र क्र.मनपा/बांधकाम/विभाग-१/३३९/९१, दि.२१.०९.९१ द्वारे महानगरपालिका हद्दीपुरते काळ्या यादीत समावेश केल्या कारणाने त्यांची निविदा रद्द करुन सदरील कामासाठी आलेले दुसऱ्या कमी दराचे ठेकेदार श्री.अब्दुल कलीम यांचेकडून सदरील काम पहिल्या कमी दराच्या ठेकेदाराच्या दराने म्हणजे १७.१०% कमी दराने काम करणेसाठी लेखी सम्मतीपत्र घेण्यांत आलेले असून त्यास दिनांक ०९.१०.१९९१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

तरी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ठेकेदाराने दिलेल्या सम्मतीप्रमाणे १७.१०% कमी दरानुसार श्री.अब्दुल कलीम यांची निविदा मंजूर करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा येथील बुरुड समाज स्मशान भुमीस संरक्षित भिंत व वाचमन क्वॉर्टर बांधणेच्या कामासाठी ठेकेदार श्री.अब्दुल कलीम यांनी लेखी सम्मती दिल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.१०% कमी दराने करुन घेण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२०१/२८ :**

उप अभियंता, स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, सादात नगर स्लम भागात मुलभूत सुखसोई उपलब्ध करुन देणेसाठी स्थायी समितीचा ठराव क्रमांक - ४५९ दि.१६.०३.९१ द्वारे रु.२,९५,०६३/- ला मंजूरी दिली असून यामध्ये सादातनगर स्लम भागात खडी रस्त्याचे काम करणेसाठी रु.३८,०००/- चा समावेश आहे. करिता सदरील कामासाठी कार्यालयाची निविदा सूचना क्र.३ (१९९१-९२) स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत टाईम्स दैनिक नवा मराठा व दैनिक सिटीजन्स मध्ये प्रसिध्दीसाठी देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण ११ निविदा विकण्यांत आल्या. व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजित तारखेस फक्त (४) चार निविदा प्राप्त झाल्या व त्यापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३४.१% कमी दराचे टेंडर मे.शैलेश कन्स्ट्रक्शन यांचे होते. परंतू हे अतिशय कमी असल्यामुळे ठेकेदारांनी दिलेल्या दराचे पृथःकरण मागविले असता ठेकेदारांनी दिलेले पृथःकरण योग्य न वाटल्यामुळे व ठेकेदारांनी दिलेला दर कमी करण्यास योग्य नसल्यामुळे सदरील कामासाठी पुन्हा टेंडर मागविणेसाठी व टेंडरची रक्कम रु.३४,९४६/- असल्यामुळे शॉर्ट टेंडर नोटीद्वारे "ओ" नमुन्यात टेंडर मागविणेसाठी मा.आयुक्त, महानगरपालिका यांनी दि.२६.०५.९१ ला आदेश दिल्याप्रमाणे कार्यालयाची लघु निविदा सूचना क्र.५/(१९९१-९२) द्वारे अे-१ नमुन्यावर प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन (३) निविदा विकण्यांत आल्या. व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजित तारखेस तीन निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.साजेद अन्वर | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त |
| २. | श्री.शेख शरीफ | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.५% कमी |
| ३. | श्री.मीर हिदायत अली | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या श्री.शेख शरीफ यांची निविदा कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ००.५% कमी आहे. करिता श्री.शेख शरीफ यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ००.५% कमी दराची "अे-१" निविदा मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.सादातनगर स्लम भागात मुलभूत सुखसोयी उपलब्ध करुन देणे बाबतचे कामाअंतर्गत सादातनगर भागात खडी रस्त्याचे काम करणेसाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.५% कमी दराचे गुत्तेदार श्री.शेख शरीफ यांचे अे-१ निविदापत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२०२/२९ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, लायन्स क्लब, मुकूंदवाडी येथे श्रेणी वाढ योजने अंतर्गत (९७) झोपडीधारकांची निवड करण्यांत आली असून सदरील श्रेणी

वाढ योजनेच्या कार्यक्रम राबविणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन १९९०-९१ चे दरसुचीनुसार अंदाजपत्रक रु.४,८५,०००/- चे तयार करण्यांत आले आहे.

सदरील योजने अंतर्गत प्रत्येक झोपडीधारकास हडको तर्फे रु.४,०००/- चे कर्ज तसेच रु.१,०००/- अनुदान असे एकूण रु.५,०००/- प्रत्येक झोपडी दुरुस्तीसाठी खर्चाची तरतूद वरील अंदाजपत्रकात करण्यांत आलेली आहे. करिता लायन्स क्लब मुकूंदवाडी येथे श्रेणी वाढ योजने अंतर्गत निवडलेल्या ९७ समावेश केलेले अंदाजपत्रक रु.४,८५,०००/- ला मंजूरी देणेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लायन्स क्लब मुकूंदवाडी येथे श्रेणीवाढ योजने अंतर्गत (९७) झोपडपट्टीधारकांना श्रेणीवाढ योजनेचा कार्यक्रम राबविणेसाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये ४,८५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२०३/३० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील उद्यानाभोवती संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र.१७, दि.११.०७.९१ अन्वये रक्कम रु.७,५३,४००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळालेली आहे.

सदर काम हाती घेण्यासाठी निविदा मागविल्या असता एकूण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.पॉल कन्स्ट्रक्शन | - | १७.७% कमी |
| २. | एस.ए.नवाब | - | १५.५३% कमी |
| ३. | मो.अब्दुल लतीफ | - | १४.८६% कमी |
| ४. | मे.एस.एच.असोशिएटस | - | १७.६३% कमी |
| ५. | विशाल कन्स्ट्रक्शन | - | ३% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.६३% कमी दराची निविदा मे.एस.एच.असोशिएटस यांची आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथील उद्यानाभोवती संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.६३% कमी दराचे गुत्तेदार श्री.मे.एस.एच.असोशिएटस यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२०४/३१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिटी चौक येथे वाहतुक स्वयंचलित नियंत्रक बसविणेच्या कामासाठी एस.टी.बी.डी.एस.आर.इ.सन १९८८-८९ नुसार र.रु.१,४२,८४९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदर खर्च हा विशेष शासकीय अनुदानातून सन १९९०-९१ हया वर्षाच्या तदतूदीमधून करण्यांत येईल. त्यास मान्यता मिळावी.

सदर कामासाठी दै.लोकमत टाईम्स व सिटीजन्स हया वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.फरानी इले ॲण्ड इले.लॅब, औरंगाबाद | - | ६.१% कमी |
| २. | मे.न्युक्लिऑनिक्स, पुणे | - | ५.६५% जास्त |
| ३. | मे.मेल्ट्रानिक्स, अहमदनगर | - | ७.१% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.१% कमी दराची मे.मेल्ट्रानिक्स, अहमदनगर यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिटी चौक येथे वाहतुक स्वयंचलित नियंत्रक बसविणेच्या कामासाठी एस.टी.बी.डी.एस.आर.इ.सन १९८८-८९ नुसार तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये १,४२,८४९.०० चे अंदाजपत्रकास तसेच कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.१% कमी दराचे मे.मेल्ट्रानिक्स अहमदनगर यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२०५/३२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, टाऊन हॉल चौक येथे वाहतुक स्वयंचलित नियंत्रक बसविणेच्या कामासाठी एस.टी.बी.डी.एस.आर.इ.सन १९८८-८९ नुसार र.रु.१,८६,१९८.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असून सदर खर्च हा विशेष शासकीय अनुदान सन १९९०-९१ हया वर्षाच्या तरतूदीमधून करण्यांत येईल. त्यास मान्यता मिळावी.

सदर कामासाठी दै.लोकमत टाईम्स व सिटीजन्स मध्ये निविदा सूचना प्रसिध्द करुन मोहरबंद निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १) मे.फरानी इलेक्ट्रीकल्स अँण्ड इलेक्ट्रॉनिक्स लॅब, औरंगाबाद | - | ७.२% जास्त |
| २) मे.न्युक्लिऑनिक्स, पुणे | - | ५% जास्त |
| ३) मे.मेल्टॉनिक्स, अहमदनगर | - | ४.७% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.७% कमी दराची निविदा मे.मेल्ट्रॉनिक्स अहमदनगर यांची आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाऊन हॉल चौक, येथे वाहतुक स्वयंचलित नियंत्रक बसविणेच्या कामासाठी एस.टी.बी.डी.एस.आर.इ. सन १९८८-८९ नुसार तयार करण्यांत आलेल्या र.रु.१,८६,१९८/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.७% कमी दराचे मे.मेल्ट्रानिक्स, अहमदनगर यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२०६/३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांतीचौक येथे वाहतूक स्वयंचलित नियंत्रक बसविणेच्या कामासाठी एस.टी.बी.डी.एस.आर.ई.सन १९८८-८९ नुसार रक्कम रु.२,८९,६६८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असून सदर खर्च हा विशेष शासकीय अनुदानातून सन १९९०-९१ च्या वर्षाच्या तरतूदीमधून करण्यांत येईल. त्यास मान्यता मिळावी.

सदर कामासाठी दै.लोकमत टाईम्स व सिटीजन्स, औरंगाबाद हया वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मोहरबंद निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मेल्ट्रानिक्स, अहमदनगर | - | २.१% कमी |
| २. | मे.फरानी इले.ॲण्ड इले.लॅब, औरंगाबाद | - | ४.५% जास्त |
| ३. | मे.न्युक्लिऑनिक्स, पुणे | - | ५.५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.१% कमी दराची मे.मेल्टानिक्स अहमदनगर यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक येथे वाहतुक स्वयंचलित नियंत्रक बसविणेच्या कामासाठी एस.टी.बी.डी.एस.आर.इ. सन १९८८-८९ नुसार तयार करण्यांत आलेले र.रु.२,८९,६६८/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.१% कमी दराचे मे.मेल्ट्रानिक अहमदनगर यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.२०७/३४ :**

उप आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद मा.आयुक्त यांचे मंजूरीनुसार प्रस्ताव सादर करीत आहेत की, कार्यालयीन ठराव (स्थायी समिती) क्र.५०८/५४, दि.२६.०३.९१ व त्यातील दि.१६.०४.९१ च्या दुरुस्तीनुसार कार्यालयाच्या सब्जीमंडी शॉपींग सेंटर मधील दुकान क्र. १ ते १४ वरील गच्ची पैकी १२ दुकानांची गच्ची श्री.फेरोज खान व इतर यांना तर श्री.मुद्रणालय व विजय सायकल मार्ट यांना प्रत्येकी एक गच्ची ३० वर्षे भाडेपट्ट्याने देण्याबाबत मंजूरी झालेली आहे.

श्री.फिरोज खान व इतर यांची मुनलाईट हॉटेल स्थित जागा पैठण गेट ते क्रांतीचौक रस्ता विकास योजनेत बाधित होत असल्यामुळे वरीलप्रमाणे १२ दुकानांची गच्ची त्यांना भाडेपट्ट्याने देण्याबाबत विचार झालेला आहे.

परंतू अद्याप संबंधित व्यवसाय करीत असलेल्या मुनलाईट हॉटेलची जागा मनपाच्या ताब्यात मिळालेली नाही. तेव्हा सदरहु जागा संबंधितांनी म.न.पा.च्या ताब्यात द्यावी किंवा ज्यावेळी महानगरपालिकेच्या ताब्यात मिळेल त्यावेळी संबंधितांना वर उल्लेख केलेली गच्चीची जागा या ठरावानुसार भाडेपट्ट्याने देणे संयुक्तीक होईल. वरीलप्रमाणे मुळच्या वर उल्लेख केलेल्या ठरावात वरीलप्रमाणे दुरुस्ती करणेस्तव (अमेंडमेन्ट-प्रपोझल) प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.फिरोज खान व इतर यांचे म्हणणेनुसार मुनलाईट हॉटेल स्थित जागा पैठणगेट ते क्रांतीचौक रस्ता रुंदीकरणाचे वेळी २४ तास अगोदर मनपाने कळविल्यास सदर मालमत्ता स्वखर्चाने काढून घेण्यांत येईल. तसेच संबंधिताकडून बॉन्ड करुन घेण्यांत यावा. कार्यालयीन ठराव (स्थायी समिती) क्र.५०८/५४, दि.२६.०३.९१ व त्यातील दि.१६.०४.९१ च्या दुरुस्तीनुसार कार्यालयाच्या सब्जीमंडी शॉपींग सेंटरमधील दुकान क्र.१ ते १४ वरील गच्ची पैकी १२ दुकानाची गच्ची श्री.फिरोजखान अ.रहेमान खान यांना मंजूर झाल्याप्रमाणे जागा ताब्यात देण्यांत येवून ॲग्रीमेंट करुन घेण्यांत यावे. यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२०९/३५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९१-९२ हया वर्षासाठी ८००० नग ४X४० वॅट ट्युबरॉड खरेदी करण्यासाठी र.रु.२,८०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदर खर्च हा नवीन विद्युत साहित्य खरेदी हया शिर्षकामधून करण्यांत येईल.

सदर कामासाठी दै.वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यांत आल्या असता एकूण चार निविदा प्राप्त झाल्या होत्या पैकी मे.श्री.चिंतामणी ट्रेडींग कं.औरंगाबाद हयांची निविदा तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे प्रति नग रु.२९.८८ (बजाजमेक) हयाप्रमाणे असून त्यांच्याकडून खरेदी करण्यांसाठी ठराव क्र.६१/११ दि.२२.०७.९१ अन्वये स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

त्याप्रमाणे संबंधित पुरवठादारास ४x४० वॅट ट्युबचा पुरवठा करणे बाबत कार्य आदेश देखील देण्यांत आलेला असून एक महिन्याची मुदत देण्यांत आली होती. सदर मुदत दि.२०.१०.९१ रोजी संपली असून संबंधिताने अद्याप सदर साहित्याचा पुरवठा ह्या कार्यालयास केलेले नाही. अर्थात मुदत संपताच संबंधितास स्मरणपत्र देवून त्याची प्रत बजाज कंपनीस पाठविण्यांत आली आहे. तसेच सध्या विद्युत भांडारात ट्युब नसल्यामुळे व एजन्सी पुरवठा करित नसल्यामुळे मा.आयुक्तांनी दि.२९.१०.९१ रोजी सदर साहित्य मंजूर दरामध्ये (रुपये २९.८८) प्रमाणे ८००० नग ट्युब बजाज कंपनीतर्फे खरेदी करण्यांस मान्यता दिलेली आहे. चर्चेनुसार बजाज कंपनी सदर ट्युब वरील दरात देण्यास तयार आहे. तरी प्रस्ताव मंजूरीस्तव आणि विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ हया वर्षासाठी ८००० नग ४x४० वॅट ट्युब रॉड खरेदी करण्यासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रुपये २,८०,०००/- चे अंदाजपत्रकास नवीन विद्युत साहित्य खरेदी या शिर्षकाखाली खर्च करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समिती ठराव क्र.६१/११ दि.२२.०७.९१ अन्वये मंजूर केलेल्या मे.चिंतामणी ट्रेडींग कं.औरंगाबाद यांचे प्रति नगास रु.२९.८८ या दराची निविदा त्यांनी पुरवठा न केल्यामुळे रद्द करण्यांत येऊन मा.आयुक्त यांचे दि.२९.१०.९१ रोजीचे मंजूरी अन्वये सदरील साहित्य ४x४० वॅट ट्युब रॉड ८००० नग नग रु.२९.८८ या दराने बजाज कंपनीकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२१०/३६ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, शहरातून साथींचे रोगांचा प्रादुर्भाव कमी करणेसाठी व प्रतिबंधक उपाय योजनेसाठी पाणी शुध्दीकरणाच्या गोळ्या (क्लोरीन टॅबलेटस) सन १९९१-९२ साठी खरेदी करणे जरुरी आहे. त्याप्रमाणे स्थानिक वृत्तपत्रातून जाहिरात देवून निविदा मागविल्या आल्या होत्या. एकंदर सहा निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| | | रुपये | प्रति |
|---|---|---|---|
| १. | विश्व केमीकल | ७९.०० | १००० क्लॉरीन ३० एम.जी. |
| २. | मोनार्क फार्मा | ८१.०० | १००० क्लॉरीन ३० एम.जी. |
| ३. | मोनार्क केमीकल्स | ८३.०० | १००० क्लॉरीन ३० एम.जी. |
| ४. | प्रिमियन असोशिएटस, नागपूर | ७२.७५ | १००० क्लॉरीन ३० एम.जी. |
| ५. | आदिती सेल्स, कार्पोरेशन | १६२.५० | १००० क्लॉरीन ३० एम.जी. |
| ६. | श्री.केमीकल्स | | |

श्री.केमीकल्स यांनी निविदीत केल्याप्रमाणे त्यांनी क्लोरीनचे दर भरलेले नाही. त्यांनी हॅलोजन म्हणून ४ एमजीची ओझान ग्रुपचा गोळ्यांचा दर भरलेला आहे. म्हणून त्याचे दर तुलनात्मक तक्त्यासाठी पात्र धरण्यांत आलेले नाहीत.

महानगरपालिकेने (क्लोरीन) पाणी शुध्दीकरण गोळ्याबाबत निविदा मागविल्या होत्या त्याप्रमाणे प्रिमीयर असोशिएटस यांचे दर ७२.७५ प्रति १००० गोळीसाठी कमी दराचे दरपत्रक मंजूर करावे व १९९१-९२ साठी अंदाजित केलेल्या रकमेतून खर्च करण्यास मंजूरी देवून मेसर्स प्रिमीयर असोशिएटस यांचे बरोबर करार करणेसाठी मान्यता द्यावी. मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ करिता मेसर्स प्रिमीयर असोशिएटस नागपूर यांचे प्रति हजार क्लोरीन गोळ्या करिता (३० एम.जी) रुपये ७२.७५ या कमी दराच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. मेसर्स प्रिमीयर असोशिएटस नागपूर यांचे कडून वरील दराने २० लाख गोळ्या खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १९.११.१९९१ रोजी भरलेल्या विशेष स्थायी समिती सभेचे वृत्तांत.**

**मंगळवार दिनांक १९ नोव्हेंबर १९९१ रोजी मा.सभापती श्री.मो.इस्माईल अ.करीम यांचे अध्यक्षतेखाली दुपारी ३.०० वाजता विशेष स्थायी समिती सभेस सुरवात झाली. या सभेत कार्यालयीन अधिकाऱ्यांसह निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
२. श्री.फैयाज खान अहमद खान
३. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री.जावेद हसन खान कसीम हसन खान
५. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
६. श्री.भगुरे तुळशीराम छगन
७. श्री.सोनवणे केशव काशिनाथ

**विषय क्र.२११/१ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला की, शहर व सिडको भागात वेगवेगळ्या व्यासाचे एकूण ३९,२०३ नळ कनेक्शन आहेत. (घरगुती/उद्योगधंद्यासाठी व तात्पुरते स्वरुपाचे) (जानेवारी ९१ अखेरपर्यंत)

औरंगाबाद शहराची लोकसंख्या सुमारे ६ लाख आहे. पैकी सिडको कडील खेडे व स्लम भागात सुमारे २ लाख लोकसंख्या असून त्या भागात सुमारे १५४०० सर्व प्रकारचे वेगवेगळ्या व्यासाचे नळ कनेक्शन आहेत. तसेच शहरात सुमारे ४ लाख लोकसंख्या असून वेगवेगळ्या प्रकारचे व वेगवेगळ्या व्यासाचे २३,८०३/- नळ कनेक्शन आहेत. लोकसंख्येच्या मानाने शहरात नळ कनेक्शन रेकॉर्डप्रमाणे सिडकोशी तुलना केली असता कमी आहेत. परंतू शहरात (सिडको धरुन) पाहणीच्या वेळेस अनधिकृत नळ कनेक्शन झाल्याचे दिसते. बऱ्याच घरात चौकशी केली असता घरमालकाचे नांव व नळ अधिकृत किंवा अनधिकृत आहे ही माहिती अचूक मिळू शकत नाही. तरी सुध्दा शहरात सुमारे १०० अनधिकृत नळ कनेक्शन शोधून काढण्याचे काम कार्यालयाचे कर्मचारी वर्गाने गेल्या दोन महिन्यापासून केले आहे व त्याबाबत कायदेशीर कार्यवाही चालू आहे.

सन १९९०-९१ मध्ये पाणी पुरवठ्याचा एकूण खर्च रु.२.६९ कोटी झाला असून नळ कनेक्शन द्वारा मागणी रु.१.७५ कोटी इतकी होती. म्हणजे महापालिकेस सुमारे रु.९३ लाख नुकसान सोसावे लागले करिता होणारे नुकसान काही अंशी भरुन काढण्याचे दृष्टीने विनापरवाना नळ शोधणे हे काम अपरिहार्य आहे.

अनधिकृत नळ शोधणे अत्यंत अवघड आहे. हे काम नागरिकांचे सहकार्याशिवाय पुर्ण होणे शक्य नाही. त्याकरिता अनधिकृत नळ शोध माहिती हाती घ्यावी लागेल. तत्पुर्वी नळ नियमित करण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक वाटते.

१. वर्तमानपत्रात जाहिर सूचना प्रसिध्द करणे व त्यात खालील बाबींचा उल्लेख करणे.

अ) ज्या नागरिकांनी अनधिकृत नळ जोडणी केली आहे. त्यांनी नियमाप्रमाणे महापालिका परवानाधारक प्लंबर कडून नळ नियमित करण्याकरिता कार्यवाही दाखल करावी.

ब) अनधिकृत नळ नियमित करण्याकरिता फिस रुपये ६००/-.

क) अनधिकृत नळाबाबत दि.०१.०४.९० पासून एक वर्षाचे चार्जेस खालीलप्रमाणे -
१/२ इंच घरगुती - ४००.००
किंवा १/२ इंच उद्योगधंद्याकरिता - १४५०/-
३/४" घरगुती ७३०/-
किंवा ३/४ उद्योगधंद्याकरिता - २६५०/-
१" घरगुती - ११६०.००
किंवा १" उद्योगधंद्याकरिता - ४२००/-
तात्पुरते नळ कनेक्शन असल्यास
१/२ " तात्पुरते (२००x१२) - २४००.००
३/४ " तात्पुरते (३००x१२) - ४२००.००
१" तात्पुरते (५५०x१२) - ६६००.००

ड) रोड दुरुस्ती चार्जेस (कोणत्याही व्यासाची लाईन असल्यास) - १००.००

च) बोरींग फिस - १/२ " करिता रु. ५/-
३/४ " करिता रुपये - २५/-
१" करिता रुपये - ७५/-

छ) तसेच पुढील एक वर्षाचा ॲडव्हान्स "क" प्रमाणे

ज) या व्यतिरिक्त जे अनधिकृत नळ गांवठाणाबाहेर आहेत. त्यांना रु.४१/- दर चौ.मीटरप्रमाणे विकास खर्च भरावा लागेल. (घोषित) झोपडपट्ट्या करिता रु.९/- दर चौ.मिटरप्रमाणे)

२) वरीलप्रमाणे जे अनधिकृत नळधारक दिलेल्या वेळेत आपले नळ कनेक्शन नियमित करणार नाहीत. अशा करिता खास शोध पथकातर्फे कार्यवाही करावी लागेल. व अनधिकृत नळ कनेक्शन सापडल्यास अथवा तसा प्रयत्न झाल्या असल्याचे निदर्शनास आल्यास अशा व्यक्तीवर महापालिका पाणी पुरवठा उप विधीप्रमाणे आणि इ.पी.कोडच्या कलम ३७९ प्रमाणे खटला भरण्यांत येईल. प्रस्तावास मान्यता झाल्यास पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**<u>संवाद :</u>**

**मा.सभापती :** औरंगाबाद शहरात विनापरवाना नळ घेण्याची प्रवृत्ती बऱ्याच प्रमाणात वाढलेली आहे. अशाप्रकारे विनापरवाना नळ घेणे नियमाच्या विरुध्द असून यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होते. पुर्वी नळ कनेक्शनसाठी आलेली संचिका कर आकारणी विभागात पाठवून संबंधित मालमत्तेवर कर आकारणी झाल्यानंतर नळ कनेक्शन देण्याची पध्दत होती. परंतू माजी आयुक्तांनी सात आठ महिन्यापुर्वी कार्यरत असलेली ही पध्दत एका आदेशाद्वारे बंद केलेली आहे. पर्यायाने मालमत्तेवर टॅक्स आकारणी न झाल्यामुळे नागरिकांच्या नळ कनेक्शन मागणीच्या संचिका मंजूर होत नाही. त्यामुळे अनधिकृत नळ कनेक्शन घेण्याची प्रवृत्ती वाढत आहे. आणि महानगरपालिकेचे आर्थिक नुसान होत आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन प्रशासनाने मांडलेल्या ठरावावर सभागृहाने चर्चा करावी.

**श्री.केशव सोनवणे :** खत्री नगरच्या प्रकरणानंतर स्लम व इतर भागातील मालमत्तेवर कर आकारणी करण्याची पध्दत बंद झाल्यामुळे अनधिकृत नळ कनेक्शन प्रश्न उद्‌भवला आहे. अशी चर्चा यापुर्वीच्या स्थायी समितीमध्ये झालेली आहे. ही

बाब लक्षात घेता नळ कनेक्शन घेण्यासाठी येणाऱ्या अडचणी बाबत आजच्या सभेत काय चर्चा होणार आहे. आणि त्यावर काय निर्णय घेणार आहेत. याची माहिती मा.आयुक्तांना असणे आवश्यक आहे. म्हणून आजच्या सभेत मा.आयुक्त उपस्थित असते तर नळ कनेक्शन बाबत सभागृहात काय चर्चा झाली. आणि त्या विषयी कोणते निर्णय घेण्यांत आले. याची मा.आयुक्तांना पूर्ण कल्पना येईल. तेव्हा आजच्या सभेला मा.आयुक्त उपस्थित असावे असे वाटते.

**मा.उपआयुक्त :** सभागृहामध्ये मुख्य लेखापरिक्षक, विधी सल्लागार, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनिःसारण हे उपस्थित आहेत. या प्रशासकीय अधिकाऱ्यांसमोर ही चर्चा होत आहे. तेव्हा नळ कनेक्शन मंजूरीबाबत सभागृहात झालेली चर्चा आणि त्याविषयी सभागृहाने घेतलेला निर्णय सभागृहाच्या शिफारशीसह सर्वसाधारण सभेत ठेवला जाईल. आणि अशा सर्वसाधारण सभेत मा.आयुक्त हे उपस्थित असतीलच तेव्हा सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयानंतर त्यावर अंमलबजावणी होईल.

**श्री.केशव सोनवणे :** कर आकारणी झालेली नसल्यामुळे सिडको भागातील नळ कनेक्शनची बरीच प्रकरणे नामंजूर झालेली आहेत. अर्थात नळ कनेक्शन च्या प्रकरणाबरोबर कर आकारणीचा प्रश्न हा निर्माण होतोच तसेच विनापरवाना बांधकाम धारकाने नळ कनेक्शनची मागणी केली असता अशा संचिका नगररचना विभागाकडे अभिप्रायासाठी पाठविल्या जातात या संचिकावर विनापरवागी बांधकाम असल्यामुळे कर आकारणी करण्यांत येऊ नये. असा अभिप्राय दिला जातो. नगर रचना विभागाचे वरील अभिप्रायाप्रमाणे नळ कनेक्शन मंजूर केले जात नाही. व पर्यायाने नागरिक अनधिकृत नळ कनेक्शन करुन घेतात. यापुर्वी घोषित स्लम भागात मालमत्तेवर कर आकारणी करुन नळ देण्याची पध्दत कार्यरत होती. परंतू खत्री प्रकरणानंतर ही पध्दत बंद झालेली आहे. त्यामुळे स्लम भागातील नागरिकांना नळ घेता येत नाही. पर्यायाने नागरिक प्लंबरला हाताशी धरुन नळ कनेक्शन करुन घेतात. तेव्हा पुर्वीप्रमाणेच स्मल भागाला कर आकारणी करण्यांत आली पाहिजे.

**मा.सभापती :** ठाणे महापालिकेत विनापरवाना घरा नाही नळ दिला जातो. तसेच अन्य महापालिकांमध्ये विना परवाना घरांना कर आकारणीची काय पध्दत आहे. याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने सोलापूर महापालिकेकडून माहिती मागविण्यांत आली आहे.

**कर आकारणी अधिकारी :** सोलापूर महानगरपालिकेत विनापरवाना घरांना कर आकारणी करण्याबाबत अवलंबवण्यांत आलेल्या कार्यपध्दतीची माहिती सभागृहास वाचून दाखविली ती खालीलप्रमाणे -

१. सोलापूर मनपाकडे घोषित झोपडपट्टी एकूण ११९ आहेत. त्यावर कर आकारणी करण्यांत आलेली आहे.

२. कोणत्याही झोपडीस कर आकारणी करतांना त्यास बांधकाम परवानगी किंवा पी.आर.कार्ड किंवा कोणत्याही विभागाचा रिपोर्ट घेण्याचा संबंध नाही. मात्र संबंधित विभागाने कळविल्यास तेव्हढी दखल घेण्यांत येते.

३. कोणतेही बांधकाम नियमित असो किंवा अनियमित असो ते पाहण्याचे काम कर आकारणी विभागाचे नाही. फक्त झोपडी, शेड, घर दिसल्यास आकारणी करण्याचा कर आकारणी केल्या नंतर संबंधित विभागास स्वत:हून कळविण्याची आवश्यकता नाही. व गलिच्छ वस्तीतील कोणत्याही झोपडीस अथवा शेडला अथवा घराला आकारणी करुन मनपाचे उत्पन्न वाढविण्यांत येते.

४. कर आकारणीची स्पेशल नोटीस देतांना मु.प्रा.म.अ.१९४९ सुचना बिगर हुकूमाबाहेरचे बांधकाम किंवा बिगर परवाना वापर या बाबतीत जरुर ते इलाज करणेस मनपाचे हक्कास या नोटीसाने बांध येणार नाही. असे छापून नमूद केलेले आहे व सदरील नोटीसवर घरधारकांनी मिळकत धारकांची स्वाक्षरी घेतलेली असते. त्यामुळे महानगरपालिकेस सदरील बांधकाम पाडावयाचे असल्यास सदरील नोटीसमुळे बांधा येत नाही.

५. तसेच एखादे विनापरवाना बांधकाम गलिच्छ वस्ती वगळून शहराचे कोणत्याही भागात असल्यास त्यास कर आकारणी करता येते.

६. कोणत्याही आरक्षणामध्ये घरे झालेली असल्यास त्यास कर आकारणी विभागातर्फे कर आकारणी करण्यांत येते. कारण अशा आरक्षणामध्ये घरे होवू न देणे ही कर आकारणी खात्याची जबाबदारी नाही. त्यासाठी संबंधित विभाग जबाबदार आहेत. तसेच अशा आरक्षणाचे जागी महानगरपालिकेची आरक्षित जागा असा फलक लावलेला असतो. त्यामुळे शक्यतो असे बांधकाम होत नाही. आणि झाल्यास त्यांना पर्यायी जागा देवून आरक्षण रिकामे करण्यांत येते.

७. ज्या जागेच्या मालकी हक्काबाबत काही वाद असल्यास शहर भूमापन कार्यालयाशी लेखी संपर्क साधून मालकी हक्क निश्चित केला जातो.

**मा.सभापती :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे सोलापूर व अन्य महानगरपालिकामध्ये विनापरवाना मालमत्तेवर कर आकारण्याची पध्दत अंमलात आहे. औरंगाबाद शहरातील हे हिस्सा विकास आराखड्यात विविध विकासासाठी आरक्षित केलेला आहे. त्यापैकी बहुतेक आरक्षित केलेला आहे. त्यापैकी बहुतेक आरक्षित जागेवर घरे बांधून तयार झालेली आहेत. आणि अशा घरांना (बहुतांशी) कर आकरणीही झालेली आहे. पण माजी आयुक्तांनी विनापरवाना घरांना कर आकारणी करण्याची पध्दत बंद केल्यामुळे अनाधिकृत नळ कनेक्शनचे प्रमाण वाढलेले आहे.

**श्री.केशव सोनवणे :** सिडको भागास मालमत्ता कर लावलेला नाही. त्यामुळे तेथील नागरिकांना नळ कनेक्शन मिळत नाही. मालमत्ताकराबाबत घर मालकांना नोटीसेस दिल्या आहेत. परंतू त्याबाबतची सुनावणी झालेली नाही म्हणजेच या भागातील मालमत्ता कर आकारणी झालेली नाही. मग सिडको भागातील नागरिकांनी मालमत्ता कर कसा भरावा तेव्हा सिडको भागातील नागरिकांना नळ कनेक्शनसाठी टॅक्स बाबतची असलेली अट शिथील करुन नळ

कनेक्शन देण्यांबत यावे. मालमत्ता कराबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर संबंधित घरमालकाने मालमत्ता कर भरला नाही. तर त्याचे नळ कनेक्शन कट करण्यांत यावे.

**मुल्य निर्धारण अधिकारी :** सिडको भागातील एन-६ ते एन-१३ करिता मालमत्ता कराच्या नोटीसेस वाटप झालेले आहे. या नोटीसेसवर ज्या घर मालकांनी हरकत घेतली आहे. अशा हरकतीची सुनावणी करण्याचे काम चालु आहे.

**श्री.केशव सोनवणे :** सिडको भागातील मालमत्ता कराबाबत यापुर्वी मी जो उल्लेख केला आहे. तो एन-६ ते एन-१३ या भागातील मालमत्ता कराविषयी नसून हा मालमत्ता कराचा प्रश्न एन-१ ते एन-५ या बंगला पध्दतीच्या मालमत्ताबाबतचा आहे. मुल्य निर्धारण अधिकारी यांनी जो खुलासा केला. त्या एन-६ ते एन-१३ या भागातील गाळे धारकांना नळ कनेक्शन मिळालेले आहे.

**मुल्य निर्धारण अधिकारी :** कर आकारणी विभागाने टॅक्स लावणे बंद केले नसून जर एखादी मालमत्ता स्लम भागातील असेल तर त्याबाबत सदर मालमत्ता घोषित स्लम भागात आहे काय? याबाबत प्रकल्प अधिकारी यांचा आणि विनापरवाना बांधलेल्या मालमत्तेबाबत नगररचना विभागाचा अभिप्राय घेऊन त्यांचे अभिप्रायाप्रमाणे कार्यवाही केली जाते. ज्या मालमत्तांना बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र मिळाले आहे. अशा मालमत्तांना नियमाप्रमाणे कर आकारणी केली जाते.

**मा.सभापती :** मालमत्ता कराबाबत प्रशासनाची झालेल्या चर्चेनुसार (मा.आयुक्त, मा.उपआयुक्त, व विधी सल्लागार) वैधानिक बाबींचा विचार करण्यासाठी आजची सभा दिनांक २७.११.९१ पर्यंत तहकुब करण्यांत येते.

वरील घोषणेनंतर वरील सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २७.११.१९९१ रोजी भरलेल्या विशेष स्थायी समितीचा (तहकुब) वृतांत.**

**दिनांक १९.११.१९९१ रोजी तहकुब करण्यांत आलेली विशेष स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक २७.११.९१ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.सभापती श्री.मो.इस्माईल अ.करीम यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली.**

**या सभेत कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
२. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
३. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
४. श्री.भगुरे तुळशीराम छगन
५. श्री.बारवाल गजानन रामकिसन
६. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
७. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र.२११/१ :**

पुढे चालू

**<u>संवाद :</u>**

**करमुल्य निर्धारण अधिकारी :** दि.१९.११.९१ च्या सभेनंतर पुणे, सोलापूर ठाणे व नाशिक या महापालिकांना भेटी देवून तेथील कर आकारणीच्या कामाची माहिती घेण्यांत आली आणि त्या आधारे खालीलप्रमाणे अहवाल तयार करण्यांत आला.

१) झोपडपट्टी रहिवाशांकडून सेवा आकार, भुईभाडे, प्रशासकीय आकार इत्यादी वसुल करणे बाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एम.सी.एम./१०७९/६१३०/सीआर-१११/७, गृहनिर्माण व विशेष सहाय्य मंत्रालय, मुंबई दि.८ जानेवारी १९८७ द्वारे झोपडपट्टीचा वापर निवासी व राहत्या घरात छोटा व्यवसाय असल्यास रुपये १५.०० दर महासेवा आकार वसूल करण्यांत यावा. व झोपडीचा वापर बिगर निवासी कारणासाठी असल्यास रु.२७/- दर महासेवा आकार वसूल करण्यांत यावा असे आदेशित केले आहे.

२) सदर आदेशात शासनाने हे स्पष्ट केले आहे की, ज्या महानगरपालिका वरीलप्रमाणे सेवा शुल्क वसूल करण्यास तयार नाहीत. त्यांनी शासन व जिल्हाधिकारी यांना तशी पुर्व सूचना देणे आवश्यक आहे.

३) महानगरपालिका ठाणे व महानगरपालिका सोलापूर यांच्या कर आकारणी पध्दतीचा अभ्यास करता, असे स्पष्ट झाले आहे की, ठाणे महापालिका विना परवाना बांधकामास कर आकारणी करते परंतू कर आकरणीचे स्पेशल नोटीसवर "बिगर परवाना बांधकाम" व सदरचा इमला नगर परिषदेच्या परवानगीशिवाय बांधला असल्यामुळे त्यावरील आकारणीमुळे त्याला बांधकामाची परवानगी असे समजले जाणार नाही असे दोन शिक्के मारते.

४) सोलापूर महानगरपालिका विना परवानगी बांधकामावर कर आकारणी करते. त्यांच्या नोटीसवर खालील सूचना छापलेल्या असतात. बिगर

हुकूमाचे अगर हुकूमाबाहेरचे बांधकाम किंवा बिगर परवाना वापर या बाबतीत जरुर ते इलाज करण्यास महापालिकेचे हक्कास या नोटीसीने बाधा येणार नाही.

५) औरंगाबाद महानगरपालिकेने यापुर्वी बिर परवाना बांधकामास कर आकारणी केली आहे. यापुढे अशी कर आकारणी करतांना स्पेशल नोटीसवर वरीलप्रमाणे सूचना छापून व बिगर परवाना बांधकामाचा शिक्का मारुन कर आकारणी करता येईल. कर आकारणी नोटीसवर महानगरपालिकेचा गोल शिक्का मारुन त्यामध्ये विना परवाना बांधकाम असे नमूद करुन कर आकारणी करता येईल.

## अपेक्षित कार्यवाही

अ) औरंगाबाद महानगरपालिकेच्या कर आकारणी नोटीसमध्ये वरीलप्रमाणे योग्य तो बदल करणे. सदर बदल "सदरचा इमला/इमारत/नगर परिषदेच्या/ महानगरपालिकेच्या विना परवानगीने बांधला/बांधली/वापरत असल्यामुळे त्यावरील कर आकारणीमुळे त्याला बांधकामाची परवानगी आहे असे समजले जाणार नाही. व याबाबतीत जरुर ते कायदेशीर इलाज करणेस महानगरपालिकेचे हक्कास या नोटीसीने नोटीसशी संबंधित कर पावतीने बाधा येणार नाही." असा असावा.

ब) कर आकारणी नोटीसीसीवर महानगरपालिकेच्या गोल शिक्का मारुन त्यामध्ये विना परवानगी बांधकाम/वापर असे नमूद करावे.

क) अशा प्रकारे केलेली कर आकारणी ही घराचे मालक म्हणून न करता भोगवटाधारक म्हणून करणे योग्य राहील. तसेच नोटीस व संबंधित कागदपत्रावर भोगवटाधारक अशी नोंद करण्यांत यावी.

ड) अशा प्रकारे कर आकारणी करतांना वरील प्रमाणे शिक्का, सदरील घराचे माहितीपत्रक हिशोब तक्ता, कर आकारणी रजिस्टर बील, मागणी नोटीस, पावती व इतर संबंधित कागदपत्रे यावर मारणे योग्य राहील.

इ) ज्या दिवशी मनपाने असे बांधकाम पाडले त्या दिवसापासूनच सदरील कर आकारणी बंद झाल्याचे गृहीत धरले जाईल.

फ) नोटीसची टीप महानगरपालिकेच्या विधी सल्लागाराकडून तपासून अंतिम करण्यांत यावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.गजानन बारवाल :** महापालिका अस्तित्वात आली तेव्हा काही ग्रामीण भाग महापालिकेत समाविष्ट झालेला आहे. अशा प्रकारे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या ग्रामीण भागातील गावठाण भागात जी घरे तयार झाली आहेत. अशा घरांना कर आकारणी करण्याबाबत काय कार्यवाही केली जाईल याचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** एप्रिल १९९१ नंतर कर आकारणी करण्याबाबत जी पध्दत बंद केली आहे. त्यावर आज सभागृहास विचार करावयाचा आहे. कर आकारणी बंद केल्यामुळे नागरिकांमध्ये विनापरवाना नळ घेण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. तसेच नागरिकांना विद्युत कनेक्शन घेण्याबाबतही अडचण निर्माण होत आहे. नागरिकांनी अनधिकृत नळ कनेक्शन घेतल्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तेव्हा सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे अन्य

महानगरपालिका प्रमाणे शहरातील विना परवानगी बांधकामावर कर आकारणी करतांना कर आकारणीचे स्पेशल नोटीसवर "विना परवाना बांधकाम" व सदरचा इमला महापालिकेच्या परवानगीशिवाय बांधत असल्यामुळे त्यावरील कर आकारणीमुळे इमल्यास बांधकामाची परवानगी असे समजले जाणार नाही. "तसेच बिगर हुकूमाचे अगर हुकूमाबाहेरचे बांधकाम बिगर परवाना वापर या बाबतीत जरुर ते इलाज करणेस महापालिकेच्या हक्कास या नोटीसद्वारे बाधा येणार नाही. असा शिक्का मारुन कर आकारणी करण्यांत यावी. शहरातील विविध स्लम भागात पक्क्या स्वरुपाची घरे बांधण्यांत आलेली आहेत. तेव्हा अशा भागातील घरांना महापालिकेच्या प्रचलित नियमाप्रमाणे कर आकारणी करण्यांत यावी."

**श्री.गिरजाराम हाळनोर :** प्रशासनातर्फे सभागृहात खुलासा करण्यांत आल्याप्रमाणे ठाणे/सोलापूर महापालिकाने अवलंबलेल्या पध्दतीनुसार औरंगाबाद शहरातील विना परवाना बांधकामावर कर आकारणी करण्यांत यावी.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** मंजूरा रेखांकनातील महापालिकेने ताब्यात घेतलेल्या मोकळ्या जागावर बऱ्याच ठिकाणी बांधकाम घेत असल्यामुळे अशा ताब्यात घेतलेल्या मोकळ्या जागांना महापालिकेतर्फे तार फेसिंग करण्यांत येण्याची व्यवस्था करण्यांत यावी.

**मा.सभापती :** स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे मंजूरा रेखांकनातील मोकळ्या जागेवर "ओपन स्पेस" मालमत्ता तयार झाली असेल तर अशा मालमत्तेवर तयार झ ाली असेल तर अशा मालमत्तेवर कर आकारणी करण्यांत येवू नयेत.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** एखाद्या मंजूरा रेखांकनामधील मोकळी जागा "ओपन स्पेस" महापालिकेने ताब्यात घेतल्यानंतर त्याबाबतची नोंद नगर भू-मापन कार्यालयात केली जाते काय? असा प्रश्न विचारुन ज्योतीनगर येथील मोकळ्या जागेबाबतचे "ओपन स्पेस" नगर भूमापन कार्यालयाचे कागदपत्र मा.सभापती यांच्याकडे सुपूर्द केले.

**श्री.अलिम बेग :** शहरातील इमारतीवरील कर माफ घेऊ शकतो काय? होत असल्यास तो कोणत्या नियमाप्रमाणे होतो. तसेच कमलनयन बजाज हॉस्पीटल या इमारतीवर कर लावण्यांत आला आहे काय? याबाबतचा खुलासा व्हावा.

**कर मूल्य निर्धारण अधिकारी नं.२ :** कमलनयन बजाज हॉस्पीटल वर लावण्यांत आलेल्या कराबाबत कागदपत्र पाहून माहिती दिली जाईल.

**मा.उपआयुक्त :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३५ अन्वये काही कर माफ होवू शकतो. या बाबत या नियमात विस्तृत खुलासा केलेला आहे.

**श्री.अलिम बेग :** सार्वजनिक न्याय नोंदणी असली तरी अशा संस्थानी (कमलनयन बजाज) करामध्ये माफी देणे योग्य होणार नाही. कारण शैक्षणिक संस्था व इतर संस्था सुध्दा सार्वजनिक न्याय नोंदणीकृत असल्यातरी या संस्थामधून आर्थिक उत्पन्न होतोच अर्थात अशा संस्था उत्पन्न दाखवित नाहीत ही बाब वेगळी तसेच शासनातर्फे चालविण्यांत येणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय "घाटी" या इमारतीवरही महापालिकेतर्फे कर आकारणी केली जाते. तेव्हा कमलनयन बजाज हॉस्पीटल मध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांकडून शुल्क आकारणी होत असल्यामुळे या इमारती वर कर आकारणी माफ

करणे योग्य होणार नाही. जर सार्वजनिक न्याय नोंदणी या नियमाप्रमाणे कमलनयन बाजज हॉस्पीटल यांना करात सुट देण्यांत येत असेल तर शहरातील इतर संस्थानाही अशाप्रकारे सुट का देण्यांत येवू नये.

**मा.सभापती :** स.सभासदांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत संबंधित विभागाने पुढील सभेत अशी प्रकरणे व त्याबाबतची सविस्तर माहिती दाखल करण्याची व्यवस्था करावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** स्लम भागातील मालमत्तांना नगरभूमापन कार्यालयातर्फे मालकी हक्काचे कागदपत्रे मिळत नाही. तसेच या भागातील मालमत्तांच्या खरेदी विक्रीची नोंद घेतली जात नाही. तेव्हा अशा प्रकरणात खरेदीदाराचे नावे, मालमत्ता नामांतर करणे बाबत काय कार्यवाही केली जाईल याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** अशा प्रकारे कुठलेही कागदपत्रे नसतांना नामांतर केल्यास त्यास वैधानिक बांधा येईल. त्यामुळे प्रशासनाचे प्रचलित नियमानुसारच नामांतराची कार्यवाही करता येईल.

**मा.आयुक्त :** घोषित व अघोषित झोपडपट्टीतील विना परवाना बांधकाम घराची कर आकारणी बाबत प्रशासनातर्फे तयार करण्यांत आलेली संक्षित टिप्पणी सभागृहास वाचून दाखविण्यांत आली.

**श्री.गजानन बारवाल :** कर आकारणी बाबत प्रशासनाने तयार केलेल्या टिप्पणीचा विचार केला तर नियमाप्रमाणे टिप्पणी नुसार आकारणी करता येईल काय? याचा विचार व्हावा.

**मा.सभापती :** एप्रिल, १९९१ नंतर कर आकारणी बंद करण्यांत आली होती. त्यामुळे अनधिकृत नळ घेण्याची नागरिकांची प्रवृत्ती वाढत चालली आहे. आणि पर्यायाने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. ही बाब विचारात घेवून अन्य महापालिकेत कर आकारणी बाबत असलेली पध्दत विचारात घेवून त्यात किरकोळ फेरफार करुन पुन्हा कर आकारणी करण्यास सुरुवात करण्यांत येणार आहे. त्यामुळे अशा प्रकारे कर आकारणी करण्यास नियमाला बांधा येत नाही.

**श्री.तुळशीराम भगुरे :** शहरातील ज्या भागात मालमत्तेबाबत कोणत्याही प्रकारचे दस्ताऐवज नाही (पी.आर.कार्ड/रजिस्ट्री इ.) अशा घरांना मालमत्ता कर कोणत्या आधारे आकारला जाईल याचा खुलासा व्हावा.

**मा.आयुक्त :** प्रशासनाने शहरातील मालमत्तेचा सर्व्हे केल्यानुसार दि.२६.०४.९१ पर्यंतच्या सर्व घरांना कर आकारणी केलेली आहे. दि.२६.०४.९१ नंतर तयार झालेल्या घरांना हा प्रश्न निर्माण होईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** कर आकारणी बाबत प्रशासनाने सभागृहासमोर सादर केलेल्या टिप्पणीनुसार कर आकारणी केल्यामुळे यापुढे विना परवाना बांधकामास नोटीस देतांना सदर नोटीस वर विना परवाना बांधकामाचा शिक्का मारुन ही कर आकारणी घरांचे मालक म्हणून न करता भोगवटधारक अशी नोंद करुन करण्यांत येणार आहे. त्यामुळे अशा प्रकारे नोंद केल्यामुळे ज्या इमारतीवर यापुढे कर आकारणी होणार आहे. ते सर्व भोगवटाधारक आणि यापुर्वी ज्या विना परवानगी बांधकामाची कर आकारणी झाली आहे. ते मालक असा अर्थ होईल काय?

**मा.सभापती :** स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे मालकी हक्क देण्याचे काम महापालिका करत नाही. आतापर्यंत कर आकारणी बंद असल्यामुळे महापालिकेचे होणारे आर्थिक नुकसान लक्षात घेऊन नियमाला बांधा येणार नाही. या पध्दतीने यापुढील विना परवाना बांधकामावर कर आकारणी साठी ही पध्दत आवलंबण्यात येणार आहे. तेव्हा इथून पुढे होणाऱ्या कर आकारणीमुळे विना परवानगी धारक, भोगवटाधारक आणि यापुर्वीचे विना परवाना बांधकामधारक, मालक असा अर्थ होणार नाही. तेव्हा प्रशासनाने सुचविलेल्या पध्दतीनुसार कर आकारणी करुन अनधिकृत नळ कनेक्शला आळा घालण्यांत यावा. आणि ज्या नागरिकांनी अनधिकृत नळ कनेक्शन घेतले आहे. अशा नागरिकांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण १० प्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

**मा.उपआयुक्त :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण १० प्रमाणे प्रशासनास फक्त दंड आकारण्याचा अधिकार आहे. या प्रकरणानुसार अनधिकृत नळ कनेक्शन नियमित करण्याचा अधिकार नाही. तेव्हा सदरचा प्रस्ताव शिफारस करुन सर्वसाधारण सभेस पाठविण्यांत यावा. असे वाटते. तरीपण सभागृहाने अनधिकृत नळ कनेक्शन बाबत निर्णय घ्यावा. या निर्णयाचे स्विकृतीने वेळी त्याबाबतचा वैधानिक सल्ला घेवून त्या आवश्यक ती दुरुस्ती करता येईल.

**मा.सभापती :** विना परवाना नळ जोडणी केलेले जे नागरिक नळ जोडणी बाबतची संचिका कार्यालयात दाखल करतील अशा नागरिकांकडून प्रकरण १० अन्वये रु.६००/- दंड आकारुन नळ जोडणी बाबतचे इतर चार्जेस भरुन घेण्यांत यावेत. या संबंधितास नळ कनेक्शन देण्यांत यावे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण १० चे कलम १/३/१८ मध्ये अशाच प्रकारची तरतूद आहे. तेव्हा मा.उपआयुक्त यांनी सुचविल्याप्रमाणे याबाबत प्रकरण सर्वसाधारण सभेत पाठविण्याची आवश्यकता नाही. कर आकारणीबाबत प्रशासनातर्फे नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यांत येणार असल्याने एप्रिल १९९१ नंतरच्या मालमत्तांना कर आकारणी करुन नागरिकांना सहजासहजी नळ कनेक्शन मिळण्याची व्यवस्था करावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २८ नोव्हेंबर १९९१ रोजी भरलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दिनांक २८.११.१९९१ रोजी मा.सभापती श्री.मो.इस्माईल अ.करीम यांच्या अध्यक्षतेखाली समिती सभागृहात दुपारी ३.०० वाजता स्थायी समिती सभेस सुरवात झाली. या सभेत कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
२. श्री.फैयाज खान अहमद खान
३. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री.जावेद हसन खान कसीम हसन खान
५. श्री.पालीवाल विजय गोविंदलाल
६. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
७. श्री.भगुरे तुळशीराम छगन
८. श्री.बारवाल गजानन रामकिसन
९. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
१०. श्री.सोनवणे केशव काशिनाथ
११. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र.२१२/१ :**

दिनांक ०२.११.९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :-</u>**

**श्री.केशव सोनवणे :** आज थोर समाज सुधारक महात्मा ज्योतीबा फुले यांची पुण्यतिथी असतांनाही बलवंत मोफत वाचनालयासमोर बसविण्यांत आलेल्या म.ज्योतीबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यांत आलेल्या नाही. तसेच या भागाची साफसफाईही झालेली नाही. या कामी प्रशासनाकडून झालेल्या दिरंगाई बद्दल आम्ही निषेध नोंदवून सभात्याग करीत आहेत.

(सर्वश्री. फैय्याजखान, अलीम बेग, जावेद हसन, विजय पालिवाल, नारायण फत्तेलष्कर, तुळशीराम भगुरे, गजानन बारवाल, प्रभाकर विधाते, केशव सोनवणे, गिरजाराम हाळनोर, यांनी दुपारी ३.३० वाजता सभात्याग केला. उपरी निर्दिष्ट स.सभासदांनी ३.३५ ला पुन्हा सभागृहात प्रवेश केला.)

**श्री.अलिम बेग :** दि.२७.११.९१ च्या चर्चेनुसार कमलनयन बजाज हास्पीटलला मालमत्ता करात सुट दिली आहे काय? याबाबतची माहिती आजच्या सभेत देण्यांत येईल असे सुचित करण्यांत आले होते. तेव्हा त्याबाबत खुलासा व्हावा.

**करमुल्य निर्धारण अधिकारी :** कमलनयन बाज हॉस्पीटल या इमारतीस सामान्य कर माफ करण्यांत आलेला आहे.

**जकात अधिक्षक :** सभागृहाच्या निर्णयानुसार कमलनयन बजाज हॉस्पीटल या संस्थेकडे जकात कर प्रकरणी दोन वेळेस भेट दिली असता संबंधितांनी संस्थेच्या वरीष्ठ पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन माहिती देण्यांत येईल असा खुलासा दिला.

**मा.उपआयुक्त :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३२ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मा.आयुक्तांनी आदेशाद्वारे कमलनयन बजाज हॉस्पीटल या इमारतीस सामान्य कर माफ केलेला आहे. उक्त अधिनियमाचे कलम १३२ प्रमाणे मा.आयुक्त यांना अधिकार आहेत.

**मा.सभापती :** सार्वजनिक न्याय नोदणीनुसार कमलनयन बजाज हॉस्पीटल या इमारतीस सामान्य कर माफ झाला असला तरी या हॉस्पीटलमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांकडून शुल्क आकारला जातो. म्हणजेच संबंधित हॉस्पीटलला उत्पन्न प्राप्त होते. तेव्हा कमलनयन बजाज हॉस्पीटल करिता सामान्य करात देण्यांत आलेली सुट योग्य नाही. तेव्हा कलम १३२ चा जो वापर केला आहे. तो योग्य वाटत नाही. शहरात असलेल्या शिक्षण संस्था सुध्दा सार्वजनिक न्याय नोंदणीकृत असतील. जर सार्वजनिक न्याय नोंदणीनुसार कमलनयन बजाज हॉस्पीटल इमारतीस सामान्य कर माफ होऊ शकतो तर शहरातील अशा संस्थांनाही करात सुट का मिळत नाही.

**श्री.केशव सोनवणे :** कमलनयन बजाज हॉस्पीटल करिता आयात होणाऱ्या मशिनरीवर जकात करात देण्यांत आलेली सुट रद्द करतांना काढण्यांत आलेल्या आदेशात नजरचुकीने माफी देण्यांत आली होती. असे म्हटले आहे. तेव्हा या इमारतीचे सामान्य करात देण्यांत आलेली सुट सुध्दा रद्द करण्यांत यावी आणि कमलनयन बजाज हॉस्पीटलच्या इमारतीवर नियमाप्रमाणे कर आकारणी करण्यांत यावी.

**मा.सभापती :** कमलनयन बजाज हॉस्पीटल करिता आयात होणाऱ्या मालावर देण्यांत आलेली जकात माफी नजरचुकीने देण्यांत आलेली आहे. असा आदेशात खुलासा आहे. त्याप्रमाणे सामान्य कराबाबतही कार्यवाही करुन संबंधित इमारतीवर नियमाप्रमाणे कर आकारणी करण्यांत यावी.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** पुणे महानगरपालिकेतर्फे शहरातील थोर पुरुषांचे पुतळे दर महिन्याला धुतले जातात तेव्हा औरंगाबाद महानगरपालिकेमध्येही त्याप्रमाणे कार्यवाही करण्याची व्यवस्था व्हावी.

**मा.उपआयुक्त :** थोर पुरुषांचे पुण्यतिथी/जयंती निमित्त शहरात विविध पुतळयाचे भागाची त्या त्या वेळी स्वच्छता करण्याबाबत संबंधित विभागाचे विभागीय अधिकारी यांना आणि जयंती/पुण्यतिथी निमित्त पुतळ्यासाठी आवश्यक असलेले पुष्पहार पुरविण्याबाबत उद्यान अधिक्षक यांना सूचना देण्यांत येतील.

**श्री.म.अयुब गुलाम जिलानी (मा.सभापती यांचे परवानगीने) :** वार्ड क्र.१२ मधून निवडून आल्यापासून या वार्डाचे विविध कामासाठी वेळोवेळी संबंधित विभागाकडे मागणी करुनही गेल्या साडेतीन वर्षात या वार्डात कोणत्याही प्रकारचे रस्ते, लाईट, ड्रेनेज, खांडकी, पाईप लाईनचे काम अद्याप झालेले नाही. या कामासाठी वरीष्ठ अधिकाऱ्यांचीही वेळेवेळी भेट घेतलेली आहे. गेल्या १० दिवसापासून वार्ड क्र.१२ मधील नेहरु नगर व इतर भागात पाणी नाही. याबाबत वर्तमानपत्रातही बातमी प्रसिध्द झालेली आहे. वार्डातील नागरिक पाण्यासाठी वारंवार मागणी करत आहेत. साडे तीन वर्षाचे कालावधीत या भागातील कोणत्याही प्रकारची सुविधा उपलब्ध झालेली नाही. तेव्हा सभागृहातील सर्व सभासदांनी वार्ड क्र.१२ ची पाहणी करावी आणि या भागाकरिता आवश्यक सुविधा केव्हा उपलब्ध करुन दिल्या जातील त्याबाबत खुलासा करावा.

**मा.सभापती :** स.सभासदांनी सभागृहासमोर मांडलेली सुचना मान्य करण्यांत येते. तसेच वार्ड क्र.१२ येथील सुविधा बाबत चर्चा करण्यांत येईल.

**जलगृह अभियंता :** दिल्ली गेट टाकीवरुन जिन्सी टाकीला होणारा पाणी पुरवठा पाईप लाईनवर पुर्वी १२ तास पंपीग चालू होती. आता या पंपीग लाईन मध्ये बदल करण्यांत आलेला आहे. त्यामुळे वार्ड सार्वजनिक नळांना कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. या भागात वितरण जलवाहिन्या टाकण्यांत आलेल्या नाहीत.

**मा.सभापती :** पाणी ही नागरिकांची नित्याची गरज आहे ही बाब लक्षात घेता या भागातील पाणी टंचाई दूर करण्याच्या दृष्टीने जलगृह अभियंता यांनी ताबडतोब कार्यवाही करावी आणि पंपींग लाईन बदल्यामुळे होणाऱ्या संभाव्य पाणी टंचाई दूर करण्याच्या दृष्टीने या भागात वितरण जलवाहिन्या टाकण्याचे अंदाजपत्रक तयार करुन सभागृहासमोर सादर करावे.

**अतिरिक्त शहर अभियंता :** वार्ड क्र.१२ मध्ये बहुतांशी रस्ते अरुंद आहेत. या रस्त्याचे कामासाठी अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. तेव्हा वितरण जलवाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यंत या भागातील रस्त्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक सुधारित करुन काम करण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** शहानुरमियाँ दर्गा उर्स आणि सातारा यात्रा उत्सव असल्यामुळे शहानूरमियाँ दर्गा रोडकडे जाणाऱ्या रस्त्याचे पॅचवर्क आणि सातारा रोडचे डांबरीकरणाचे काम सुरु करण्यांत यावे. तसेच नागरिकांच्या सोयासाठी या भागातील लाईट व्यवस्थीत करण्याचे कामही सुरु करण्यांत यावे.

**श्री.प्रभाकर विधाते :** वार्ड क्र.३ मधील विद्युत व्यवस्थेबाबत काय कार्यवाही झाली तसेच या भागातील डांबरीकरणाच्या कामाचे काय झाले. याचा खुलासा व्हावा. या दोन्ही कामासाठी अनेक वेळा मागणी करण्यांत आलेली आहे.

**उपअभियंता बी-१ :** वार्ड क्र.३ मधील आतापर्यंत काही रस्त्याचे डांबरीकरणाचे काम झाले आहे.

**श्री.मोहसीन अहमद (मा.सभापती यांचे परवानगीने) :** नागसेन कॉलनी येथील समाज मंदिराचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. याबाबत वेळावेळी मागणी करण्यांत यावे.

**उप अभियंता (इ) :** नागसेन कॉलनी येथील समाज मंदिराचे काम हाती घेण्याच्या दृष्टीने सदर संचिका पुढील कार्यवाहीसाठी मा.मुख्य लेखापरिक्षक यांचेकडे पाठविली असता मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी या कामासाठी अंदाजपत्रकात तरतूद आहे काय. अशी विचारणा केली आहे. या कामावर तीन चार वर्षापासून मनाई हुकूम होता.

**मा.सभापती :** नागसेन कॉलनी येथील समाज मंदिराचे कामावर आतापर्यंत एक लाख रुपये खर्च झालेले आहेत. या कामावरचा मनाई हुकूम काढून घेण्यांत आलेला आहे. तेव्हा या कामाची संचिका त्वरीत मंजूर करुन घेऊन काम लवकर सुरु करावे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर, श्री.गजानन बारवाल :** सभासदांना त्यांच्या वार्डातील विविध कामाविषयीचे पत्रक त्या त्या विभागात दाखल करावे लागते. ही बाब लक्षात घेता सभासदांना त्यांच्या वार्डातील कामाचे पत्रक टाईप करुन घेण्यासाठी एक टंकलेखन यंत्र आणि एक टायपिस्ट देण्याची व्यवस्था व्हावी.

**मा.सभापती :** मा.सचिव यांनी सभागृहाचे कामकाजासाठी लागणारे टंकलेखन यंत्र आणि सभासदाचे पत्र टाईप करण्यासाठी एक नवीन टंकलेखन यंत्र अशा प्रकारे आवश्यकतेनुसार लागणाऱ्या टंकलेखन यंत्राचा प्रस्ताव दाखल करावा.

**श्री.तुळशीराम भगुरे :** हरसुल येथील समाज मंदिराच्या कामाचे अंदाजपत्रक मंजूरीबाबत विचार व्हावा.

**मा.मुख्य लेखापरिक्षक :** १५ डिसेंबर पर्यंत सुधारित अंदाजपत्रक तयार करुन देण्याचे काम पुर्ण करण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

**श्री.तुळशीराम भगुरे :** साफसफाई कामगार श्रीमती हरणाबाई मिसाळ झोन नं.२ यांचे वैद्यकीय देयक अद्याप मंजूर झालेले नाही. त्याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** संबंधित विभागाने पुढील सभेत त्याबाबतची माहिती द्यावी.

**श्री.मिर्झा अलिम बेग :** वैद्यकीय देयकाबाबत सभागृहात आतापर्यंत झालेली चर्चा विचारात घेता प्रत्येक कर्मचाऱ्यांला दरमहा प्रमाणे वैद्यकीय भत्ता देण्यांत यावा.

**मा.मुख्य लेखापरिक्षक :** स.सभासदांचे सूचनेप्रमाणे शासकीय नियमानुसार कर्मचाऱ्यांना दरमहा वैद्यकीय भत्ता देता येणार नाही. शासन निर्णयानुसार काही विशेष आजारा करिताच वैद्यकीय देयकाचा परतावा केला जातो.

**श्री.तुळशीराम भगुरे :** वैद्यकीय देयकाचा परतावा करतांना काही काही कर्मचाऱ्यांच्या संचिका आरोग्य वैद्यकीय अधिकारी व काही संचिका मा.मुख्य लेखापरिक्षक यांचेमार्फत मंजूर होतात हे कसे याबाबत खुलासा व्हावा. तसेच त्या बाबत काही नियम असल्यास त्याची प्रत देण्यांत यावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** वैद्यकीय देयकाचा परतावा मिळणे बाबत कर्मचाऱ्यांने दाखल केलेली संचिका आस्थापना विभागामार्फत आरोग्य विभागात दाखल झाल्यानंतर दाखल केलेली देयके समाधानकारक असल्यास नियमाप्रमाणे मंजूरीची शिफारस करुन सदर संचिका अंतिम मंजूरीसाठी मा.उपआयुक्त यांच्याकडे सादर केली जाते. ज्या संचिकेतील दाखल केलेल्या देयकाबाबत शंका निर्माण होते. अशा संचिका मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे मार्फत मंजूरीसाठी पाठविल्या जातात. वैद्यकीय देयक मंजूरीबाबत नियम तयार करण्यांत आलेले आहेत.)

**मा.सभापती :** वैद्यकीय देयक मंजूरीबाबत प्रशासनाने तयार केलेल्या नियमाची प्रत सर्व सभासदांना पुढील सभेत देण्याची व्यवस्था करावी.

**श्री.इकबालसिंग गील :** भडकल गेट येथील ड्रेनेजचे घाणपाणी गेल्या एक दिड महिन्यापासून रस्त्यावरुन वाहत आहे. त्यामुळे त्या भागातील नागरिकांचे आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. तेव्हा या भागातील काम त्वरीत हाती घेण्यांत यावे.

**उप अभियंता (ज.नि.) :** महाराष्ट्र पा.पु.व जलनि:सारण मंडळाचे कामाचे वेळी या भागातील जलनि:सारण वाहिनी नादुरुस्त झालेली आहे. नादुरुस्त झालेली जलवाहिनी दुरुस्त करुन देण्याबाबत संबंधित विभागास आवश्यक ती नोटीस देण्यांत आलेली आहे. देण्यांत आलेल्या नोटीसचे उत्तर प्राप्त न झाल्यामुळे या प्रकरणी संबंधित विभागास दोन स्मरणपत्रेही देण्यांत आलेली आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाकडून कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात खुलासा प्राप्त झाल्याची माहिती मिळाली आहे. त्याप्रमाणे भडकलगेट येथील जलवाहिनी दुरुस्त करण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** महाराष्ट्र पा.पु.व ज.नि.मंडळाकडील खुलाशाप्रमाणे भडकलगेट येथील जलनि:सारण वाहिनी त्वरीत दुरुस्त करण्याची व्यवस्था करण्यांत यावी.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** शहागंज मच्छी बाजार विस्ताराचे अंदाजपत्रक संबंधित अधिकाऱ्याने पुढील सभेत दाखल करावे. अशी सूचना मा.सभापती यांनी दिनांक ०२.११.९१ च्या सभेत दिली आहे. त्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**अति.शहर अभियंता :** शहागंज मच्छी बाजाराचे अंदाजपत्रक तयार करुन पुढील सभेपर्यंत लेखा विभागाकडे पाठविण्यांत येईल.

**श्री.केशव सोनवणे :** रॉक्सी सिनेमाजवळील दर्पण भवन या इमारती विषयी सविस्तर माहिती संबंधित विभागाने पुढील सभेत द्यावी असा निर्ण दि.०२.११.९१ च्या सभेत घेण्यांत आलेला आहे. तेव्हा दर्पण भवन बाबतची माहिती सभागृहात देण्यांत यावी.

**मा.सभापती :** दर्पण भवन या इमारतीबाबत सर्वसाधारण सभेत चर्चा चालू आहे. तेव्हा अशा परिस्थितीत या विषयी सभागृहात चर्चा करणे योग्य होणार नाही.

**श्री.केशव सोनवणे, श्री.गिरजाराम हाळनोर :** दर्पण भवन विषयी सर्वसाधारण सभेत चर्चा चालू असली तरी मागील सभेत ठरल्याप्रमाणे सभासदांच्या माहितीसाठी खुलासा घेणे आवश्यक आहे.

**सहा.संचालक, नगररचना :** मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम २६० (१) अन्वये दिनांक १९.१०.९१ रोजी देण्यांत आलेल्या नोटीसचे उत्तरी श्री.फैय्याज अहेमद कुरेशी यांनी दिलेल्या उत्तरात म्हटले आहे की, सदर इमारत श्री.अय्याज अहेमद कुरेशी यांच्या मालकीची असून आम्ही या इमारतीचे भाडेकरु आहोत सदर इमारत पुर्वीपासूनची आहे. यानंतर कलम २६० (२) अन्वये संबंधितास नोटीस देवून केलेले अनिधकृत बांधकाम तीन दिवसाचे आत पाडून टाकण्याचे कळविण्यांत आले आहे. नसता सदर अनधिकृत बांधकाम महापालिकेतर्फे पाडून टाकण्यांत येईल. व त्याबाबतचा खर्च वसुल करण्यांत येईल. दर्पण भवन येथे प्रिंटींग प्रेस चालू असून त्यास परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे सदर अनधिकृत व्यवसाय ताबडतोब बंद करण्याबाबत संबंधितास दि.१३.११.९१ रोजी कळविण्यांत आले आहे. आणि या अनधिकृत व्यवसायाचा विद्युत पुरवठा त्वरीत बंद करण्यांबाबत म.रा.वि.मंडळास कळविण्यांत आले आहे. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी सदर इमारतीस नळ कनेक्शन दिले नसल्याचे कळविले आहे.

**श्री.केशव सोनवणे :** निवडणूक काळात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगाऊ दोन वेतनवाढ देण्याबाबत सभागृहाने यापुर्वी घेतलेल्या निर्णयाचा वृत्तांत पुढील सभेत दाखल करण्यांत यावा. असा निर्णय दि.०२.११.९१ च्या सभेत घेण्यांत आलेला आहे. तेव्हा यावर काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा.सचिव :** सभागृहामध्ये घेण्यांत आलेल्या निर्णयाची प्रत संबंधित सर्व विभागास वेळोवेळी पाठविण्यांत येते.

**मा.सभापती :** सभागृहातर्फे घेण्यांत आलेल्या निर्णयास स्विकृती झाल्यानंतर प्रशासनतर्फे त्यावर कार्यवाही करण्यांत येते. अशी पध्दत आहे. परंतू स्विकृतीनंतर सर्वच निर्णयावर कार्यवाही करणे योग्य होणार नाही. तेव्हा सभासदांनी विचारलेल्या माहिती संबंधी सभागृहात निर्णय झाल्यानंतर नजीकच्या एक

दोन दिवसात त्याबाबतची नोटींग तयार करुन संबंधित विभागाकडे पाठविण्यांत यावी. आणि अशा प्रश्नाबाबत आगामी सभेत आवश्यक ती माहिती पुरविण्यांत यावी.

**श्री.मिर्झा अलीम बेग :** ठराव क्र.२०३ अन्वये सिध्दार्थ उद्यानाभोवती संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या दरपत्रकास नियमानुसार मंजूरी देण्यांत आली असून सदर कामाची देखरेख करण्याचे काम उद्यान अधिक्षक यांच्याकडे दिल्याची माहिती आहे. संरक्षित भिंत बांधणे हे तांत्रिक काम असून उद्यान अधिक्षकाचे देखरेखीत हे काम पूर्ण करुन घेणे योग्य होणार नाही. असे वाटते.

**मा.उपआयुक्त :** शहर अभियंता यांनी सदर प्रकरणी चर्चा करुन तांत्रिक पुर्तता करण्याची व्यवस्था करावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.नारायण फत्तेलष्कर :** नेहरु रोजगार योजने अंतर्गत ज्या नागरिकांना आर्थिक सहाय्य देण्यांत आले अशा नागरिकांची यावी पुरविण्यांत यावी. अशी मागणी करण्यांत आली होती.

**मा.सभापती :** स.सभासदांनी विचारलेल्या सुचनेप्रमाणे सभासदांना नेहरु रोजगार योजने अंतर्गत ज्या नागरिकांना या योजने प्रमाणे आर्थिक लाभ मिळवून देण्यांत आला आहे. अशा नागरिकांची सविस्तर माहिती संबंधित विभागाने देण्याची त्वरीत व्यवस्था करावी तसेच योजने अंतर्गत झालेल्या कामाची पाहणी करण्यासाठी स.सभासद श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.नारायण फत्तेलष्कर व श्री.अलीम बेग यांचा समावेश असलेली एक उप समिती कायम करण्यांत येते.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** नागसेन नगर भागातील जलनि:सारण वाहिनीच्या कामासाठी नाली खोदून ठेवण्यांत आली असून यानंतर सदर कामामध्ये कोणत्याही प्रकारची प्रगती झालेली नाही. त्यामुळे या भागातील नागरिकांना रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. तेव्हा याबाबत काय कार्यवाही झाली. याबाबत खुलासा व्हावा.

**उप अभियंता, ज.नि.:** नागसेन नगर भागात ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम गुत्तेदार श्री.अरोरा यांना देण्यांत आले असून खोदकामानंतर पुढील काम त्वरीत हाती घेण्यांबाबत संबंधितांना वेळोवेळी नोटीस देण्यांत आली आहे. नोटीस देऊनही संबंधित गुत्तेदरांने अद्याप पर्यंत काम सुरु न केल्यामुळे याबाबतची माहिती पुढील कार्यवाहीस्तव वरीष्ठांकडे पाठविण्यांत आली आहे.

**ठराव :**

दि.०२.११.९१ च्या इतिवृत्तातील २४,२५ दुरुस्ती

१) ठराव क्र.१७४/१ मधील महापालिका शिक्षक संघटनेने कार्यालयासमोर सुरु केलेल्या उपोषणाबाबतच्या चर्चेतील ओळ क्र.३१ मध्ये चटोपाध्याय आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव या संभाषणाऐवजी " मुख्याध्यापकाचे जेष्ठता यादीचा प्रस्ताव अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली"

२) ठराव क्र.१८०/७ बाबत दि.०२.११.९१ चे निर्णयानुसार पाहणी करण्यांत आली असून प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५८ मो.उत्तमनगर येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी वसूल झालेल्या तीन निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराच्या श्री.एम.एम.बेग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

३) ठराव क्र.१९२/१९ बाबत दि.०२.११.९१ चे निर्णयानुसार पाहणी करण्यांत आली असून प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बेगमपुरा येथे समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३% कमी दराच्या श्री.एस.ए.नवाब यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या जुन्या इमारतीचे बांधकाम साहित्य (उदा.पत्रे, खिडक्या, दरवाजे, बल्ल्या, विटा ई.) चे हर्रास करण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

४) ठराव क्र.१९३/२० याबाबत दि.०२.११.९१ चे निर्णयानुसार पाहणी करण्यांत आली असून प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.ब्रिजवाडी येथे आर.सी.सी.एन.पी.-२ क्लासची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी दि.२५.०९.९१ च्या वाटाघाटीनुसार तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.७५% जास्त दराच्या मे.उदय इंजिनिअरींग कंपनी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

५) दि.०२.११.९१ च्या सभेत ठराव क्र.२०९ बाबत जो निर्णय घेण्यांत आला होता त्याऐवजी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ हया वर्षासाठी ८००० नग ४x४० वॅट ट्युब रॉड खरेदी करणेसाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,८०,०००/- च्या अंदाजपत्रकास नवीन विद्युत साहित्य खरेदी व शिर्षकाखाली सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

शहरातील बंद दिव्याबाबत नागरिकांची स.सभासदाकडून होत असलेली मागणी लक्षात घेता ८००० नग ट्युब रॉड खरेदी बाबत मा.आयुक्त यांचे दिनांक २९.१०.९१ च्या मंजूरीनुसार मे.बजाज कंपनी हे प्रति नग रु.२९.८८ पैसे या दराने ट्युब रॉड पुरविण्यास तयार असतील तर वरील दराप्रमाणे ८००० नग ट्युब रॉड खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. अशी दुरुस्ती करण्यांत येते.

वरील दुरुस्त्यांसह दिनांक ०२.११.९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२१३/२ :**

महानगरपालिकेच्या विविध पंपींग स्टेशनमध्ये कॅपॅसिटर्स बसविण्याचे कामासाठी वर्तमानपत्रातून जाहिरात देवून निविदा मागविले असता (तिसरी वेळ) एकूण दोन निविदापत्रके प्राप्त झाली.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.संदिप सेल्स कॉर्पोरेशन, औरंगाबाद | - | दर रु.१९४.५० प्रति के.व्ही.आर. |
| २. | मे.जैन इंजिनियरिंग कं.,औरंगाबाद. | - | दर रु.२४५.०० प्रति के.व्ही.आर. |

तरी हयातील सर्वात कमी दराचे दरपत्रक मे.संदिप सेल्स कॉर्पोरेशन, औरंगाबाद यांचे असून त्या दराने एकूण कामासाठीचा खर्च रु.५७,८००/- येईल. तरी मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध पंपींग स्टेशनमध्ये कॅपसिटर्स बसविण्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे दरपत्रक मे.संदिप सेल्स कॉर्पोरेशन औरंगाबाद यांचे प्रती के.व्ही.आर.रु.१९४.५० या दराने खरेदी करणेस व या कामासाठी होणाऱ्या रक्कम रुपये ५७,८००/- चे खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२१४/३ :**

वार्ड क्र.३४ निजामगंज येथे १५० मी.मी.व्यासाची लाईन काढून त्या ठिकाणी २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.७०,७००/- ला मा.आयुक्त

साहेब यांनी मंजूरी दिलेली असून सदर अंदाजपत्रक हे सन १९९०-९१ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यांत आलेले आहे.

आदेशाप्रमाणे सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.६/१०८७/९१, दि.१२.०९.९१ ला दैनिक स्वरगंगा व मुकद्दस या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा विकण्यांत आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ दोन निविदा वसूल झाल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.कैसर खान - अंदाजपत्रकीय दराने
२) श्री.सिद्दीकी आय.जे. - ०.५०% कमी दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराचे श्री.सिद्दीकी आय.जे.यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३४ निजामगंज येथे १५० मी.मी.व्यासाची लाईन काढून त्या ठिकाणी २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराचे गुत्तेदार श्री.सिद्दीकी आय.जे.यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२१५/४ :**

सहाय्यक आयुक्त- १ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वाचनालयातील सध्या लिपीक संवर्गातील जे कर्मचारी काम करतात त्यांना वाचनालयासंबंधी ज्ञान असणे आवश्यक आहे. करिता ६ लिपिकांची पदे खालीलप्रमाणे रुपांतरीत करण्यांत यावी.

१. तांत्रिक सहाय्यक - २ पदे
२. निर्गम सहाय्यक - २ पदे
३. ग्रंथालय सहाय्यक - २ पदे

तथापि सदरील पदे रुपांतरीत केल्यामुळे त्यांची पदनाम वरीलप्रमाणे होईल. त्यांना शासनाने ठरवून दिलेली वेतनश्रेणी लागू होणार नाही. तसेच सदरील पदनाम देतांना आवश्यक अर्हता, अनुभव व जेष्ठता विचारात घेण्यांत यावी.

करिता वरीलप्रमाणे वाचनालयातील ६ लिपिक पदाचे तांत्रिक सहाय्यक, निर्गम सहाय्यक, ग्रंथालय सहाय्यक हे पदनाम बदल्याबाबत प्रस्ताव निर्णयास्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वाचनालयात सध्या लिपिक संवर्गात काम करणाऱ्या ६ लिपिकांची पदे १) तांत्रिक सहाय्यक-२ पदे, २) निर्गम सहाय्यक-२ पदे, ३) ग्रंथालय सहाय्यक-२ पदे या प्रमाणे पद नाम बदलण्यास व रुपांतरीत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वाचनालयासाठी सहाय्यक ग्रंथपालाचे एक पद निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनातर्फे सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्यांत यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.२१६/५ :**

झोन क्र.४ मधील विविध ठिकाणी असलेल्या संडासाची दुरुस्ती करणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.१,२९,४९५.०० चे सन १९९०-९१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत

आले असून प्राप्त सरकारी अनुदानातून सदर काम करणे बाबत मा.आयुक्त साहेबांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२/५४८/९१, दि.२९.०५.९१ द्वारे दैनिक लोकधर्म व देवगिरी तरुण भारत दैनिकात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविले असता एकूण सहा निविदा विकण्यास आल्या होत्या. त्यापैकी फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता दर खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.एम.एम.बेग - ५% कमी
२) श्री.आर.एल.बारवाल - ४.४४% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराचे श्री.एम.एम.बेग यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र.४ मधील विविध ठिकाणी असलेल्या संडासाची दुरुस्ती करणे बाबतचे कामासाइी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराचे गुत्तेदार श्री.एम.एम.बेग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२१७/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नगरनाका ते जालना नाका पर्यंत वाहतुक दिशा दर्शक (बिल्डर्स) एकूण १५ नग पुरवठा करणे आणि बसवणेच्या कामासाठी एस.टी.बी.डी.एस.आर.सन १९८८-८९ च्या दरसुचीनुसार र.रु.३३,०७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असून सदर खर्च विशेष शासकीय अनुदान (एस.टी.बी.डी.) सन १९९०-९१ हया वर्षाच्या तरतूद मधून करण्यांत येईल त्यास मान्यता मिळावी.

सदर कामासाठी दै.लोकमत टाईम्स आणि दैनिक सिटीजन्स, औरंगाबाद हया वर्तमानपत्रात जाहिरात देवून मोहोरबंद निविदा मागविण्यांत आल्या असता शेवटच्या क्षणापर्यंत दोनच मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या असून सदर निविदा दि.२४.०७.९१ रोजी मे.मुख्य लेखा परिक्षक मे.अतिरिक्त शहर अभियंता आणि विद्युत ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यांत आल्या असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | प्राप्त दर |
|---|---|---|
| १. | मे.न्युक्लिऑनिक्स, पुणे | ७% जास्त |
| २. | मे.फरानी इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स लॅब, औरंगाबाद | ६.०६% कमी |

याप्रमाणे प्राप्त निविदांची छाननी केली असता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची मे.फरानी इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स लॅब, औरंगाबाद यांची असून अंदाजपत्रक दरापेक्षा ६.०६% कमी दराची आहे. तेव्हा वरील काम वरील दरामध्ये वरील एजन्सी कडून करुन घेण्यांस मान्यता मिळावी. प्रस्ताव विचारार्थ आणि प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगर नाका ते जालना नाका पर्यंत वाहतुक दिशा दर्शक (ब्लिंकर्स) एकूण १५ नग पुरवठा करणे आणि बसवणेच्या कामासाठी एस.टी.बी.डी.एस.आर.सन १९८८-८९ चे दरसुची अ नुसार तयार करण्यांत आलेले र.रु.३३,०७५/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च विशेष शासकीय अनुदान (एस.टी.बी.) सन १९९०-९१ हया वर्षाच्या तरतूदी मधून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.०६% कमी दराचे मे.फरानी इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स लॅब, औरंगाबाद यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२१८/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९१-९२ हया वर्षासाठी लागणारे विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खाते (विद्युत) दरसुची सन १९८९-९० अ नुसार रक्कम रु.४,८४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदर खर्च हा नवीन विद्युत सहित्य खरेदी हया शिर्षकामधून करण्यांत येईल त्यास मान्यता मिळावी.

सदर कामासाठी दैनिक मराठवाडा आणि दैनिक मुकदस हया स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता मुदतीच्या आत एकूण चार कोऱ्या निविदा विकल्या गेल्या असून शेवटच्या क्षणापर्यंत चारही मोहोरबंद निविदा हया कार्यालयात प्राप्त झाल्या असता सदर निविदा दि.२२.०८.९१ रोजी दुपारी ४.०० वाजता मे.मुख्य लेखापरिक्षक, अतिरिक्त शहर अभियंता आणि विद्युत ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यांत आल्या असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | ॲटम क्रमांक | साहित्यांचे नांव | मे.सत्या इले., औरंगाबाद. | मे.पगारिया इंटरप्राईजेस, औरंगाबाद. | मे.मेहता ट्रडर्स, मुंबई | मे.चिंतामणी ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | बजाज मेक | बजाज मेक | बजाज मेक | बजाज मेक |
| १ | १५० वॅ.एच.पी.एस.व्ही. बल्ब (१०० नग) | | ५०८/- (ब) | ५१९/- (ब) | ५२८/- (ब) | ७५०/- (ब) |
| २ | ४०० वॅ.एच.पी.एस.व्ही. बल्ब (२५ नग) | | ६८८/- (ब) | ७२३/- (ब) | ७०९/- (ब) | ९४५/- (ब) |
| ४ | २५० वॅ.एच.पी.एस.व्ही. इग्नेटर (५० नग) | | १७०/- (ब) | १८५/- (ब) | १६९/- (ब) | १६४.९४ (ब) |
| ५ | १५० वॅ.एच.पी.एस.व्ही. ब्लॉस्ट (५० नग) | | ४१९/- (ब) | ४५३/- (ब) | ३८९/- (ब) | ४३९.८९ (ब) |
| ६ | २५० वॅ.एच.पी.एस.व्ही. ब्लॉस्टर (१०० नग) | | ५९५/- (ब) | ६४४/- (ब) | ५२९/- (ब) | ६१७.३९ (ब) |
| ७ | ४०० वॅ.एच.पी.एस.व्ही. ब्लॉस्ट (२५ नग) | | ७८५/- (ब) | ८४७/- (ब) | ७७७/- (ब) | ८१८.५४ (ब) |
| ८ | १२५ वॅ.एच.पी.एस.व्ही. बल्ब (४०० नग) | | ११५/- (ब) | १०७.९१ (ब) | १०९/- (ब) | १०९/- (ब) |
| ९ | २५० वॅ.एच.पी.एस.व्ही. बल्ब (२०० नग) | | २५०/- (ब) | २६३/- (ब) | २६९/- (ब) | २६०/- (ब) |
| १० | १२५ वॅ.एच.पी.एस.व्ही. ब्लॉस्ट (४०० नग) | | २६६/- (ब) | २८८/- (ब) | २५७/- (ब) | २७७/- (ब) |
| ११ | २५० वॅ.एच.पी.एस.व्ही. ब्लॉस्ट (१०० नग) | | ४६३/- (ब) | ४५७/- (ब) | ३९९/- (ब) | ४३८.९० (ब) |

याप्रमाणे प्राप्त निविदांची छाननी केली असता तुलनात्मकदृष्ट्या मे.सत्या इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचे ॲटम क्र.१, ३ आणि ९ मेसर्स पगारिया इंटरप्राईजेस, औरंगाबाद यांचे ॲटम क्र.८ मेसर्स मेहता ट्रेडर्स, मुंबई यांचे ॲटम क्र.५,६,७ आणि १० मेसर्स श्री.चिंतामणी ट्रेडींग कंपनी यांचे ॲटम क्रमांक-४ चे दर सर्वात कमी आहेत.

१. तरी मेसर्स सत्या इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचेकडून खालील
ॲटम क्र.१,१२५ वॅट एच.पी.एस.व्ही.बल्ब (बजाज) १०० नग प्रति नग रु.५०८/-
ॲटम क्र.३,४०० वॅट एच.पी.एस.व्ही.बल्ब (बजाज) २५ नग प्रति नग ६८८/-
ॲटम क्र.९.२५० वॅट एच.पी.एस.व्ही.बल्ब (बजाज) २०० नग प्रति नग - २५०/-.

२. मे.पगारिया इंटरप्राईजेस, औरंगाबाद यांचेकडून खालील
ॲटम क्र.८.१२५ वॅट एच.पी.एस.व्ही.बल्ब (क्रॉम्प्टन) ४०० नग प्रति नग रु.१०७.९१.

३. मेसर्स मेहता ट्रेडर्स, मुंबई यांचेकडून खालील
ॲटम क्र.५ १५० वॅट एच.पी.एस.व्ही.ब्लॉस्ट (बजाज) ५० नग प्रति नग रु.३८९/-
ॲटम क्र.६.२५० वॅट एच.पी.एस.व्ही.ब्लॉस्ट (बजाज) १०० नग प्रति नग रु.५२९/-
ॲटम क्र.७.४०० वॅट एच.पी.एस.व्ही.ब्लॉस्ट (बजाज) २५ नग प्रति नग रु.७७७/-
ॲटम क्र.१० वॅट एच.पी.एम.व्ही.ब्लॉस्ट (बजाज) ४०० नग प्रति नग रु.२५७/-
ॲटम क्र.११.२५० वॅट एच.पी.स.व्ही.ब्लॉस्ट (बजाज) १०० नग प्रति नग रु.३९९/-

४. मेसर्स श्री.चिंतामणी ट्रेडींग कं.औरंगाबाद यांचेकडून खालील
ॲटम क्र.४.२५० वॅट एच.पी.एस.व्ही.इग्नेटर (बजाज) ५० नग प्रति नग रु.१६४.९४/-

यांप्रमाणे वरील दरामध्ये वरील एजन्सीच्या नांवासमोर दर्शविलेले विद्युत साहित्य खरेदी करणे योग्य राहील. प्रस्ताव विचारार्थ आणि मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ वर्षासाठी लागणारे विद्युत साहित्य खरेदी करिता तयार करण्यांत आलेल्या र.रु.४,८४,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

या कामापैकी अनुक्रमांक - ४ (२५० वॅट एच.पी.एस.व्ही.इग्नेटर-५० नग) तुर्त स्थगित ठेवण्यांत यावा. असे सर्वानुमते ठरले. आणि उरलेल्या अ.क्र.१ ते ३ व ५ ते ११ ॲटम करिता वसुल झालेल्या दरपत्रकापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे खालील दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| ॲटम क्रमांक | साहित्यांचे नांव | तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | १५० वॅट.एच.पी.एस.व्ही. बल्ब (१०० नग) | ५०८/- (ब) बजाजमेक | मे.सत्या इले., औरंगाबाद. |
| ३ | ४०० वॅट.एच.पी.एस.व्ही. बल्ब (२५ नग) | ६८८/- (ब) | मे.सत्या इले., औरंगाबाद. |
| ५ | १५० वॅट.एच.पी.एस.व्ही. ब्लॉस्ट (५० नग) | ३८९/- (ब) | मे.मेहता ट्रडर्स, मुंबई |
| ६ | २५० वॅट.एच.पी.एस.व्ही. ब्लॉस्ट (१०० नग) | ५२९/- (ब) | मे.मेहता ट्रडर्स, मुंबई |
| ७ | ४०० वॅट.एच.पी.एस.व्ही. ब्लॉस्ट (२५ नग) | ७७७/- (ब) | मे.मेहता ट्रडर्स, मुंबई |
| ८ | १२५ वॅट.एच.पी.एस.व्ही. बल्ब (५०० नग) | १०७.९१/- (क्रॉम्प्टन) | मे.पगारिया इंटरप्राईजेस, औरंगाबाद. |
| ९ | २५० वॅट.एच.पी.एस.व्ही. बल्ब (२०० नग) | २५०/- (ब) | मे.सत्या इले., औरंगाबाद. |
| १० | १२५ वॅट.ब्लॉस्ट एच.पी.एम.व्ही. बल्ब (५०० नग) | २५७/- (ब) | मे.मेहता ट्रडर्स, मुंबई |
| ११ | २५० वॅट.एच.पी.एम.व्ही. ब्लॉस्ट (१०० नग) | ३९९/- (ब) | मे.मेहता ट्रडर्स, मुंबई |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१९/८ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी पुन्हा प्रस्ताव सादर केला आहे की, मा.आयुक्तांनी मोदी झेरॉक्स मशीन हे महाराष्ट्र शासन रेट कॉन्ट्रॅक्ट दरात उपलब्ध आहेत. व त्यांची गुणवत्ता व दर्जा पण चांगला आहे व इतर झेरॉक्स मशीनच्या मानाने किंमत पण कमी आहे. करिता स्थायी समिती यापुर्वी मंजूर झालेल्या कॅनान झेरॉक्स मशिन खरेदी बाबतच्या प्रस्तावावर

पुन्हा विचार करुन मोदी झेरॉक्स मशीन मॉडेल १०२५ (१:१) रु.६५,५३०.०० व इतर खर्च रु.१४,०१०.०० असे एकूण रु.७९,५४०/- एवढा खर्च येईल.

करिता मोदी झेरॉक्स मशिन १०२५ (१:१) खरेदीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव पुन्हा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोदी झेरॉक्स मशिन हे महाराष्ट्र शासन रेट कॉन्ट्रॅक्ट दरात उपलब्ध असून त्याची गुणवत्ता व दर्जा चांगला असल्याने व इतर झेरॉक्स मशिनच्या मानाने किंमत पण कमी असल्यामुळे मोदी झेरॉक्स मशिन मॉडेल १०२५ (१:१) रु.६५,५३०.०० व इतर खर्च रु.१४०१०.०० असे एकूण रु.७९,५४०.०० ला खरेदी करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२२०/९ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, कबीर नगर स्लम भागात ३५० मी.मी.व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर.सी.सी.गटार बसविण्याचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे १९८९.९० चे दरसुचीनुसार अंदाजपत्रक रु.९८,४००/- चे तयार करण्यांत आले असून मा.आयुक्त महानगरपालिका यांनी दि.०८.०५.९१ रोजी प्रशासकीय मान्यता दिल्यानुसार कार्यालयाची निविदा सूचना क्र.७ (१९९१-९२) द्वारे स्थानिक वृत्तपत्र दैनिक देवगिरी तरुण भारत व दैनिक सायंकाळ लोकधर्म मध्ये प्रसिध्दीस देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण ६ निविदा विकण्यांत आल्या व मोहोरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजित तारखेस फक्त (२) निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मेसर्स शैलेश कन्स्ट्रक्शन | - | १६.२०% कमी |
| २. | श्री.एस.के.मिसाळ | - | ४.५% जास्त |

मे.शैलेश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर तुलनात्मदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १६.२०% कमी आहे. परंतू या ठेकेदाराने नियमानुसार १% अनामत जमा केलेले नसल्यामुळे श्री.एस.के.मिसाळ यांचे ४.५% जास्त दराचे टेंडर मंजूरीसाठी शिफारस केली असता मा.आयुक्त यांनी अतिरिक्त शहर अभियंता व मुख्य लेखा परिक्षक यांना ठेकेदारांसोबत वाटाघाटी करण्याचे आदेश दिल्यानुसार श्री.एस.के.मिसाळ यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीचे वेळी वरील काम ४.५% अधिक दराऐवजी अंदाजपत्रकाचे दराप्रमाणे करण्यास तयार असल्याबाबत लेखी सम्मती दि.२२.०९.९१ चे पत्राद्वारे दिलेली आहे. त्यानुसार श्री.एस.के.मिसाळ यांचे दरपत्रकाप्रमाणे टेंडर मंजूर करण्याचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कबीर नगर स्लम भागात ३५० मी.मी.व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर.सी.सी.गटार बसविण्याचे कामसाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे टेडर गुत्तेदार श्री.एम.के.मिसाळ यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीचे वेळी वरील काम ४.५% अधिक दराऐवजी अंदाजपत्रकीय दराप्रमाणे करण्यास लेखी सम्मती दिल्यानुसार श्री.एस.के.मिसाळ यांचे अंदाजपत्रकीय दराचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२२१/१० :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, इंदिरानगर स्लम भागात खांडकी पेव्हिंगचे काम करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे १९८९-९० चे दरसुची नुसार अंदाजपत्रक रु.९९,४२५/- चे तयार करण्यांत आले. ज्यास दि.०२.१२.९० ला मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी मंजूरी दिल्यानुसार कार्यालयाची निविदा सूचना क्र.१, दि.१९.१२.९० दुसऱ्या वेळेस निविदा सूचना क्र. (१५), दि.११.०३.९१ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता दोन्ही वेळेस सर्वात कमी दराची निविदा अनुक्रमे ३३% कमी व ३०.२% कमी अशा दराच्या निविदा प्राप्त झाल्या व सदरील दर कर करण्यास अयोग्य असल्यामुळे व २०% पेक्षा जास्त कमी दराचे टेन्डर स्विकारावयाचे नाही असे स्थायी समितीत ठरल्याप्रमाणे मा.आयुक्त, महानगरपालिका यांचे आदेशाप्रमाणे वरील कामासाठी कार्यालयाची निविदा सूचना क्र.७ (१९९१-९२) दै.देवगिरी तरुण भारत व सायंदैनिक लोकधर्म मध्ये प्रसिध्दीस देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोरी निविदा विकण्याची अंतिम दिनांक ०८.०८.९१ पर्यंत एकूण (२४) निविदा विकण्यांत आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजित तारखेस फक्त (१२) निविदा प्राप्त झाल्या. व प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कैसर खॉन | - | १७.८६% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| २. | श्री.मिर हिदायत अली | - | २७.३०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ३. | श्री.सै.रफिकुद्दीन | - | २६.२५% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ४. | श्री.एन.अे.अन्सारी | - | २३.७८६% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ५. | श्री.बी.आर.आनंद | - | १८.५% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ६. | श्री.अे.एम.फारुकी | - | २७.२०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ७. | श्री.अब्दुल खालेक | - | १५% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ८. | श्री.से.सिराजुद्दीन | - | १८.१०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ९. | श्री.एस.के.मिसाळ | - | १९.९५% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| १०. | श्री.बशीर खान लालखान | - | २१.५% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ११. | श्री.झफर खॉन | - | २६.२५% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| १२. | श्री.सै.गयासुद्दीन | - | १७% अंदाजपत्रकापेक्षा कमी |

निविदा उघडल्यानंतर त्यात तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २७.३०% कमी दराची निविदा श्री.मिर हिदायत अली यांची निविदा आहे. करिता श्री.मिर हिदायत अली यांची २७.३०% कमी दर असलेली निविदा स्विकारणेचा प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर स्लम भागात खांडकी पेव्हींगचे काम करणेसाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.३०% कमी दराचे गुत्तेदार श्री.मिर हिदायत अली यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२२२/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, करीम कॉलनी भागात "अंकुर नर्सिंग होम" समोर खांडकी पेव्हींग करणे बाबतच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु.६४,४५०/- चे तयार करण्यांत आले आहे.

सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.करीम कॉलनी भागात अंकुर नर्सिंग होम समोर खांडकी पेव्हींग करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.६४,४५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२२३/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, गरमपाणी येथे खाम नदिवर पाईप कल्व्हर्ट बांधणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिति बैठक दि.०६.०८.९० रोजी विषय क्र.१०२/२ प्रमाणे अंदाजपत्रक र.रु.४,३७,४३०/- चे अंदाजपत्रकास छावणी प्रशासनाने ५०% अनुदान देण्याची हमी दिल्यास काम करता येईल. या अटीवर सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

सन १९९१-९२ च्या बजेटमध्ये या कामासाठी ५.०० लाख रुपयाची तरतूद आहे. परंतू हे काम करण्यासाठी र.रु.६,८५,०००/- उरलेल्या रकमेची तरतूद १,८५,०००/- हे पुढील वर्षामध्ये सन १९९१-९२ मध्ये करावी या धर्तीवर या कामाला मंजूरी झाली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.३/जा.क्र./मनपा/बांधवि-१/३०१४/९१, दि.१६.०७.९१ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण पाच निविदा विकल्या गेल्या त्यापैकी पाच निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि.०२.०८.९१ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.बी.आर.आनंद | - | ८% जास्त |
| २. | श्री.डी.अजितसिंग | - | ४.९९% जास्त |
| ३. | श्री.कुलवंतसिंग | - | ७% जास्त |
| ४. | श्री.एस.अे.नवाब | - | ९.७% जास्त |
| ५. | श्री.एस.एच.असोशिएटस | - | ११% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.९९% जात दराची निविदा श्री.डी.अजितसिंग यांची आहे. परंतू सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार तुलना केली असता हे दर २% कमी येत आहे. तरी श्री.डी.अजितसिंग याची निविदा ४.९९% जास्त दराची स्विकारण्यास प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गरमपाणी येथे खामनदीवर पाईप कल्व्हर्ट बांधणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराचे गुत्तेदार श्री.डी.अजित सिंग यांचे निविदापत्रकास सर्वानुमत मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२२४/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांचेकडून खरेदी केलेले २०० एम.टी.सिमेंट रेल्वेस्टेशन ते बायजीपुरा मनपा गोडावून पर्यंत वाहतूकीसाठी दि.१८.०९.९१ रोजी दरपत्रक मागविण्यांत आले होते व त्यात एकूण सात दरपत्रके वसूल झाले असून तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे म्हणजे प्रति टन रु.४०/- प्रमाणे श्री.व्ही.ए.खान यांचे दरपत्रक होते व त्या आधारे २०० मे.टन सिमेंट वाहतुक करण्यांत आले. त्यानंतर स्थायी समितीमध्ये सिमेंट खरेदी बाबत प्रस्ताव क्र.१४६/१२ द्वारे

दि.२५.०९.९१ रोजी खरेदी बाबत चर्चा होऊन २०० मे.टन ऐवजी १००० मे.टन सिमेंट खरेदीस मान्यता मिळाली होती. व त्या आधारे बाकी ८०० मे.टन सिमेंट वरील दराने म्हणजे प्रति मे.टन रु.४०.०० प्रमाणे व्ही.ए.खान यांच्या कडून वाहतुक करण्यांत आले. तरी ८०० मे.टन वाहतुकीस रु.३२००.०० खर्चास तसेच वाहतुक ठेकेदार श्री.व्ही.ए.खान यांच्या दरपत्रकास कार्योत्तर मान्यता मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांचेकडून खरेदी केलेले १००० मे.टन सिमेंट रेल्वेस्टेशन ते बायजीपुरा मनपा गोडावून पर्यंत वाहतुक करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे म्हणजे प्रति टन रु.४०.०० प्रमाणे गुत्तेदार श्री.व्ही.ए.खान यांचे निविदापत्रकास तसेच ८०० मे.टन सिमेंट वाहतुकीस रु.३२००.०० खर्च करण्यात आल्यामुळे या रकमेस व श्री.व्ही.ए.खान यांच्या दरपत्रकास सर्वानुमते कार्योत्तर मंजूरी देण्यांत येते.